मध्यप्रदेश संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ९

संशोधनमुक्तावलि

[सर दुसरा]

प्रस्तुत ग्रंथांत ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकापर्यंत सुमारें दीड हजार वर्षांच्या कालांतील सातवाहन, नल, वाकाटक, विष्णुकुंडी, राष्ट्रकूट, पांडव, परमार व यादव या राजवंशांविषयी नवीन माहिती आली आहे.

तसेंच यांत सुविख्यात संस्कृत कवि शूद्रक, कालिदास व भवभूति यांच्या कालाविषयीच्या व ग्रंथांविषयीच्या कांही समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

"म. म. मिराशींनी केलेल्या संशोधनाचा विचार केल्याशिवाय मध्ययुगीन भारताचा सुसंगत इतिहास इतउत्तर कोणासहि लिहितां येणें शक्य नाही, एवढें त्यांच्या लेखांचें महत्त्व आहे."

लोकनायक डॉ. **माधव श्रीहरि अणे**

लेखक

वा. वि. मिराशी

किंमत चार रुपये

मध्यप्रदेश संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ६

संशोधनमुक्तावलि

सर दुसरा

लेखक

महामहोपाध्याय वासुदेव विष्णु मिराशी, एम्. ए.

माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर, आणि
विदर्भ महाविद्यालय, अमरावती; फॅकल्टी ऑफ आर्ट्‌सचे
प्रमुख (डीन) आणि संस्कृत, पाली व प्राकृत विभागाचे
अध्यक्ष, नागपूर विश्वविद्यालय.

*

मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर

प्रथमावृत्ति]　　किंमत चार रुपये　　[१९५७

प्रकाशक :

देवीदास गोविंद लांडगे,
बी. ए., एल्एल्. बी.,
चिटणीस, मध्यप्रदेश संशोधन मंडळ,
नागपूर.

मुद्रक :
पां. ना. बनहट्टी, बी. एस्सी.,
नारायण मुद्रणालय, धनतोली,
नागपूर.

माझे प्रिय मित्र

कै. हरि नारायण नेने, एम्. ए.

महानुभावीय वाङ्मयाचे सुविख्यात संशोधक,

यांचे पूज्य स्मृतीस

सादर समर्पण

अनुक्रमणिका

प्राचीन भारतांतील स्त्रीरत्नें

ग्रंथपरीक्षण

परिशिष्ट

पुरस्कार

'संशोधनमुक्तावली'च्या पहिल्या सरानंतर अल्पावधींतच हा दुसरा सर जनतेपुढे सादर करण्याचा सुयोग मध्यप्रदेश संशोधन मंडळाला लाभला ही आनंदाची गोष्ट आहे. 'मुक्तावली'च्या पहिल्या सरावर अनेक चिकित्सक विद्वान् व अधिकारी पुरुषांनी उत्कृष्ट अभिप्राय दिले, त्यामुळें या मंडळाला हा दुसरा सर प्रकाशित करण्यास उत्तेजन मिळालें. महामहोपाध्याय मिराशी यांनी अद्ययावत् केलेल्या परिश्रमाचा परामर्श घेऊन भारताचे राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी गतवर्षी मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेच्या वार्षिक समारंभांत त्यांना ताम्रपट व शाल देऊन त्यांचा सत्कार केला, ही गोष्ट मंडळाला भूषणावह व अभिमानास्पद वाटते.

'मुक्तावली'च्या या दुसऱ्या सरांत दोन भाग आहेत; पहिल्या भागांत संस्कृत वाङ्मयान्तर्गत सुप्रसिद्ध नाटकांतील कांही वादग्रस्त मुद्यांवर, व दुसऱ्या भागांत कांही ऐतिहासिक विषयांवर वेळोवेळीं लिहिलेल्या लेखांचा संग्रह आहे. या सर्व लेखांत लेखकाची चिकित्सकबुद्धि, तादात्म्य व चिकाटीहि दिसतेच, परंतु तदनुषंगाने त्यांना किती अवांतर ज्ञानाचा उपयोग करावा लागतो याचीहि प्रतीति होते. लेखकाच्या विद्याव्यासंगाचें क्षेत्र किती विस्तीर्ण, विविध व अगाध आहे याचा परिचय झाला म्हणजे सामान्य वाचकाला विस्मय वाटतो. हे लेख या विषयांत काम करूं इच्छिणाऱ्या तरुण व उत्साही विद्यार्थ्यांना मार्गदर्शक होतील, यांत शंका नाही.

या पुस्तकांतील संशोधनपर लेख असे आहेत की त्यावरून इतिहासशास्त्राचें (Science) स्वरूप ध्यानांत येतें. प्राचीन काळीं इतिहासाची कल्पना इति–ह–आस अशी होती. त्यांत दंतकथा, आख्यायिका आणि मागे घडलेल्या गोष्टी, कथेच्या रूपाने सांगितलेला नीतिबोध इत्यादि विषयांचा समावेश होत असे. याचें प्रत्यंतर 'राजतरंगिणीं'तील पुढील श्लोकावरून येतें–

कोऽन्यः कालमतिक्रान्तं नेतुं प्रत्यक्षतां क्षमः ।
कविप्रजापतींस्त्यक्त्वा रम्यनिर्माणशालिनः ॥

(गतकालाला पुन्हा डोळ्यापुढे आणून देण्यास रमणीयत्व निर्माण करणाऱ्या ब्रम्हदेवावांचून आणि कवींवांचून कोण समर्थ आहे ?)

गतकाळीं घडलेला वृत्तांत कवीकडे सोपविल्यावर त्यांतून वस्तुनिष्ठतेला अर्धचंद्र मिळाला तर काय आश्चर्य ? कवीकडून मनोरंजन व सदुपदेशाची प्राप्ति झाली म्हणून कविकृति कांही इतिहास होणार नाही. शास्त्रीय दृष्टीने इतिहास या शब्दाचा अर्थ घेतला तर त्यांत येणारा वृत्तांत वस्तुनिष्ठच असला पाहिजे. वास्तविक घटना शोधून काढण्यास कोरीव लेख, ताम्रपट, बक्षीसपत्रें इत्यादि मानवी समाजाच्या प्रत्यक्ष व्यवहारांत आलेली सामग्री हीच महत्त्वाची असते. त्यांतून वस्तुनिष्ठ इतिहास काढण्याचें कार्य अर्वाचीन काळांत संशोधक कसा करतो हें या पुस्तकांतील लेखांवरून स्पष्ट होईल.

या बाबतींत आपण किती मागासलेले आहोंत हें पाश्चात्यांकडे पाहिलें म्हणजे ध्यानांत येतें. आधुनिक पाश्चात्य संस्कृतीचा प्रारंभ ग्रीस देशांत झाला, असा साधारण समज आहे. परंतु ग्रीक संस्कृतीच्या पूर्वी तिचा खरा उगम बॅबिलोनिया, असीरिया व इजिप्तमध्ये सापडतो. पण हा शोध कसा लागला ? त्या शोधाचीं साधनें म्हणजे शेकडों Cuneiform (कीलकलिपी) मध्ये लिहिलेले लेख व hyroglyphic

(चित्रलिपी)मध्ये कोरलेले लेख, तेथील पडक्या व उद्ध्वस्त झालेल्या राजवाड्यांत व देवालयांत सापडले ते होत. प्रथमतः त्या दोन्ही लिपींतील अक्षरें उलगडून त्यांतून अर्थनिष्पत्ति कशी करावी हीच मोठी अडचण उपस्थित झाली. १८०२ सालीं एका George Friedrich Grotefend नांवाच्या जर्मन संशोधकाने Cuneiform लिपीचा तुलनात्मक व सूक्ष्म अभ्यास करण्यास सुरुवात केली व त्यानंतर सुमारें अर्ध शतकाच्या कालावधींत Rawlinson व Hincks यो दोघां इंग्रजी, व Julius Oppert या जर्मन संशोधकांनी Grotefend ने अंगिकारलेलें कार्य तडीस नेलें. त्याचप्रमाणे Jean Francois Champollion नांवाच्या एका फ्रेंच संशोधकाने hyroglyphics लिपी उलगडून अर्थ लावण्याच्या बाबतींत यश मिळविलें. म्हणून ह्या १९ व्या शतकांतील घटना ऐतिहासिक संशोधनाच्या क्षेत्रांत संस्मरणीय गणल्या जातात.

याप्रकारें या वैज्ञानिक युगांत इतिहासनिर्मितेचें श्रेय कवींकडे न जातां महामहोपाध्यास मिराशी यांच्यासारख्या कसलेल्या संशोधकांच्या पदरांत पडतें.

एका इंग्रजी ग्रंथकाराने History is past politics and politics is present history असें म्हटलें आहे. हें वचन कदाचित् ५० वर्षांपूर्वी खरें ठरलें असतें; परंतु सांप्रतकाळीं इतिहास म्हणजे केवळ वीरपुरुष व राजकारणी मुत्सद्दी यांचींच चरित्रें नसून त्यांत सामाजिक, धार्मिक, आर्थिक, कलात्मक अशा जीवनाच्या अनेक पैलूंचा समावेश होतो. या दृष्टीने आपल्या भारतीय प्राचीन इतिहासाचा व्यापक व गहन अभ्यास करणें अवश्य आहे. भारतीय संस्कृति अनेक शतकें परकीय लष्करी व सांस्कृतिक हल्यांना तोंड देऊन आजतागायत जगली आहे असें म्हणून आपण अभिमानाने डुलत असतों. परंतु आपल्या संस्कृतीची दृढता व चिकाटी कशांत आहे याचें रहस्य शोधून काढण्याची प्रवृत्ति आपल्या विश्व-

विद्यालयांतूनहि फारशी दिसत नाही. भौतिकशास्त्राप्रमाणे, समाजशास्त्राचा अभ्यासहि राष्ट्रीय जीवनाला पोषक आहे. महामहोपाध्याय मिराशी यांच्यासारखे उच्च दर्जाचे चिकित्सक विद्वान् विपुल संख्येने प्रत्येक पिढींत तयार करणें किती अवश्य आहे, याचा विचार शिक्षणक्षेत्रांतील श्रेष्ठ विद्वान् व अधिकारी वर्ग यांनी केला पाहिजे.

हा 'मुक्तावली'चा दुसरा सर पहिल्या सराप्रमाणेच विद्वज्जनांच्या आदरास पात्र होऊन तरुण विद्यार्थ्यांसही स्फूर्तिदायक होईल याविषयीं शंका नाही. महामहोपाध्याय मिराशी यांचें कार्य आणखी अनेक वर्षे असेंच अबाधित चालो, अशी आशा प्रकट करून मी या ग्रंथाचा आदरपूर्वक पुरस्कार करतों.

नागपूर
१-१-१९५७

भवानीशंकर नियोगी
अध्यक्ष,
मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर

लेखकाचें हृद्गत

तीन वर्षांपूर्वी मध्यप्रदेश संशोधन मंडळाने माझ्या सोळा संशोधनपर मराठी लेखांचा संग्रह 'संशोधनमुक्तावलि, सर पहिला' या नांवाने प्रसिद्ध केला. त्याचें परीक्षण करतांना अनेक विद्वानांनी त्यांतील लेखांविषयी प्रशंसोद्गार काढले, आणि त्या 'मुक्तावली'चे आणखी 'सर' प्रसिद्ध व्हावे अशी इच्छा प्रदर्शित केली. तदनुसार मंडळ आणखी वीस लेखांचा हा दुसरा सर प्रकाशित करीत आहे.

प्रस्तुत भागांत खिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून खिस्तोत्तर तेराव्या शतकापर्यंत सुमारें दीड हजार वर्षांच्या कालांतील सातवाहन, नल, वाकाटक, विष्णुकुंडी, राष्ट्रकूट, पांडव, परमार व यादव या राजवंशांविषयी नवीन माहिती आली आहे. प्रत्येक लेखाच्या आरंभीं प्रास्ताविक माहिती देऊन नंतर संशोधनाने तींत कोणती भर पडते तें सांगितलें आहे. म्हणून सामान्य वाचकांसहि हे लेख समजण्यास कठीण वाटणार नाहीत अशी अपेक्षा आहे. प्रस्तुत संग्रहांत केवळ राजवटीचें संशोधन आलें नसून धार्मिक, सामाजिक, कलाविषयक बाबींविषयींहि नवीन माहिती आढळेल असा मला भरवसा आहे. प्राचीन काळच्या कांही थोर राजस्त्रियांसंबंधी सविस्तर माहिती देण्याचा येथे केलेला उपक्रम वाचकांस आवडेल असें वाटतें.

या भागांत केवळ प्राचीन भारतीय इतिहासाचेंच संशोधन नसून त्यांत सुविख्यात संस्कृत कवि शूद्रक, कालिदास व भवभूति यांच्या कालाविषयीच्या व ग्रंथांविषयीच्या कांही समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला

आहे. बहुतेक लेख प्राचीन महाराष्ट्रीय राजे, राण्या, कवि, मुत्सद्दी वगैरें-संबंधी असल्यामुळे ते विशेषतः मराठी वाचकांना महत्त्वाचे व मनोरंजक वाटतील अशी आशा आहे.

या भागांतील लेख ज्या नियतकालिकांत प्रथम प्रसिद्ध झाले त्यांचा निर्देश प्रत्येक लेखाच्या आरंभीं केला आहे. या नियतकालिकांच्या संपादकांनी प्रस्तुत लेखांच्या पुनर्मुद्रणास परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

मध्यप्रदेश संशोधन मंडळाचे प्रमुख सभासद व महानुभावीय वाङ्मयाचे ख्यातनाम संशोधक कै. प्राचार्य हरि नारायण नेने यांच्याशीं माझा परिचय चाळीस वर्षांपूर्वी, ते फर्ग्यूसन कॉलेजांतून एम्. ए. च्या परीक्षेस बसले तेव्हा, प्रथम झाला. पुढे नोकरीच्या निमित्ताने आम्हा दोघांचें नागपुरीं वास्तव्य झाल्यामुळे त्या परिचयाचें स्नेहांत रूपांतर झालें. विद्वत्ता, सच्चारित्र्य, निरहंकारी व निर्मत्सरी वृत्ति, संशोधननैपुण्य इत्यादि त्यांच्या अंगच्या अनेक गुणांमुळे त्यांच्याविषयी मला सदैव वाटलेला आदर हा भाग त्यांच्या पूज्य स्मृतीस अर्पण करून मी व्यक्त करीत आहे.

मागीलप्रमाणे याहि संग्रहाच्या प्रकाशनास जुन्या मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांनी उदार देणगी दिली आहे. तसेंच पूर्वीप्रमाणे मध्यप्रदेश संशोधन मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर भवानीशंकर नियोगी यांनी या संग्रहास आपल्या मार्मिक पुरस्काराने भूषविलें आहे आणि मध्यप्रदेश संशोधन मंडळाने तो प्रकाशित करण्याचें धाडस केलें आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

वा. वि. मिराशी

संशोधनमुक्तावलि
सर दुसरा

१. संस्कृत वाङ्मय

संस्कृत 'मृच्छकटिक' नाटकासंबंधी कांही विचार*

संस्कृत वाङ्मयांतील '**मृच्छकटिक**' हें नाटक अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामान्यतः संस्कृत नाटकांतील विषय महाभारत-रामायणांतून घेतलेले असतात. त्यांत ऐतिहासिक कथानकाचा उपयोग केलेला असल्यास तें बहुधा एखाद्या राजाच्या अंतःपुरांतील प्रेमकलहावर उभारलेलें असतें. भवभूतीच्या 'मालतीमाधवा'सारखीं कांही थोडीं सामाजिक नाटकें संस्कृत वाङ्मयांत आहेत, पण त्यांतहि समाजाच्या वरच्या थरांतील पात्रेंच आढळतात. 'मृच्छकटिक' हें नाटक या सर्वांहून अगदी वेगळ्या तऱ्हेचें आहे. त्यांत गणिका, संवाहक, द्यूतकर, विट, चेट इत्यादि समाजाच्या खालच्या थरांतील पात्रें घातलीं आहेत. या वैशिष्ट्यामुळें हें नाटक New Attic Comedy च्या धर्तीवर रचलें होतें असा कांही पाश्चात्त्य विद्वानांनी तर्क केला होता; पण त्याला कांही आधार नाही.

---

* 'नवभारत', पुणें, डिसेंबर, १९५५.

'मृच्छकटिक' नाटकासंबंधी अनेक प्रश्न उपस्थित होतात. भासकृत 'चारुदत्त' नाटकाशीं त्याचें संविधानक, पात्रें, भाषा इत्यादिकांत आश्चर्य-कारक साम्य लक्षांत घेतां, शूद्रकाने भासाच्या नाटकाला वाढवून परिणत रूप दिलें, किंवा शूद्रकाच्या 'मृच्छकटिका'चीच 'चारुदत्त' ही संक्षिप्त रंगावृत्ति तयार करून कोणीं अज्ञात गृहस्थानें ती भासाच्या नांवावर प्रचलित केली—असे या बाबतींत दोन पक्ष संभवतात. अद्यापि या प्रश्नाचा निर्णय समाधानकारक रीतीने लागला नाही.* या शिवाय 'मृच्छकटिका'चा कर्ता शूद्रक हा केव्हा व कोठे होऊन गेला हाहि प्रश्न अद्यापि अनिर्णीतच आहे. हे झाले बहिरंग परीक्षणाचे प्रश्न. याशिवाय 'मृच्छकटिकां'तील संविधानक, त्यांतील पात्रांचे स्वभावविशेष, त्यांतील घटना घडण्यास लागणारा काळ इत्यादि अंतरंगप्रश्नहि विवाद्य झाले आहेत व त्यावर अनेकांनी लिहिलें आहे. 'सह्याद्रि' मासिकाच्या गेल्या वर्षीच्या (१९५४) दिवाळी-अंकांत (पृ. ५६५–५७४) श्री. पु. रा. लेले यांनी लिहिलेल्या लेखामुळे यांतील कांही अंतरंगप्रश्नांच्या विवेचनास पुनः चालना मिळाली आहे. या निमित्ताने प्रस्तुत नाटकविषयक कांही प्रश्नांची थोडीबहुत चर्चा करण्याचा प्रयत्न येथे करीत आहे.

'मृच्छकटिक' नाटकाचें कथानक घडून येण्यास किती काळ लागला याविषयीं भिन्न भिन्न मतें व्यक्त झालीं आहेत. श्री. लेले यांच्या मतें 'नाटकाची सुरवात झाल्यापासून तीन रात्री आणि एक दिवस एवढयाच मुदतींत नाटकाचें सगळें कथानक घडून आलेलें दिसतें.' याच्या उलट 'सत्यकथे'च्या जानेवारी १९५५ च्या अंकांतील लेखक श्री. बी. काश्यप म्हणतात की "सबंध 'मृच्छकटिक' नाटकांतील घटना पंधरवडयाहून अधिक काळांत व स्थूल मानाने तीन आठवडयांत घडल्या आहेत." (पृ. १०). 'मृच्छकटिक' नाटकांतील बहुधा सर्व अंकांत कालनिर्देशाचे उल्लेख अनेक ठिकाणीं आढळतात. त्यांचा साकल्याने विचार केल्यास हा प्रश्न समाधान-कारक रीतीने सोडविणें कठीण जाऊं नये.

'मृच्छकटिक' नाटकाचें कथानक नक्की कोणत्या महिन्यांत घडलें याची चर्चा कोणी केलेली मला माहीत नाही. म्हणून तो प्रश्न प्रथम घेऊं.

* या प्रश्नावर या लेखांत थोडा प्रकाश पाडण्याचा प्रयत्न केला आहे.

चारुदत्त व वसंतसेना यांची प्रथम दृष्टादृष्ट झाली ती कामदेवायतनोद्यानांत असें अनेक ठिकाणीं म्हटलें आहे.* ती अर्थातच कामदेवाच्या किंवा मदनाच्या उत्सवप्रसंगींच झाली असावी. प्राचीन काळच्या उत्सवांची एक यादी वात्स्यायनाच्या 'कामसूत्रां'त (४, ४२) आली आहे. तींत 'सुवसन्तक' नामक उत्सवाचा निर्देश आहे. 'कामसूत्रा'चा टीकाकार यशोधर याने 'सुवसन्तो मदनोत्सवः। तत्र नृत्यगीतवाद्यप्रायाः क्रीडाः' (सुवसन्त म्हणजे मदनोत्सव होय. या उत्सवांत नृत्य, गीत, वाद्य यांचें प्राचुर्य असलेल्या क्रीडा होतात) असें म्हटलें आहे. हा 'सुवसन्तक' म्हणजे सध्याचा वसन्तपञ्चमीचा उत्सव होय. हा सध्याहि माघ शुक्ल पञ्चमीस साजरा केला जातो. पण 'मृच्छकटिकां'त उल्लेखिलेला उत्सव हा नसावा. मदनोत्सवांत चारुदत्ताला पाहिल्यावर वसंतसेनेचें मन त्याच्यावर बसलें व तेव्हापासून तिने इतरांच्या मागणीस नकार देण्यास आरंभ केला असें पहिल्या अंकांतील (पृ. १६) शकाराच्या उक्तीवरून आपणांस कळतें. 'मृच्छकटिक' नाटकाचें कथानक त्यानंतर थोड्याच दिवसांनी घडून आलें असावें. तें घडलें तेव्हा उन्हाळा चांगलाच कडक भासूं लागला होता असें आठव्या अंकांतील (पृ. १३६–१३७) शकार व विट यांच्या भाषणावरून स्पष्ट दिसतें. 'पुष्पकरंडक उद्यानांत माझी गाडी लौकर घेऊन ये' असें शकाराने आपल्या चेटास बजावलें होतें. पण मध्यंतरीं घडलेल्या कांही घटनांमुळे, विशेषतः राजमार्गावर गाड्यांचा खूप जमाव झाल्यामुळे, दोनप्रहर झाले तरी तो आला नव्हता. तेव्हा शकार म्हणतो : 'चिरमस्मि बुभुक्षितः। मध्याह्ने न शक्यते पादाभ्यां गन्तुम्' (पृ. १३६) (मला पुष्कळ वेळापासून भूक लागली आहे. या दुपारच्या वेळीं पायीं चालत जाणें शक्य नाही.) त्यावर विटहि दुपारच्या उष्णतेचें खालील वर्णन करतो—'वृक्षाच्या छायेंत बसलेल्या गाई तोंडांतील गवताचा घास टाकून झोंप घेत आहेत. तहानलेले वनहरिण तळ्यांतील ऊन पाणी पीत आहेत. कडक उन्हाच्या भीतीने लोक नगरमार्गाने जात नाहीत. तेव्हा आपली गाडी कडक उन्हाने

---

* 'मृच्छकटिक' (डॉ. वा. गो. परांजपे यांनी संपादिलेली आवृत्ति), पृ. १६, २५, २७, २८, ३४, इ. पुढील संदर्भहि याच आवत्तीचे समजावे.

तापलेली जागा सोडून कोठे तरी छायेंत उभी राहिली असावी' (अंक ८, श्लो. ११). हें वर्णन अर्थातच वसंतऋतूंतील परिस्थितीला लागू पडणारें नाही. तेव्हा चारुदत्त व वसंतसेना यांची प्रथम दृष्टादृष्ट माघ शुक्ल पंचमीस झाली नसावी.

याशिवाय दुसऱ्या एका मदनोत्सवाचा उल्लेख वात्स्यायनाने याच उताऱ्यांत केला आहे. 'कामसूत्रा'चा टीकाकार यशोधर ह्या मदनोत्सवांत मदनाच्या मूर्तीचें पूजन केलें जातें* अशी माहिती देतो. हा उत्सव कोणत्या महिन्यांत होत असे हें त्याने सांगितलें नाही. पण इतर ग्रंथांतील उल्लेखां-वरून तो चैत्र शुक्ल त्रयोदशीस होई असें दिसतें. या तिथीला मदनत्रयो-दशी म्हणत व त्या दिवशीं अनङ्गपूजाव्रत केलें जाई. या प्रसंगीं नगराच्या बाहेरील उद्यानांत मदनाच्या मूर्तीची पूजा होऊन मोठी यात्रा भरत असे. या उत्सवाचा उल्लेख भवभूतीच्या 'मालतीमाधवां'तहि आला आहे. तेथील उत्सवाची सर्व व्यवस्था त्या त्या नगरांतील स्त्रियांच्या हातीं असे असें दिसतें.† या मदनोद्यानयात्रेच्या प्रसंगीं माधव व मालती यांची प्रथम भेट झाली. अशा उत्सवांतच वसंतसेना व चारुदत्त यांनी परस्परांना प्रथम पाहिलें असावें. त्यानंतर लौकरच 'मृच्छकटिकां'तील घटना घडून आल्या असाव्या. चैत्र महिन्यांत कडक उन्हाळयास सुरवात होत असल्यामुळे मागे उल्लेखिलेलें दोनप्रहरचें वर्णनहि या कालाला जुळणारें आहे.‡

या मदनोत्सवानंतर वसंतसेनेचें चारुदत्तावरील प्रेम वाढत गेलें व ती त्याची भेट घेण्याची संधि पाहूं लागली. मदनोत्सवानंतर सुमारें एक आठवड्याने चैत्र कृष्ण षष्ठीस 'मृच्छकटिक' नाटकाच्या कथानकास

* 'मदनोत्सवो मदनप्रतिकृतिपूजनम् ।' —कामसूत्र (काशी संस्कृत सीरिज), पृ. ४९.

† मकरन्द—वयस्य माधव, अद्य किल **सकलनगराङ्गनाजन-प्रवर्तितमहोत्सवा**भिराममदनोद्यानप्रतिनिवृत्तमन्यादृशमिव भवन्तमव-धारयामि ।– ('मालतीमाधवम्', काळे आवृत्ति, पृ. २१, २४.)

‡ तो दिवस वैशाख शुक्ल दशमीचा होता हें पुढे दाखविलें आहे. तो वर्षाकाल नसल्यामुळे आदल्या दिवशींच्या वादळाला 'अकालदुर्दिन' म्हटलें आहे.

आरंभ झाला असावा. या षष्ठीस सध्या स्त्रिया उपोषण करीत नाहीत, पण प्राचीन काळीं त्या त्या तिथीला 'अभिरूपपति' नामक व्रत करीत असें दिसतें. या व्रताचा उल्लेख प्रस्तावनेंत सूत्रधार-नटी संवादांत आला आहे. या व्रतांत दिवसभर उपोषण करून प्रदोषकालीं पारणें होई. या पारण्याकरितां एखादा योग्य ब्राह्मण पाहण्याविषयीं नटी सूत्रधारास सांगते. तितक्यांत चारुदत्ताचा मित्र मैत्रेय त्या रस्त्याने जातो. त्यास पाहून सूत्रधार त्याला भोजनाचें आमंत्रण देतो. पण तो तें स्वीकारीत नाही. या प्रसंगाने मैत्रेयाच्या मनांत जे विचार आले ते तो पहिल्या अंकाच्या मुख्य प्रवेशांतील आरंभींच्या आपल्या स्वागत भाषणांत व्यक्त करीत आहे. चारुदत्ताची पत्नी धूता हिनेहि या दिवशीं उपोषण केलें होतें. या तिथीचा ती रत्नषष्ठी असा उल्लेख करते.* तिसऱ्या अंकांत आपल्या वाड्यांतून वसंतसेनेचा दागिना चोरीला गेला असें समजल्यावर धूता त्याबद्दल आपली रत्नमाला मैत्रेयास देते. त्या प्रसंगीं ती म्हणते, 'रत्नषष्ठीस मी उपोषण केलें होतें. त्या व्रताच्या पारण्याच्या प्रसंगीं ब्राह्मणास यथाशक्ति दक्षिणा द्यावयास पाहिजे होती, पण ती द्यावयाची राहिली. म्हणून आज ही रत्न-माला मी आपणांस देत आहे. तिचा स्वीकार करावा.' वसंतसेनेच्या दागिन्याची चोरी वैशाख शुक्ल अष्टमीस झाली हें पुढे दाखविलें आहे. त्या वेळीं माहेरून मिळालेली रत्नमाला चोरीला गेलेल्या दागिन्याबद्दल आपण आपल्या पतीला देऊं केली तर तो ती स्वीकारणार नाही याची खात्री असल्यामुळे धूता ती दक्षिणेच्या मिषाने मैत्रेयास देत आहे. रत्न-षष्ठीचें व्रत थोड्याच दिवसांपूर्वी झालें असल्याने त्याची आठवण तिला सहजच झाली व त्या निमित्ताने आपण ही दक्षिणा देत आहों असें तिला सांगतां आलें. पहिल्या अंकांत चारुदत्त व वसंतसेना यांचा प्रणयप्रसंग चालू असतां तिकडे आर्या धूता 'अभिरूपपति' नामक व्रताचें आचरण करीत होती यांतील विरोधहि शूद्रकाने मोठ्या कुशलतेनें सूचित केला आहे.†

---

* 'मृच्छकटिक', पृ. ६७.

† शूद्रकाने या प्रसंगीं धूतेचा अत्यंत विवेकी व धीरगंभीर स्वभाव दाखविला आहे. 'चारुदत्त' नाटकांत मात्र या प्रसंगीं तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिल्याचें दाखविलें आहे.

'मृच्छकटिका'चा पहिला प्रवेश चैत्र कृष्ण षष्ठीस प्रदोषसमयीं सुरू होतो. संध्याकाळीं देवपूजा आटोपून चौरस्त्यावर मातृदेवतांना बलि ठेवण्याकरिता चारुदत्त मैत्रेयाला सांगतो. ती तिथि कृष्णपक्षांतील षष्ठी असल्यामुळे चंद्रोदय सूर्यास्तानंतर बारा घटकांनी रात्रीच्या अकरा वाजण्याच्या सुमारास झाला असावा. त्यापूर्वी गडद अंधकार असल्यामुळे शकार, विट व चेट यांना वसंतसेनेस पकडणें कठीण जातें, तिच्या फुलांच्या सुवासावरून व नूपुरांच्या झंकारावरून त्यांना तिचा माग काढावा लागतो. ती त्यांच्या तावडींतून सुटून चारुदत्ताच्या वाड्यांत बाजूच्या दाराने (पक्षद्वाराने) शिरते. तेथे त्यांचें संभाषण झाल्यावर वसंतसेना आपला मौल्यवान् दागिना काढून ठेवते व चारुदत्ताला आपणांस घरीं पोचविण्याविषयी विनंति करते. चारुदत्त उजेडाकरिता दिवट्या पाजळण्यास सांगतो, पण तितक्यांत चंद्रोदय झाल्यामुळे त्यांची जरूरी भासत नाही. तो षष्ठीचा चंद्र असल्यामुळे त्याचें बिंब अर्ध्याहून अधिक होतें. म्हणून चारुदत्ताच्या भाषणांतील 'कामिनीगण्डपाण्डुः' हें त्याचें विशेषण अन्वर्थ आहे.* तेव्हा पहिल्या अंकांतील हा प्रवेश चैत्र कृष्ण षष्ठीस रात्रीं आठ ते अकरा वाजेपर्यंतच्या अवधींत घडला असावा.

दुसऱ्या अंकांतील घटना यानंतर दुसऱ्याच दिवशीं म्हणजे चैत्र कृष्ण सप्तमीस घडल्या. आदल्या दिवशीं चारुदत्ताची भेट झाल्यापासून वसंतसेनेचें चित्त ठिकाणावर नव्हतें. तेव्हा सकाळीं ' स्नान करून देवतांची पूजा कर ' असा तिच्या मातेने तिला निरोप पाठविला असता वसंतसेना म्हणते : 'आज मी स्नान करणार नाही. तेव्हा ब्राह्मणालाच देवपूजा करूं द्या '

---

* ' 'मृच्छकटिका'च्या पहिल्या अंकांत शकार संवतसेनेचा पाठलाग करीत असतां आकाशांत ढग आले आणि एकदम घनदाट अंधकार पडला. तेव्हा वसंतसेना चारुदत्ताच्या घरांत शिरली नंतर ग विरून गेले किंवा वाऱ्याने अन्य भागांत गेले आणि चंद्राचा प्रकाश पडला ', असें श्री. लेले म्हणतात. पण तें बरोबर नाही. चारुदत्ताच्या भाषणांतील ' उदयति हि शशाङ्कः ' इत्यादि श्लोकांतील (पृ. ३१) पुढे झालेल्या चंद्रोदयाचें वर्णन पहा.

(पृ. ३२). यानंतर संवाहक, द्यूतकर व द्यूतगृहाचा मालक माथुर यांचा संवाद घातला आहे. माथुर द्यूतांत हरलेल्या दहा सुवर्णमुद्रांकरिता संवाहकाला पकडतो, पण तितक्यांत तेथे आलेला दर्दुरक त्याला सोडवतो व तो वसंतसेनेला शरण जातो. त्याच्या भाषणावरून तो पूर्वी चारुदत्ताची सेवा करीत होता हें समजल्यावर वसंतसेना त्याला आपली सोन्याची बांगडी देऊन कर्जमुक्त करते. तितक्यांत तिचा खुण्टमोडक नामक हत्ती मदोन्मत्त होऊन आपल्या माहुताला ठार करतो व नगरांत धुमाकूळ माजवतो. पण वसंतसेनेचा सेवक कर्णपूरक त्याला लोहदंडाने मार देऊन त्याच्या तावडींत सापडलेल्या परिव्राजकाला मुक्त करतो. त्याचें तें धाडस पाहून प्रसन्न झालेला चारुदत्त त्याला देण्याकरिता कांही अलंकार आपल्याजवळ नसल्यामुळे आपला जाईच्या फुलांनी सुवासित झालेला शेलाच त्याच्याकडे बक्षीस म्हणून फेकतो. आदल्या दिवशीं चारुदत्ताच्या वाड्यांत तो शेला पाहिला असल्यामुळे त्याच्या जाईच्या फुलांच्या सुवासावरून वसंतसेनेला त्याची ओळख पटते व या प्रसंगाने चारुदत्ताची गुणग्राहकता व दातृत्व यांचा प्रत्यय देऊन तिचें मन त्याच्यावर जास्तच अनुरक्त होतें.*

तिसऱ्या अंकांतील घटना यानंतर पंधरा-सोळा दिवसांनी वैशाख शुक्ल अष्टमीस रात्रीं घडलेल्या दिसतात. त्या दिवशीं रात्रीं रेभिलाच्या घरीं गायन होतें. मध्यरात्र झाली तरी चारुदत्त परत आला नाही असें पाहून त्याचा सेवक वर्धमानक बाहेरच्या ओवरींत जाऊन झोंपतो. त्यानंतर लवकरच रेभिलाच्या घरचा जलसा संपल्यावर चारुदत्त व मैत्रेय घरीं जाण्यास निघतात. वाटेंतच त्यांना चंद्र अस्तास जात असलेला दिसतो. त्याचें वर्णन चारुदत्तानें 'जलाशयांत बुडून गेलेल्या हत्तीच्या दंताचें वर दिसणारें तीक्ष्ण अग्र' असें केलें आहे. मध्यरात्रीनंतर लवकरच अस्तास

---

* 'मृच्छकटिकां'त हा शेल्याचा वृत्तांत अत्यंत कुशलतेने घातला आहे. तो जाईच्या फुलांनी सुवासित केला होता हें पहिल्या अंकांत सांगून दुसऱ्या अंकांत त्याच्या त्या सुवासावरून वसंतसेनेने शेला फेकणारा गृहस्थ चारुदत्त होता असें अनुमान केल्याचें दाखविलें आहे. 'चारुदत्त' नाटकांत हा मनोरम प्रसंग नाही.

जाणाऱ्या चंद्राच्या या वर्णनावरून ती तिथि अष्टमी होती यांत संशय नाही. यानंतर पाय धुऊन ते दोघे झोपीं जातात. झोपण्यापूर्वीं वर्धमानक वसंतसेनेचा अलंकार मैत्रेयाजवळ सांभाळण्यास देतो. यापुढे सर्वत्र पसरलेल्या घनदाट अंधकारांत शर्विलकाला चारुदत्ताचें घर फोडून अलंकार घेऊन जाणें कठीण होत नाही.

चारुदत्ताच्या घरची चोरी कोणत्या तिथीस झाली याविषयीं भिन्न मतें व्यक्त झालीं आहेत. पहिल्या अंकांतील प्रवेशाच्या दुसऱ्या दिवशीं रात्रीं रेभिलाच्या घरीं गाणें झालें असें श्री. लेले म्हणतात. पण तसें असतें तर आदल्या दिवशीं मध्यरात्रीच्या थोडें अगोदर उगवलेला चंद्र दुसऱ्या दिवशीं मध्यरात्रीनंतर लवकरच अस्तास जाणें संभवत नाही. हॉर्वर्ड ओरिएंटल सीरिजमध्यें 'मृच्छकटिका'चें इंग्रजी भाषांतर करणारे डॉ. रायडर यांच्याहि ध्यानांत ही अनुपपति आली नाहीं. कारण त्यांनींहि तिसऱ्या अंकांतील घटना दुसऱ्या दिवशींच्या रात्रीं घडल्या असें म्हटलें आहे. 'मृच्छकटिका'चे विद्वान् संपादक डॉ. वा. गो. परांजपे यांचेंहि मत डॉ. रायडरप्रमाणेंच आहे. या मतानुसार पहिल्या व तिसऱ्या अंकांतील चंद्रोदय व चंद्रास्त यांच्या वर्णनाची अनुपपति त्यांच्या ध्यानांत आली होती. पण तिच्याबद्दल त्यांनी शूद्रकालाच दोषी ठरविलें आहे. ते म्हणतात: 'या दोन अंकांतील घटना फक्त एका दिवसाच्या अंतरानें घडल्या आहेत. तरी पहिल्या अंकांत चंद्र प्रदोषकाळीं उगवतो असें शूद्रकानें अनवधानानें दाखविलें आहे.' पण असें समजण्यास मूळ नाटकांत काडीइतकाहि आधार नाहीं.

तिसऱ्या अंकाच्या या तिथीनें केवळ आधुनिक विद्वानांसच चकविलें असें नाही. 'मृच्छकटिका'ची प्रतिकृतिच असें जें तथाकथित भासकृत 'चारुदत्त' नाटक त्याच्या कर्त्यालाहि हाच भ्रम झाला होता. पहिल्या अंकांतील घटना षष्ठीस घडल्या असें त्यांत म्हटलें आहे.* वसंतसेनेचा दागिना स्वतःजवळ ठेवण्याविषयी चारुदत्तानें सांगितल्यावर मैत्रेय रदनिकेला

* 'षष्ठीकृतदेवकार्यस्य तत्रभवतश्चारुदत्तस्य कारणात्...'। 'चारुदत्त' ('भासनाटकचक्रम्' आवृत्ति), पृ. १९६.

म्हणतो, 'रदनिके, हा अलंकार तूं घे. षष्ठी व सप्तमीच्या तिथीस तूं तो सांभाळ. अष्टमीस अनध्याय असल्यामुळे मी तो सांभाळीन.' तिसऱ्या अंकांत चारुदत्त व मैत्रेय रेभिलाच्या जलशानंतर परत आल्यावर रदनिका मैत्रेयाला त्याच्या पूर्वीच्या भाषणाची आठवण करून देऊन म्हणते, 'हा दागिना मी षष्ठी व सप्तमी या तिथीस सांभाळला. आज अष्टमी तेव्हां आता तूं तो सांभाळ.' या संभाषणावरून पहिल्या अंकानंतर तिसऱ्या दिवशींच्या रात्रीं हा प्रकार घडला असें 'चारुदत्ता'च्या कर्त्याला सुचवावयाचें आहे. पण असें असतांहि त्याने पहिल्या अंकांतील चंद्रोदय व तिसऱ्या अंकांतील चंद्रास्त 'मृच्छकटिकां'तल्या प्रमाणेच वाणले आहेत. 'मृच्छकटिकां'त या संबंधांत तिथींचा मुळीच निर्देश नसल्यामुळे कांहीच विसंगति भासत नाही. या एकाच उदाहरणावरून 'चारुदत्ता'च्या कर्त्यानें 'मृच्छकटिक' नाटकाची उचलेगिरी केली हें सिद्ध होईल. असो.

चौथ्या अंकांतील घटना यानंतर दुसऱ्या दिवशींच वशाख शुद्ध नवमीस घडलेल्या दिसतात. सकाळीं चारुदत्ताच्या घरीं चोरी झाल्याची बातमी श्रेष्ठिचत्वरांत (सराफकट्ट्यावर) पसरते. ती शर्विलकाच्याहि कानीं येते. तेव्हा आपण रात्रीं कोणाच्या घरीं चोरी केली हें त्याला समजतें. नंतर तो, तो दागिना घेऊन, वसंतसेनेच्या वाड्यांत येतो व मदनिकेनें शिकविल्याप्रमाणें 'माझें घर मोडकळीस आलें असल्यामुळे आपला अलंकार संभाळणें कठीण जात आहे म्हणून तो परत पाठविला आहे' असा चारुदत्ताचा म्हणून खोटाच निरोप वसन्तसेनेस सांगून तिला तो दागिना परत करतो. वसंतसेनेनें त्याचें व मदनिकेचें भाषण आडून ऐकलें असल्यामुळे ती म्हणते : 'आर्य चारुदत्तांनी मला अगोदरच सांगून ठेवलें आहे की दागिना परत करण्यास येणाऱ्या गृहस्थास मदनिका द्यावी. तेव्हा तेच तुम्हास ती अर्पण करीत आहेत असें समजावें,' असें म्हणून ती मदनिकेला दास्यांतून मुक्त करून शर्विलकाच्या स्वाधीन करते.*

---

* 'चारुदत्त' नाटकांत अलंकार घेऊन आलेल्या सज्जलकाला चेटी कामदेवकुलांत (मदनाच्या देवळांत) थांबण्यास सांगते. तितक्यांत

(पुढील पानावर)

वसंतसेनेचा निरोप घेऊन शर्विलक मदनिकेसह तिच्या वाडयांतून बाहेर पडतो तोंच 'कोणा सिद्ध पुरुषाच्या भविष्यवाणीप्रमाणे गोपालदारक आर्यक राजा होणार हें ऐकल्यावर भयभीत झालेल्या राजाने त्याला गौळी-वाडयांतून आणून घोर बंदीखान्यांत टाकलें आहे. तेव्हा सर्वांनी आपापल्या ठिकाणीं सावध राहावें' अशी राष्ट्रियाची (वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याची) दवंडी त्याच्या कानीं येते. तेव्हा वसन्तसेनेच्या गाडीवानाला मदनिकेला सार्थवाह रेभिलाच्या घरीं पोचविण्यास सांगून 'माझे नातेवाईक, पराक्रमी विट, राजाने अपमान केल्यामुळे संतप्त झालेले राजसेवक यांना राजाविरुद्ध उठवून मी विनाकारण बंदींत टाकलेल्या माझ्या मित्राची सुटका एकदम छापा घालून करतों' असें म्हणून शर्विलक त्या उद्योगास लागतो.

यानंतर मैत्रेय चारुदत्ताची धर्मपत्नी धूता हिने दागिन्याचा मोबदला देण्यासाठी दिलेली रत्नमाला घेऊन वसंतसेनेच्या वाडयांत येतो. वसंतसेना तिचा स्वीकार करते व म्हणते, 'मी प्रदोषसमयीं आपणांस भेटावयास येईन असें आर्य चारुदत्तांना सांगा.' मैत्रेय गेल्यावर ती निघण्याची तयारी करते तेव्हा तिची दासी म्हणते, 'आज अकालीं पावसाचा रंग ('अकाल-दुर्दिन') दिसत आहे.' तो दिवस वैशाख शुक्ल नवमीचा होता. त्या वेळीं वर्षाकाल सुरू झाला नसल्यामुळे त्या काळच्या अभ्राच्छादित दिनास 'अकालदुर्दिन' म्हटलें आहे.

(मागील पानावरून)

विदूषक येतो. त्याच्याकडून मुक्तावलि घेतल्यावर वसंतसेना त्याला जाऊं देते, पण चारुदत्ताला आपल्या भावी प्रदोषकालाच्या भेटीबद्दल निरोप पाठवीत नाही. नंतर ती सज्जलकाची भेट घेते असें दाखविलें आहे. यांत विनाकारण दोन प्रसंगांची उलथापालथ केलेली दिसते. सज्जलकाने अलंकार परत केल्यावर ती 'मला माहीत आहे की तुम्ही चारुदत्ताच्या घरीं साहसकर्म करून हा अलंकार आणला आहे' असें स्पष्टच म्हणते. यापेक्षा 'मृच्छकटिकां'तील या प्रसंगाची घटना व त्यांतील भाषणें कितीतरी सूचक व मनोरम आहेत !

वसंतसेना चारुदत्ताकडे जाण्यास निघाली त्या वेळीं संध्याकाळ झाली होती, आकाशांत काळेभोर ढग असून अंधार होऊं लागला होता. पण, सूर्य अस्तास गेला नव्हता. हें 'एतैरार्द्रतमालपत्रमलिनैरापीतसूर्यं नभः' (श्लो. २०) या वर्णनावरून, तसेंच 'माहेन्द्रेण विवल्गतीव धनुषा' (श्लो. २७) यांतील इन्द्रधनुष्याच्या उल्लेखावरून, दिसून येईल. तो शुक्लपक्ष असल्यामुळे चंद्र आकाशांत होता, पण त्याचा प्रकाश ढगांत लुप्त झाला होता.* वैशाखांतील हा पाऊस वादळाच्या रूपाचाच असावयाचा व तसेंच त्याचें वर्णन 'मृच्छकटिका'च्या पांचव्या अंकांत केलें आहे. शूद्रकाने या दिवशींच्या वादळाचा उपयोग अनेक प्रकारांनी केला आहे. या वादळाच्या रात्रीं शर्विलकाने बंदीखान्यावर छापा घालून आर्यकाला सोडविलें. त्या रात्रीच्या पावसामुळे उज्जैनींतील रस्त्यावर चिखल झाला आणि दुसऱ्या दिवशीं पहाटे खेडेगावांतून त्या नगरींत येणाऱ्या गाड्या चिखलांत रुतून बसल्या. असल्या एका गाडीच्या मालकाने आपल्या गाडीचें चाक मारण्याविषयी विनंति केल्यामुळे शकाराचा गाडीवान् स्थावरक आपली गाडी चारुदत्ताच्या वृक्षवाटिकेच्या फाटकाजवळ उभी करून त्याच्या मदतीला जातो. तितक्यांत चारुदत्ताची गाडी येऊन उभी आहे, असें समजल्यामुळे वसंतसेना चुकीने शकाराच्या गाडींत बसते. स्थावरकाला गाडी जड झाल्याचा भास होतो, पण आपण इतरांच्या गाडीचीं चाकें मारण्यांत थकलों असल्यामुळे तसें आपणांस वाटत असेल असें आपल्या मनाचें समाधान करून तो गाडी हाकतो. पुढे त्याचा आवाज परिचित नसल्यामुळे 'आपण भलत्याच गाडींत तर बसलों नाही ना ?' अशी शंका वसंतसेनेच्या मनांत येते. पण पुष्पकरण्डकजीर्णोद्यान नगरापासून दूर असल्याने चारुदत्ताने बैलांना जास्त श्रम होऊं नयेत म्हणून पुनः आपली गाडी न पाठवितां दुसरी गाडी व नोकर पाठविले असतील अशी आपल्या मनाची समजूत ती करून घेते.

---

* मैत्रेयाच्या भाषणांतील 'अथ किंनिमित्तं पुनरीदृशे प्रणष्टचन्द्रालोके दुर्दिनान्धकारे आगता भवती' (पृ. १०६) पहा. पांचव्या अंकाच्या शेवटीं श्लो. ५१मध्ये आलेलें इन्द्रधनुष्याचें वर्णन मात्र प्रक्षिप्त दिसतें. डॉ. परांजपे यांनीहि तें तसें मानलें आहे.

शूद्रकानें या वादळाचा उपयोग इतरत्रहि केला आहे. या वादळांत पुष्पकरण्डक–जीर्णोद्यानांतील एक मोठें झाड मोडून पडलें व त्याच्याखाली एथ स्त्री सापडून तिचें प्रेत दुसऱ्या दिवशीं सकाळीं विटाच्या दृष्टीस पडलें.* त्यानंतर तिसऱ्या दिवशीं चारुदत्ताचा खटला चालू असतां, त्यानें वसंतसेनेला मारली असावी असा संशय न्यायाधीशास येतो. तेव्हा तो वीरक नामक पोलिस अधिकाऱ्यास 'कोर्टाच्या आवारांतील घोडा घेऊन त्वरित जा व कोणा स्त्रीचें प्रेत त्या उद्यानांत आहे काय पाहून ये' अशी आज्ञा करतो. तोंपर्यंत त्या स्त्रीचा मृत देह श्वापदांनी छिन्नविच्छिन्न केलेला असतो. तथापि अवशिष्ट हात, पाय, केस इत्यादिकांवरून तो देह स्त्रीचाच अशी वीरकाची खात्री होते व तो तसा रिपोर्ट न्यायाधीशास करतो. याप्रमाणे या वादळानें वसंतसेनेचें चारुदत्तावरचें उत्कट प्रेम व्यक्त होतें एवढेंच नाही तर त्यायोगें गाड्यांची अदलाबदल होऊन वसंतसेना शकाराच्या तावडींत सापडते व चारुदत्तावर तिचा खून केल्याचा आरोप सिद्ध होण्यास मदत होते.

सहाव्या अंकांतील घटना वादळानंतरच्या दिवशीं वैशाख शुक्ल दशमीस घडल्या असाव्या. पहाटे चारुदत्त पुष्पकरण्डक–जीर्णोद्यानांत जाण्यास निघतो. जातांना आपल्या वर्धमानक नामक सेवकाला रात्रींच (म्हणजे सूर्योदयापूर्वी) गाडी जोडून ठेवून वसंतसेनेला त्या उद्यानांत घेऊन येण्याविषयी आज्ञा करतो. वर्धमानक त्याप्रमाणे गाडी घेऊन येतो व बुरख्यासहित गाडी बाजूच्या फाटकाजवळ उभी केली आहे अशी रदनिकेला वर्दी देतो. "वसंतसेना आपली वेषभूषा (प्रसाधन) करीत आहे, क्षणभर थांब" असें रदनिका त्याला सांगते. तितक्यांत गाडीमध्ये बसण्याकरिता घालावयाची गादी (आस्तरण) आणावयास आपण विसरलों असें वर्धमानकाच्या ध्यानांत येतें. बैलांना नुकतीच वेसण घातली असल्यामुळे ते आपण गेल्यावर एके ठिकाणीं उभे राहणार नाहीत असें वाटून तो आपली गाडी घेऊन गादी आणण्यासाठी जातो. तितक्यांत संस्थानकाचा (शकाराचा) गाडीवान तेथे येऊन गाडी उभी करतो व स्वतः दुसऱ्या गाडी-

* 'मृच्छकटिक', पृ. १५३.

वानाच्या गाडीचें चिखलांत रुतलेलें चाक मारण्यास जातो. त्या अवधींत वसंतसेना मागून येऊन चुकीने त्या गाडींत बसते. संस्थानकाची गाडी निघून गेल्यावर वर्धमानक पुनः आपली गाडी आणून त्याच जागीं उभी करतो. या सुमारास सूर्योदय झाला होता. त्यापूर्वी सूर्य अर्धवट उगवला होता ('अर्धोदिते दिनकरे'*) तेव्हा गोपालदारक आर्यक शर्विलकाच्या मदतीने बंदीखान्याच्या अधिकाऱ्यास ठार मारून कैदेंतून सुटतो व आश्रयार्थ सैरावैरा पळूं लागतो. तो वर्धमानकाच्या गाडीजवळ येतो त्या वेळीं त्याच्या शृंखलांचा आवाज ऐकून वर्धमानकाला वसंतसेना गाडींत बसण्यासाठी आली असें वाटतें व तो तिला 'बैलांना नुकतीच वेसण घातल्यामुळे तें आपणांस पुढील बाजूने बसूं देणार नाहीत, म्हणून आपण मागील बाजूने बसावें' असें सुचवितो. पुढे वेशीजवळ आल्यावर पोलीस अधिकारी चंदनक व वीरक यांच्यामध्ये गाडी कोणी तपासावी याविषयी झगडा झाल्यामुळे आर्यक पुष्पकरण्डक–जीर्णोद्यानांत सुखरूप पोचतो व तेथे चारुदत्ताची गाठ पडल्यावर त्याला शरण जातो. शरणागताला अभय देण्याचा चारुदत्ताचा स्वभाव असल्यामुळे तो त्याला आपल्या गाडींतून इष्ट स्थलीं जाण्यास मदत करतो.

रतिश्रान्त वसंतसेनेला घरीं एकटीच सोडून चारुदत्त पहाटेस निघून गेला, तेव्हा तो तशाच महत्त्वाच्या कामाकरिता गेला असावा, व तें काम म्हणजे पालकराजाला पदच्युत करून आर्यकाला गादीवर बसविण्याचें कारस्थान असावें असा तर्क श्री. लेले यांनी केला आहे व यासारख्या कांही उल्लेखांवरून 'मृच्छकटिक' नाटक राजकीय होतें इतकेंच नव्हे, तर खरोखरीच्या घटनांवर आधारलेलें, अतएव ऐतिहासिक होतें, असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. नाटकाला लोकप्रिय करण्याकरिता शूद्रकाने त्याला प्रेमाचें अस्तर दिलें आहे असें त्यांचें म्हणणें आहे. याच्या उलट श्री. बी. काश्यप म्हणतात कीं 'इ. स. ६०० च्या पूर्वी रेभिल, शर्विलक, चंदनक, चांडाळ, द्यूतकार इत्यादि निरनिराळ्या थरांतील माणसांचा राजकारणाशीं

---

* अर्धोदिते दिनकरे गोपालदारकः खुटितः। —'मृच्छकटिक,' पृ. १२०.

संपर्क येत नसल्यामुळे त्यांच्या उठावानें राज्यक्रांति झाली असणें शक्य नाही. ' या दोन परस्परविरुद्ध मतांचा थोडक्यांत विचार करूं.

'मृच्छकटिक' नाटक वाचल्यावर त्याचें मुख्य कथानक पालक राजाची पदच्युति हें नसून चारुदत्त व वसंतसेना यांची प्रणयकथा हें आहे हें कोणाच्याहि लक्षांत येईल. 'मुद्राराक्षस' व 'मृच्छकटिक' यांची तुलना केली असतां ही गोष्ट स्पष्ट होईल. 'मुद्राराक्षसां'तील प्रत्येक घटना चन्द्रगुप्तावर सूड घेण्यास प्रवृत्त झालेल्या राक्षस नामक अमात्याच्या योजना हाणून पाडून त्याला चन्द्रगुप्ताचें अमात्यपद स्वीकारण्यास भाग पाडण्याच्या उद्देशानें घडून आलेली दिसेल. तेव्हा तें नाटक राजकीय आहे, यांत संशय नाही. याच्या उलट 'मृच्छकटिकां'तील राज्यक्रांतिविषयक घटना गौण असून त्या तें नाटक सुखान्त करण्याच्या उद्देशानें घातलेल्या दिसतात. तेव्हा 'मृच्छकटिकां'तील मुख्य कथानक चारुदत्त व वसंतसेना यांची प्रणयकथा हें असून त्याला राजकारणाचें अस्तर दिलें आहे यांत संशय नाही. अशा प्रकारचें अस्तर केवळ याच नाटकांत नव्हे तर अनेक संस्कृत नाटकांत आढळेल. उदाहरणार्थ, भासाच्या 'स्वप्नवासवदत्तां'तील उदयनाच्या सैन्याचा आरुणि नामक शत्रूवर विजय व त्यायोगें उदयनाला झालेली स्वराज्यप्राप्ति; 'मालविकाग्निमित्रां'तील अग्निमित्राच्या सेनापतीनें केलेला विदर्भराजाचा पराभव व तदुत्तर विदर्भाची दोन चुलत भावांत वाटणी; 'विद्धशालभञ्जिकें'त कलचुरि सैन्यानें केलेला कुन्तलाधिपतीचा पराभव व तदनंतर कुन्तल राज्याची वीरपालाला प्राप्ति—या घटनाहि याच प्रकारच्या आहेत. या सर्व नाटकांतील मुख्य कथानक अन्तःपुरातील प्रेमकलह हें असून त्याला राजकीय घटनांचें अस्तर जोडलें आहे असें दिसून येईल. 'मृच्छकटिकां'तील मुख्य व गौण कथानकांचा संबंध याच तऱ्हेचा आहे. फरक एवढाच की त्यांतील प्रणयकथा राजाराणींची नसून सार्थवाह–गणिकांची आहे. आणि त्यामुळेंच त्यांतील राजकीय घटना राजसैनिकांच्या पराक्रमानें घडल्या नसून सामान्य लोकांच्या बंडाळीमुळे उत्पन्न झाल्या आहेत.

'मृच्छकटिकां'तील राजकीय घटनांचा मुख्य कथानकाशीं संबंध कसाहि असो, पण त्या ऐतिहासिक म्हणजे खरोखरीच घडल्या होत्या काय याचा आता विचार करूं. या बाबतींत विद्वानांनी भिन्न भिन्न मतें

प्रकट केलीं आहेत. मुख्य गोष्ट शर्विलकाने पालक-राजाला ठार मारून ज्याला गादीवर बसविलें तो आर्यक कोण होता ही होय. तो पालक राजाचा भाऊबंद किंवा नातेवाईक असून कोठेतरी खेडयांत लपून राहत होता असें श्री. लेले म्हणतात, पण त्याचें ह्या राजाशीं नक्की नातें त्यांनी सांगितलें नाही. 'मृच्छकटिकां'त आर्यकाला अनेक ठिकाणीं 'गोपालदारक' असें म्हटलें आहे.* याचे दोन अर्थ संभवतात: (१) गोपाल नामक गृहस्थाचा मुलगा, आणि (२) गवळ्याचा मुलगा. 'मृच्छकटिकां'तील पालक राजा उज्जैनीस राज्य करीत होता. या नांवाचा एकच राजा इतिहासज्ञांस माहीत आहे. तो उज्जैनीच्या प्रद्योत उर्फ चंडमहासेन नृपतीचा मुलगा होता. प्रद्योताला गोपालक व पालक असे दोन मुलगे व वासवदत्ता नामक मुलगी होती. वासवदत्ता ही वत्सराज उदयनाची पट्टराणी. 'मृच्छकटिकां'तील आर्यक हा गोपालकाचा (किंवा गोपालाचा) मुलगा असावा असें कांही विद्वानांचें मत आहे. या दोन्ही मुलांचा जेथे निर्देश येतो तेथे गोपालाचें नांव प्रथम येतें. उदाहरणार्थ, 'स्वप्नवासदत्ता'च्या सहाव्या अंकांतील चंडमहासेनाच्या राणीच्या संदेशांतील खालील वाक्य पहा: 'मम वा महासेनस्य वा यादृशौ गोपालकपालकौ तादृश एव त्वम्।' ('मला व माझे पति महासेन यांना जसे आमचे गोपालक व पालक तसाच, उदयना! तूंहि प्रिय आहेस.') त्याप्रमाणेच 'कथासरित्सागरां'तील (११,७४-७५) खालील श्लोक पहा–'जातौ द्वौ तनयौ चण्डमहासेनस्य भूपतेः। एको गोपालको नाम द्वितीयः पालकस्तथा॥' या उल्लेखांवरून गोपालक हा महासेनाचा वडील मुलगा होता हें स्पष्ट आहे. वत्सराज उदयनाने त्याला विदेह (मिथिला) देशाचें राज्य दिल्याचा 'कथासरित्सागरां'त (१९,५७) उल्लेख आहे. 'बृहत्कथाश्लोकसंग्रहां'त म्हटलें आहे की, प्रद्योत (महासेन) राजानंतर गोपाल उज्जैनीच्या गादीवर आला, पण त्याने लवकरच राजत्याग करून आपला भाऊ पालक यास गादीवर बसविलें. पालकाने दुष्टपणाने राज्य केलें. शेवटीं त्याला एक दुःस्वप्न पडलें. त्यामुळे आपला मुलगा अवन्तिवर्धन याला गादीवर बसवून त्याने संन्यासा-

---

* 'मृच्छकटिक', पृ. ४३, ८०, ११६, ११८ इ.

श्रमाचा स्वीकार केला. बहुतेक पुराणांत प्रद्योतानंतर पालकाने तेवीस वर्षे राज्य केल्याचा उल्लेख आहे. ('विष्णुपुराणा'च्या एका प्रतींत मात्र 'पालको' बद्दल 'गोपालको' असा पाठ आहे.) पालकानंतर विशाखयूप व त्यानंतर सूर्यक (कांही पाठांत अजक) गादीवर आल्याचें पुराणें सांगतात.* डॉ. देवदत्तपंत भांडारकरांच्या मतें, प्रद्योतानंतर त्याचा धाकटा मुलगा पालक गादीवर आला. पण गोपालाचा मुलगा आर्यक याला राज्यावरील आपला हक्क सोडण्याची इच्छा नव्हती. म्हणून त्याने कारस्थान करून पालकाला पदच्युत करून आपण गादी बळकाविली. त्यांच्या मतें पुराणांतील वंशावळींत नांवांची उलथापालथ झाली असावी. पुराणांत पालक–विशाखयूप–अजक अशी वंशावळ दिली आहे. ती वस्तुतः पालक–अजक–विशाखयूप अशी असावी. अजक हें आर्यक याचें प्राकृत रूप मानून डॉ. भांडारकरांनी पुराणांतील वंशावळीची 'मृच्छकटिकां'तील घटनांशीं सांगड घातली आहे.

वरील विवेचनावरून 'बृहत्कथाश्लोकसंग्रह', 'कथासरित्सागर', पुराणें इत्यादि प्राचीन ग्रंथांत गोपालपुत्र आर्यकाचा निःसंदिग्ध उल्लेख येत नाही हें दिसून येईल. त्यामुळे पालकराजाच्या कारकीर्दीच्या अखेरीस खरोखरीच राज्यक्रांति झाली होती काय याबद्दल संशय उत्पन्न होतो. पण 'मृच्छकटिकां'तील उल्लेखांचा काळजीपूर्वक विचार केल्यास शूद्रकाची या क्रांतीविषयी काय कल्पना होती हें अजमावणें कठीण नाही. आर्यकाला बहुतेक ठिकाणीं गोपालदारक म्हटलें आहे व तो घोषांत (गवळीवाड्यांत) राहात होता हेंहि सांगितलें आहे. त्यावरून सकृद्दर्शनींच 'गोपालदारक' याचा अर्थ 'गवळ्याचा मुलगा' असा सहजच ध्यानांत येतो. 'गोपालदारक' याचा अर्थ गोपाल नामक मनुष्याचा मुलगा असाहि करणें शक्य आहे खरें. पण तसा अर्थ विवक्षित असता तर एखाद्या ठिकाणीं तरी त्याच्या राजवंशाचा सूचक असा उल्लेख आला असता. शिवाय एका ठिकाणीं तर आर्यक स्वतःचें 'गोपालप्रकृति' असें वर्णन करतो.† गोपाल हा त्याचा

* पार्जिटर, 'कलियुगांतील राजवंश', पृ. १९.

† शरणागतो गोपालप्रकृतिरार्यकोऽस्मि ।–'मृच्छ.' पृ. १३०.

पिता असता तर तो त्याचा उल्लेख इतक्या निःस्नेहपणाने करता ना ! शिवाय त्याच्या तसेंच त्याच्या मित्रांच्या भाषणांत त्याचा राज्यावरच्या हक्काचा चुकून सुद्धा उल्लेख आलेला नाही. उलट, कैदेंतून सुटून आल्यावर तो आपल्या स्वगत भाषणांत म्हणतो :*

'भाग्यानि मे यदि तदा मम कोऽपराधो
यद्वन्यनाग इव संयमितोऽस्मि तेन ॥'

(माझ्या दैवांत जर राज्ययोग लिहिला असेल तर त्यांत माझा कोणता अपराध, की ज्यामुळे पालकराजाने मला वन्य हत्तीप्रमाणे जखडून ठेवावें ?) हे उद्गार अर्थातच राज्यावर पैतृक हक्क सांगणाऱ्या राजपुत्राच्या तोंडीं शोभणार नाहीत. सहाव्या अंकांत आर्यक कैदेंतून निसटून गेल्याची वार्ता समजतांच पोलिस अधिकारी चन्दनक म्हणतो,† 'अरे रे वीरकविशल्यभीमाङ्गददण्डकालदण्डशूरप्रमुखाः,

आगच्छत विश्वस्तास्त्वरितं यतध्वं लघु कुरुत ।
लक्ष्मीर्येन न राज्ञः प्रभवति **गोत्रान्तरं** गन्तुम् ॥

(अहो वीरकप्रभृति राजसेवकांनो ! तुम्ही सर्व राजाचे विश्वासू लोक लवकर एकत्र व्हा, आर्यकाला पकडण्याचा प्रयत्न करा, जेणेंकरून राजलक्ष्मी दुसऱ्या वंशांत जाऊं शकणार नाही.)

आर्यक हा पालकाचा पुतण्या असता तर तो राजा झाल्याने राजलक्ष्मी परवंशांत गेली असें कोणी मानलें नसतें. तेव्हा चन्दनकाच्या या उद्गारांवरूनहि आर्यक पालकराजाच्या वंशांतील नव्हता हें उघड आहे.

'मृच्छकटिकां'तील राज्यक्रांति खरोखरीच झाली होती काय याबद्दल संशय आहे. पण त्या नाटकांतील उल्लेखांवरून शूद्रकाला ती सामान्य लोकांच्या बंडामुळे घडून आली होती असें दाखवावयाचें होतें हें मात्र स्पष्ट आहे. प्राचीन काळीं जनतेने बंड करून राजाला पदच्युत केल्याचीं किंवा

---

* 'मृच्छकटिक', पृ. ११७.

† 'मृच्छकटिक', पृ. ११९.

कंठस्नान घातल्याचीं उदाहरणें सहसा सापडत नाहीत. राज्यक्रांति व्हावयाची ती सामान्यतः परकी राजाच्या स्वारीमुळे, महत्त्वाकांक्षी व बलिष्ठ सरदारांच्या बंडाळीमुळे किंवा सैन्याच्या फितुरीमुळे; पण प्रस्तुत राज्यक्रांति मुख्यतः गवळी, विट, चेट इत्यादि खालच्या दर्जाच्या लोकांच्या बंडाळीमुळे झाली यांत संशय नाही. तिचीं कारणें दोन—(१) पालक राजा अन्यायानें राज्य करीत होता व त्यामुळे तो लोकांना नकोसा झाला होता. ज्यानें शकारासारखा दुष्ट व मूर्ख मनुष्य राष्ट्रीयत्वाच्या उच्चपदावर नेमला होता त्याच्या कारकीर्दींत लोकांना सुख काय लाभणार ? तेव्हा तो राज्यभ्रष्ट केव्हा होईल असें त्याच्या सेवकांनाहि झालें होतें. (२) तितक्यांत गवळ्याचा मुलगा आर्यक हा राजा होणार असें कोणा सिद्धपुरुषानें भविष्य वर्तविल्यामुळे लोकांना आशेचा किरण दिसूं लागला होता व ते त्याच्याभोंवती जमूं लागले होते.* अशा सिद्धादेशांवर तत्कालीन लोकांची मोठी श्रद्धा असे.† सिद्धादेशावरून पद्मावती वत्सराज उदयनाची राणी होणार हें समजल्यावर तो संबंध घडून येण्यासाठी यौगंधरायणानें किती कारस्थानें केलीं तें 'स्वप्नवासवदत्तां'त दाखविलें आहे. अशाच एका सिद्धादेशावरून विदर्भराजकन्या मालविका हिला वर्षभर अज्ञातवासांत राहिल्यावर अनुरूप पतीची प्राप्ति होणार हें माहीत असल्यामुळे, 'मालविकाग्निमित्रां'तल्या परिव्राजिकेनें विदिशेस तिचें कुलीनत्व प्रकट केलें नव्हतें. इतरहि 'रत्नावली'-सारख्या संस्कृत नाटकांत सिद्धादेशावर विश्वास ठेवून मुत्सद्द्यांनी कारस्थानें रचल्याचे उल्लेख आहेत. तेव्हा गोपालदारक राजा होणार या सिद्धवचनावर लोकांचा विश्वास बसला तर त्यांत आश्चर्य नाही. त्याची आकृतिहि राजपदाला अनुरूप अशीच होती. त्याला पाहतांच त्याचे हत्तीच्या सोंडेप्रमाणें दीर्घ बाहू, सिंहाच्यासारखे पुष्ट खांदे, विशाल वक्षःस्थल

---

* 'कथितं च मम प्रियवयस्येन शर्विलकेन यथा किल आर्यको नामा गोपालदारकः सिद्धादेशेन समादिष्टो राजा भविष्यति । सर्वश्चास्मद्विधो जनस्तमनुसरति ।' 'मृच्छकटिक', पृ. ४३.

† 'न हि सिद्धवाक्यान्युत्क्रम्य गच्छति विधिः सुपरीक्षितानि' हे 'स्वप्नवासवदत्तां'तील यौगंधरायणाचे शब्द पहा.

च लालसर चंचल लांबट डोळे यांयोगें चारुदत्ताचा सकृद्दर्शनींच त्याच्याविषयीं अत्यंत अनुकूल ग्रह होतो व हा कोणी महात्मा (थोर पुरुष) आहे असें त्यास वाटतें. त्याचीं सर्व भाषणें संस्कृतमध्ये दिलीं आहेत. तेव्हा गवळयांच्या कुळांत जन्मलेला हा युवक सुसंस्कृत, भव्य शरीरयष्टि असलेला, शूर व धाडसी होता यांत संशय नाही. चंदनकाकडून तरवार मिळाल्यावर व चारुदत्ताच्या सेवकाकडून बेडी काढली गेल्यावर त्यानें शर्विलकानें चालू केलेल्या दंगलींत स्वतः भाग घेतला व यज्ञवाटांत शिरून दुरात्म्या पालकाला कंठस्नान घातलें.* अशा शूर व धाडसी युवकाला लोकांचें पाठबळ मिळाल्यावर त्यानें प्रत्यक्ष राजावर हल्ला करावा यांत आश्चर्य नाही. तशांत पालकराजाला चांगल्या मंत्र्यांचें साहाय्य नव्हतें व त्याची सेनाहि सज्ज नव्हती.† तशांत तो त्या वेळी यज्ञ करण्यांत गुंतलेला अत एव निःशस्त्र होता. अशा परिस्थितींत आर्यकाने आपल्या निवडक शूर लोकांच्या साहाय्याने राजावर एकाएकीं हल्ला करून त्याला यज्ञवाटांतच यमसदनीं पाठविलें तर त्यांत आश्चर्य नाही.

तेव्हा सामान्य लोकांच्या उठावामुळें उज्जयिनींत राज्यक्रांति झाली असें शूद्रकास दाखवावयाचें होतें यांत संशय नाही. पण या कारस्थानांत चारुदत्ताचा हात होता असें दिसत नाही. वादळानंतरच्या पहाटेस चारुदत्त वसंतसेनेस सोडून गेला तें कारस्थानाच्या सिद्धीकरितां नव्हे, तर पुष्पकरंडक–जीर्णोद्यानांत तो दिवस मैत्रेय व वसंतसेना यांच्या सहवासांत मजेंत घालवावा या हेतूने तेथील व्यवस्था करण्यास. अशा रीतीने एखादा दिवस मजेंत घालविण्याकरिता नागरक उत्तम वस्त्रालंकार धारण करून घोडयावर बसून सकाळींच घरून निघत आणि वेश्या, परिचारक इत्यादिकांसह उद्यानांत जात. तेथे कोंबडे, बोकड इत्यादिकांच्या टकरा, द्यूत, नाटकप्रयोग, खेळ इत्यादिकांत आनंदाने काळ घालवून सायंकाळीं घरीं

* ‘आर्यकेणार्यवृत्तेन कुलं मानं च रक्षता। पशुवद्यज्ञवाटस्थो दुरात्मा पालको हतः॥’ (‘मृच्छ०’, पृ. २०५).

† ‘हत्वा रिपुं तं बलमन्त्रहीनम्’ इत्यादि शर्विलकाचे उद्गार पहा—‘मृच्छकटिक’, पृ. २०५.

परत येत. येतांना त्या उद्यानांतील आपल्या क्रीडेचें स्मृतिचिन्ह बरोबर नेत, असें वात्स्यायनाच्या 'कामसूत्रां'त वर्णिलें आहे.* अशा उद्यानयात्रेची आगाऊ व्यवस्था करण्याकरतांच चारुदत्त पहाटे उठून मैत्रेयासह पुष्पकरंडक–जीर्णोद्यानांत गेला होता व वसंतसेना निजून उठल्यावर तिला तेथे घेऊन येण्याविषयीं त्याने आपल्या वर्धमानक चेटाला सांगितलें होतें. तेथे बराच वेळ वाट पाहून झाल्यावर आपली गाडी कां आली नाही याविषयी अनेक तर्कनितर्क त्याचे मनांत येतात (अंक ७, श्लो. २). शेवटीं गाडी आल्यावर तींत बसलेल्या आर्यकास पाहिल्यावर त्यास साहजिकच आश्चर्य वाटतें. आपण आर्यक नामक गवळी असून शरण आलों आहों असें त्याने सांगताच त्याला पालकराजाने बंदीवासांत टाकल्याच्या वार्तेची त्यास आठवण होते व तो शरणागताला अभय देतो आणि आपल्या गाडींतून त्याला इष्टस्थळीं पोचवितो. या प्रवेशावरून चारुदत्ताचें या कारस्थानांत मुळींच अंग नव्हतें हें उघड आहे.

'चारुदत्ताजवळ तीन पिढ्यांची गडगंज संपत्ति होती, पण त्याच्या हातांत कारभार आल्यावर त्याने ती थोड्याच वर्षांत संपविली. ही संपत्ति केवळ दानधर्मांत संपलेली दिसत नाही. तो जुगारी असल्याचा उल्लेख नाही. तेव्हा त्याने पालकाला पदच्युत करण्याच्या कारस्थानांत आपल्या देणग्यांचा वर्षाव केला असला पाहिजे' असा तर्क श्री. लेले यांनी केला आहे, पण तो बरोबर नाही. याविषयीं 'मृच्छकटिक' काय म्हणतें तें पाहूं. त्या नाटकांत चारुदत्त अनेक प्रसंगीं देणग्यांची खैरात करतांना दिसतो. कोणी कांही शूर कृत्य केलें किंवा कांही आनंददायक वार्ता कळविली की त्याला पारितोषिक ठेवलेलेंच. अशा देणग्यांत कुबेराची संपत्तिहि पुरी पडली नसती. याशिवाय चारुदत्तानें अनेक धार्मिक व लोकोपयोगी कृत्यें केलीं होतीं. नवव्या अंकांत वसंतसेनेला दागिन्यांच्या लोभाने ठार मारल्याचा आरोप त्याच्यावर ठेवला जातो, तो ऐकून मैत्रेय उद्गारतो, 'अहो सद्गृहस्थहो! ज्याने अनेक अग्रहार स्थापिले, विहार, आराम, देवालयें बांधली, तळीं, विहिरी खोदविल्या, यज्ञयूप उभारले व अशा रीतीने ही उज्जयिनी नगरी विभूषित केली, तो अशा तऱ्हेचें पापकृत्य क्षुल्लक

* 'कामसूत्र', पृ. ४७.

धनाच्या लोभाने करील काय ?' या उद्‌गारांवरून चारुदत्ताच्या दारिद्र्याचें कारण पालकराजाला पदच्युत करण्याच्या कारस्थानाला केलेली आर्थिक मदत हें नसून त्याचीं धार्मिक व लोकोपयोगी कृत्यें व दानशील स्वभाव होय हें उघड आहे.

चारुदत्ताचा या कारस्थानांत हात नव्हता, तसेंच पालकाच्या कारकीर्दीच्या अखेरीस अशी राज्यक्रांति झाल्याचा यत्किंचित्‌हि पुरावा प्राचीन काळच्या ग्रंथांत सापडत नाही हें आपण पाहिलें आहे. पण राज्यक्रांतीची कल्पना शूद्रकाला स्वकालीन एखाद्या ऐतिहासिक घटनेवरून सुचली असणें अशक्य नाही. 'मृच्छकटिक' नाटक, त्यांतील भाषा, धार्मिक परिस्थिति इत्यादि प्रमाणांवरून खिस्ती शकाच्या आरंभींच्या दोन-तीन शतकांत लिहिलें गेलें असावें, असें अनेक विद्वानांचें मत आहे. 'मृच्छकटिकां'त वर्णिली आहे त्या प्रकारची राज्यक्रांति खिस्तोत्तर तिसऱ्या शतकाच्या मध्याच्या सुमारास झाली होती असें पुराणांतील उल्लेख, कोरीव लेख वगैरे प्रमाणांवरून आता निश्चित झालें आहे. इ. स. २५० च्या सुमारास दक्षिणेंतल्या विशाल सातवाहन–साम्राज्याचा अस्त झाला आणि त्याच्या जागीं दक्षिणेंत अनेक लहान लहान राज्यें उत्पन्न झालीं. त्या काळीं उत्तर महाराष्ट्र, गुजराथ व कोकण या प्रदेशावर आभीरांची सत्ता पसरली. आभीरनृपति ईश्वरसेन याच्या काळचा एक कोरीव लेख नाशिकच्या लेण्यांत अद्यापि विद्यमान आहे. त्यांत ईश्वरसेनाला 'राजा' ही पदवी लावली आहे. पण त्याच्या पित्याचा 'शिवदत्त आभीर' असा पदवीविरहित नामोल्लेख केला आहे. त्यावरून ईश्वरसेन हा अगदी सामान्य आभीर कुळांत जन्मला होता हें स्पष्ट दिसतें. पुराणांतील वर्णनाप्रमाणे, दहा आभीर राजांनी ६७ वर्षें राज्य केलें.* ही वर्षसंख्या दहा राजांच्या राजवटींच्या मानाने कमी वाटते. वायुपुराणाच्या एका प्रतींत दिलेली १६७ वर्षें ही संख्या जास्त संभवनीय आहे. या आभीरांनी आपला स्वतःचा संवत्सर सुरू केला. तो पुढे महाराष्ट्र, कोंकण व गुजराथ या प्रदेशांत

---

* 'सप्तषष्टिं च वर्षाणि दशाभीरास्ततो नृपाः ॥' पार्जिटर, 'कलियुगांतील राजवंश', पृ. ४६.

जवळजवळ पांचशें वर्षे चालू होता. आभीर म्हणजे अहीर किंवा गवळी. महाराष्ट्रविदर्भांत गवळी लोकांचें पूर्वी राज्य होतें अशी समजूत अद्यापि प्रचलित आहे ती या आभीरांच्या राजवटीमुळे उत्पन्न झाली असावी. डॉ. स्टेन कोनो यांच्या मतें तर आभीरवंशस्थापक ईश्वरसेन हाच शूद्रक होय; त्याने मृच्छकटिक नाटकांत आपण केलेल्या राज्यक्रांतीचा उल्लेख केला आहे.* हें मत आपण स्वीकारलें नाही तरी 'मृच्छकटिक' नाटकाच्या कर्त्याला गोपालदारक आर्यकाने केलेल्या राज्यक्रांतीची कल्पना आभीरराज्य-स्थापनेवरून सुचली असणें अशक्य नाही. हेंच अनुमान आणखी एका उल्लेखावरून करतां येतें. उज्जयिनींत विजय प्राप्त झाल्यावर आर्यकाने वेणातटीं असलेल्या कुशावतीचें राज्य चारुदत्ताला दिलें असें 'मृच्छकटिका'-च्या दहाव्या अंकांत म्हटलें आहे. ही वेणानदी म्हणजे विदर्भांतील वैनगंगा होय. तिच्या दोन्ही तीरालगतच्या प्रदेशाला प्राचीन काळीं 'वेणाकट' असें नांव होतें. त्याचा उल्लेख 'महाभारतांत (सभापर्व, अ. ३१, श्लोक १२) व वाकाटकांच्या तिरोडी ताम्रपटांत आला आहे. कालान्तराने 'वेणाकट' याचे 'वेणातट' असें रूप प्रचलित झालें. या प्रदेशाची राजधानी कुशावती होती ही महत्त्वाची माहिती 'मृच्छकटिका'वरून मिळते. ही नगरी रामाने विंध्यपर्वताच्या पठारावर वसविली होती असें 'रामायणां'त (उत्तरकांड, स. १०८, श्लो. ४) म्हटलें आहे. हें वर्णन वैनगंगेच्या तीरीं असलेल्या नगरीस ठीक जमतें. वैनगंगेच्या आजूबाजूचा प्रदेश आर्यकाने चारुदत्तास दिला त्यावरून तो पूर्वी उज्जयिनीस राज्य करणाऱ्या पालक राजाच्या राज्यांत मोडत होता हें उघड आहे. अशी परिस्थिति सातवाहनांच्याच काळीं होती. खिस्तोत्तर २५० च्या सुमारास उत्तर महाराष्ट्र, गुजराथ वगैरे प्रदेशांत जसा आभीर नृपतींचा, त्याप्रमाणे विदर्भांत वाकाटक नृपतींचा उदय झाला. चारुदत्ताप्रमाणे वाकाटकहि ब्राह्मण जातीचे होते हें कोरीव लेखांवरून सिद्ध झालें आहे. या दोन्ही राज्यक्रांतींचें प्रतिबिंब 'मृच्छकटिकां'त पडलें

* 'अवन्तिसुन्दरीकथा' नामक दण्डिकृत गद्यकाव्याचें अपूर्ण हस्तलिखित कांही वर्षांपूर्वी सापडलें होतें. त्यांत शूद्रकाने आपल्या ग्रंथांत स्वचरित्र वर्णिल्याचा उल्लेख आहे. 'शूद्रकेणासकृज्जित्वा स्वच्छया खड्गधारया। जगद् भूयोऽप्यवष्टब्धं वाचा स्वचरितार्थया॥'

आहे. त्यावरून त्या नाटकाचा काळ खिस्तोत्तर तृतीय शतकाचा उत्तरार्ध हा ठरवितां येतो.

शेवटीं 'मृच्छकटिकांती'ल शेवटच्या अंकांतील घटनांचा कालनिर्णय करून हा लांबलेला लेख पुरा करूं.

'मृच्छकटिका'च्या साहव्या, सातव्या व आठव्या अंकांतील घटना एकाच दिवशीं वैशाख शुक्ल दशमीस घडल्या होत्या. त्या दिवशीं वसंतसेनेला मारून शकार सायंकाळीं पुष्पकरण्डक-जीर्णोद्यानांतून परत येतो. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो न्यायालयांत चारुदत्तावर फिर्याद गुदरण्यास जातो. त्याच वेळीं चन्दनकाने लत्ताप्रहार केल्यामुळे अपमानित झालेला वीरक न्यायालयांत येतो. तो म्हणतो, 'चन्दनकाने केलेल्या माझ्या अपमानाचें शल्य माझ्या मनांत असल्यामुळे मी कशीबशी **गेली रात्र** घालविली.' तेव्हा नवव्या अंकांतील शकाराची चारुदत्तावरील फिर्याद वैशाख शुद्ध एकादशीस गुदरली गेली असें दिसतें. त्याच दिवशीं तिचा निकाल लागून चारुदत्त दोषी ठरतो व राजा त्याला सुळावर चढविण्याची आज्ञा करतो.

शेवटच्या दहाव्या अंकांतील घटना याच्याच पुढल्या दिवशीं वैशाख शुद्ध द्वादशीस सकाळीं घडल्या असाव्या. सकाळीं चारुदत्ताला घेऊन चांडाल स्मशानाकडे जात असतां, इकडे शर्विलक, चन्दनक, दर्दुरक इत्यादि मित्रांच्या साहाय्याने गोपालदारक आर्यक राजवाड्यावर चाल करतो व यज्ञवाटांत शिरून तेथे असलेल्या पालक राजाला कंठस्नान घालतो. शर्विलक लगलीच आर्यकाला गादीवर बसवून त्याच्या नांवें दंवडी पिटवितो व पौरजनांना शांतता व सुव्यवस्था यांचें आश्वासन देतो. नंतर तो चारुदत्ताला सोडविण्यासाठी स्मशानाकडे त्वरेने जातो. तेथे सर्वांची भेट होऊन ते आर्या धूता अग्निप्रवेश करणार त्या ठिकाणीं जातात व तिला वांचवितात.

याप्रमाणे 'मृच्छकटिक' नाटकांतील संविधानक **चैत्र कृष्ण षष्ठीस सुरू होऊन वैशाख शुक्ल द्वादशीस समाप्त झालें.** तेव्हा त्या सबंध नाटकांतील घटना घडण्यास **एकूण बावीस दिवस** लागले असावेत.

संस्कृत आणि मराठी 'मृच्छकटिक'*

मराठी नाट्यवाङ्मयाच्या प्रारंभींच्या काळांत ज्या कांही संस्कृत नाटकांचीं मराठींत भाषांतरें झालीं त्यांमध्ये शूद्रकाचें 'मृच्छकटिक' हें होतें. परशरामपंत तात्या गोडबोले यांनी आपलें भाषांतर सन १८६२ मध्ये प्रसिद्ध केलें. या भाषांतराच्या आरंभीं त्यांनी छोटीशी प्रस्तावना लिहून तींत शूद्रकाचा काळ, नाटकाच्या 'मृच्छकटिक' या नांवाची व्युत्पत्ति व मूळच्या संस्कृत नाटकाला प्रकरण कां म्हणतात त्याचीं कारणें यांचें संक्षिप्त विवेचन करून नंतर 'ह्यांतील कथानकें व पात्रें पुराणप्रसिद्ध नाहीत, ह्यामुळे वाचणाऱ्यांच्या मनांत अर्थसंबंध लौकर येणार नाही' असें समजून त्याच्या कथानकाचा सारांश दिला आहे. गोडबोल्यांनी संस्कृत नाटकाचें भाषांतर शब्दशः केलें आहे. त्यामध्ये मुळांतल्या गद्यभागाला गद्य व पद्यभागाला पद्य घातलें आहे. पद्यभागांत श्लोक, आर्या, साकी, दिंडी, ओवी या छंदांचा उपयोग केला आहे. हें भाषांतर 'वाचणाऱ्यां'-करिता असल्यामुळे त्यांत रंगभूमीवरील प्रयोगाच्या दृष्टीने कोणताहि फरक केलेला नाही. मूळ नाटकांतल्याप्रमाणे याचेहि दहा अंक आहेत. त्यांत कोणतीहि काटछाट केली नाही.

त्यानंतर सन १८८९ सालीं गोविंद बल्लाळ देवल यांचें मराठी 'मृच्छकटिक' नाटक रंगभूमीवर आलें. देवल हे स्वतः उत्तम नट असल्या-मुळे त्यांना रंगभूमीवर यशस्वी होण्याकरिता नाटकाच्या ठिकाणीं आवश्यक असलेल्या गुणांची उत्तम कल्पना होती. त्यामुळे त्यांनी मूळ नाटकांतील पाल्हाळीक भाग काढून टाकिला, कांही प्रवेश पूर्णपणें गाळून योग्य ठिकाणीं त्यांचा संबंध मात्र सांगितला, तिसरा व चौथा मिळून एक अंक केला,

* महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष २९, अंक ११४, पृ. ७–१३.

सातवा अंक पूर्णपणें गाळला, सहाव्यांतला आरंभींचा तेवढा प्रवेश ठेवून बाकीचा गाळला आणि ठेवलेला भाग आठव्या अंकाला जोडून त्याचा एक अंक केला. अशा रीतीने त्यांनी मूळच्या दहा अंकांचा सात अंकांत संक्षेप केला. परशुरामपंत तात्यांच्या भाषांतराचें आपणांस बरेंच साहाय्य झाल्याचें देवलांनी आपल्या प्रस्तावनेंत सांगितलें आहे. दोन्ही अनुवादांची तुलना केल्यास गोडबोल्यांच्या कांही चुका देवलांच्या रूपांतरांत आलेल्या दिसतील. त्यांचें थोडें दिग्दर्शन पुढे येईल. नाटकांत केलेल्या या फेरफारांमुळे अंकांतील स्थलैक्य व कालैक्य बिघडलें आहे. कांही ठिकाणीं असंभवनीयताहि उत्पन्न झाली आहे. तथापि त्यामुळे देवलांचें मराठी रूपांतर सुटसुटीत होऊन त्याचा रंगभूमीवर मर्यादित काळांत प्रयोग करणें शक्य झालें. देवलांनी स्वतः रचून घातलेल्या सुरस पद्यांनी त्यांत उत्तम रंग भरला. त्यांतच पात्रसाच्या प्रत्यक्ष दृश्याने त्याची आकर्षकता वाढली. त्यामुळे हें नाटक अनेक वर्षें महाराष्ट्रीय रसिकांचें मनोरंजन करीत राहिलें.

देवलांच्या मराठी 'मृच्छकटिक' नाटकाच्या आतापर्यंत दहा आवृत्त्या झाल्या आहेत. दहाव्या आवृत्तीला जोडलेल्या प्रस्तावनेसंबंधी चर्चा चालू असतां देवलांचें मराठी 'मृच्छकटिक' मूळ संस्कृत नाटकाशीं ताडून पाहण्याची कल्पना मनांत आली. देवलांचें 'मृच्छकटिक' रंगभूमीवर आल्यास आज सत्तर वर्षें झालीं. या दीर्घ काळांत कोणी असा प्रयत्न केल्याचें मला माहीत नाही. म्हणून येथे कांही संदर्भांची चर्चा करण्याचें योजिलें आहे.

(१) पहिल्या अंकाच्या आरंभींच्या प्रवेशांत सूत्रधारास आपल्या घरीं मोठ्या समारंभाची तयारी झालेली दिसते. त्यासंबंधी तो आपल्या भार्येस (नटीस) विचारतो तेव्हा ती 'अभिरूपपति' नामक व्रताच्या पारण्याकरिता ती तयारी चालली आहे, असें सांगते. त्यावर 'हा पति इहलोकचा की परलोकचा?' असा प्रश्न सूत्रधार करितो. नटीने 'परलोकचा' असें उत्तर देतांच त्याचा राग अनावर होतो. आपल्या खर्चाने आपली भार्या परलोकच्या पतीच्या प्राप्तीकरिता व्रत करीत आहे, अशी त्याची समजूत होऊन तो तिला 'हें व्रत तुला कोणी सांगितलें' असें खडसावून विचारतो. 'आपला प्रियमित्र चूर्णवृद्ध याने' असें नटीने उत्तर देतांच तो उद्गारतोः—

जैसें विधिने कापावें नववधूकेशपाशातें ।
तैसें नृपपालकें कापितां नीचा तव कंठातें ।
पाहिन मी जेव्हा । होईन तुष्टात्मा तेव्हा ॥

गोडबोल्यांचें भाषांतरहि बहुतांशीं याच प्रकारचें आहे. फक्त मूळचें भाषण गद्यांत असल्याने त्यांनी तें गद्यांतच केलें आहे. देवलांच्या साकीने सूत्रधाराच्या या उद्गारांना जास्त उठाव मिळाला आहे, यांत संशय नाही. पण तीं ऐकतांना तींत योजिलेल्या उपमेचा अर्थ काय, हा प्रश्न मनांत उपस्थित होतो. शेवटच्या अंकांत चारुदत्ताला पालक राजाच्या आज्ञेने वधस्तंभीं नेण्यांत येणार आहे, त्याची पूर्वसूचना आहे यांत संशय नाही. भासाच्या म्हणून म्हटलेल्या 'चारुदत्त' नाटकांत संस्कृत मृच्छकटिक नाटकाचे शेवटचे सहा अंक गाळले असल्यामुळे त्यांत चारुदत्ताला स्मशानांत नेण्याचा प्रसंग येत नाही. म्हणून त्यांत सूत्रधाराचे हे उद्गार गाळले आहेत. पण त्यामुळे वाचकांस खटकल्याशिवाय राहत नाही. अशा तऱ्हेचे इतरहि अनेक प्रसंग 'चारुदत्तां'त आढळतात. त्यावरून 'चारुदत्त' ही संस्कृत 'मृच्छकटिका'ची संक्षिप्त आवृत्ति आहे, याविषयी संशय राहत नाही. मूळ नाटकांतील सूत्रधाराचे हे उद्गार प्राकृतांत आहेत. ते असे—

सूत्रधारः । (सक्रोधम्) आः दासीएपुत्ता चुण्णवुड्ढा, कदा णु हु तुमं कुविदेण रण्णा पालएण णवबहूकेसकलावं विअ ससुअन्धं कप्पिज्जन्तं पेक्खिस्सं । (आः दास्याःपुत्र चूर्णवृद्ध, कदा नु खलु त्वां कुपितेन राज्ञा पालकेन नववधूकेशकलापमपि ससुगन्धं छिद्यमानं प्रेक्षिष्ये ।

या उत्तरांतील उपमेने अनेकांना बुचकळ्यांत पाडिलें आहे. संस्कृत 'मृच्छकटिक' नाटकाच्या इंग्रजींत अनेक सटीक आवृत्त्या व भाषांतरें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांच्या कर्त्यांनी या उताऱ्याचा अर्थ 'क्रुद्ध झालेला पालक राजा नववधूचा सुगन्धित केशकलाप जसा कापतो तसा त्याने तुझा गळा कापतांना मी केव्हा पाहीन ?' असा केला आहे. हार्वर्ड विद्यापीठाच्या प्राच्यग्रंथमालेंत डॉ. रायडर यांनी 'मृच्छकटिका'चें सुंदर इंग्रजी भाषांतर केलें आहे. त्यांना 'पालक राजा नववधूचा केशकलाप कापतो' ही कल्पना पसंत न पडल्यामुळे त्यांनी 'कधी बरें पालक राजा तुझ्यावर रागावलेला मी

पाहीन ? तेंव्हा नववधूच्या केशकलापाचा जसा (भांगाच्या रूपाने) विभाग होतो तसा तुझ्या देहाचा खात्रीने विभाग होईल' असें भाषान्तर केलें आहे. पण मुळांतील 'कप्पिज्जन्तं' या प्राकृत शब्दाचा 'कापला गेलेला' असाच अर्थ होतो, ' विभक्त झालेला' असा अर्थ होत नाही. कांही टिप्पणीकारांनी त्यावर श्लेष मानून त्याचा अर्थ केशपक्षीं 'सज्जी-क्रियमाण' (म्हणजे वेणी घातलेला) आणि चूर्णवृद्धपक्षीं 'छिद्यमान' (कापलेला) असा केला आहे. तो मान्य केल्यास 'क्रुद्ध पालक राजा नववधू-च्या सुगन्धित केशकलापाची जशी वेणी घालतो तसा तो तुला कापील' असा या वाक्यांतून अर्थ निघेल व तो हास्यास्पद होईल, हें उघड आहे. इतर टिप्पणीकारांनी 'कापलेला' असा एकत्र अर्थ घेऊन त्यांतून निरनिराळे ध्वनि काढले आहेत. कलकत्ता विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या इंग्रजी भाषां-तराचे कर्ते श्री. सत्येन्द्रकुमार बसु 'ज्याप्रमाणे पालक राजा आपल्या नववधूचा सुगन्धित केशकलाप कापतो त्याप्रमाणे' इत्यादि अर्थ करितात. पण तशी पद्धत प्राचीन काळीं होती, असें समजण्यास आधार नाही. प्राचार्य र. दा. करमरकर तर या भाषणांतील उपमेवरून पालक राजा अत्यंत जुलमी होता व त्याला तरुण स्त्रियांचें मुंडन करण्याचें वेड होतें, असा व्यंग्यार्थ काढतात. डॉ. वा. गो. परांजपे म्हणतात की, असलें निंद्य कर्म पालक राजाने केलें नसलें तरी आंध्रभृत्यवंशी एखाद्या राजाने केलें असावें. विख्यात संस्कृतज्ञ टीकाकारांचे हे अर्थ पाहतां गोडबोले व देवल यांनी या संदर्भाचा केलेला अर्थ पुष्कळ चांगला वाटतो.

गोडबोले व देवल यांनी या संदर्भांत अनुक्रमें 'दैवाने' व 'विधिने' असे शब्द घालून 'दुर्दैवाने वैधव्य आल्यावर नववधूचा केशकलाप जसा कापला जातो त्याप्रमाणे' असा अर्थ केला आहे. पण त्याला मूळ संस्कृत वाक्यांत आधार नाही व तसा अर्थ शूद्रकाला विवक्षित होता असेंहि वाटत नाही. देवलांच्या साकींत मुळांतलें 'ससुगन्धं' याचा अर्थ आला नाही. तें पद तर अत्यंत महत्त्वाचें आहे. ज्या चूर्णवृद्धावर सूत्रधार कोपला होता तो त्याचा जसा 'प्रियवयस्य' होता तसा चारुदत्ता-चाहि होता. त्याने चारुदत्ताचा शेला जाईच्या फुलांनी सुगन्धित करून तो मैत्रेयाबरोबर परत पाठविला होता (अनुप्रेषितः), आणि चारुदत्ताची

देवपूजा संपल्यावर तो त्यास देण्याविषयी सांगितलें होतें.* तो शेला पाहिल्यावर चारुदत्ताच्या मनांत आपल्या दारिद्र्याविषयीं विचार उत्पन्न झाले, असें पहिल्या अंकांत दाखविलें आहे. ('गृहीत्वा सचिन्तः स्थितः' ही अभिनय सूचना व त्यानंतरचे त्याचे उद्गार पाहा.) याचें कारण शूद्रकानें स्पष्टपणें सांगितलें नसल्यामुळे आपणांस त्याचें अनुमान केलें पाहिजे. अशीं एकदोन स्थळें संस्कृत 'मृच्छकटिकां'त अन्यत्र सांपडतील. कदाचित् चूर्णवृद्धाने तो शेला चारुदत्ताकडून आग्रहाने मागवून घेऊन तो सुगन्धित केला असावा. तो परत घेतांना इतरांना सदैव देणग्या व पारितोषिकें देणाऱ्या चारुदत्ताच्या मनांत आपल्या दारिद्र्याची जाणीव उत्पन्न झाल्यास नवल नाही. तेव्हा हा चूर्णवृद्ध सुगंधी तेलें व अत्तरें विकणारा आणि वस्त्रें सुगंधित करणारा 'गन्धी' होता, असें दिसतें. सदैव अत्तरादि सुगन्धित द्रव्याशीं संबंध येत असल्याने तो स्वतः सुगंधित झाला असल्यास आश्चर्य नाही. नववधूंना आपल्या केशकलापाला तैलपुष्पादिकांनी सुगंधित करण्याची आवड असते, हें सांगण्याची जरुरी नाही. तेव्हा सूत्रधार म्हणतो, 'नववधूच्या केशकलापाप्रमाणे (अत्तरादिकांनी) सुगंधित झालेल्या तुला पालक राजा केव्हा कापील, असें मला झालें आहे.' चूर्णवृद्ध हा सूत्रधाराचा 'प्रियवयस्य' होता. तेव्हा त्याचें भाषण वाच्यार्थानें घ्यावयाचें नाही. चूर्णवृद्ध सदैव सुगंधी तैलें, अत्तरें विकणें, वस्त्रांना सुगंधित करणें इत्यादि कामांत गुंतला असल्यामुळे त्याचा देह सुगंधित होत असे. म्हणून सूत्रधाराने विनोदाने त्याला नववधूच्या केशपाशाची उपमा दिली आहे. या उपमेंतील साधारण धर्म 'कप्पिजन्तं' (कापलेला) हा नसून 'ससुअन्धं' (सुगन्धित)

* या शेल्याचा उपयोग शूद्रकाने नंतर दोन ठिकाणीं केला आहे. त्याच्या सुगंधावरून चारुदत्ताचें यौवन अनुदासीन आहे, याचा प्रत्यय वसंतसेनेस येतो. पुढे कर्णपूरकाला बक्षीस मिळालेल्या शेल्याला तसाच सुगंध येत असल्यामुळे तो कर्णपूरकाकडे फेकणारा गृहस्थ चारुदत्तच होता, असें अनुमान वसंतसेना करिते. 'चारुदत्त' नाटकाच्या कर्त्यानें प्रस्तावनेंत चूर्णवृद्धाच्या 'गन्धी'पणाचें वर्णन गाळलें आहे, तसेंच येथेहि याने पाठविलेल्या 'जातिकुसुमवासित प्रावरकाचा' उल्लेख गाळला आहे.

हा आहे. तेव्हा पालक राजाला आपल्या किंवा इतरांच्या तरुण स्त्रियांचे सुगंधित केशपाश कापण्याचें वेड होतें, असें मानण्याची आवश्यकता नाही. वरील अर्थास अनुसरून देवलांच्या अनुवादांत बदल करणें जरूर आहे.

(२) पहिल्या अंकांत सूत्रधार मैत्रेयास भोजनास बोलावतांना म्हणतो—'आजचें भोजन उत्तम प्रकारचें चमचमीत आहे; तुला कोणचीहि अडचण नाही.' आता मूळचें वाक्य पहा—अज्ज सम्पण्णं भोअणं नीसवत्तं च। (अद्य सम्पन्नं भोजनं निस्सपत्नं च।) यांतील 'निस्सपत्नं' याचा अनुवाद 'तुला कोणचीहि अडचण नाही' असा केला आहे; पण तो बरोबर दिसत नाही. मैत्रेय मोठा भोजनलोलुप ब्राह्मण. तेव्हा त्याला आकृष्ट करण्याकरिता सूत्रधार सांगतो की, आज आम्ही दुसऱ्या कोणास भोजनास बोलाविलें नाही. आजच्या जेवणांत तुझा कोणी वांटेकरी होणार नाही. तुला यथेच्छ खावयास मिळेल. गोडबोल्यांचें भाषान्तर 'तुला दुसऱ्या कोणाची अडचण नाही' असें आहे. तें स्पष्ट नसलें तरी बरें आहे. देवलांच्या भाषांतरांत 'दुसऱ्या कोणाची' याचें 'कोणचीहि' असें रूपांतर झालेलें दिसतें. मैत्रेयाला कांही अडचण आहे की नाही, हें सूत्रधाराला कसें माहीत असणार? आपल्या येथे दुसरा कोणी बोलाविला नसल्यामुळे मैत्रेयाला आकंठ भोजन करतां येईल हें त्याला सांगावयाचें आहे.

(३) पहिल्या अंकांतील मुख्य प्रवेशाच्या आरंभीं चारुदत्त आपल्या दारिद्र्याविषयीं खेदोद्गार काढतो तेव्हा मैत्रेय म्हणतो—'हें बघ, आता त्या गोष्टीचा खेद मानूं नकोस. तुझें द्रव्य कांही चोरांनी चोरिलें नाही की राजाने लुटलें नाही. आपल्याच इष्टमित्रांना देतां देतां क्षीण झालें आहे.' यांतील शेवटचें वाक्य मुळांतील 'प्रणयिजनसंक्रामितविभवस्य' याचा अनुवाद आहे. गोडबोल्यांचा अनुवाद अशाच तऱ्हेचा आहे. संस्कृतांत 'प्रणयिन्' याचा अर्थ 'याचक' असाहि होतो, व तोच येथे विवक्षित आहे. चारुदत्ताने आपलें धन आपल्या इष्टमित्रांस देऊन संपविलें असतें तर त्याबद्दल त्यास फारसें श्रेय मिळालें नसतें. त्याने तें निरपेक्षपणें याचकांना देऊन टाकिलें म्हणून त्याची थोरवी.

(४) दुसऱ्या अंकांतील पहिल्या प्रवेशांत मदनिका वसंतसेनेला आपल्या प्रियकराचें नांव सांगण्याविषयीं आग्रह करिते. तेव्हा वसंतसेना

म्हणते, 'अगे, मी कामदेवाच्या उत्सवासाठी गेलें होतें तेव्हा तूं होतीस ना माझ्याबरोबर ? मग मला काय नवखीसारखें विचारतेस ? तुला नाही का आठवण ?' त्यावर मदनिका उत्तर करते--'हं हं समजलें. त्या दिवशीं तुम्ही ज्याची प्रार्थना केली आणि ज्याने तुम्हांला वचन दिलें तोच ना ?' गोडबोल्यांचा अनुवाद असाच आहे. फक्त 'वचन' बद्दल 'अभि-वचन' घातलें आहे. वसंतसेनेने चारुदत्ताची काय प्रार्थना केली व त्याने तिला कोणतें वचन दिलें, हें स्पष्ट नसल्याने वाचक किंवा प्रेक्षक येथे बुचकळ्यांत पडतो. मुळांतील वाक्य असें आहे—ज्ञातम् । किं स एव येनार्या शरणागताभ्युपपन्ना ? (समजलें. तोच का तुमचा प्रियकर ज्याने तुम्ही शरण गेलां असतां तुमचें रक्षण केलें ?) यांतहि कामदेवोत्सवांतील प्रसंगाचा स्पष्ट निर्देश नाही. पण तेथे कोणी दुष्ट मनुष्य वसंतसेनेला त्रास देऊं लागला तेव्हा ती जवळच असलेल्या चारुदत्ताला शरण गेली व त्याने तिची सुटका केली, असें अनुमान करितां येतें. वसंतसेनेच्या पाठीस लागणारा हा शकारच असावा. पहिल्या अंकांतील त्याच्या भाषणांत कामदेवाच्या उत्सवाचा उल्लेख आहे तो पाहा.

(५) पांचव्या अंकांतील पहिल्या प्रवेशाच्या शेवटीं वर्धमानक गाडीं-तील बैठक आणावयास जातांना म्हणतो, 'अरे, हा कोण जती येत आहे ? अपशकुनच समजावयाचा ! बरें, आपण उजव्या बाजूने जाऊं.' मूळ नाटकांत हे उद्गार चारुदत्ताच्या तोंडीं आहेत. पुष्पकरण्डक जीर्णोद्यानांत आपल्या गाडींतून आलेल्या गोपालदारक आर्यकाची बेडी काढून घेऊन त्याला इष्टस्थलीं पोहोचविण्याची व्यवस्था केल्यावर चारुदत्त बौद्धभिक्षूला—पूर्वाश्रमींच्या संवाहकाला—पाहून हे उद्गार काढितो. देवलांनी संस्कृत 'मृच्छकटिकां'तील सातवा अंक पूर्णपणे गाळल्यामुळे त्यांनी हे उद्गार वर्ध-मानकाच्या तोंडीं घातले आहेत. त्याचा उद्देश अर्थातच पुढील प्रवेशांतील बौद्ध भिक्षूच्या प्रवेशाची सूचना देणें हा आहे. पण तो चांगला साधला नाही. पांचव्या अंकांतील पहिल्या प्रवेशाचें स्थल चारुदत्ताचा वाडा हें आहे, तर दुसऱ्या प्रवेशाचें स्थल पुष्पकरंडक—जीर्णोद्यानाजवळच्या उद्यानाचा मार्ग आहे. या दोन स्थळांतील अंतर कित्येक मैल होतें. कारण चारुदत्ताच्या वाडयापासून जीर्णोद्यानांत गाडी नेण्यास वर्धमानकाला, तसेंच शकाराच्या

चेटालाहि, चारपांच तास लागले होते. तेव्हा चारुदत्ताच्या वाड्याजवळ असलेल्या वर्धमानकाला पुष्पकरंडक-जीर्णोद्यानाजवळचा भिक्षु कसा दिसला, असा प्रश्न येथे उपस्थित होतो. देवलांनी आगामी प्रवेशांतील भिक्षूची पूर्वसूचना देण्याचा प्रयत्न केल्यामुळे ही अडचण उत्पन्न झाली आहे.

(६) पांचव्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशाचें स्थल 'मार्ग' असें सांगितलें आहे. त्यांतील भिक्षूच्या भाषणावरून तो एका उद्यानांत जात असतां त्याला दुरून चारुदत्त व मैत्रेय दिसतात. चारुदत्ताने आर्यकाची बेडी काढवून त्याला मुक्त केलें आहे, असें पाहिल्यावर भिक्षु म्हणतो, 'या वेळीं याच्या दृष्टीस पडणें उचित नाही. तर आपण पुढच्या राजश्यालकाच्या उद्यानांत जावें.' या भाषणावरून चारुदत्त व मैत्रेय शकाराच्या पुष्प-करण्डक जीर्णोद्यानांत नसून जवळच्या दुसऱ्या एका उद्यानांत वसंतसेनेची वाट पाहत होते, असें दिसतें. पण पहिल्या प्रवेशांतील वसंतसेना व दासी यांच्या संभाषणावरून चारुदत्त पुष्करण्डक-जीर्णोद्यानांत गेला होता व तेथेच वसंतसेनेला आणण्याविषयी त्याने वर्धमानाला सांगितलें होतें, असें म्हटलें आहे. या दोन प्रवेशांतील ही विसंगति देवलांनी मुळांतील एक अंक सबंध गाळून त्याचा सारांश भिक्षूच्या भाषणांत देण्याचा प्रयत्न केल्यामुळे उत्पन्न झाली आहे.

(७) वरील प्रवेशांत 'मी मारलें म्हणून तो चेट पळून जात आहे त्याला धरून आण' असें सांगून शकार विटाला दूर करतो व तो गेल्यावर वसंतसेनेचा गळा दाबून तिला मूर्च्छित करितो. कांही वेळाने चेटाला घेऊन आल्यावर विट म्हणतो—'हा तर पाय पसरून वाटेंत बसला आहे. तेव्हा यानेच स्त्रीवध केला खचित. ईश्वर आता कल्याण करो!' शकाराने वसंतसेनेला मारलें असल्याचें विटाला अद्यापि माहीत नाही. तें पुढे शकार त्याला वसंतसेना जमिनीवर पडलेली दाखवितो तेव्हा समजतें. तेव्हा त्याच्या अगोदरच विटाला शकाराने स्त्रीवध केला असें कसें वाटलें? मूळ संस्कृत नाटकांत ही अनुपपत्ति येत नाही. त्यांतील विटाचें भाषण पहा—
विटः—अनुनीतो मया स्थावरकश्चेटः। तद्यावत् काणेलीमातरं पश्यामि। (परिक्रम्यावलोक्य च) अये, मार्ग एव पादपो निपतितः। अनेन च पतता

स्त्री व्यापादिता। भोः पाप, किमिदकार्यमनुष्ठितं त्वया। तत्रापि पापिनः पतनात् स्त्रीवधदर्शनेनातीव पातिता वयम्। अनिमित्तमेतत्। यत्सत्यं वसन्तसेनां प्रति शङ्कितं मे मनः। सर्वथा देवताः स्वस्ति करिष्यन्ति। या भाषणावरून विटाला परत आल्यावर वाटेंत मोठें झाड पडलेलें व त्याखाली सांपडून एक स्त्री मेलेली आढळली. हें दुश्चिन्ह वाटून त्याला वसंतसेनेविषयीं काळजी वाटूं लागली, असें दिसतें. हें झाड आदल्या दिवशींच्या वादळांत पडलें होतें, हें उघड आहे. या घटनेचा उपयोग शूद्रकाने पुढील अंकांत चारुदत्ताला दोषी ठरविण्यांत केला आहे. शकार चारुदत्तावर वसंतसेनेचा वध केल्याचा आरोप करितो. तितक्यांत तेथें आलेल्या वीरक नामक नगररक्षकाच्या जबानीवरून वसंतसेना आदल्या दिवशीं चारुदत्ताच्या गाडींतून पुष्पकरण्डक जीर्णोद्यानांत क्रीडा करण्याकरिता गेली होती, असें समजल्यावर न्यायाधीश त्याला (वीरकाला) त्या उद्यानांत जाऊन तेथें एखादें स्त्रीचें प्रेत पडलें आहे काय, तें पाहून येण्यास पाठवितो. वीरकाने आपण तेथें कोल्ह्याकुत्र्यांनी खाल्लेलें प्रेत पाहिलें, असें सांगताच न्यायाधीशाला चारुदत्त दोषी असल्याची शंका येते. सहाव्या अंकांत चारुदत्तावर वसंतसेनेचा खून केल्याचा आरोप सिद्ध करण्याकरिता जी पुराव्यांची सांखळी दाखविली आहे तींत पुष्पकरण्डक जीर्णोद्यानांतील स्त्रीचें प्रेत, हा एक महत्त्वाचा दुवा आहे. पण देवलांच्या 'मृच्छकटिकां'त तें प्रेत त्या उद्यानांत कसें आलें, तें दाखविलें नाही. पांचव्या अंकांतील विटाच्या पूर्वोक्त भाषणांत या स्त्रीला अपघाताने आलेल्या मरणाचा उल्लेख यावयाचा, पण तो आला नाही. याचें कारण देवलांनी येथे परशरामपंत तात्यांच्या चुकीच्या भाषांतराचा अनुवाद केला आहे हें होय. मागे संस्कृत 'मृच्छकटिकां'तील विटाच्या भाषणांतील उतारा आहे. त्याशीं तात्यांचें खालील भाषांतर ताडून पाहिल्यास ही गोष्ट स्पष्ट होईल.

विट—हा स्थावरक चेट मी समजावून माघारा आणिला. आता काणेलीपुत्रास जाऊन भेटावें. (इकडेतिकडे पाहून) अरे, हा तर पाय पसरून मार्गांतच पडला आहे ! तर याने स्त्रीवध केला असावा, असें वाटतें. हाय, हाय ! अरे दुष्टा, काय ही अनर्थाची गोष्ट केली त्वां ! तुजसारख्या पाप्याच्या पतनानें आणि स्त्रीवधदर्शनाने आम्ही फारच

पतित झालों. ह्या दुश्चिन्हावरून त्या वसंतसेनेविषयी माझे मनांत जी शंका आली ती खरी. असो, सर्व प्रकारें देवता कल्याण करोत.

तात्यांचें मराठी भाषांतर बहुतेक ठिकाणीं निर्दोष आहे. कदाचित् संस्कृत 'मृच्छकटिका'तील अशुद्ध पाठामुळे त्यांच्या हातून या ठिकाणीं चूक झाली असेल. देवल मूळ संस्कृत नाटक न पाहतां तात्यांच्या भाषांतरावर अवलंबून राहिल्यामुळे त्यांच्याहि नाटकांत तीच चूक राहिलेली दिसते.

(८) सहाव्या अंकाच्या शेवटीं न्यायाधीश 'चारुदत्ताला दूर ने, आणि मांगास आज्ञा दे की, याला घेऊन जाऊन राजाज्ञेप्रमाणे सुळी द्यावें' असें शोधनकास सांगतो; तेव्हा चारुदत्ताला क्रोध येऊन तो म्हणतो—

सत्त्व घ्यावें असें चित्ति होतें तरी। वह्नि, विष, जल, तुला यांहि अथवा। कंठ माझा तुवां कापुनी करवतीं। शांतवाया मना प्राण घ्यावा ॥

या उद्गारांवरून वह्नि, विष, जल आणि तुला हीं करवताप्रमाणें प्राण घेण्याचीं साधनें होतीं, असा प्रेक्षकांचा ग्रह होतो. पण तसा अर्थ विवक्षित नाही. वह्नि, विष, जल व तुला हीं दिव्यें होत. इतर प्रमाणांच्या अभावीं न्यायनिवाड्याच्या कामीं यांचा उपयोग केला जात असे. या दिव्यांच्या योगें आपलें निरपराधित्व सिद्ध करण्याची संधि पालक राजाने आपणांस द्यावयास पाहिजे होती. त्यांत आपण दोषी ठरलों असतों, तर पालक राजाने आपला कंठ करवताने चिरला असता तरी हरकत नव्हती, असें चारुदत्ताचें म्हणणें आहे. हा अर्थ देवलांच्या पद्यांत स्पष्टपणें आला नाही. याविषयी तात्यांचा खालील श्लोक आहे—

विषसलिलतुलाग्नि ह्यांस आधी शरीर
करवतिं मग द्यावें सोडुनी हा विचार।
मज रिपुवचनाने मारिशी ब्राह्मणातें
कुलसह नरकीं तूं पाडिशी आपणातें ॥

देवलांचें 'मृच्छकटिक' अत्यंत सुंदर नाटक आहे. त्याने महाराष्ट्रीय रसिकांचें मनोरंजन दीर्घकाळ केलें आहे. तें सर्वस्वीं निर्दोष व्हावें, या हेतूने वरील चर्चा केली आहे. तींत कांही तथ्य असल्यास त्याचा विचार पुढील आवृत्तीच्या वेळीं व्हावा, ही इच्छा.

'शाकुंतल' नाटकांतील एक प्रसंग*

'क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः ।'

अभिजात ग्रंथकारांच्या ग्रंथांचें जों जों परिशीलन करावें तों तों त्यांचा आशय जास्त जास्त ध्यानांत येऊन रसिक वाचकांस अधिकाधिक आनंद होतो. म्हणून त्यांच्या ग्रंथांवर अनेक टीका, टिप्पणें, चर्चा होऊन त्यांचें हृद्गत समजून घेण्याचा व इतरांस तें समजून देण्याचा प्रयत्न वरचेवर होत असलेला दृष्टीस पडतो. आंग्लकविसम्राट् शेक्सपीयर याच्या प्रत्येक नाटकावर अशा तऱ्हेचीं इतकीं टीका-टिप्पणें झालीं आहेत की, आता त्यांच्या सारांशाचाही समावेश एका भल्या मोठया ग्रंथांत होऊं शकत नाही. आमच्या भारतीय कवींचें भाग्य अशा तऱ्हेने अद्यापि उदयास आलें नाही. तथापि त्यांच्यामध्येहि कालिदास, भवभूति यांसारखे कांही असे ग्रंथकार आहेत की, त्यांच्या ग्रंथांचा पाश्चात्य मर्मग्राही पद्धतीने अभ्यास केल्यास त्यांपासून 'प्रतिक्षणिं नवीच रुचि' प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. प्रस्तुत लेखांत कविकुलगुरु कालिदासाच्या परिणतप्रज्ञतेचें फळ असें जें 'शाकुंतल' नाटक त्यांतील एका प्रसंगाची थोडी चर्चा करण्याचें योजिलें आहे.

'शाकुंतला'च्या पांचव्या अंकांतील हा प्रसंग. दुर्वास ऋषीच्या शापाने राजाला पूर्वकृत्याची विस्मृति पडल्यामुळे आपल्यापुढे प्रत्यक्ष येऊन उभ्या राहिलेल्या शकुंतलेचीहि ओळख पटत नाही. त्यामुळे शकुंतलेच्या बरोबर आलेला कण्वशिष्य शार्ङ्गरव त्यास टाकून बोलतो. शकुंतलाहि ओळख

---

* फुलोर (मॉरिस कॉलेज, नागपूर,च्या शारदामंडळाचें दशवार्षिक प्रकाशन, १९३५), पृ. ३-४१.

पटविण्यास राजाची अंगठी दाखवावी म्हणून पाहते, पण ती अगोदरच शचीतीर्थाला नमस्कार करतांना तिच्या बोटांतून गळून पडली असल्याने तिला सापडत नाही. तेव्हा पूर्वीच्या एकांतांतील गोष्टींची आठवण देऊन शकुंतला राजाची स्मृति जागृत करण्याचा प्रयत्न करते. पण त्यांत तिला यश येत नाही. शेवटीं 'तूं पाहिजे तर हिचा स्वीकार कर, नाही तर टाक' असें राजाला सांगून गौतमीसह ऋषिकुमार जावयास निघतात. शकुंतलेला ते आपल्या बरोबर येऊं देत नाहीत. इकडे राजाहि तिला परस्त्री समजून तिचा स्वीकार करीत नाही. शकुंतलेच्या अशा असहाय स्थितींत 'प्रसूती-पर्यंत तिला माझ्या घरीं राहूं द्या' असें पुरोहित सुचवितो व राजाची त्याला संमति मिळतांच तो रडत असलेल्या शकुंतलेला घेऊन जातो. कांही वेळाने 'काय हो, हें आश्चर्य!' असे पडद्यामागे शब्द ऐकूं येतात व नंतर पुरोहित प्रवेश करून काय घडलें तें वर्णन करतो. या प्रसंगीं कालि-दासाने त्याच्या तोंडीं खालील श्लोक घातला आहे—

या निन्दन्ती स्वानि भाग्यानि बाला
बाहूत्क्षेपं क्रन्दितुं च प्रवृत्ता।
स्त्रीसंस्थानं चाप्सरस्तीर्थमारा-
दुत्क्षिप्यैनां ज्योतिरेकं जगाम॥ शाकुंतल ५, ३०.

शाकुंतलाच्या ज्या देवनागरी व बंगाली अशा दोन प्रमुख पाठपरंपरा आहेत त्या दोहोंतही हा श्लोक आढळतो. त्यांत 'उत्क्षिप्य' याच्या जागीं 'आक्षिप्य' आणि 'एनां'च्या जागीं 'अङ्के' एवढेच पाठभेद आढळतात, व तेही फारसे महत्त्वाचे नाहीत. कण्वशिष्य परत गेल्यावर आपल्या दैवाला दोष देत शकुंतला बाहू उंच करून रडूं लागली असा यांतील पहिल्या दोन चरणांचा अर्थ आहे व त्याविषयीं मतभेद नाही. पण श्लोकाच्या उत्तरार्धाच्या अर्थाबद्दल मात्र बराच मतभेद दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, मॉनियर विल्यम्सने त्याचें येणेंप्रमाणे भाषान्तर केलें आहे—

A single flash of light in female shape having snatched her up near the Apsarastirtha went off (with her).

आता प्रो. अ. ब्रा. गजेंद्रगडकर यांचें भाषांतर पहा—

And that very moment a lustre of the form of a woman having lifted her up from afar went towards the Apsarastirtha.

शाकुंतलाचे प्राचीन टीकाकार राघवभट्ट 'स्त्रीसंस्थानं ललनाकारमेकं केवलं ज्योतिः एनामाक्षिप्य अप्सरस्तीर्थं जगामेति संबंधः।' (स्त्रीरूपधारी एक तेजःपुंज मूर्ति तिला घेऊन अप्सरस्तीर्थाकडे गेली असा या श्लोकार्धाचा अन्वय लावावयाचा) असें म्हणतात, तर शाकुंतलाचे एक आधुनिक बंगाली टीकाकार कृष्णनाथ न्यायपञ्चानन भट्टाचार्य हे आपल्या संस्कृत टीकेंत 'अप्सरस्तीर्थं' हें 'स्त्रीसंस्थानं ज्योतिः' याचें विशेषण करून 'अप्सरांसारखें दिसणारें' किंवा 'अप्सरांपासून उत्पन्न झालेलें' असें ललनाकृति तेज असा अर्थ सुचवितात. मराठी भाषांतरकारांमध्येंहि असाच मतभेद आहे. उदाहरणार्थ, अलीकडे उत्कृष्ट म्हणून गणलेलीं अशीं श्रीयुत के. वि. गोडबोले व लक्ष्मणशास्त्री लेले यांचीं शाकुंतलाचीं मराठी भाषांतरें घेऊं—

गोडबोलेकृत 'महाराष्ट्र शाकुंतल'—

स्त्रीरूपी तों एक तेजाळ मूर्ति
उंचोनी घे ने तिला शक्रतीर्थीं ॥

लेलेकृत 'मराठी शाकुंतल'—

स्त्रीज्योति तीर्थनिकटीं इतुक्यांत आली
घेऊनि तीस उचलोनि अदृश्य झाली ॥

या विविध भाषांतरांचा विचार करतां कृष्णनाथ न्यायपञ्चानन यांचा विलक्षण अर्थ सोडला तर भाषांतरकारांमध्ये दोन पक्ष दिसतात. एक पक्ष 'आरात्' याचा संबंध 'अप्सरस्तीर्थम्' याकडे जोडून 'अप्सरस्तीर्थाजवळ एक तेजःपुंज मूर्ति शकुंतलेला घेऊन अदृश्य झाली' असें मानतो तर दुसरा 'अप्सरस्तीर्थम्' हें पद 'आरात्' याशीं न जोडतां 'जगाम' याशीं जोडतो व 'एक तेजःपुंज मूर्ति शकुंतलेला घेऊन अप्सरस्तीर्थाकडे गेली

असा अर्थ करतो. या दोन अर्थांपैकी कोणता सयुक्तिक आहे याचा आता विचार करूं.

'शाकुंतला'चें थोडें बारकाईने वाचन केल्यास शक्रावतार (शक्रघाट), शचीतीर्थ, अप्सरस्तीर्थ वगैरे तीर्थें दुष्यंतकाळीं हस्तिनापुरांत होतीं अशी कल्पना कालिदासाने केलेली आढळून येईल. शचीतीर्थाला नमस्कार करतांना शकुंतलेच्या बोटांतून अंगठी गळून पाण्यांत पडली असा वर उल्लेख आलाच आहे. याच तळयाच्या घाटाला शक्रघाट म्हणत असावे. कारण सहाव्या अंकाच्या आरंभीं अंगठीबद्दल ज्या कोळयाला पकडलेलें दाखविलें आहे, तो शक्रावतारीं राहणारा होता असा उल्लेख आला आहे. तेव्हा अप्सरस्तीर्थ याचाहि 'अप्सरांपासून झालेलें' किंवा 'अप्सरांसारखें दिसणारें' (तेज) असा अर्थ न करिता 'अप्सरांचें तीर्थ' असा अर्थ केला पाहिजे हें उघड आहे. या तीर्थाला अप्सरस्तीर्थ म्हणण्याचें कारणहि कालिदासाने अन्यत्र सांगितलें आहे. सहाव्या अंकाच्या आरंभीं मेनकेची सखी सानुमती म्हणते, ' साधुजनांचीं स्नानें होईपर्यंत अप्सरस्तीर्थावर हजर राहण्याची माझी पाळी संपली आहे तेव्हा आता त्या राजर्षीची काय अवस्था आहे तें आता पाहावें. ' यावरून अप्सरस्तीर्थावर सज्जन स्नान करीत त्या वेळीं अप्सरा आळीपाळीने उपस्थित राहत असत अशी कल्पना कालिदासाने केली आहे असें दिसून येईल. शकुंतलेला कोणी उचलून नेलें हें कालिदासाने पांचव्या अंकांत सांगितलें नाही, कारण पांचव्या अंकांतील हकीकत पुरोहिताच्या भाषणांत आली आहे. पुरोहिताला अर्थातच शकुंतलेला कोणी व कोठे उचलून नेलें हें सांगणें शक्य नव्हतें. शकुंतलेला नेणारी व्यक्ति तेजःपुंज असून ती स्त्रीसारखी दिसत होती एवढेंच त्याने आपल्या भाषणांत सांगितलें आहे. पण या गोष्टीचा उलगडा कालिदासाने सातव्या अंकांतील मारीच ऋषीच्या भाषणांत केला आहे. मारीच ऋषि म्हणतात, ' अप्सरस्तीर्थाच्या घाटावरून दुःखी शकुंतलेला घेऊन मेनका दाक्षायणीकडे (अदितीकडे) आली, त्याच वेळीं दुर्वासाच्या शापामुळे तूं या आपल्या सहधर्मचारिणीला टाकलेंस असें मला समजलें. ' या त्यांच्या भाषणावरून, शकुन्तला पुरोहिताबरोबर रडत जात असतांना अप्सरस्तीर्थाजवळ आली त्या वेळीं मेनकेची तेथे हजर राहण्याची पाळी होती व तिने आपल्या

दुःखी मुलीला पाहून लागलीच आपल्याबरोबर स्वर्गांत नेलें, असें कालिदासास सुचवावयाचें आहे हें स्पष्ट आहे.

वरील विवेचनावरून 'आरात्' याचा संबंध 'अप्सरस्तीर्थम्' याच्याशीं जोडून अप्सरस्तीर्थाजवळ कोणी तेजःपुंज स्त्रीने शकुन्तलेस उचलून नेलें हाच अर्थ कालिदासास अभिप्रेत होता हें स्पष्ट होईल. दुसरें असें की, शकुन्तलेला उचलून अप्सरस्तीर्थाकडे नेलें असा जो दुसरा अर्थ, तो मुळीच संभवनीय नाही. पुरोहिताच्या जवळून शकुन्तलेला (अर्थात् आकाशमार्गाने) घेऊन जाणारी व्यक्ति नेमकी अप्सरस्तीर्थाकडेच गेली असें त्यास कसें समजलें ? शिवाय अप्सरस्तीर्थ हें भूलोकीं हस्तिनापुरांतच होतें, स्वर्गांत नव्हतें, हें आपण मागे पाहिलें आहे. दुःखी शकुन्तलेला घेऊन जाणारी मेनका अप्सरस्तीर्थाकडे न जातां जेथे अदितीच्या सान्निध्यांत तिला दुःखाचा थोडा विरंगुळा वाटेल त्या मारीचाश्रमाकडे एकदम जाईल हें उघड आहे. तेव्हा वरील श्लोकाच्या उत्तरार्धांचा 'कोणी तेजःपुंज स्त्री शकुन्तलेला वर उचलून अप्सरस्तीर्थाकडे गेली' असा अर्थ करणें शक्य नाही, हें वाचकांच्या लक्षांत येईल.

'शाकुन्तल' नाटक लक्षपूर्वक वाचल्यास वरील श्लोकाचा खरा अर्थ कोणाच्याहि लक्षांत यावा इतका तो साधा आहे. मग या बाबतींत इतके विद्वान् चुकले कसे ? असा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचें उत्तर हें की, आरात् याचा अप्सरस्तीर्थम् याशीं संबंध जोडण्यांत व्याकरणनियमाची अडचण येते. पाणिनीचें सूत्र पुढीलप्रमाणे आहे —

अन्यारादितरर्तेदिक्शब्दाञ्चूत्तरपदाजाहियुक्ते । २. ३. २९.

'अन्य, आरात्, इतर, ऋते, दिशा दाखविणारे, तसेंच अञ्च् धातूपासून झालेले प्राक्, प्रत्यक् यांसारखे शब्द, आच् व आहि हे प्रत्यय अंतीं असलेले शब्द (उदाहरणार्थ, दक्षिणा, दक्षिणाहि), यांना पंचमीची अपेक्षा असते' असा वरील सूत्राचा अर्थ आहे. तेव्हा अप्सरस्तीर्थाजवळ असा अर्थ कवीस विवक्षित असता तर तो 'अप्सरस्तीर्थात् आरात्' असें लिहिता, असें वाटून वरील विद्वानांनी प्रस्तुत श्लोकाचा ओढाताणीचा अर्थ पसंत केला असावा. कालिदासाचें व्याकरणाकडे चांगलेंच लक्ष होतें असें दिसतें.

व्याकरणनियमानुसार बनलेल्या सुसंस्कृत भाषेने मनुष्य शोभतो व पवित्र होतो असें त्याने एका उपमेंत सुचविलें आहे.* त्याने अनेक शब्दांच्या व्युत्पत्त्या आपल्या ग्रंथांत दिल्या आहेत व कांही सुंदर व्याकरणविषयक उपमा योजिल्या आहेत त्यांवरून त्याला व्याकरणाचें चांगलेंच ज्ञान होतें यांत संशय नाही. अश्वघोषादि पूर्वकालीन कवींच्या मानाने त्याच्या ग्रंथांत व्याकरणदृष्टया चुकीचीं रूपें क्वचितच आढळतात. तेंव्हा वरील अर्थ ग्राह्य धरल्यास 'अप्सरस्तीर्थम्' यांतील विभक्तीची उपपत्ति कशी लावावयाची असा प्रश्न उपस्थित होतो, त्याचा आता विचार करूं.

प्राचीन काळीं अनेक संस्कृत व्याकरणकार होऊन गेले. त्यांतील कांहींचीं नांवें पाणिनीच्या 'अष्टाध्यायीं'त आलीं आहेत. शिवाय

'इन्द्रश्चन्द्रः काशकृत्स्नापिशली शाकटायनः।
पाणिन्यमरजैनेन्द्रा जयन्त्यष्टादिशाब्दिकाः ॥'

या प्राचीन श्लोकांत आठ आद्य व्याकरणकारांचीं नांवें आलीं आहेत. यांपैकी बहुतेकांचे ग्रंथ सध्या उपलब्ध नाहीत. कालिदासाने योजिलेलीं कांही रूपें पाणिनीय व्याकरणाप्रमाणे शुद्ध नाहीत.† त्यामुळे त्याच्या काळीं दुसरें व्याकरण प्रचलित असून त्यांतील नियमांनुसार त्याने तीं रूपें योजिलीं असतील काय अशी शंका मनांत येते. सध्या उपलब्ध असलेल्या जैनेंद्र, सारस्वत, कालाप इत्यादि व्याकरणांत कोठेहि 'आरात्' शब्दाला द्वितीयेची अपेक्षा असते असा नियम आढळत नाही. तथापि पूर्वीच्या एखाद्या व्याकरणांत तसा नियम नसेलच असेंहि म्हणतां येत नाही. यासारखेंच आपण एक उदाहरण घेऊं. पाणिनीच्या वर उद्धृत केलेल्या सूत्रांत 'ऋते' हा शब्द आला आहे. वरील सूत्रानुसार त्याला नेहमी पंचमीची अपेक्षा असावी. पण संस्कृत वाङ्मयांत अनेक ठिकाणीं 'ऋते'

---

* संस्कारवत्येव गिरा मनीषी तया स पूतश्च विभूषितश्च।
'कुमारसंभव', १. २८.

† उदाहरणार्थं—तं पातयां प्रथममास पपात पश्चात्। 'रघुवंश', ९.६१.
लावण्य उत्पाद्य इवास यत्नः। 'कुमारसंभव', १. ३५.

या शब्दामुळे द्वितीयेचा प्रयोग झालेला आढळतो. उदाहरणार्थ, खालील पद्यांश पहा—

(१) **ऋते** हि **त्वां** न भविष्यन्ति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ।
भगवद्गीता, अध्याय ११, श्लो. ३२.

(२) क्व कर्म प्रध्वस्तं फलति **पुरुषाराधनमृते** ।
महिम्नः स्तोत्र, २०.

(३) स्वकूपारिजातस्य **ऋते नलाशां** वासैरशेषामपुपूरदाशाम् ।
नैषधीयचरित, ६, ८६.

वरील सर्व उदाहरणांत 'ऋते' शब्दामुळे द्वितीयेचा उपयोग केला आहे. पाणिनीय व्याकरणाप्रमाणे तर या प्रयोगाची उपपत्ति लावतां येत नाही. तेव्हा कांही टीकाकारांनी 'ऋते द्वितीया च' या चांद्रसूत्राचा आधार घेतला आहे.* 'ऋते' प्रमाणेच 'आरात्' शब्दाच्या बाबतींत द्वितीयेचें विधान करणारें एखाद्या व्याकरणकाराचें सूत्र असणें शक्य आहे.† तसें सूत्र प्रस्तुत ग्रंथाच्या वाचकांपैकी कोणास आढळल्यास त्यांनी तें प्रकाशित करून कालिदासकालीन व्याकरणशास्त्रावर जास्त प्रकाश पाडावा अशी विनंती करून रजा घेतों.

---

* 'अन्यारात्' इत्यादि सूत्रावरील तत्त्वबोधिनी पाहा.

† कै. प्रो. वा. शि. आपटे यांच्या संस्कृत-इंग्लिश कोशांत 'आरात्' याच्या योगें केव्हा केव्हा द्वितीयेचा प्रयोग होतो असें म्हटलें आहे, पण त्याला आधार दिला नाही. इतर कोणी कोशकार असें विधान करीत नाही.

भवभूतीचें उपनाम*

ता. २७ जानेवारी १९२९ च्या ' महाराष्ट्रां'त डॉ. केतकरांनी ' भवभूतीचें उपनाम डंबर कीं उदुंबर?' असा वाद उपस्थित केला आहे व कांही प्रमाणांवरून भवभूतीचें उपनाम डंबरच असावें असा निकाल दिला आहे. आपल्या प्रमाणांवर त्यांचा इतका विश्वास आहे की, डॉ. भांडारकरांस (आपलीं प्रमाणें समजलीं असतीं तर) डंबर हा पाठभेद मान्य झाला असता असें त्यांस वाटतें. एवढीं बलवत्तर प्रमाणें असतां डॉ. भांडारकर चुकले कसे असें कोडें आम्हांस पडलें व म्हणून त्या प्रश्नाचा जरा जास्त विचार करतां डॉ. भांडारकर चुकले नसून डॉ. केतकरांचीच दिशाभूल होत आहे असें आम्हांस दिसून आलें.

डॉ. भांडारकरांनी आपण स्वीकारलेल्या 'उदुंबर' या पाठाचें समर्थन केलें नाहीं याबद्दल डॉ. केतकर आश्चर्य दाखवितात व त्यांनीं कोणत्या तत्वावर 'डंबर' हें कुलनाम टाकून दिलें अशी पृच्छा करतात. डॉ. भांडारकर सध्यां हयात नाहींत, तथापि त्यांनीं कोणत्या कारणास्तव उदुंबर हा पाठ स्वीकारला हें समजणें मुळींच कठीण नाही. डॉ. भांडारकर प्रसिद्ध संशोधक होते. कोणत्याहि गोष्टीविषयीं अनुमान करतांना त्याच्याविरुद्ध कांही पुरावा आहे काय याचा ते चांगला विचार करीत असले पाहिजेत. 'मालविकाग्निमित्र' नाटकावरून डॉ. केतकरांनी काढलेल्या अनुमानांचें परीक्षण करतांना ' कोणत्याहि ग्रंथकाराविषयीं कांही विधानें करतांना त्यानें लिहिलेल्या सर्व वाङ्मयाचा अभ्यास करणें जरूर आहे; नाहीं तर सोंडेला स्पर्श करून हत्ती अजगरासारखा आहे असें म्हणणाऱ्या आंधळयासारखी संशोधकाची हास्यास्पद स्थिति होते' असें आम्ही म्हटलें होतें. पण संस्कृत कवींच्या दुर्दैवाने त्या

---

* 'महाराष्ट्र', नागपूर, २४ फेब्रुवारी १९२९.

गोष्टीचें महत्व डॉ. केतकरांना पटलेलें दिसत नाही. असो. उदुंबर हा पाठ स्वीकारण्याचें कारण एकच व तें म्हणजे भवभूतीनेच स्वतः आपल्या 'महावीरचरित' या दुसऱ्या नाटकांतहि उदुंबर असेंच नांव दिलें आहे, हें होय. 'महावीरचरित' भवभूतीचेंच याबद्दल संशय नाही. कारण 'मालतीमाधवां'त त्याने आपल्या कुलाचें व पूर्वजांचें जसें वर्णन केलें आहे तसेंच, किंबहुना बहुतांशीं त्याच शब्दांत, 'महावीरचरितांत'हि वर्णन आलें आहे. इतरहि शब्दसादृश्य, अर्थसादृश्य इत्यादि प्रमाणांवरून भवभूतिच 'महावीरचरिता'-चा कर्ता होता यांत संदेह राहत नाही. डॉ. केतकरांस या बाबतींत संदेह असल्यास तो त्यांनी पुढे मांडला नाही. ''महावीरचरिता'च्या कोणत्याहि आवृत्तींत 'उडुंबर' असाच पाठ दिलेला आढळेल.' ''महावीरचरिता'च्या एखाद्या हस्तलिखित प्रतींत डंबर हा पाठ नसेल कशावरून ?' असें डॉक्टर साहेब कदाचित् म्हणतील, तर त्यांस ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने नुकतीच प्रकाशित केलेली व पं. तोडरमल्ल व प्रो. मॅकडोनेल यांनीं संपादिलेली 'महावीरचरिता'ची आवृत्ती पाहण्याची विनंति करतों. या आवृत्तीकरितां पं. तोडरमल्ल यांनी काश्मीर, कलकत्ता, मुंबई, म्हैसूर, तंजावर इत्यादि ठिकाणीं हिंदुस्थानांत असलेल्या व केंब्रीज, इंडिया ऑफिस वगैरे जागीं पाहावयास मिळणाऱ्या दुर्मिळ अठरा स्वतंत्र हस्तलिखित प्रती मिळवून ती मोठ्या परिश्रमाने तयार केली आहे व प्रत्येक पृष्ठांवर सर्व हस्तलिखित प्रतींचे पाठ दिले आहेत. त्यांपैकी बहुतेक सर्व 'उदुंबर' हाच पाठ देतात. फक्त एकाच प्रतींत 'दुम्बरनामानो' असा पाठ आहे; पण तो लेखकाच्या हस्तदोषाने झालेला आहे. डॉ. केतकरांचा 'डम्बर' हा पाठ कोठेंच दिसत नाही. यांतील कांही हस्तलिखित प्रति तीनशें वर्षांइतक्या पूर्वींच्या आहेत. व त्या परस्परस्वतंत्र व दूरदूरच्या प्रदेशांतून मिळविलेल्या असल्याने त्या सर्वांत दिलेला 'उदुंबर' हाच पाठ खरा याविषयीं कोणालाहि संशय राहणार नाही. 'महावीरचरिता'च्या वीरराघव या टीकाकारानेहि हाच पाठ घेतला आहे.

आता डॉ. केतकर यांनी 'डंबर' हा पाठ स्वीकारण्यास जीं प्रमाणें दिलीं आहेत त्यांचा विचार करूं. ते म्हणतात 'कलकत्ता येथील (छापील) आवृत्त्या व डॉ. भांडारकरांस मिळालेली नाशिकची हस्तलिखित प्रत यांत

साम्य फार आहे. त्यावरून त्या ज्या प्रतींवरून झाल्या त्यांचें अधिक क्षेत्र-व्यापकत्व आणि प्राचीनत्व दृष्टीस पडतें.' कलकत्ता व नाशिक यापेक्षा दूरदूरच्या प्रदेशांतील 'महावीरचरिता'च्या प्रतींत उदुम्बर हेंच नांव आढळतें असें आम्ही वर दाखविलें आहे. तीच स्थिति 'मालतीमाधवा'च्या आवृत्तींत दिलेल्या पाठभेदांवरून दिसून येईल. दुसरें असें कीं, कलकत्ता आवृत्ति व नाशिकची हस्तलिखित प्रत यांत इतर ठिकाणीं कितीहि साम्य असलें तरी 'डंबर' हा पाठ कलकत्त्याच्या आवृत्तींतच आढळतो. नाशिकच्या प्रतींत तो डॉ. भांडारकरांस दिसला नाही असें त्यांनी दिलेल्या पाठभेदावरून दिसतें. जोपर्यंत 'डंबर' हा पाठ नाशिकच्या प्रतींत आढळत नाही तोंपर्यंत इतर ठिकाणचें साम्य काय कामाचें ?

डॉ. केतकरांचें दुसरें प्रमाण हें की, 'मालतीमाधवा'च्या टीकाकाराने-जगद्धराने-हा पाठ स्वीकारला आहे. डॉ. हॉल व भांडारकर यांनीं म्हटल्या-प्रमाणे जगद्धर हा मिथिलेंतील विदेहनगरचा राहणारा. तेव्हा त्याने डंबर हा पाठ दिला, तर त्यावरून त्याच्या काळीं उत्तर हिंदुस्थानांत कांही ठिकाणीं तो पाठ प्रचलित होता एवढेंच आपणांस म्हणतां येईल; व हीच गोष्ट कलकत्त्याच्या छापील प्रतींवरूनहि दिसते. त्याच्याविरुद्ध 'महाराष्ट्रा'च्या ता. १० फेब्रुवारीच्या अंकांत रा. कणीकर यांनी दाखविल्याप्रमाणे मालती-माधवाच्या दुसऱ्या टीकाकाराचा पुरावा आहे.

डॉ. भांडारकर 'मालतीमाधवा'च्या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं जगद्धराचे पाठ स्वीकारण्यास पूर्वीइतके नाखूष नव्हते असें डॉ. केतकर म्हणतात. पण यांत त्यांची कांही तरी चूक होत आहे असें वाटतें. डॉ. भांडारकरांना दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं जगद्धराच्या टीकेची एक चांगली प्रत मिळाली; व तिच्यावरून पहिल्या आवृत्तींत छापलेल्या टीकेचे (मूळ नाटकाचे नव्हे) पाठ आपण बरेच ठिकाणीं बदलले असें त्यांनी म्हटलें आहे. प्रस्तावनेंत 'टेक्स्ट' या शब्दाचा डॉ. भांडारकरांनी उपयोग केला आहे. पण संदर्भा-वरून टीकेचें मूळ असाच त्याचा अर्थ होतो असें आम्हांस वाटतें. मूळ नाटकाचे पाठ टीकेवरून दुसऱ्या आवृत्तींत बदललेले आमच्या तरी दृष्टीस पडले नाहीत. 'पहिल्या आवृत्तींत डॉ. भांडारकर जगद्धर तीन शतकां-

पूर्वींचा असावा असें मानीत होते; पण दुसऱ्या आवृत्तीच्या वेळेस त्यास आणखी चारशें वर्षें पाठीमागे घालण्यास त्यांस हरकत वाटत नव्हती' असें एक विधान डॉ. केतकरांनी केलें आहे; पण तें कोणत्या आधारावर तें समजत नाही. कारण दुसऱ्या आवृत्तींतहि डॉ. भांडारकर 'जगद्धर चौदाव्या शतकानंतर होऊन गेला' असेंच म्हणत आहेत. असो.

वरील विवेचनावरून भवभूतीचें उदुंबर असेंच नांव होतें, यांत संशय राहणार नाही. आता हें नांव कसें पडलें असावें याचा विचार करूं. उदुंबर (म्ह. उंबर) हें एका वृक्षाचें नांव. तें कवीचें कुलनाम कसें असेल अशी शंका जगद्धरास आल्यामुळें त्याने 'डंबर' हा पाठ स्वीकारला (किंवा तो त्यानें स्वतःहि कल्पिला असेल), व 'डंबरनामानः' म्हणजे 'ज्यांचें नांव प्रसिद्ध आहे असे' असा अर्थ देऊन त्याने आपलें समाधान करून घेतलें. या संबंधी निश्चित कांही सांगता येत नाही. तथापि, एक कल्पना सुचली ती वाचकांपुढे मांडतों. भवभूतीच्या काळापर्यंत उपनांवें देण्याचा प्रघात नव्हता. प्राचीन शिलालेखांत अनेक ब्राम्हणांचीं नांवें आलेलीं आहेत, पण इ. स. १००० पर्यंत त्यांचीं गोत्रें, प्रवर वगैरेच दिले जात; उपनामांचें उल्लेख दिसत नाहीत. ('मध्ययुगीन भारत', भा. ३, पृ. ५५१ पाहा.) तथापि आपण मूळचे कोठले याची ब्राम्हण चांगली आठवण ठेवीत. अशा मूळस्थानांचे शिलालेखांत 'नन्दिवर्धनविनिर्गत'– 'वलभीविनिर्गत–' असे उल्लेख आढळतात. ('मध्ययुगीन भारत', भा. २, पृ. ३१३–१४). अशा मूलस्थानांवरून हल्लींची बरींच आडनांवें झालेलीं आढळतात. हल्लीं महाराष्ट्रांत आपण गांवाच्या नांवास 'कर' हा शब्द लावतो (उ. राजापूरकर) अगर तो एकारान्त करतों. पण कर्नाटकांत केवळ गांवाचें नांवच उपनांव म्हणून योजण्यांत येते (उ. अनिखिंडी, बनहट्टी इत्यादि). याच कारणाने भवभूतीने आपलें 'उदुंबर' हें उपनाम दिलें असेल काय? वृक्षावरून गांवांचीं नांवें सध्याहि पडलेलीं दिसतात (उ. औदुंबर), व इ. स. च्या आठव्या शतकांत होऊन गेलेल्या भवभूतीच्या काळींहि तोच प्रघात होता, हें राष्ट्रकूटनृपति पहिला कृष्णराज याच्या शके ६९४ च्या भांदक येथे सांपडलेल्या ताम्रपटावरून दिसून येईल. या ताम्रपटांत उंबरमन्ति (सध्याचें यवतमाळ जिल्ह्यांतील राणी उमरावती), उंबरग्राम इत्यादि नांवें दिलीं आहेत.

(रा. का. ना. दीक्षित यांनी सेकंड ओरिएंटल कॉन्फरन्स्मध्ये वाचलेला लेख पाहा.) तेव्हा 'उदुंबर' या नांवाच्या एका गांवांतून भवभूतीचे पूर्वज पद्मपुर येथे राहण्यास आले, व आपल्या मूळ ठिकाणाची स्मृति कायम ठेवण्यासाठी त्यांनी 'उदुंबर' हें कुलनाम धारण केलें असावें असें वाटतें. हें 'उदुंबर' यवतमाळ जिल्ह्यांतील पैनगंगा नदीच्या उत्तर तीराजवळचें उमरखेड असावें.

' यज्ञफल ' नाटकाची समस्या*

सन १९१२ मध्ये कै. म. म. गणपतिशास्त्री यांनी महाकवि भास याचीं म्हणून तेरा नाटकें ' त्रिवेंद्रम् संस्कृत ग्रंथमालें 'त प्रसिद्ध केलीं. तोंपर्यंत त्या कवीचें नांव कालिदास, राजशेखर इत्यादिकांच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून व सुभाषितसंग्रहांत त्याच्या नांवावर दिलेल्या श्लोकांवरून माहीत होतें. त्याची एकहि नाट्यकृति उपलब्ध नव्हती. तीं तेरा नाटकें प्रकाशित झाल्यावर त्यांच्या भासकर्तृकत्वाविषयीं पुष्कळ चर्चा झाली. अद्यापि हा प्रश्न वादग्रस्त आहे. तथापि, त्यांपैकी ' स्वप्नवासवदत्तम् ' हें नाटक मात्र भासाच्या तन्नामक नाटकाची किंचित् बदललेली आवृत्ति असावी याविषयीं आता संशय नाही. इतर नाटकांमध्ये त्या नाटकासारखे शब्दप्रयोग, मंगलश्लोक, भरतवाक्य वगैरे दिसत असल्याने तींहि भासाचीं असावींत असें बऱ्याच विद्वानांचें मत आहे.

ही नाटकें प्रसिद्ध झाल्यानंतर सुमारें तीस वर्षांनी सौराष्ट्रांतील गोंडलचे राजवैद्य जीवराम कालिदास शास्त्री यांनी आपल्या ' रसशाला-औषधाश्रम ' संस्थेतर्फें ' महाकविश्रीभासप्रणीतं यज्ञफलम् ' या नांवाने एक नाटक प्रसिद्ध केलें. त्याला जोडलेल्या उपोद्घातांत राजवैद्यांनी हें नाटक आपणांस कसें मिळालें याची हकीगत दिली आहे. सन १९२४ च्या सुमारास त्यांना काशी, सुरत, पंजाब इत्यादि ठिकाणांहून हस्तलिखितांचा मोठा संचय मिळाला. त्यांत ' यज्ञफल ' नाटकाचीं दोन हस्तलिखितें–एक विक्रमसंवत् १७२७ मध्ये व दुसरें वि. सं. १८५९ मध्ये–देवनागरींत लिहिलेलीं मिळालीं. तीं वाचल्यावर तें नाटक भासाचेंच अशी त्यांची खात्री झाली. तथापि, अनेक कार्यांत व्यापृत असल्याने त्यांना तें नाटक लागलीच

* नवभारत, पुणें, जानेवारी १९५३, पृ. १–१०

प्रसिद्ध करतां आलें नाही. त्यानंतर सतरा वर्षांनी–सन १९४१ मध्ये–त्यांनी आपले मित्र अल्मोडानिवासी श्रीगोपालदत्त शास्त्री यांनी लिहिलेल्या टिप्पणींसह तें नाटक प्रसिद्ध केलें. या उपोद्घाताची तारीख १९-७-१९४१, अशी शेवटीं दिली आहे.*

भास हा अत्यंत प्राचीन संस्कृत कवि. कविकुलगुरु कालिदासानेहि आपल्या 'मालविकाग्निमित्रम्' नाटकांत त्याची 'प्रथितयशस्' म्हणून प्रशंसा केली आहे. अशा महाकवीची नाटककृति उपलब्ध झाल्यावर तिजविषयीं संस्कृतज्ञांना अत्यंत कुतूहल उत्पन्न व्हावें व त्यांनी तिची सर्वांगीण चर्चा करावी असें कोणासहि वाटेल. पण या नाटकाच्या बाबतींत मात्र तसें घडलें नाही. नाही म्हणावयास डॉ. पुसाळकर यांनी मात्र हें नाटक प्रसिद्ध झाल्यावर लौकरच सन १९४२ मध्ये हैदराबाद येथे भरलेल्या अखिलभारतीय-प्राच्यविद्या–परिषदेमध्ये त्यावर एक लेख वाचला. तो पुढे रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या १९४२ च्या जर्नलमध्ये (पु. १८, पृ. २३-२९) प्रसिद्ध झाला आहे. त्यानंतर श्री. ए. एस्. पी. ऐयर व डॉ. जी. के भट यांनीहि त्यावर लिहिलें आहे. पण इतर कोणी या नाटकाची चर्चा केल्याचें मला माहीत नाही.

डॉ. पुसाळकर यांचा लेख प्रसिद्ध झाल्यावर सन १९४२ मध्ये पं. गोपालदत्त शास्त्री पुण्याच्या भांडारकर–संशोधनमंडळांत गेले होते. त्या वेळीं त्यांनी कै. डॉ. सुखटणकर व प्रा. गोडे यांच्याजवळ "'यज्ञफल' हें नाटक भासाचें नसून तें आपण स्वतः भासाच्या उपलब्ध नाटकांच्या धर्तीवर रचलें आहे व त्या नाटकांत आपण आपल्या कर्तृत्वाच्या कांही खुणा (keys)हि घालून ठेवल्या आहेत", ही अत्यंत आश्चर्यकारक माहिती सांगितली. जयपूरच्या एका प्रकाशकानेहि ता. २७ ऑक्टोबर १९४२ रोजीं डॉ. पुसाळकर यांना पत्र पाठवून, गोंडल येथे प्रसिद्ध झालेलें 'यज्ञफल' भासाचें नसून तें पं. गोपालदत्त शास्त्री यांनी रचलें आहे असें कळविलें व त्यांत त्यांनी घातलेल्या आपल्या कर्तृत्वाच्या तीन खुणाहि दिल्या. त्यावर डॉ. पुसाळकरांनी त्यांना लिहिलें की, पं. गोपालदत्त शास्त्री

* कव्हरवर मात्र 'सन मार्च १९४१' असा निर्देश आहे.

यांनी यासंबंधी सर्व पुरावा प्रसिद्ध करावा व त्यानंतर लवकरच्च जयपूर येथें होणाऱ्या प्राच्यविद्यापरिषदेच्या अधिवेशनाकरिता जमणाऱ्या विद्वानांपुढें तो ठेवावा. पुढे जयपूरला तें अधिवेशन भरलें नाही. पं. गोपालदत्त शास्त्रीहि कैलासवासी झाले. त्यामुळे हा प्रश्न अनिर्णीत राहिला. तथापि, त्याविषयीच्या कुतूहलानें डॉ. दांडेकरांनी त्याची शहानिशा करण्याकरिता गोंडळचे राजवैद्य जीवराम कालिदास शास्त्री (आता स्वामी श्रीचरणतीर्थ) यांना पत्र लिहून त्यांच्या जवळचें हस्तलिखित मागविलें. तें काळजीपूर्वक पाहिल्यावर तें त्यांत लिहिल्याप्रमाणे वि. सं. १७२७ इतकें जुनें आहे अशी त्यांची व 'भांडारकर-संशोधनमंडळा'चे क्यूरेटर प्रा. गोडे यांची खात्री झाली. त्यांतील दोन पानांचे फोटोहि डॉ. दांडेकरांनी त्या संशोधन-मंडळाच्या गतवर्षीच्या 'ॲनल्स' (पु. ३१, पृ. ३०७-३१४) मधील आपल्या लेखांत छापले आहेत. डॉ. दांडेकरांनी आपल्या लेखांत, पं. गोपालदत्त-शास्त्री यांनी नाटकांत व उपोद्घातांत घातलेल्या नाटककर्तृत्वाच्या खुणांचेंहि परीक्षण केलें असून, 'त्यांत कांही तथ्य नाही, हें नाटक भासाचें नसलें तरी जुनें आहे व तें गोपालशास्त्रींचें तर खास नव्हे', असें आपलें निश्चित मत दिलें आहे.

गतवर्षी मी मुंबईस गेलों असतां माझे मित्र प्रा. ह. दा. वेलणकर यांच्या घरीं या नाटकाची प्रत मला पाहावयास मिळाली. त्यावर त्याच सुमारास प्रसिद्ध होणार असलेल्या डॉ. दांडेकर व डॉ. भट यांच्या लेखांविषयीहि माहिती मिळाल्यामुळे माझें कुतूहल उत्पन्न झालें. राजवैद्य जीवरामशास्त्री यांनी प्रसिद्ध केलेलीं आणखी दोन पुस्तकें-भगवद्गीतेची कांही भिन्न श्लोक असलेली आवृत्ति व गुप्तसम्राट् समुद्रगुप्त याचें खंडित 'कृष्णचरितकाव्य'- हींहि मीं तेथे पाहिलीं. त्यानंतर माझ्या विनंतीवरून राजवैद्यांनी 'यज्ञफल', 'कृष्णचरित' व 'पूर्वपाणिनीयम्' या पुस्तकांची एक एक प्रत मला पाठविली. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. हीं सर्व पुस्तकें अत्यंत कुतूहलोत्पादक आहेत. त्यांवर चिकित्सक पद्धतीने चर्चा झाली पाहिजे. पण हीं पुस्तकें प्रसिद्ध झाल्यानंतर आज जवळजवळ एक तप लोटलें तरी त्यांच्याकडे विद्वानांचें विशेष लक्ष गेलेलें दिसत नाही. 'कृष्णचरिता'वर एक लेख मी गतवर्षी नागपूरच्या 'तरुण भारता'च्या

दिवाळी अंकांत प्रसिद्ध केला होता. प्रस्तुत लेखांत 'यज्ञफल' नाटकाच्या कर्त्याविषयी चर्चा केली आहे. त्यापूर्वी एका गोष्टीचा खुलासा केला पाहिजे. राजवैद्य पं. जीवराम कालिदास शास्त्री यांच्याशीं माझा परिचय नाही. कै. गोपालदत्त शास्त्री यांच्याशींहि माझा परिचय झाला नव्हता. 'यज्ञफल' नाटकाविषयी प्रसिद्ध झालेल्या माहितीमुळे माझें कुतूहल उत्पन्न होऊन मी तें नाटक व त्यावरील लेख वाचले. त्यावरील झालेलें माझें मत केवळ सत्यान्वेषणाच्या हेतूने येथे मांडलें आहे. यांत दुसरा कोणताहि हेतु नाही.

प्रथम या नाटकाचें संविधानक अनावश्यक भाग गाळून संक्षेपानें देतों, म्हणजे पुढील विवेचन समजण्यास मदत होईल.

पहिला अंक : या नाटकाचा आरंभ 'नान्द्यन्ते ततः प्रविशति सूत्रधारः' या वाक्याने होतो. नंतर सूत्रधाराच्या मंगलश्लोकांत राम, भरत, लक्ष्मण व शत्रुघ्न हीं या नाटकांतील प्रमुख पात्रांचीं नांवें गोवून मुद्रालंकार साधला आहे. प्रस्तावनेंत कवीचें किंवा नाटकाचें नांव नाही. प्रस्तावनेंत शेवटीं 'स्थापना' हेंच नांव दिलें आहे. या सर्व बाबतींत हें नाटक भासाच्या तेरा नाटकांसारखेंच वाटतें.

प्रस्तावनेनंतर सुमंत्र प्रवेश करतो व म्हणतो की, दशरथ राजाला चार पुत्र झाल्यामुळे सर्वत्र उत्सव होत आहे; अशा प्रसंगीं तुरुंगांतून कैद्यांना सोडून द्यावयाचें, पण राज्यांत कोणीहि अपराध करीत नसल्यामुळे कोणी कैदेंत नाही. राजाच स्वतः पितृऋणांतून मुक्त झाला आहे. नंतर राजा प्रवेश करतो. त्याच्याकडे कौसल्यादि तिन्ही राण्यांच्या दासी येऊन आपापल्या स्वामिनीची विशिष्ट कारणास्तव स्वतःस अग्रमान देण्याविषयीची विनंती कळवितात. राजा त्यामुळे घोटाळ्यांत पडतो. पण शेवटीं सर्वांना सारखाच मान देण्याचें ठरवितो.

दुसरा अंक : " राजा सुमंत्राला बोलावून सांगतो की, " मी पूर्वी कैकेयीला 'तुझ्या मुलाला सर्व राज्य मिळेल' असें वचन दिलें आहे. पण राज्यपालन करण्यास योग्य व क्षत्रियगुणान्वित असा रामच असल्याने

त्यालाच यौवराज्याभिषेक करण्याची माझी इच्छा आहे. तेव्हा सचिव, भृत्य, प्रजा इत्यादिकांना राम अत्यंत प्रिय होईल व भरताचेंहि प्रेम त्याच्यावर बसेल अशी योजना तूं कर."

नंतर तिन्ही राण्या येतात. त्यांना राजा कोणाला यौवराज्याभिषेक करावा म्हणून विचारतो. या प्रसंगीं कौसल्या अत्यंत स्वार्थी दिसते. रामालाच सर्व राज्य मिळालें पाहिजे असा आग्रह ती धरते. कैकेयीच्या विवाहप्रसंगीं आपण वचन दिलें असल्यामुळे भरताला राज्य दिलें पाहिजे असें राजाने म्हणतांच तिला मूर्च्छा येते. राम व भरत यांच्यामध्ये राज्य अर्धें अर्धें वांटावें. माझ्या मुलांना तें नको. ते दोघे राम व भरत यांची सेवा करतील.' असें म्हणून सुमित्रा आपला निःस्वार्थीपणा प्रकट करते. 'राम हाच आपल्या गुणांमुळे राजा होण्यास योग्य आहे. आपण मला पूर्वी वचन दिलें असलें तरी लोकांच्या हिताकरिता तें मोडण्यांत पाप नाही, तसें करण्यास माझीहि संमति आहेच' असें सांगून कैकेयी आपला उदात्त स्वभाव व्यक्त करते. राण्या निघून गेल्यावर विदूषक प्रवेश करतो व 'रामाला राज्याभिषेक होणार असें कौसल्येकडून मला समजलें' असें राजाला सांगतो. 'याला खरी गोष्ट कळल्यास हा कलागती लावील' असें वाटून राजा त्याला म्हणतो, 'अरे, हे कुमार अद्यापि लहान आहेत तेव्हा मी जे थट्टेने बोललों तें तूं खरें मानू नकोस.'

तिसरा अंक : आपला शत्रु दशरथपुत्र रामाच्या रूपाने जन्मला आहे असें रावणाला कळतें. त्याचें सामर्थ्य किती आहे तें जाणावें व शक्य तर त्याचा वध करावा किंवा त्यास बांधून न्यावें, या उद्देशाने रावण दशरथाच्या वाड्याजवळ येतो. त्याच वेळीं विश्वामित्र ऋषिहि आपल्या बला व अतिबला या विद्या व जृम्भकास्त्रें रामाला द्यावीं या उद्देशाने तेथे येतात. नंतर राम आदिकरून कुमार शस्त्रविद्येचा अभ्यास करण्याकरिता तेथे येतात. भरत, शत्रुघ्न व व लक्ष्मण यांचें शरसंधान अचूक व परिणामकारी होतें. पण विश्वामित्र व रावण यांच्या अदृश्य कारवाईमुळे रामाच्या अस्त्राचा कांहीच परिणाम होत नाही. तें पाहून रामाला अत्यंत क्रोध येतो व तो निर्वाणीच्या आग्नेयास्त्राचें संधान करतो. पण इतक्यांत वसिष्ठ ऋषि तेथे

आल्यामुळे तो आपला बाण परत घेतो. 'विश्वामित्र ऋषि येथें आले आहेत, त्यांचा तूं योग्य सन्मान कर' असें वसिष्ठ ऋषि रामाला सांगतात.

चौथा अंक : विश्वामित्र ऋषि राजसभेंत येतात व कुमारांच्या विद्यार्जनाविषयीं चौकशी करतात. शेवटीं 'कुमारांना माझ्याबरोबर यज्ञ-रक्षणार्थ पाठवावें, मी त्यांना दिव्यास्त्रें देईन' असें ते दशरथाला सांगतात. थोडे आढेवेढे घेतल्यावर दशरथ वसिष्ठाच्या सल्ल्याप्रमाणें त्यांना विश्वा-मित्राबरोबर जाण्यास संमति देतो.

पांचवा अंक : विश्वामित्राचा यज्ञ निर्विघ्नपणें शेवटास जातो. सर्वत्र लोक निर्भयपणें फिरूं लागतात. अशा वेळीं विश्वामित्र ऋषि राम-लक्ष्मणांना तपोवनाजवळच्या गौळीवाड्यांत, शेतकऱ्यांच्या राहणीचें प्रत्यक्ष ज्ञान त्यास व्हावें, तें त्यास त्यांच्या व्यवहारनिर्णयप्रसंगीं उपयोगीं पडेल या उद्देशाने घेऊन जातात. कृषीवलांना पाहिल्यावर त्यांस नगरांत घेऊन जावें, कारण त्याच्यायोगें नगरेंहि तपोवनासारखीं होतील असें रामाला वाटतें. पण विश्वामित्र म्हणतात–'नगरांत राहिले तर यांचे सर्व गुण नष्ट होतील. हे आपलें कृषिकर्म विसरतील. तेथे यांना गर्व उत्पन्न होऊन हे स्वतःला राजापेक्षांहि श्रेष्ठ समजूं लागतील नगरांतील लोकांचे दोष यांचे अंगीं येतील. तेव्हा त्यांना येथेच राहूं द्या. फक्त राजा व पौरजन यांच्याकडून यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.'

सहावा अंक : विश्वामित्र ऋषि राम–लक्ष्मणांना घेऊन जनकाच्या यज्ञाला उपस्थित राहण्याकरिता मिथिलेस जातात. तेथे रामाचें व सीतेचें प्रेम परस्परांवर बसावें म्हणून ते त्यांची गाठ उद्यानांत पडेल अशी योजना करतात. तेथे त्यांची दृष्टादृष्ट होऊन त्यांचें परस्परांवर प्रेम जडतें. ही ब्रह्मर्षीची मुलगी असल्यास किंवा तिचा दुसऱ्या कोणाशीं विवाह ठरला असल्यास आपला प्रणयभंग होईल अशी भीति रामाला वाटते; पण थोडा विचार केल्यावर आपलें मन हिच्यावर बसल्यामुळे ही अगम्या किंवा दुष्प्रा-प्या असण्याचा संभव नाही असेंहि त्याला वाटतें. पुढे त्यांचा परस्पराशीं परिचय होतो. नंतर जनक तेथे येतो. त्याला ही गोष्ट माहीत होते. नंतर तो दशरथाला आपल्या सर्व कुटुंब–परिवारासह येण्याविषयी आमंत्रण पाठवितो.

सातवा अंक : जनकाचा यज्ञ समाप्त होऊन तो अवभृथस्थान करतो. नंतर तो आपल्या सीतादि कन्यांचा रामादि कुमारांशीं विवाह करतो. इतक्यांत शिवधनुर्भंगामुळे कोपाविष्ट झालेला परशुराम तेथें येतो. पण रामाला पाहतांच त्याच्या वैष्णव रूपाची ओळख पटून तो आपलें सर्व पुण्य त्यास देतो व शाश्वत ब्रह्मप्राप्तीसाठी तपश्चर्या करण्यास निघून जातो. शेवटीं विश्वामित्राच्या मुखाने खालील भरतवाक्याने नाटकाची समाप्ति होते :

'रक्षन्तु वर्णा धर्मं स्वं प्रजाः स्युरनुपप्लुताः ।
त्वं राजसिंह पृथिवीं सागरान्तां प्रशाधि नः ॥'

डॉ. पुसाळकर व डॉ. भट या दोघांनींहि या नाटकाचें परीक्षण करून तें भासाचें आहे, असें आपलें मत दिलें आहे. डॉ. पुसाळकर "हें नाटक भासाच्या तृतीय कालखंडांतील परिणत प्रज्ञेचें फळ असून 'प्रतिमा' व 'प्रतिज्ञायौगंधरायण' या दोन नाटकांच्या मध्ये केव्हा तरी त्याची निर्मिति झाली असावी" असें आपलें मत देतात; तर डॉ. भट "या नाटकांत कथानक, रचना, स्वभावचित्रण, विनोद इत्यादिकांत नाटककाराचें कौशल्य दृष्टीस पडत नाही, त्यामध्ये कथाभाग व वादविवाद मोठ्याच प्रमाणांत आहे, कथानकांतील प्रसंग सुश्लिष्ट रीतीने संबद्ध नाहीत, या कारणांमुळे हें नाटक भासाच्या अगदी प्रारंभींच्या कालखंडांतलें असावें." असें म्हणतात. डॉ. दांडेकरांनी या दृष्टीने नाटकाचें परीक्षण केलें नाही. 'हें नाटक भासाचें असेल किंवा नसेल, पण तें निदान वि. सं. १७२७ इतकें तरी जुनें आहे. गोपालदत्त शास्त्रींचें तर तें खासच नाही,' असें आपलें मत निश्चित झाल्याचें ते सांगतात. तेव्हा या प्रश्नाचा थोडा बारकाईने विचार करूं.

आपाततः हें नाटक भासाचीं म्हणून मानलेल्या तेरा नाटकांसारखें दिसतें, यांत शंका नाही. आरंभींची 'नान्द्यन्ते ततः प्रविशति सूत्रधारः' ही रंगसूचना, मंगलश्लोकांतील मुद्रालंकार, 'प्रस्तावने' ऐवजीं 'स्थापना' शब्दाचा प्रयोग, कर्त्याच्या नांवाचा अनुल्लेख, शेवटचें ठरीव तऱ्हेचें भरतवाक्य, अपाणिनीय प्रयोग इत्यादिकांवरून हें नाटक पूर्वींच्या तेरा नाटकांच्या कर्त्यानेच रचलें असावें व तो भास असल्यास हें नाटकहि भासाचेंच असावें, असा सकृद्दर्शनीं ग्रह होतो. पण थोडें सूक्ष्म वाचन केल्यावर हें

नाटक अगदी अलीकडे कोणी तरी रचून भासाच्या नांवावर खपविण्याचा प्रयत्न केला आहे, असें वाटूं लागतें. याविषयीं कांही प्रमाणें खाली दिलीं आहेत :

(१) कालिदासाच्या ग्रंथांशीं साम्य : या नाटकामध्ये कालिदासाच्या नाटकांतील व काव्यांतील उक्तींचें व प्रसंगांचें अनेक ठिकाणीं अनुकरण केलें आहे. पुढील उक्तिसाम्य पहा :

‘यज्ञफल’	कालिदासीय ग्रंथ
(१) सम्राडेव सुतोदयेन विहितो मुक्तः पितॄणामृणात् ॥ (१. ५)	ऋणाभिधानात्स्वयमेव केवलं तदा पितॄणां मुमुचे स बन्धनात् ॥ (रघु. ३. २१)
(२) प्रजाः प्रजाः स्वा इव पालिताश्च । (१. १०)	प्रजाः प्रजाः स्वा इव तन्त्रयित्वा । (शा. ५. ५)
(३) सूर्ये निरभ्राम्बरवर्तिनि स्यात् कथं तमिस्रा गतिभङ्गहेतुः ॥ (१. १६)	सूर्ये तपत्यावरणाय दृष्टेः कल्पेत लोकस्य कथं तमिस्रा ॥ (रघु. ५. १३)
(४) वज्रपातसदृशं वचनम् । पृ. ४५.	पावकः खलु वचनोपन्यासः । शा. ५
(५) चपलोऽयं बटुः । पृ. ६०.	चपलोऽयं बटुः । शा. २.
(६) क्व नृपत्वमनल्पविप्लवं क्व कुमाराः सुकुमारचेतसः । परिहासविजल्पितं त्विदं परमार्थं न हि मन्यतां वचः ॥ (२. ४१)	क्व वयं क्व परोक्षमन्मथो मृगशावैः सममेधितो जनः । परिहासविजल्पितं सखे परमार्थेन न गृह्यतां वचः ॥ (शा० २. १८)
(७) यथा प्रदीपादपरे प्रदीपे प्रज्वालिते नास्ति तयोस्तु भेदः । (३. १४)	न कारणात्स्वाद्बिभिदे कुमारः प्रवर्तितो दीप इव प्रदीपात् ॥ (रघु. ५. ३७)
(८) गोप्यन्ते स्वभुजबलेन बाहुजा हि । (३. १६)	स्ववीर्यगुप्ता हि मनोः प्रसूतिः ॥ (रघु. २. ४)

(९) गुणैः स्तुत्यः सर्वो भवति न वयः कारणमिह ॥ (२३. ३)	तेजसां न हि वयः समीक्ष्यते ॥ (रघु. ११. १)
(१०) आत्मीये दृश्यते गुणः ॥ (३. २४)	सर्वः कान्तमात्मीयं पश्यति । (शा. २)
(११) क्रीडारतो वाऽविकृतः शयानः सिंहोऽपि न स्वं महिमानमेति ॥ (३. २९)	प्रायः स्वं महिमानं क्षोभात्प्रतिपद्यते हि जनः ॥ (शा. ६. ३१)
(१२) न खलु न खलु वध्याः पक्षिणोऽनागसस्ते सह पृथुककलत्रैस्तत्र वासः कृतस्तैः । क्व बत विहगदेहाश्चञ्चला लाघवेन क्व पुनरशनिकल्पा मृत्युदूताः शरास्ते ॥ --(३. ३८)	न खलु न खलु बाणः संनिपात्योऽयमस्मिन् मृदुनि मृगशरीरे तूलराशाविवाग्निः । क्व बत हरिणकानां जीवितं चातिलोलं क्व च निशितनिपाता वज्रसाराः शरास्ते ॥ --(शा. १. १०)
(१३) यदि मम याच्ञा मोघा न स्यात् । (पृ. १२९)	याच्ञा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ॥--(मेघ. ६)
(१४) अरुणेन तमो भिन्नमिति लोके निगद्यते । किन्तु भास्करकर्मैतद्येनाग्रे निहितोऽरुणः । (५. १४)	किं वाऽभविष्यदरुणस्तमसां विभेत्ता तं चेत्सहस्रकिरणो धुरि नाकरिष्यत् ॥ --(शा. ७. ४)
(१५) कृत्याकृत्यविवेके तु प्रमाणं हि सतां मनः । (६. १८)	सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ॥ (शा. १. २२)
(१६) विद्या बुधस्य विमला सफला न तावत् यावन्न सा गुणवते पुरुषाय दत्ता ।	वत्से, सुशिष्यपरिदत्तेव विद्याऽशोचनीयासि संवृत्ता ।--(शा. ४)

कन्यां विनीय परिपोष्य च
तां न यावत्
योग्याय नैव ददते न कृती
पिता स्यात् ॥ (६. २३)

(१७) प्रियसखि वरमिव तातस्याशिषमभिनन्दय। (पृ. १९४) — भगवन्, वरः खल्वेष नाशीः। (शा. ४)

प्रसंगसाम्य—(अ) 'यज्ञफला'च्या दुसऱ्या अंकांत, कोणाला राज्याभिषेक करावा हें कैकेयीला विचारतांना दशरथ वरकरणीं रामाच्या अभिषेकाला विरोध करतो. तो स्वगत भाषणांत म्हणतो —' केनापि व्याजेन स्वाभीष्टविरोधं दर्शयित्वा कार्यसिद्धिं करोमि।' (पृ. ४३). ही कल्पना 'शाकुंतल' नाटकाच्या दुसऱ्या अंकांतील तत्सदृश प्रसंगावरून सुचलेली दिसते. दुष्यन्ताच्या सेनापतीला विदूषकाप्रमाणेच मृगया नकोशी झालेली असते. तथापि तो तिची वरकरणीं स्तुति करतो व तसें करण्यापूर्वी विदूषकाला एकीकडे म्हणतो—' सखे स्थिरप्रतिबन्धो भव। अहं तावत्स्वामिनश्चित्तवृत्तिमनुवर्तिष्ये।'

(आ) दुसऱ्या अंकांतील यौवराज्याभिषेक कोणाला करावा ही चर्चा अप्रस्तुत आहे. तिचा पुढे कोणत्याहि घटनेशीं संबंध नाही. तिच्या शेवटीं विदूषकाला 'थट्टेने बोललेलें खरें मानूं नको' हें राजाचें म्हणणें 'शाकुंतला'च्या दुसऱ्या अंकांतील तत्सदृश प्रसंगावरून सुचलेलें आहे. 'शाकुंतलां'त राजाच्या उक्तीचा पुढील घटनांशीं घनिष्ठ संबंध आहे. तसा 'यज्ञफलां'त नाही. या एकाच उदाहरणावरून कोणी कोणाचें अनुकरण केलें हें सहज ध्यानांत येईल. येथे अर्थसाम्याबरोबर उक्तिसाम्य आहे ही गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे.

(इ) तिसऱ्या अंकांत विश्वामित्र व रावण अदृश्य राहून रामाच्या बाणांना निःशक्त करतात, कारण त्याला क्रोध आणून त्याचें शौर्य पाहण्याच्या त्यांचा उद्देश असतो. हा प्रसंगहि 'शाकुंतला'च्या पांचव्या अंकांतील मातलीने त्याच उद्देशाने विदूषकावर केलेल्या हल्ल्यावरून सुचलेला दिसतो.

भास हा कालिदासाच्या पूर्वी होऊन गेला असल्याने त्याच्या ग्रंथांतील कांही उक्तींचें व प्रसंगांचें अभावितपणे अनुकरण कालिदासाच्या ग्रंथांत होणें साहजिक आहे व तसें तें झालेलें मी आपल्या 'कालिदास' ग्रंथांत दाखविलें आहे.* पण भासकृत कोणत्याहि इतर नाटकांतून इतक्या उक्ति व प्रसंग कालिदासाने घेतलेले दाखवितां येणार नाहीत. वर दाखविलेल्या साम्यबाहुल्यावरून 'यज्ञफला'च्या कर्त्यानेच कालिदासाच्या ग्रंथांचें अनुकरण करून व त्यांतील प्रसंग व शब्दयोजना युक्तायुक्तस्थलीं योजून आपला ग्रंथ सजविला आहे, यांत संशय नाही.

स्त्रियांचीं संस्कृत पद्यभाषणें

(२) स्त्रियांनी प्राकृतांत बोलावें असा साहित्यशास्त्राचा नियम आहे व तो भासाच्या इतर नाटकांत व कालिदासाच्या नाटकांत पाळलेला दिसतो. कालिदासाच्या नाटकांतील पण्डिता कौशिकी या विदुषीशिवाय इतर स्त्रीपात्रें संस्कृतांत कधीहि बोलत नाहीत. पुढे क्वचित् प्रसंगीं वैदग्ध्याकरिता स्त्रियांनीहि संस्कृत बोलण्यास हरकत नाही असें मत प्रचलित झालें. त्याला अनुसरून भवभूतीने आपल्या 'मालतीमाधवां'त स्त्रीपात्रांच्या तोंडीं क्वचित् संस्कृत श्लोक घातले आहेत.† पुढे साहित्यग्रंथांत याविषयी नियम घालण्यांत आले. उदाहरणार्थ, 'साहित्यदर्पणां'त म्हटलें आहे :

'योषित्सखीबालवेश्याकितवाप्सरसां तथा ।
वैदग्ध्यार्थं प्रदातव्यं संस्कृतं चान्तरान्तरा ॥' —(६, १६९)

पण या तऱ्हेचें उदाहरण भासाच्या इतर नाटकांत कोठेहि आढळत नाही. 'यज्ञफला'मध्ये मात्र स्त्रीपात्रें अनेक प्रसंगीं संस्कृत पद्यांत बोलतांना दिसतात. उदाहरणार्थ, सुमित्रा (पृ. ४७, ४८), कैकेयी (पृ. ४९, ५०, ५१), मन्थरा (पृ. ८९), मधुरिका (पृ. १९०) यांचीं संकृतांतील पद्यभाषणें पाहा. या स्त्रिया आपलीं गद्यभाषणें प्राकृतांतच करतात. प्राकृतांत कविता रचणें नाटककर्त्याला साधत नसावें, हें स्त्रियांच्या तोंडीं संस्कृत पद्यें घालण्याचें कारण असावें.

---

* 'कालिदास' (द्वितीयावृत्ति), पृ. १४६ पाहा.
† 'मालतीमाधव' २, १; ७, १ पाहा.

(३) भासाच्या नाटकांतील भाषा साधी, सोपी व समासविरहित अशी असते. 'यज्ञफलां'तहि ती तशीच आहे असें डॉ. पुसाळकर म्हणतात. पण तें सर्वांशीं खरें नाही. उदाहरणार्थ, सातव्या अंकांत जनकाच्या तोंडीं घातलेलें खालील वाक्य पाहा :

'अतीतेऽह्नि मम यज्ञान्तस्नानमभूत्। तदैव च मयार्षेण विधिना रघुकुलप्रदीपस्य महाराज्ञो दशरथस्य ज्येष्ठाय पुत्राय सकलक्षत्रकुलकमला-हस्कराय भुजबलोत्थापितभग्नानेकमहाबलवीराविचालितोग्रचापाय भीम-यातुधानवधनिवारिततपोवनभयसंशयाय सुकृतिजनमनःकुमुदप्रसादहेतवे सर्व-नयनाभिरामाय रामचन्द्राय रसोद्भवा प्रदत्ता' (पृ. ११९)

वरील उताऱ्यांतील **प्रदीर्घ समासरचना** हें नाटक कालिदास-पूर्वकालीन असणें शक्य नाही हें स्पष्ट दाखवितें.

(४) भासाच्या इतर ग्रंथांत कित्येक ठिकाणीं **अपाणिनीय प्रयोग** आढळतात. प्रस्तुत नाटकांतहि ते कांही ठिकाणीं (मुद्दाम ?) योजिले आहेत. उदाहरणार्थ : तोष्य (पृ. ४), आस (पृ. १३), महाराज्ञः (पृ. २३) पाहा. पण कांही ठिकाणी टिप्पणीकार गोपाळदत्त शास्त्री यांच्या म्हणण्याप्रमाणे या ग्रंथकाराने पाणिनीचे नियम–जे इतर काव्यनाटकग्रंथांत क्वचितच अनु-सरलेले दिसतात ते–तंतोतंत पाळलेले दिसतात. उदाहरणार्थ, सैकः (पृ. १३५), इच्छमानः (चानश् प्रत्यय, पृ. १५९) इत्यादि पाहा. तेव्हा 'यज्ञफला'-च्या कर्त्यानें इतर ठिकाणीं अपाणिनीय प्रयोग मुद्दाम घालून त्या नाटकाला प्राचीनत्वाचें रूप देण्याचा प्रयत्न केलेला आहे असें वाटूं लागतें.

वरील प्रमाणांवरून 'यज्ञफल' हें नाटक कालिदासपूर्वकालीन नाही अर्थात् तें भासाचेंहि असणें शक्य नाही, हें दिसून येईल. पण तें भासाचें नसलें तरी वि. सं. १७२७ इतकें तरी जुनें आहे हें डॉ. दांडेकरांचें मतहि बरोबर वाटत नाही. कारण या नाटकांत कांही आधुनिक विचार व वाक्प्रचार आढळतात. कसे ते पाहा :

यौवराज्याभिषेकाच्या बाबतींत आपणांस राजा व सुमंत्र विचारीत नाहीत असें पाहून विदूषक कृतककोपाने म्हणतोः—"अहमन्तःपुरे देवीनां

बहिश्च भ्रातृणां विग्रहमुत्पादयामि । अथवा प्रायोपवेशनभयं सर्वेषामुत्पादयामि ” (पृ. ६०) यांत विदूषकाने आपल्या मनासारखें झालें नाही तर आमरण उपोषणाचा सत्याग्रह करण्याचा धाक घातला आहे. असा धाक प्राचीन ग्रंथांत सहसा आढळत नाही. तो आधुनिक सत्याग्रहयुगांत रचलेल्या ग्रंथांत येणें संभवतें.

(३) चौथ्या अंकांत सुमंत्र विश्वामित्राला पाहतो, तेव्हा म्हणतो : ‘ भगवन् नमस्ते । ’ (पृ. ११०). नमस्काराची ही पद्धत भासकृत इतर नाटकांत आढळत नाही. विश्वामित्र हा महर्षि होता. त्याला ‘ नमस्ते ’ (तुला नमस्कार असो) म्हणणें सुमन्त्राला शोभत नाही. अशा प्रसंगीं भासाच्या इतर नाटकांत ‘ भगवन् अभिवादये ’ (देवधर-संपादित ‘ भासनाटकचक्र ’, पृ. १८०), ‘ भर्तृदारक वन्दे ’ (पृ. २२५), ‘ आर्य, अभिवादये ’ (पृ. २८६), ‘ भो आचार्य, अभिवादये ’ (पृ. ३७८), ‘ तात, दुर्योधनोऽहमभिवादये ’ (पृ. ४६४), अशीं अभिवादवचनें आढळतात. सध्या लहानांपासून थोरांपर्यंत ‘ नमस्ते ’ म्हणण्याची पद्धत उत्तर हिंदुस्थानांत पडली आहे. गीतेच्या अकराव्या अध्यायांत ‘ नमोऽस्तु ते ’, ‘ नमो नमस्ते ’ इत्यादि वाक्यांच्या अंधानुकरणाचा हा परिणाम ! परमेश्वराला उद्देशून बोलतांना आपण द्वितीयपुरुषीं एकवचनाचा प्रयोग करतों, तसा भासानेहि एके ठिकाणीं केला आहे (‘ बालचरितम् ’ ५, १८). पण वडील माणसांच्या किंवा माननीय व्यक्तींच्या बाबतींत तोच प्रयोग करणें शिष्टसंमत नाही. तथापि, असा प्रयोग सध्या उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र रूढ झाला आहे खरा. प्रस्तुत नाटक उत्तर हिंदुस्थानांत लिहिलें गेल्यामुळे त्या प्रयोगाचें अनुसरण सुमन्त्राच्या वरील अभिवादनांत झालेलें दिसतें.

(३) पांचव्या अंकांत अनेक ठिकाणीं तपोवन व घोष (गौळीवाडे) यांची नगराशीं तुलना केली आहे, तींत आधुनिक विचार आढळतात. नगरांतील रम्यत्व हें कृत्रिम असतें. राजेलोकांच्या उद्यानांत कुंपण वगैरे घालून वृक्ष काळजीने वाढविले जातात, पण त्यांचीं फळें सर्वांना मिळत नाहीत. याच्या उलट तपोवनांत हरिणादि सर्व प्राण्यांना पानें व फळें यथेच्छ खातां

येतात. खेडेगावांतील कृषीवल अल्प लाभाने संतुष्ट असल्याने अन्नाचा विक्रय करीत नाहीत. नगरांतील लोक उत्तुंग सौधांत ललितकलांचा आनंद घेवोत, पण त्यांना वनांतील द्वेषरहित सृष्टिसौंदर्याचें सुख माहीत होत नाही (पृ. १५४). तपोवनाजवळ गौळीवाड्यांत राहणारे लोक, त्यांना कोणी धर्माचा उपदेश केला नाही तरी, धर्माचें अतिक्रमण करीत नाहीत. त्यांच्यामध्ये कलह किंवा लोकांना लुबाडण्याची इच्छा नसते. ते आतिथ्यशील असतात व स्वतःवर केलेले अपकार (लौकरच) विसरतात (पृ. १५७) इत्यादि. वरील वर्णन वाचतांना अलीकडील 'खेडेगावांकडे वळा' या प्रचाराची आठवण होते. भासाच्या 'पंचरात्र' व 'बालचरित' या नाटकांतहि गौळीवाड्यांतले प्रवेश घातले आहेत. त्यांमध्ये गवळ्यांचें गोधनावरील उत्कट प्रेम आढळतें, त्यांचें 'हल्लीसक' नृत्य दृष्टीस पडतें व इंद्रध्वजादि उत्सवांचाहि उल्लेख येतो. पण त्यांमध्ये कोठेहि नागर व ग्रामीण जीवनाची तुलना करून ग्रामीण जीवनाचें श्रेष्ठत्व प्रतिपादल्याचें दिसत नाही.

वरील कारणांस्तव 'यज्ञफल' हें नाटक प्राचीन नसून अलीकडेच कोणी रचलें असावें असें वाटतें. त्याच्या कर्त्याने अर्थातच भासाच्या उपलब्ध नाटकांचे कुशलतेनें अनुकरण केलें आहे. कालिदासाच्या ग्रंथांत क्वचित् स्थळीं भासाच्या कल्पना आढळतात हें आता माहीत झाल्यामुळे, कालिदासीय उक्ति व प्रसंग युक्तायुक्तस्थळीं घातले आहेत, हल्लीच्या चिकित्सक पद्धतीला अनुसरून पादटीपांत पाठभेद दिले आहेत, अपाणिनीय प्रयोग व संस्कृत ग्रंथांतील समानार्थक उतारे टिप्पणींत घातले आहेत. सारांश, हें नाटक भासाचेंच आहे हें दाखविण्याकरिता ग्रंथकाराने प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. डॉ. पुसाळकर व डॉ. भट यांसारख्या विद्वानांनाहि हें नाटक भासाचें वाटलें, यावरून त्याचे प्रयत्न बरेच सफल झालेले दिसतात.

हें नाटक आपण रचून भासाच्या नांवावर प्रसिद्ध केलें, हा कै. गोपाळदत्त शास्त्रींचा दावा बरोबर दिसतो. पुढे मागे जरूर पडल्यास ही आपली कृति आहे हें सिद्ध करतां यावें म्हणून त्यांनी उपोद्घातांत व मूळ नाटकांतहि कांही खुणा (keys) घालून ठेवल्या होत्या. डॉ. दांडेकरांच्या मतें त्यांत कांही तथ्य नाही. तेव्हां त्यांचें परीक्षण करणें जरूर आहे.

खूण १ : नाटकाला जोडलेल्या 'प्राग्वक्तव्यम्' नामक उपोद्घातां-तल्या पहिल्या एकोणीस वाक्यांतील आठवें अक्षर घेतल्यास 'बलात् ग्रंथ लेकर उपोद्घातभी मेरेसेही लिखाया' हें वाक्य तयार होतें.

डॉ. दांडेकरांनाहि हें मान्य आहे. पण त्यांच्या मतें गोपाळदत्त शास्त्री यांनी प्रस्तावना लिहिली असावी व म्हणून त्यांना अशी खूण घालणें शक्य झालें असावें. पण ही प्रस्तावना राजवैद्य जीवराम कालिदास शास्त्री यांच्या नांवावर आहे. गोपाळदत्त शास्त्री यांचा उल्लेख उपोद्घाताच्या शेवटीं आला आहे खरा, पण तो केवळ टिप्पणीचा कर्ता म्हणून. हा उपोद्घात राज-वैद्यांनी स्वतः लिहिला असता तर त्यांतून वरील हिंदी वाक्य बनवितां आलें नसतें हें उघड आहे. तेव्हा राजवैद्यांनी गोपालदत्तशास्त्री यांच्याकडून उपो-द्घात लिहून घेऊन आपल्या नांवावर छापला असें स्पष्ट दिसतें. म्हणून गोपालदत्तशास्त्री यांच्यावरील आरोपांपैकी 'उपोद्घात मेरेसेही लिखाया' हा भाग निर्विवादपणे सिद्ध होत आहे. त्यामुळे 'यज्ञफल' ग्रंथ त्यांच्याकडून लिहवून घेतला हा भागहि खरा असावा असें मानण्याकडे मनाचा कल होतो. हीं दोन कामें–ग्रंथरचना व उपोद्घातलेखन–गोपालदत्तशास्त्रींकडून करवितांना, ते म्हणतात त्याप्रमाणे, त्यांच्यावर अयोग्य दडपण घालण्यांत आलें किंवा त्यांना योग्य मेहनताना देऊन तीं कामें त्यांच्याकडून करवून घेण्यांत आलीं, हें समजण्यास आता साधन नाही.

खूण २ : पहिल्या अंकांतील अठ्ठाविसाव्या श्लोकांतील पहिल्या, तिसऱ्या, चौथ्या व दुसऱ्या पादांतील पांचवें अक्षर घेतल्यास 'गोपालस्य' असा शब्द होतो.

'यज्ञफला'च्या अवशिष्ट* हस्तलिखितांत किंवा गोंडळच्या राजवैद्यां-कडून मिळालेल्या छापील प्रतींतहि या विशिष्ट अक्षरांनी 'गोपालस्य' असा शब्द बनत नाही असें डॉ. दांडेकरांनी दाखविलें आहे. पण तेच सांगतात की, आपण पाहिलेल्या दुसऱ्या एका छापील प्रतींत हाच श्लोक पाठभेदानें दिला आहे. ते पाठ घेतल्यास ही खूणहि सिद्ध होते. तो श्लोक असा :

---

* 'यज्ञफला'चें दुसरें हस्तलिखित गोपालदत्तशास्त्री घेऊन गेले असें राजवैद्य सांगतात.

घृणीनां पूगोऽयं बत दिनकरस्य क्षयमगात् ।
प्रकाशो दीपानां रजनिवदनालङ्कृतिरिव ॥ ”

तेव्हा गोपालदत्त शास्त्रींना अभिप्रेत असलेल्या पाठांचा हा श्लोक ज्यांमध्ये आहे अशा कांही प्रती छापल्या होत्या, यांत संशय नाही. पुढे ग्रंथकर्त्याने आपल्या कर्तृत्वाची ही खूण या श्लोकांत घातली आहे हें लक्षांत आल्यामुळे तें पान बदलण्यांत आलें असावें असें दिसतें. त्याच वेळीं या बदललेल्या आवृत्तीच्या प्रती ध्यानांत याव्या म्हणून पुस्तकाचें कव्हरहि बदललें असावें. कारण डॉ. दांडेकर सांगतात की, पूर्वीच्या कव्हरवर वर्ष व मास यांचा उल्लेख नव्हता, पण बदललेल्या आवृत्तीच्या कव्हरवर 'सन १९४१ मार्च' असा निर्देश आहे. ही तारीखहि चूक आहे. कारण पुस्तक १९–७–४१ पर्यंत तयार झालें नव्हतें, हें उपोद्घाताच्या शेवटीं जी तारीख घातली आहे त्यावरून स्पष्ट आहे.

खूण ३ : दुसऱ्या अंकांतील पहिल्या पांच श्लोकांच्या पहिल्या पादांचें आठवें अक्षर घेतल्यास 'भासानुकारि' असा शब्द तयार होतो.

ही खूण डॉ. दांडेकर यांना मान्य आहे. पण 'तीं काकतालीय न्यायाने झालेली आहे. या अक्षरांचा असा शब्द होतो हें लक्षांत आल्यावर गोपालदत्त शास्त्री यांनी त्याचा फायदा घेतला असावा' असें ते म्हणतात. पण ही खूण काकतालीय न्यायाने होणें संभवत नाही. शिवाय हिच्यामध्येहि पहिल्या खुणेंतल्याप्रमाणे आठवेंच अक्षर घ्यावें लागतें हें लक्षांत घेतां ही खूण मुद्दाम घातली असावी असें वाटतें.

कै. गोपालदत्त हे विद्वान् शास्त्री होते. भांडारकर-संशोधन-मंडळा'-च्या रौप्यमहोत्सवप्रसंगीं त्यांनी स्वकृत श्लोक म्हटले, त्यांवरून त्यांचें संस्कृत भाषेवरील आश्चर्यकारक प्रभुत्व व प्राचीन शैलीचे श्लोक रचण्याची हातोटी हीं स्पष्टपणें दिसून आलीं, असें दांडेकर सांगतात. त्यांनी नाटकावर टिप्पणी लिहिली आहे, तिजवरून त्यांची प्रगाढ विद्वत्ता व संस्कृत काव्याचा खोल अभ्यास दिसून येतात. अशा विद्वान् शास्त्र्यास भासकृत उपलब्ध नाटकांचा सूक्ष्म अभ्यास करून तत्सदृश नाटकरचना करतां येणें अशक्य नाही.

आता राहिला हस्तलिखिताचा प्रश्न. राजवैद्यांनी पाठविलेलें हस्तलिखित वि. सं. १७२७ इतकें जुनें आहे असें आपलें व प्रा. गोडे यांचें निश्चित मत झाल्याचें डॉ. दांडेकर सांगतात. तें हस्तलिखित मी पाहिलेलें नाही. तथापि, ज्या विद्वान् शास्त्र्याला प्राचीन काव्यशैलीचें बेमालूम अनुकरण करतां येतें त्याला पृष्ठमात्रादि घालून प्राचीन लेखनपद्धतीचेंहि अनुकरण करणें कठिण जाऊं नये. त्याकरिता जुना कागद मिळविणें किंवा नव्या कागदाला कृत्रिम उपायांनी जुनेपणा आणणेंहि अशक्य नाही.

गोंडळच्या रसशाळेतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलेलें हें एकच पुस्तक संशयास्पद नाही. ‘पूर्वपाणिनीयम्’ नामक व्याकरणावरचा २४ सूत्रांचा ग्रंथ, सध्याच्या ७०० श्लोकांच्या भगवद्गीतेपेक्षा मोठी ७४५ श्लोकांची ‘भोजपत्री गीता’, गुप्तसम्राट् समुद्रगुप्त याचें ‘कृष्णचरित’ नामक खंडकाव्य–असे आणखी तीन, संस्कृत वाङ्मयेतिहासांत अत्यंत खळबळ उडवून देणारे, ग्रंथ राजवैद्यांनी १९४०–४१ या कालांत प्रसिद्ध केले.* यांपैकी ‘भोजपत्री गीते’चें परीक्षण करून ती बनावट असल्याचें डॉ. बेलवलकर यांनी साधार दाखविलें आहे.† ‘कृष्णचरित’ काव्याचीहि अशीच गोष्ट आहे. त्याचीं दोनच जीर्ण पानें आपणांस मिळाली व तीं आपण छापलीं असें राजवैद्य सांगतात. त्यांतील कित्येक विधानें अत्यंत विस्मयोत्पादक आहेत. उदाहरणार्थ—शूद्रक कवीनें शकांना जिंकून विक्रमसंवत् चालू केला. त्याचा आश्रित कालिदास हा शाकुन्तलादि चार नाटकांचा कर्ता होता. दुसरा कालिदास समुद्रगुप्ताचा सांधिविग्रहिक हरिषेण हाच होय. त्याने रघुवंशादि पांच काव्यें रचलीं–अशी आश्चर्यकारक माहिती त्यांत आढळते. इतरहि वररुचि, व्याडि, ‘अन्त्यज’ देवल, ‘बुद्धचरित’ लिहिणारा चीन कवि वगैरेविषयीं त्यांत श्लोक आहेत. त्रुटित ‘कृष्णचरित’ काव्य

* सन १९४१ मध्ये गोपालदत्त शास्त्र्यांचा राजवैद्यांशीं बेबनाव होऊन ते जयपूरला निघून गेले असें ‘कृष्णचरितम्’ व ‘पूर्वपाणिनीयम्’ यांच्या उपोद्घातांवरून दिसतें.

† डॉ. बेलवलकरांचा ‘गंगानाथ झा रिसर्च इन्स्टिटयूट’च्या जर्नल–(पु. १. पृ. २१–३१)–मधील या विषयावरील लेख पाहा.

आधुनिक संशोधनाशीं परिचित असलेल्या कोणा विद्वानाने रचलें असावें. त्याचा कर्ता गोपालदत्त शास्त्रीच असणें असंभवनीय नाही.*

कांही वर्षांपूर्वी धावक, भास इत्यादिकांविषयीं असेच कांही श्लोक 'कविविमर्श' नामक ग्रंथांतील म्हणून प्रसिद्ध झाले होते. पण त्याविषयीं चौकशी करतां ते बनावट असल्याचें आढळून आलें. भविष्योत्तर-पुराणांत 'कलियुग-राजवृत्तान्त' म्हणून एक प्रकरण आलें आहे. त्यांतील कांही उल्लेख अलीकडील संशोधनाने मिळालेल्या माहितीशीं जुळत असल्यामुळे तें प्रकरण खरें मानण्याकडे कांही विद्वानांचा कल होता. पण सूक्ष्म अभ्यासानंतर तें आधुनिक संशोधनाशीं परिचित असलेल्या कोणी तरी रचलें असावें असें आता मानण्यांत येतें. गोपालदत्त शास्त्रींचा उपक्रम याच प्रकारचा आहे. अशा प्रकारचे उद्योग आपल्या देशांत फार प्राचीन काळापासून चालू आहेत. स्वतःच्या कृतीची प्रसिद्धि होऊन तिला मान्यता मिळावी या हेतूने अनेक विद्वानांनी स्वतः अज्ञात राहून आपले ग्रंथ—पुराणें, स्मृति, काव्यें, नाटकें इत्यादि—प्राचीन ऋषींच्या किंवा प्रथितयश ग्रंथकारांच्या नांवावर खपविलेले आढळतात. त्यामुळे संस्कृत वाङ्मयेतिहासांत अतिशय घोटाळा उत्पन्न झाला आहे. अठरा पुराणें व्यासानेच रचलीं की दुसऱ्या कोणी, कालिदास एक किंवा तीन, श्रीशंकराचार्यांच्या नांवावर असलेले ग्रंथ त्यांनी रचले किंवा दुसऱ्या कोणी, इत्यादि प्रश्न यामुळेच उत्पन्न झाले आहेत. उपलब्ध पुराव्याची छाननी करून ते सोडविण्यांत संशोधकांचे परिश्रम खर्ची पडत आहेत. अशा वेळीं असे नवीन नवीन बनावट ग्रंथ रचून त्यांचें काम जास्त बिकट करणें योग्य होणार नाही. कितीहि कौशल्यानें बनावट ग्रंथ रचले तरी आधुनिक चिकित्सक युगांत सत्य उघडकीस आल्याशिवाय राहत नाही. तेव्हा संस्कृत विद्वानांनी अशा प्रकारचे उद्योग करण्याचें सोडून आपली विद्वत्ता योग्य कार्यास लावावी असें त्यांस नम्रपणे सुचवून हा लांबलेला लेख समाप्त करतों.

---

* नागपूरच्या 'तरुण भारता'च्या सन १९५१ च्या दिवाळी अंकांतील या विषयावरील माझा लेख पाहा.

२. प्राचीन भारतीय इतिहास

सातवाहनांच्या आरंभकालावर नवीन प्रकाश*

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासांत सातवाहनांचा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. किंबहुना, महाराष्ट्राच्या विश्वसनीय प्राचीन इतिहासाला सातवाहनकालापासूनच आरंभ होतो. या वंशाला पुराणांत आन्ध्र म्हटलें आहे, पण तो मूळचा आंध्रदेशीय नव्हे, कारण त्याचे अगदी आरंभींचे लेख पश्चिम महाराष्ट्रांत नाशिकजवळच्या पांडवलेण्यांत व जुन्नरजवळच्या नाणेघाटांतील लेण्यांत सापडले आहेत. त्यांचीं अत्यंत प्राचीन नाणींहि हैदराबाद संस्थानच्या मध्य किंवा पश्चिम भागांत मिळालीं आहेत. पुराणांतील राजवंशांच्या याद्या तयार झाल्या त्या वेळीं या वंशाचें राज्य आन्ध्रदेशांत असल्याने त्याला आन्ध्र म्हटलें असावें. या वंशांतील ३० राजांनी ४६० वर्षे राज्य केलें असें पुराणांत म्हटलें आहे. पण तें बरोबर नाही. कारण आरंभींच्या कांही राजांचीं नांवें पुराणांत आलीं नाहीत. उदाहरणार्थ, या वंशाचा संस्थापक सातवाहन याचेंहि नांव पुराणांत आलें नाही. शिवाय शेवटचे कांही राजे पुराणांतील वंशावळींतून गळलेले दिसतात, कारण त्यांचीं कित्येक नाणीं सुमारें बारा वर्षांपूर्वी विदर्भांत सापडलीं होतीं. तेव्हा या वंशाचें राज्य खिस्तपूर्व २३० पासून खिस्तोत्तर २५० पर्यंत म्हणजे जवळ जवळ पांच शतकें महाराष्ट्रांत होतें असें म्हणण्यास

* 'स्वामी केवलानंद गौरवग्रंथ', पृ. ३०–३५.

हरकत नाही. इतका प्रदीर्घ काळ एखादें राजघराणें टिकून राहिल्याचें उदाहरण इतिहासांत क्वचितच आढळेल. या काळांत सातवाहनांचें साम्राज्य दक्षिणच्या बहुतेक प्रदेशांत पसरलें. या वंशांतील गौतमीपुत्र सातकर्णीच्या एका लेखांत त्याचे घोडे तीन समुद्रांचें पाणी प्याले होते, असें वर्णन आलें आहे. याशिवाय मध्यहिंदुस्थानाचाहि कांही भाग त्यांच्या साम्राज्यांत अन्तर्भूत होता. सातवाहनांच्या राजवटींत धर्म, तत्त्वज्ञान, वाङ्मय, कला-कौशल्य इत्यादिकांना उदार राजाश्रय मिळून त्यांची अतिशय उन्नति झाली व त्यायोगें महाराष्ट्राचें नांव अत्युज्ज्वल झालें.

अशा या सुविख्यात राजवंशाच्या आरंभकाळाविषयी आपलें ज्ञान अद्यापि अत्यंत मर्यादित आहे. सुमारें दहा बारा वर्षांपूर्वीपर्यंत या वंशाला 'सातवाहन' नांव कसें मिळालें याचेंहि कोडें संशोधकांना पडलें होतें. या नांवाच्या अनेक व्युत्पत्त्या त्यांनी सुचविल्या होत्या, पण त्या समाधान-कारक नव्हत्या. सन १९४५ मध्ये खुद्द सातवाहन राजाचीं दोन नाणीं हैदराबाद संस्थानांत सापडलीं तेव्हा या वंशाचा मूळपुरुष सातवाहन नामक राजा होता व म्हणून त्या वंशाला सातवाहन नांव मिळालें ही अत्यंत महत्त्वाची माहिती प्रथम मिळाली. त्यानंतर याच राजाचें आणखी एक नाणें हैदराबाद संस्थानांतील कोंडापूर गावीं केलेल्या उत्खननांत सापडलें. या नाण्यांवरून सातवाहन राजे हैदराबाद संस्थानच्या मराठवाडयांत प्रथम उदयास आले असें दिसतें. त्यांची राजधानी प्रतिष्ठान (औरंगाबाद जिल्ह्यांतील पैठण) ही असावी.

पुराणांत या घराण्याच्या मूळ पुरुषाचें नांव आलें नाही. त्यानंतर-चींहि एक दोन राजांचीं नांवें गळालेलीं दिसतात. पुराणांतील वर्णनाप्रमाणे या वंशाचा पहिला राजा शिशुक हा होता. याच्याहि नांवाविषयी घोटाळा झाला आहे. त्याचें खरें नांव शिमुक होतें असें कोरीव लेखावरून दिसतें. जुन्नरजवळच्या नाणेघाटांतील लेण्यांत त्याचा पुतळा कोरला होता, पण तो आता भग्न झाला आहे. त्यावर 'सिमुक सातवाहनो' असें त्याचें नांव तत्कालीन प्राकृत भाषेंत कोरलेलें अद्यापि वाचतां येतें. यानंतर पुराणांतील

वर्णनाप्रमाणे याचा भाऊ कृष्ण हा गादीवर बसला. याच्या काळचा एक लेख नाशिकजवळच्या पांडवलेण्यांत कोरला आहे. त्यांत 'सातवाहनकुले कन्हे राजनि' म्हणजे 'सातवाहनवंशी कृष्ण राजा राज्य करीत असतां' असा निर्देश आहे. कृष्ण हा सातवाहन राजाचा मुलगा असता तर 'सातवाहनपुते कन्हे राजनि' असा उल्लेख आला असता. तेव्हा या लेखांवरून सातवाहनानंतर व शिमुक-कृष्णापूर्वी एक दोन पिढया झाल्या असाव्या हें उघड आहे.

कृष्णानंतर त्याचा मुलगा सातकर्णि हा गादीवर बसला असें पुराणें सांगतात, पण यांतहि थोडी चूक दिसते. नाणेघाटांतील लेण्यांत सातवाहन राजघराण्यांतील व्यक्तींचे व त्यांच्या जवळच्या नातेवाइकांचे पुतळे कोरविले होते व त्यांवर त्यांचीं नांवेंहि लिहिलीं होती. शिमुक सातवाहनाच्या शेजारीं देवी नागनिका व राजा श्रीसातकर्णि यांचा जोडपुतळा होता असें त्य वरील लेखावरून दिसतें. त्याच्या पलीकडे सातकर्णीचे तीन पुत्र (यांपैकी दोघांचीं नांवें आता नष्ट झालीं आहेत), नंतर नागनिकेचा भाऊ महारठी त्रणकयिर व त्याचे दोन मुलगे यांचे पुतळे होते. या पुतळ्यांमध्ये कृष्णाचा पुतळा दिसत नाही. सातकर्णि हा कृष्णाचा मुलगा असता तर शिमुकानंतर त्याचा पुतळा कोरविला असता. तेव्हा सातकर्णि हा शिमुकाचा मुलगा होता हें उघड आहे.

नाणेघाटांतील या छोटया लेखांशिवाय आणखी एक प्राकृत भाषेंतील मोठा लेख त्याच लेण्यांत आहे. त्यावरून तत्कालीन इतिहासावर बराच प्रकाश पडतो. हा लेख अत्यंत भग्न स्थितींत असल्यामुळे त्यांतील कित्येक अक्षरें नष्ट झालीं आहेत. त्यामुळे त्याच्या अर्थाविषयी संशोधकांत बरेच मतभेद आहेत. प्रथम या लेखाच्या पहिल्या पांच ओळी देऊन* नंतर त्याच्या अर्थाची चर्चा करूं—

---

* हा उतारा आर्किऑलाजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया, व्हॉ. ५, पृ. ६० वरील डॉ. बुल्हरच्या वाचनावरून घेतला आहे. कंसांतील अक्षरें अस्पष्ट आहेत असें समजावें.

१ [ओं नमो पजापति]नो धंमस नमो ईदस नमो संकसनवासुदेवानं चंदसूरानं [महि]मा[व]तानं चतुंनं च लोकपालानं यमवरुनकुबेरवासवानं नमो कुमारवरस वेदिसिरिस र[ञो]

२ · · · · · · [वी]रस सूरस अप्रतिहतचकस दखि[नाप]ठ-[पतिनो] · · · · ·

३ मा · · · · लाय महारठिनो अंगियकुलवधनस सगरगिरिवर-चल[या]य पथविय पथमवीरस वस· ·य व अलह· ·सलसु य महतो मह· ·

४ · · · · · सिरिस भारिया देवस पुतदस वरदस कामदस धनदस वेदिसिरिमातु सतिनो सिरिमतस च मातुय सीम · · · · पथमय · · · ·

वरिय · · · · नागवरदयिनिय मासोपवासिनिय गहतापसाय चरित-ब्रह्मचरियाय दिखव्रतयञसुंडाय यञा हुता · · · · ·

हा लेख एका राणीने कोरला होता. तिचें नांव आता नष्ट झालें आहे. तसेंच चौथ्या ओळीच्या आरंभीं 'सिरिस' शब्दापूर्वी तिच्या पतीचें नांव कोरलें होतें तेंहि आता वाचतां येत नाही. तथापि ही राणी पुतळ्यावरील लेखांत उल्लेखिलेली सातकर्णि राजाची पत्नी नागनिका ही असावी, हें डॉ. बुल्हरचें अनुमान सर्वांनी ग्राह्य मानलें आहे. चौथ्या ओळींतील वर्णनावरून तिला वेदिश्री किंवा वेदि* व सति (किंवा शक्ति) असे दोन पुत्र होते असें दिसतें. या राणीने अनेक यज्ञ केले व अनेक गाव, कित्येक हत्ती, हजारो घोडे, गाई व कार्षापण नामक तत्कालीन नाणीं दक्षिणा म्हणून दिलीं. लेखाच्या अवशिष्ट भागांत अश्वमेध, राजसूय, अग्न्याधेय, अन्वारम्भणीय, गवामयन, भगालदशरात्र, आप्तोर्याम, अङ्गिरसामयन, गर्गत्रिरात्र, अङ्गिरसत्रिरात्र, छन्दोगपवमानत्रिरात्र, त्रयोदशरात्र, दशरात्र इत्यादि यज्ञांचा व प्रत्येक यज्ञाच्या वेळीं दिलेल्या विविध प्रकारच्या दक्षिणांचा निर्देश आहे. यांपैकी कांही यज्ञ तिने राजाची सहधर्मचारिणी म्हणून व कांही स्वतः केले होते.†

---

* याचें नांव लेखांत वेदिसिरि (वेदिश्री) असें येतें, पण सिरि हें संमानदर्शक आहे.

† सतराव्या ओळींत 'सयं' (स्वयम्) असा शब्द आला आहे.

या लेखांत आरंभीं 'नमो कुमारवरस वेदिसिरिस' असे शब्द आले आहेत, त्यांवरून त्या काळीं राणी नागनिका ही आपल्या वेदिश्री नामक मुलाच्या नांवाने प्रतिनिधि (रीजंट) म्हणून राज्य करीत होती असें बुल्हरने अनुमान केलें. तें त्यानंतरच्या सर्व संशोधकांनी स्वीकारलें आहे. तेंच मत आजतागायत लिहिलेल्या प्राचीन भारताच्या सर्व इतिहासांत प्रतिपादलें आहे. या प्रश्नाची चर्चा करण्याकरिता या लेखाच्या वर उद्धृत केलेल्या पहिल्या पांच ओळींचा जरा बारकाईने विचार केला पाहिजे.

या लेखांत आरंभीं धर्म, इन्द्र, संकर्षण, वासुदेव, चंद्रसूर्य आणि यम, वरुण, कुबेर व वासव हे चार दिशांचे चार लोकपाल यांना नमन केलें आहे. हे सर्व सुप्रसिद्ध देव आहेत. तेव्हा यापुढे ज्याला नमन केलें आहे तो कुमारवरहि देवच असावा हें उघड आहे. बुल्हरने त्याचा अर्थ कुमारश्रेष्ठ असा करून तो शब्द त्यापुढील 'वेदिश्री'शब्दाचें विशेषण मानला व या लेखांत आरंभीं राजकुमार वेदिश्री याला नमन आहे असें म्हटलें. राजकुमाराला लेखाच्या आरंभीं नमन कसें केलें अशी शंका बुल्हरला आली होती, पण वेदिश्री याचें स्थान त्या काळीं अत्यंत उच्च मानलें जात असल्यामुळे त्याला देवांप्रमाणें या लेखारंभीं नमन केलें असावें, असें त्याने त्या शंकेचें समाधान केलें आहे. पण हें स्पष्टीकरण बरोबर दिसत नाही. आतापर्यंत हजारों संस्कृत व प्राकृत कोरीव लेख सापडले आहेत पण त्यांपैकी एकाहि लेखांत अल्पवयी राजकुमारालाच काय, पण प्रत्यक्ष राज्यकर्त्या सम्राटालाहि असें नमन केलेलें आढळत नाही. प्रो. रॅप्सन यालाहि हें स्पष्टीकरण पटलें नाहीं. म्हणून त्यानें या लेखांतील आरंभींच्या शब्दांचा निराळाच अन्वय सुचविला.

या लेखांतील आरंभींचीं 'ओं नमो प्रजापति-' हीं अक्षरें आता नष्ट झालीं आहेत. तीं बुल्हरने अनुमानाने सुचविलीं होतीं. पण त्यायोगें वरील अडचण येत असल्यामुळे रॅप्सनने तीं गाळून त्या नंतरच्या 'नमो' या शब्दाचा संबंध त्यापुढील देवनामाशीं न लावतां मागील देवनामाशीं लावावा असें सुचविलें.* तसें केल्यास 'धंमस नमो' 'इंदस नमो' अशीं

* 'आंध्रांचीं नाणीं' हा त्याचा इंग्रजी ग्रंथ, प्रस्तावना, पृ. १४ पाहा.

नमनार्थक वाक्यें होतील. हा अन्वय स्वीकारल्यास कुमारश्रेष्ठ वेदिश्रीला लेखारंभीं नमन कसें केलें ही अडचण नाहीशी होते. रॅप्सनच्या मतें 'कुमारवरस' शब्दापासून खऱ्या लेखाला आरंभ होतो. वेदिश्रीला 'कुमारवर' म्हटलें असल्याने नागनिका राणी आपल्या अल्पवयी वेदिश्री नामक मुलाच्या नांवें राज्य करीत होती हें बुल्हरचें मत रॅप्सननेहि ग्राह्य मानलें आहे.

पण रॅप्सनने सुचविलेला शब्दांचा वरील अन्वय बरोबर वाटत नाही. प्राचीन काळच्या सर्व प्राकृत व संस्कृत लेखांत 'नमः' हा शब्द ज्याला नमन केलें आहे त्या देवाच्या नांवापूर्वी येतो. खालील उदाहरणें पहा--

(१) नमो अरिहंतानं। (हाथीगुंफेंतील खारवेलाचा लेख, एपिग्राफिया, इंडिका, पु. २०, पृ. ७९.)

(२) नमो भगवतो...सवंञुनो। (नागार्जुनीकोंड येथील वीरपुरुषदत्ताचा लेख, ए. इं., पु. २०, पृ. १६.)

(३) नमः शिवाय। (तालगुंडा येथील शान्तिवर्म्याचा लेख, ए. इं., पु. ८, पृ. ३१.)

अशीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. तेव्हा नाणेघाटांच्या लेखांतील 'नमो' शब्द त्यानंतरच्या देवनामाशीं अन्वित केला पाहिजे यांत संशय नाही. पण मग 'नमो कुमारवरस' याचा अर्थ कसा लावावयाचा, असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचें उत्तरहि सोपें आहे. कुमारवर म्हणजे कार्त्तिकेय. हें नांव प्राचीन काळच्या लेखांत येतें. मध्यप्रदेशाच्या छत्तीसगड विभागांतील गुंजी या गांवीं असलेला एक प्रस्तरलेख मी अलीकडे प्रसिद्ध केला आहे. तो खिस्ती शकाच्या आरंभाइतका प्राचीन असून प्राकृतभाषेंतच आहे. त्यांत तत्कालीन राजाचें नांव 'कुमारवरदत्त' असें आलें आहे. अर्थात् तो मुलगा आपणांस कार्त्तिकेयाच्या प्रसादाने झाला अशी समजूत असल्याने त्याच्या मातापित्यांनी त्याचें हें नांव ठेविलें असावें. प्राचीन काळीं कार्त्तिकेयाची पूजा सर्वत्र प्रचलित होती. परकी शककुशाणादि लोकांचा तर तो इष्टदेव होता. मध्यभारतांत सांची व मध्यप्रदेशाच्या सागर जिल्ह्यांतील एरण येथें शकनृपति श्रीधरवर्मा याचे कोरीव लेख सांपडले आहेत, त्यांत त्या राजाला महासेन (कार्त्तिकेय) याचा उपासक म्हटलें आहे.

तेव्हा नाणेघाटांतील लेखांच्या आरंभीं कार्त्तिकेयाला नमन असलें तर आश्चर्य नाही.

नाणेघाटांतील खऱ्या लेखाचा आरंभ (नमनानंतर) 'वेदिसिरिस' या शब्दापासून होतो हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. त्या पुढील शब्द 'रञो' हा 'वेदिसिरिस' याचें विशेषण आहे. प्राकृत लेखांत अनेक ठिकाणीं विशेषणें विशेष्यानंतर घातलेलीं आढळतात. तसाच प्रकार येथे आहे. त्या-पुढील 'वीरस सूरस अप्रतिहतचकस दखिनापथपतिनो' हीं विशेषणेंहि 'वेदिसिरिस' याचींच आहेत. त्यावरून या लेखाच्या काळीं तो राज्य करीत असून वीर, शूर, अप्रतिरथ व आपल्या पित्याप्रमाणें दक्षिणापथाचा स्वामी होता हें स्पष्ट आहे. संस्कृत व प्राकृत लेखांच्या आरंभीं तत्कालीन राजाच्या कारकीर्दीचें वर्ष दिलेलें आढळतें तसें तें याहि लेखांत दिलें असावें व त्या संदर्भांतच वेदिश्री राजाचा उल्लेख लेखारंभीं आला असावा.

नाणेघाटांतील लेख कोरला त्यावेळीं वेदिश्री हा कुमार नसून स्वतः राज्य करीत होता हें त्या लेखाच्या चौथ्या ओळीवरूनहि दिसतें. त्या ठिकाणीं त्याचें वर्णन 'देवस पुतदस वरदस कामदस धनदस' या शब्दांनी केलें आहे. बुल्हरने या शब्दांचा अन्वय अन्वय त्या पूर्वीच्या '–सिरिस' या शब्दांशीं करून हीं विशेषणें वेदिश्रीचा पिता सातकर्णि याचीं मानलीं आहेत; पण हा अन्वय बरोबर नाही कारण '–सिरिस' व 'देवस पुतदस इ.' यांच्यामध्ये भारिया असें पद घातलें असल्यामुळे त्यांचा अन्वय विवक्षित नाहीं. 'देवस पुतदस' वगैरे शब्दांचा अन्वय त्या पुढील 'वेदिसिरिमातुय' यांतील 'वेदिसिरि' शब्दाशीं लावला पाहिजे. हें सापेक्षसमासाचें उदाहरण आहे. असे समास संस्कृत व प्राकृत भाषेंतील कोरीव लेखांत व कालिदासादि कवींच्या ग्रंथांतहि आढळतात व 'सापेक्षत्वेऽपि गमकत्वात्समासः' असें मानून त्यांचा अर्थ लावण्यांत येतो. तेव्हा वरील शब्दांत वेदिश्रीचेंच वर्णन केलें आहे हें उघड आहे. या शब्दांतील 'देवस' हा शब्द महत्त्वाचा आहे. त्यावरून वेदिश्री स्वतः त्या काळीं राज्य करीत होता हें स्पष्ट आहे.

तेव्हा नाणेघाटांतील हा लेख वेदिश्रीच्या लहानपणीं त्याची माता नागनिका राज्यकारभार पाहत होती त्यावेळीं कोरविला होता असें

मानण्यास यत्किंचित्हि आधार नाही. या लेखांतील तिच्या वर्णनावरूनहि ती त्या काळीं संसारांतून निवृत्त झाली असून आपला सर्व काळ धर्माचरणांत व्यतीत करीत असे, असें दिसतें. पांचव्या ओळींत तिचें खालील वर्णन आढळतें– 'मासोपवासिनिय गहतापसाय चरितब्रह्मचरियाय दिखव्रतयञसुंडाय यञा हुता।' यांत म्हटलें आहे की 'नागनिका महिना महिना उपोषण करते आणि स्वतःच्या घरीं तापसीप्रमाणे संन्यस्तवृत्तीने व ब्रह्मचर्यानें राहते. दीक्षा, व्रतें व यज्ञ करण्यांत तर ती अत्यंत निपुण आहे. अशा त्या नागनिकेने अनेक यज्ञ केले.' संन्यस्त वृत्तीनें राहून सर्व काळ यज्ञयागादि धार्मिक कृत्यांत घालविणारी स्त्री विशाल साम्राज्याचा राज्यकारभार स्वतः चालवीत असेल असें वाटत नाही.

तेव्हा सातकर्णीनंतर वेदिश्री राज्य करू लागला असें दिसतें. याचें नांव पुराणांत येत नाही. सातकर्णीनंतर पूर्णोत्संग याने अठरा वर्षें राज्य केलें व नंतर स्कन्धस्तम्भि गादीवर आला असें पुराणें सांगतात. हीं दोन्ही नांवें नाणेघाटांत आढळत नाहीत. त्या लेखांत वेदिश्री व त्याचा भाऊ सति (शक्ति) यांचा उल्लेख आहे. वेदिश्रीचीं नाणीं सापडलीं नाहीत; पण 'रञो सिरि सातिस' असा लेख असलेलीं अत्यंत प्राचीन नाणीं मुंबई राज्यांत सापडलीं आहेत. तीं नाणेघाटांत उल्लेखिलेल्या सति (शक्ति) याचीं असावीं. सातकर्णीनंतर वेदिश्री (किंवा वेदि) व सति (किंवा शक्ति) गादीवर आले असें दिसतें. पूर्णोत्संग व स्कन्धस्तम्भि हीं कदाचित् त्यांचीं दुसरीं नांवें असतील. पुराणांतील वंशावळी सर्वस्वी विश्वसनीय नसल्यामुळे या बाबतींत निश्चित विधान करणें शक्य नाही.

खानदेशांतील एक प्राचीन राजवंश*

सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी कै. पं. वामनशास्त्री इसलामपूरकर यांच्या इंदूर येथील संग्रहांतील दोन ताम्रपट डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांच्या हातीं आले. ते त्यांच्याकडून डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांना मिळाले व ते त्यांनी एपिग्राफिया इंडिका या संशोधनपर नियतकालिकांत (पु. १५, पृ. २८६ इ.) प्रकाशित केले आहेत. त्यांपैकी एक ताम्रपट महाराज स्वामिदास याने ६७ व्या वर्षीं दिला असून त्यांत नगरिका पथकांतील दक्षिण-वल्मीक-तल्लवाटक नामक ग्राम एका ब्राह्मणास दान दिल्याचा उल्लेख आहे. दुसरा ताम्रपट महाराज भुलुण्ड याने १०७ व्या वर्षीं दिला होता त्यांत उल्लदन† गावीं एक शेत ब्राह्मणास दान दिल्याचा निर्देश आहे. दोन्ही ताम्रपट वल्ख या गांवाहून दिले होते. या स्थलनामाला 'वासकात्' 'स्कन्धावारात्' या सारखें एखादें पद जोडलें नसल्याने वल्ख हें या दोन्ही राजांच्या वेळीं राजधानीचें गाव होतें असें दिसतें. महाराज स्वामिदास व महाराज भुलुण्ड हे कोणत्या राजवंशांत जन्मले होते, याचा उल्लेख या ताम्रपटांत नाही. तथापि ते स्वतःचें 'परम-भट्टारकपादानुध्यात' (सार्वभौम नृपतीच्या पायांचें चिन्तन करणारा) असें वर्णन करीत असल्यामुळे ते स्वतंत्र राजे नसून दुसऱ्या कोणत्या तरी सत्तेचे मांडलिक होते हें उघड आहे. या ताम्रपटांत कोणत्याहि शकाचा निर्देश नाही तथापि अक्षरवटिकेवरून त्यांत उल्लेखिलेली ६७ व १०७ हीं वर्षें गुप्त शकाचीं असावीं असा डॉ. मुजुमदारांनी तर्क केला व हे ताम्रपट उत्तर

* 'पराग', पुणें, वर्ष १, अंक ३ (डिसेंबर, १९४७), पृ. १-४.

† डॉ. मुजुमदार यांनी 'रुल्लदन' असें वाचलें आहे, पण पहिलें अक्षर 'र' नसून 'उ' च आहे.

हिंदुस्थानांत इंदूर येथे मिळाल्याने हें राजघराणें मध्य हिंदुस्थानांत राज्य करीत असावें असें त्यांस वाटलें. या ताम्रपटांत उल्लेखिलेल्या वलख राजधानीचा पत्ता त्यांस लागला नाही. तथापि नगरिका हें राजपुतान्यांतील प्राचीन शहर नगर असावें व तल्लवाटक हें त्यापासून थोड्या अंतरावरचें अदलवार किंवा तलोरा असावें असा तर्क त्यांनी केला आहे.

पं. वामनशास्त्री इसलामपुरकर यांना हे ताम्रपट नक्की कोठे सांपडले हें नमूद नसल्यामुळे डॉ. मुजुमदारांचे हे तर्क निश्चित मानतां येत नाहीत. शिवाय महाराज स्वामिदासाच्या ताम्रपटांतील ६७ वें वर्ष हें गुप्तशकाचें मानल्यास गुप्तांची सत्ता मध्य हिंदुस्थानांत इ. स. ३८७ च्या सुमारास दृढमूल झाली होती असें सिद्ध होईल. पण तसें इतर पुराव्यावरून दिसत नाही. कारण चौथ्या शतकाच्या अखेरीपर्यंत काठेवाड व माळवा या प्रांतांत क्षत्रपांची सत्ता प्रबळ होती. निदान इ. स. ३८८ पर्यंतचीं क्षत्रपांचीं नाणीं उपलब्ध आहेत. त्यानंतर कांही वर्षांनी इ. स. ३९५ च्या सुमारास द्वितीय चन्द्रगुप्ताने क्षत्रपांचा समूळ उच्छेद केला असें मानलें जातें. माळव्यांतील गुप्तांचा पहिला लेख गुप्त संवत् ८२ किंवा इ. स. ४०२ चा असून तो भिलशाजवळ उदयगिरि येथे सांपडला आहे. प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या स्थलांचा डॉ. मुजुमदारांनी लावलेला शोधहि निश्चित मानतां येत नाही. कारण एकतर त्यांना सर्व गांवें सांपडलीं नाहीत. व जीं सापडलीं त्यासारखीं गावें इतरत्रहि सापडतात. तेव्हा आपणांस इतर साधनांवरून हें राजघराणें कोठे राज्य करीत होतें याचा पत्ता लावला पाहिजे.

या ताम्रपटासारखाच एक ताम्रपट पूर्व खानदेश जिल्ह्यांत शिरपुर या गांवीं सुमारें साठ वर्षांपूर्वी सांपडला होता. तो कै. पं. भगवानलाल इंद्रजी यांनी इंडियन अँटिक्वरी या मासिकांत (पु. १६, पृ. ९८ इ.) प्रसिद्ध केला आहे. या ताम्रपटाकडे अद्यापि विद्वानांचें लक्ष गेलें नाही. हा ताम्रपट खंडित असून त्याचा डाव्या बाजूचा सुमारें एक इंच रुंदीचा तुकडा मोडून नष्ट झाला आहे.

अवशिष्ट भागावरून ह्या ताम्रपटांत महाराज रुद्रदास या नृपतीने ११७ व्या वर्षी विकट्टानक गावीं ब्राह्मणास एक शेत दान दिल्याचा

उल्लेख आहे. हा रुद्रदासही स्वतःला 'परमभट्टारकपादानुध्यात' असेंच म्हणवितो. या ताम्रपटाचें इंदूरच्या ताम्रपटांशी अक्षरवटिकेंत सादृश्य असून शब्दयोजना, कालनिर्देश इत्यादिकांतहि आश्चर्यकारक साम्य आहे हें खाली दिलेल्या दोन ताम्रपटांतील उताऱ्यांवरून* दिसून येईल—

महाराज स्वामिदासाचा ताम्रपट†

वल्खा[त्★] [।★] परमभट्टारकपादानुध्यातो महाराजस्वामिदासः समाज्ञापयति सर्व्वानेवास्मत्सन्तकानायुक्तकान् [।★] विज्ञातमस्तु वः समनुजानीमोस्य शाण्डिल्यगोत्रमुण्डब्राह्मणस्य...क्षेत्रपदं ब्रह्मदेयमाचन्द्रार्कतारककालीयं पुत्रपौत्रान्वयभोज्यं भोगायैवमिदानीमस्यास्माभिः कृतानुज्ञस्योचितया ब्रह्मदेयभुक्त्या भुञ्जतः कृषतः कृषापयतश्च सर्वैरेवास्मत्पक्षतत्कुल्यादिभिस्समनुमन्तव्यं नन्नभट्टिदूतकः वर्षे ६० (+) ७ ज्येष्ठ शु. ५ ।

महाराज रुद्रदासाचा ताम्रपट‡

[...] परमभट्टारकपादानुध्यातो महाराजरुद्रदासः समा[ज्ञापय★]ति सर्व्वानेवास्मदीयानायुक्तकान् [।★] विज्ञातमस्तु समनु[जानी★]मोस्य भारद्वाजसगोत्रद्रोणिलकब्राह्मणस्य... क्षेत्रं घोटकतलं नाम... ब्रह्मदेयं शाश्वतमाचन्द्रार्कतारकाकालीनं पुत्र[पौत्रान्व★]यभोज्यं भोगायैवमिदानीमस्यास्माभिः कृतानु[ज्ञ]स्यैतत् क्षेत्रं भुञ्जतः कृषतश्चास्मत्पक्षीयैः समनुमन्तव्यमिति [।★] प्रतिहारदोद्धिरदूतकः वर्ष १०० (+) १० (+) ७ वै तृतीयायाम् ।

वरील दोन ताम्रपटांतील विलक्षण साम्य लक्षांत घेतां रुद्रदास हा स्वामिदास व भुलुण्ड यांच्याच वंशांत जन्मला होता याविषयीं संशय रहात नाही. रुद्रदासाच्या ताम्रपटाचें प्राप्तिस्थान नक्की माहीत असल्याने हें राजघराणें खानदेशांत राज्य करीत होतें असें दिसतें. या सर्व ताम्रपटांत उल्लेखिलेलीं गांवेंहि खानदेशांत आढळतात. उदाहरणार्थ या राजवंशाची

* या उताऱ्यांत मुळांतील क्षुल्लक चुका दुरुस्त केल्या आहेत.

† एपिग्राफिया इंडिका, पु. १५, पृ. २८९.

‡ इंडियन अँटिक्वरी, पु. १६, पृ. ९९–१००

राजधानी वल्ख हें पूर्व खानदेशांतील चाळीसगांवाजवळचे वाघली गांव असावें. या गांवीं कांही जुनीं देवळें व प्राचीन संस्कृत लेख आहेत. त्यांपैकी एक डॉ. कील्हॉर्न याने एपिग्राफिया इंडिका (पु. २, पृ. २२१ इ.) मध्ये प्रकाशित केला आहे. त्यावरून नंतरच्या काळांतहि वाघली हें गांव काठेवाडांतील वलभी या गांवाहून येऊन खानदेशांत राज्य स्थापणाऱ्या मौर्य वंशाचें राजधानीचें ठिकाण होतें असें दिसतें. नगरिका हें वाघलीपासून १० मैल अंतरावरचें नगरदेवळें असावें. या ठिकाणींहि महादेवाचें जुनें देऊळ आहे. उल्लदन हें भुसावळपासून ९ मैलांवर असलेलें उधली गांव व विकट्टानक हें शिरपुरच्या आग्नेयेस २० मैलांवरचें विटनेरा गांव असावें असें नकाशावरून दिसतें.

तेव्हा या तीन ताम्रपटांवरून खानदेशांतील खालील वंशावळ ज्ञात होते—

महाराज स्वामिदास (वर्ष ६७)
⋮
महाराज भुलुण्ड (वर्ष १०७)
|
महाराज रुद्रदास (वर्ष ११७)

या ताम्रपटांत नेहमीप्रमाणे तीन पिढ्यांचा निर्देश नसल्याने या राजांचा परस्पर संबंध समजत नाही. हे राजे दुसऱ्या कोणा तरी सत्तेचे मांडलिक होते हें मागे सांगितलें आहेच. या सत्तेने सुरू केलेल्या शकाचीच वर्षें यांच्या ताम्रपटांत निर्देशिलेलीं असावीं. हा शक गुप्तांचा असणें शक्य नाही. कारण गुप्त शकाचे ताम्रपट दक्षिणेंत सांपडले नाहीत. अक्षरवटिकेवरून या ताम्रपटांतील कालगणना तथाकथित कलचुरि–चेदि शकाची असावी. हा शक इ. स. २४९ या वर्षीं आभीर नृपति ईश्वरसेन याने स्थापिला होता व तो महाराष्ट्रांत आठव्या शतकापर्यंत प्रचलित होता. या शकाचीं हीं वर्षें मानल्यास स्वामिदास हा इ. स. ३१६–१७ मध्ये, भुलुण्ड हा इ. स. ३५६–५७ मध्ये व रुद्रदास हा इ. स. ३६६–६७ मध्ये राज्य करीत होता असें दिसून येईल.

रुद्रदासाच्या वंशजांचे लेख उपलब्ध झाले नाहीत, पण अजंठयाच्या नं १७ च्या लेण्यांत या सारखीच 'दास'पदान्त कांही नांवें आढळतात तीं या वंशापैकीच असावीं. या लेखांत* खालील वंशावळ आढळते--

१ [नांव नष्ट झालें आहे]	६ पहिला काच
२ धृतराष्ट्र	७ भिक्षुदास
३ हरिसाम्ब	८ नीलदास
४ शौरिसाम्ब	९ दुसरा काच
५ उपेन्द्रगुप्त	१० कृष्णदास

११ [नांव नष्ट झालें आहे] — रविसाम्ब

कृष्णदासाला दोन मुलगे होते. त्यांपैकी वडील मुलाचें नांव आता वाचतां येत नाही. धाकटयाचें नांव पं. भगवानलाल इन्द्रजी व डॉ. बुल्हर यांनी रविसांब असें वाचलें आहे. हे दोन्ही बंधु प्रेमाने राहत असत व त्यांनी अश्मकादि देश जिंकले होते. कांही काळाने रविसाम्बाचा अल्पवयांत देहान्त झाला. तेव्हा त्याच्या वडील भावाला अत्यंत दुःख होऊन ऐहिक क्षणभंगुरत्वाचा त्याला प्रत्यय आला. तेव्हापासून त्याने धार्मिक रीतीने आयुष्य घालविण्यास आरंभ केला. त्याने अनेक स्तूप व विहार बांधविले व अजंठयाचें १७ नंबरचें लेणेंहि वाकाटक नृपति हरिषेण याच्या कारकीर्दींत कोरविलें. या लेण्याच्या पश्चिमेस त्याने एक गन्धकुटीहि कोरविली. ही गन्धकुटी म्हणजे अजंठयाचें १९ नं. चें चैत्यलेणें होय.

१७ नं. च्या लेण्यांतील वरील लेखावरून या वंशांतील शेवटचा राजा हा वाकाटक नृपति हरिषेण याचा समकालीन होता हें स्पष्ट आहे. अर्थात् त्याचा काल इ. सं. ४७५ ते ५०० हा येतो. त्याच्या पूर्वी दहा राजे होऊन गेले. तेव्हा या घराण्याचा मूळ संस्थापक इ. स. २७५ ते ३०० या काळांत होऊन गेला असावा. या घराण्याचे आरंभींचे तीन चार राजे स्वामिदास, भुलुण्ड व रुद्रदास यांचे समकालीन असले पाहिजेत. पण हीं

* आर्किआलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया, पु. ४, पृ. १२९ इ.

नांवें सध्या अजंठ्याच्या लेखांत आढळत नाहीत. तेव्हा हें घराणें महाराज स्वामिदास, भुलुण्ड व रुद्रदास यांच्या वंशाशीं संलग्न असावें व तें खानदेशांतच इतरत्र राज्य करीत असावें असें वाटतें.

प्रथम प्रथम या घराण्यांतील राजे आभीरांचे माण्डलिक होते, म्हणून त्यांनी आभीरांचा शक आपल्या ताम्रपटांत उपयोजिलेला दिसतो. आभीरांच्या राजवटीचा अस्त झाल्यावर हे वाकाटकांचे माण्डलिक बनले असावे. एकंदरींत यांचा काळ सुमारें इ. स. २७५ ते ५०० हा असावा.

पं. भगवानलाल यांनी या राजांना अश्मक देशाचे नृपति असें म्हटलें आहे.* पण तें बरोबर दिसत नाही. कारण खानदेशाला कधी काळीं अश्मक म्हणत असत असा पुरावा नाही. याच्या उलट या राजांपैकी कांहींनी अश्मकादि देशांवर विजय मिळविल्याचा उल्लेख अजंठ्याच्या लेखांत आहे. 'सुत्तनिपात' नामक बौद्ध ग्रंथांत अश्मक लोक गोदावरीच्या तीरावर राहात होते असें म्हटलें आहे. अलीकडे सापडलेल्या पांडरंगपल्ली ताम्रपटांत दक्षिण महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या मानाङ्क नृपतीने विदर्भ व अश्मक देश जिंकल्याचें वर्णन आहे हें भारत इतिहास संशोधक मंडळाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'ऐतिहासिक संकीर्ण निबंध', खंड २ रा, ह्यांतील 'मानपुरचे राष्ट्रकूट' या लेखांत मी दाखविलें आहे. पैकी विदर्भ हा वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेच्या अमलाखालचा दक्षिण विदर्भ असून अश्मक हा त्याला लागून असलेला पश्चिमेचा देश-ज्यामध्ये सध्याच्या अहमदनगर व औरंगाबाद या जिल्ह्यांचा अन्तर्भाव होत असे-तो असावा. अजंठ्याच्या पर्वतराजीने विदर्भाचे उत्तर व दक्षिण विदर्भ असे विभाग केले होते, तसेंच खानदेशाला अश्मक देशापासून विभक्त केलें होतें. अजंठ्याच्या २६ नंबरच्या लेण्यांतील लेखांत अश्मक नृपतीच्या एका मंत्र्याच्या नांवाने तें लेणें कोरलेल्याचा उल्लेख आहे.

खानदेशाचें प्राचीन नांव अश्मक नसून ऋषीक हें होतें. रामायणांत सुग्रीवाने वानरांना सीतेच्या शोधार्थ ज्या देशांत जाण्यास सांगितलें होते त्यांमध्ये विदर्भ व माहिषक यांच्या समवेत ऋषीकाचा उल्लेख आला

* इंडियन् अँटिक्वरी, पु. १६, पृ. ९९.

आहे.* 'दशकुमारचरिता'च्या आठव्या उच्छ्वासांत विदर्भ देशाच्या माण्डलिक राजांमध्ये अश्मक नृपतीप्रमाणे ऋषीक देशाचा राजाहि होता असें म्हटलें आहे.† नाशिकच्या पाण्डव लेण्यांतील लेखांत गौतमीपुत्र सातकर्णीचें राज्य ज्या देशांवर होतें असें म्हटलें आहे, त्यांमध्ये असक (अश्मक) देशाबरोबर असिक (ऋषीक) देशाचाहि अन्तर्भाव केला आहे.‡ या सर्व उल्लेखांवरून ऋषीक हा देश विदर्भ व अश्मक यांना लागून होता असें दिसून येईल. अशा तऱ्हेचा देश म्हणजे खानदेशच होय. कारण याच्या पूर्वेस वऱ्हाड (प्राचीन विदर्भ) व दक्षिणेस औरंगाबाद जिल्हा (प्राचीन अश्मक) आहे.

खानदेशाचें ऋषीक हें नांव पुढें प्रचारांतून गेलें असें दिसतें. कारण नंतरच्या संस्कृत कोषादि ग्रंथांत या देशनामाचा उल्लेख आढळत नाही. इ. स. च्या आठव्या शतकांत सेउणचंद्र या नांवाचा यादवनृपति या देशावर राज्य करीत होता. त्याच्या नांवावरून खानदेश व अश्मक या देशांना **सेउण देश** हें नांव मिळालेलें दिसतें. सेउणदेशांत नाशिकपासून देवगिरिपर्यंत मुलखाचा अन्तर्भाव होत असे. पुढे गुजराथच्या अहमदशहाने खानदेशावर राज्य करणाऱ्या फारुकी राजांना खान ही पदवी दिली व तेंव्हापासून या देशाला खानदेश म्हणूं लागले. खानदेश या देशनामाचें सेउणदेश या नांवाशीं किंचित् साम्य असल्याने तें नांव प्रचलित होण्यांत मदत झाली असावी असें डॉ सर रामकृष्णपंत भांडारकर यांनी म्हटलें आहे.§ सध्या 'खानदेश' या नांवाऐवजी कान्हदेश हें नांव प्रचलित करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण कान्हदेश हें नांव या प्रदेशाला प्राचीनकाळीं होतें असें दिसत नाही. प्राचीन देशनाम प्रचलित करावयाचें असल्यास तें ऋषीक किंवा सेउणदेश हेंच असलें पाहिजे.

---

* विदर्भानृषिकांश्चैव रम्यान्माहिषकानपि । रामायण, किष्किधा काण्ड, सर्ग ४१, श्लो. १०.

† दशकुमारचरित, (बॉबे संस्कृत सीरीज्), पृ. १३८

‡ एपिग्राफिया इंडिका, पु. ८, पृ. ६०

§ दख्खनचा प्राचीन इतिहास (भांडारकरांचे समग्र ग्रंथ, पु. ३, पृ. १३८).

महाकोशलांतील नल राजवंश*

वायु व ब्रह्माण्ड पुराणांत भविष्यकाळीं होणाऱ्या राजवंशांच्या वर्णनांत खालील श्लोक आहेत. †—

> कोसलायां तु राजानो भविष्यन्ति महाबलाः ।
> मेघा इति समाख्याता बुद्धिमन्तो नवैव तु ॥
> नैषधाः पार्थिवाः सर्वे भविष्यन्त्या मनुक्षयात् ।
> नलवंशप्रसूतास्ते वीर्यवन्तो महाबलाः ॥

या श्लोकांत 'कोसला' देशांत होणाऱ्या मेघ नामक नऊ राजांचें व नलवंशी कांही राजांचें वर्णन आलें आहे. हा 'कोसला' देश कोणता याचें स्पष्ट गमक या श्लोकांत नाही. या देशाचें नांव येथे स्त्रीलिंगी आलें असलें तरी तो इतर ठिकाणीं निर्दिष्ट केलेल्या पुल्लिंगी कोसल देशाहून भिन्न नसावा असें वाटतें. या कोसल देशाचे उत्तर व दक्षिण असे भाग फार प्राचीन काळापासून ज्ञात आहेत. अयोध्या ज्याची राजधानी होती तो उत्तर कोसल, व नर्मदेच्या दक्षिणेस महानदीच्या खोऱ्यांतला प्रदेश ज्यांत अन्तर्भूत होत असे तो दक्षिण कोसल होय. या दक्षिण कोसल देशालाच अलीकडे 'महाकोशल' हें नांव देण्यांत आलें आहे.

कोसल देशांत होऊन गेलेल्या या दोन राजवंशांविषयी आतापर्यंत फारशी माहिती उपलब्ध नव्हती. पण अलीकडे प्रकाशांत आलेले कोरीव लेख व नाणीं यांवरून त्यांच्याविषयी थोडी माहिती मिळत आहे. यांपैकी मेघ (किंवा मघ) नांवाच्या राजांचे लेख अलाहाबादेजवळ कोसम (प्राचीन

---

* भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक, वर्ष २०, अंक १, पृ. ९–१३.

† पार्जिटरकृत कलियुगांतील राजवंश पृ. ५१

कौशांबी) येथे* व मुद्रा† भीटा येथे सापडली आहे. या राजांचे लेख, मुद्रा किंवा नाणीं दक्षिणेंत सांपडलीं नाहीत. याच्या उलट नलवंशी राजांचे लेख व नाणीं दक्षिणेंत ज्याला पूर्वी दक्षिण कोसल म्हणत त्या प्रदेशांतच मिळालीं आहेत. तेव्हा उत्तर व दक्षिण कोसल यांचा घोटाळा होऊन पुराणांत 'कोसलायां' (कोसला देशांत) असें सामान्यार्थी पद तर घातलें नसेलना, अशी शंका मनांत येते. असो. प्रस्तुत लेखांत दक्षिण कोसलांतील नलवंशी राजांसंबंधी माहिती देण्याचें योजिलें आहे.

सन १९३९ मध्ये मध्यप्रांताच्या आग्नेयेस असलेल्या बस्तर नामक संस्थानच्या कोंडेगांव तहसिलींतील एडेंगा या गांवीं जमिनींत पुरलेला एक नाण्यांचा साठा सापडला. त्यांपैकी कांही नाणीं एका सोनाराने वितळून टाकल्यावर संस्थानच्या अधिकाऱ्यांस त्याची खबर लागली व त्यांनी राहिलेलीं ३२ नाणीं आपल्या ताब्यांत घेतलीं. हीं सर्व नाणीं सोन्याचीं असून तीं सध्या उत्तम स्थितींत आहेत. यांचा आकार गोल असून तीं पातळ सोन्याच्या पत्र्यांतून कापून काढलेलीं दिसतात. सध्या सोनार पातळ सोन्याच्या पत्र्यावर देवादिकांच्या मूर्ति उमटवितात त्याप्रमाणे त्यावरील आकृति व अक्षरें उमटविलीं आहेत. हीं नाणीं दोन प्रकारचीं आहेत. त्यांतील लहान सुमारें $\frac{६}{१०}$ इंच व्यासाचीं असून त्यांचें वजन ७ किंवा ७॥ ग्रेन आहे. मोठ्या आकारांच्या नाण्यांचा व्यास $\frac{८}{१०}$ इंच असून वजन सुमारें २० ग्रेन आहे. प्रत्येक नाण्यावर नंदी व त्याच्या मागच्या किंवा पुढच्या बाजूस अर्धचंद्राची आकृति असून तिच्या खालीं ज्या राजाने तें नाणें पाडलें त्याचें नांव पेटिकाशीर्षक लिपींत उमटविलें आहे. या नाण्यांवरून वराहराज, भवदत्तराज व अर्थपतिराज या तीन राजांचीं नांवें ज्ञात झालीं आहेत.‡

* एपिग्राफिया इंडिका पु. १८, पृ. १५९-६०; पु. २३ पृ., २४७-४८.

† आर्किआलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया. वार्षिक प्रतिवृत्त, सन १९११-१२.

‡ सोबतच्या प्लेटमध्ये क्रमांक, १ व २ या नाण्यांवर 'श्रीवराहराज', क्र. ३ व ४ वर 'श्रीवराह', क्र. ५ वर 'श्रीभवदत्तराजस्य' व क्र. ६ व ७ वर 'श्रीअर्त्थपतिराजस्य' अशीं राजनामें पेटिकाशीर्षक लिपींत उमटविलीं आहेत.

नल नृपतींचीं सोन्याचीं नाणीं



१ २ ३ ४



५ ६ ७

यांतील प्रत्येक नाण्यावर नंदी व त्याच्या मागे किंवा पुढे चंद्राची कोर आहे. खाली तें नाणें पाडणाऱ्या राजाचें नांव आहे.

क्रमांक १ व २—'श्रीवराहराज'. क्रमांक ३ व ४ 'श्रीवराह.' क्रमांक ५ —'श्रीभवदत्तराजस्य'. क्रमांक ६ व ७—'श्रीअर्थपतिराजस्य.'

नाण्यांवरील लिपीवरून हे तीन्ही राजे इ. स. च्या पांचव्या शतकांत होऊन गेले असावे असें अनुमान करतां येतें. त्यांतल्या त्यांत वराहराजाचीं नाणीं सर्वांत अगोदर व अर्थपति राजाचीं सर्वांत नंतरचीं दिसतात.

नाण्यांवरून हे राजे कोणत्या वंशांतील असावे याचा पत्ता लागत नाही. परंतु कोरीव लेखांवरून इ. स. च्या पांचव्या शतकांत होऊन गेलेला नलवंशी भवदत्त राजा ज्ञात झाला आहे. या राजाचा एक ताम्रपट वऱ्हाडच्या अमरावती जिल्ह्यांतील ऋद्धपूर या गावीं सुमारें २५ वर्षांपूर्वी सांपडला होता तो सध्या भा. इ. सं. मंडळांत ठेवला आहे. हा ताम्रपट श्रीयुत य. रा. गुप्ते यांनी एपिग्राफिया इंडिका, पु. १८, (पृ. १०२–१०४) मध्ये प्रकाशित केला आहे. यांत नलवंशी भवदत्तवर्म्याने* कदम्बगिरिग्राम नांवाचा गांव कांही ब्राह्मणांना दान दिल्याचा उल्लेख आहे. हा राजा आपल्या राणीसह प्रयागला गेला होता तेथे त्याने आपल्या व आपल्या पत्नीच्या पुण्यप्राप्तीकरिता या दानाचा संकल्प केला व नंतर स्वदेशीं परत आल्यावर तो पुरा केला असें या ताम्रपटांतील उल्लेखावरून स्पष्ट दिसतें. हा ताम्रपट नन्दिवर्धनाहून दिलेला आहे. नन्दिवर्धनाच्या पुढे 'वासकात्' वगैरेसारखें पद नसल्याने नन्दिवर्धन ही त्या काळीं भवदत्ताची राजधानी होती असें अनुमान करतां येतें. हें नंदिवर्धन म्हणजे नागपूर जिल्ह्यांतील रामटेकजवळचें नन्दरधन (किंवा नगरधन) होय. या ताम्रपटाच्या शेवटीं महाराज अर्थपति याने आपल्या मातापित्यांच्या पुण्यप्राप्तीकरिता तो करवून घेतला असें म्हटलें आहे. श्रीयुत गुप्ते यांनी या ताम्रपटावरच्या आपल्या लेखांत 'अर्थपति' हें 'धनाचा स्वामी' या अर्थीं भवदत्तराजाचें विशेषण मानलें आहे. पण तें बरोबर दिसत नाही. कारण तो राजा एके ठिकाणीं तें दान आपल्या व पत्नीच्या पुण्यप्राप्तीकरिता केलें असें म्हणून पुढे त्याच ताम्रपटांत दुसऱ्या ठिकाणीं तेंच दान आपण आपल्या मातापित्यांच्या पुण्यप्राप्तीकरिता केलें असें म्हणेलसें वाटत नाही. तेव्हा अर्थपति हा भवदत्ताचा मुलगा असावा. प्रस्तुत नाणकसंचयांत अर्थपतिराजाचीं नाणींच सापडल्यामुळे आता या बाबतींत

* या ताम्रपटांत याचें नांव भवत्तवर्मा असें चुकीने कोरलें आहे.

संशय राहत नाही. नाण्यांवरील अक्षरवटिकेवरूनहि अर्थपतिराजाचीं नाणी भवदत्तवर्म्याच्या नाण्यांनंतरचीं दिसतात, हें वर सांगितलें आहे.*

नलवंशी भवदत्तवर्म्याचा ताम्रपट वऱ्हाडांत (म्हणजे प्राचीन विदर्भांत) सापडला. पण त्यावरून त्याचे पूर्वजहि विदर्भांतच राज्य करीत होते असें म्हणता येत नाही. कारण पुराणांत नलवंशी राजे कोसलांत (म्हणजे सध्यांच्या महाकोसलांत) राज्य करीत होते असा स्पष्ट उल्लेख आलेला मागे दाखविला आहेच. प्रस्तुत नाणींहि महाकोशलांतच सापडल्याने पुराणांतील विधानाचें समर्थन होत आहे. पण नाणें ही वस्तु देशांतरीं सहज नेतां येण्यासारखी असल्याने हा पुरावा तितकासा बलवत्तर नाही. पण तसा अन्य पुरावाहि सापडला आहे. कांही वर्षांपूर्वीं मद्रास इलाख्यांतील विजगापट्टम् जिल्ह्यांत पोडागढ येथे भवदत्तवर्म्याचा उल्लेख असलेला शिलालेख सापडला होता. तोहि एपिग्राफिया इंडिका, पु. २१, (पृ. १५३–५७) मध्ये प्रकाशित झाला आहे. पोडागढ हें बस्तर संस्थानच्या पूर्वसरहद्दीपासून सुमारें ४० मैलांवर आहे. या शिलालेखांत नलवंशी भवदत्तवर्म्याच्या मुलाने एक विष्णुपद स्थापून त्याच्या अर्चेकरिता कांही गाव दिल्याचा उल्लेख आहे. या मुलाचें नांव जेथे आलें आहे तेथला शिलेचा भाग खंडित झाला असल्यामुळे तें नांव निश्चितपणे वाचता येत नाही. राहिलेल्या अक्षरांवरून तें नांव स्कन्दवर्मन् असावें असें,या लेखाचे संपादक म्हणतात. तें बरोबर असल्यास भवदत्तवर्म्यास अर्थपति व स्कन्दवर्मन् असे दोन पुत्र होते, असें सिद्ध होईल.

महाकोसलांत नलवंशाचा आणखीहि एक लेख सुमारें सवाशें वर्षांपूर्वीं प्रथम ज्ञात झाला होता. तो रायपूर जिल्ह्यांतील राजीम या प्रसिद्ध क्षेत्रीं राजीवलोचन नामक विष्णूच्या देवळांत भिंतीस लावलेला अद्यापि

* अलीकडे अर्थपतिराजाने स्वतः दिलेला ताम्रपट ओरिसा राज्यांतील पूर्वीच्या जयपूर संस्थानांतील केसरिबेडा या गावीं सांपडलेला प्रकाशित झाला आहे (एपिग्राफिया इंडिका, पु. २८, पृ. १२–१७). तो त्याने आपली राजधानी पुष्करी येथून आपल्या कारकीर्दीच्या सातव्या वर्षी मार्गशीर्ष अमावस्येस दिला होता.

विद्यमान आहे. हा लेख बराच खंडित झाल्यामुळे तो कोणीहि अद्यापि प्रकाशित केला नाही. त्याच्या अवशिष्ट भागांत नलराजाची प्रथम स्तुति असून नंतर कांही राजांचें वर्णन आलेलें दिसतें. त्यांतील पृथ्वीराज, विरूपराज व विलासतुंग या राजांचींच नांवें सध्या वाचतां येतात. अक्षर-वटिकेवरून हा लेख इ. स. च्या आठव्या शतकाच्या मध्यांतील असावा असें डॉ. देवदत्तपंत भांडारकर यांनी म्हटलें आहे.* कदाचित् तो त्याहूनहि थोडा पूर्वींचा असेल.† या लेखावरून भवदत्त व अर्थपति यांच्यानंतर कित्येक पिढया नलवंशाचें महाकोसलांत राज्य होतें असें दिसतें.

वराहराज, भवदत्त व अर्थपति हे महाकोशलांत राज्य करीत होते त्या काळीं विदर्भांत वाकाटकांचें सुसमृद्ध राज्य होतें. हीं दोन राज्यें एक-मेकांना लागून असल्याने राज्यशास्त्राच्या सामान्य नियमाप्रमाणे त्यांच्यांत वरचेवर कुरबुर चालून लढाया होत असत. मागे उल्लेखिलेला भवदत्तवर्म्याचा ऋद्धपूरचा ताम्रपट नन्दिवर्धनाहून दिला आहे. हें नन्दिवर्धन प्राचीन विदर्भांत होतें इतकेंच नव्हे तर तें एका काळीं विदर्भाची राजधानी होतें. वाकाटकवंशी राणी प्रभावतीगुप्ता हिचा पुण्यास सापडलेला ताम्रपट नन्दिवर्धनाहूनच दिला आहे.‡ तिचा मुलगा द्वितीय प्रवरसेन याचे दोन ताम्रपट नुकतेच माझ्या हातीं आले आहेत.§ त्यांपैकी एकांत तो नन्दिवर्धनाहून दिल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तेव्हा नन्दिवर्धन ही वाकाटकांची कांही काळ राजधानी होती, यांत संशय नाही. अशा नगराहून परकी राजा आपला ताम्रपट देतो त्यावरून त्याने त्या भोवतालचा प्रदेश आपल्या अमलाखालीं आणला होता असें अनुमान

---

* प्रोग्रेस रिपोर्ट, आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ् वेस्टर्न इंडिया, सन १९०३–४, पृ. ४८.

† आता हा लेख मी एपिग्राफिया इंडिका, पु. २६, (पृ. ४९–५८) मध्ये प्रकाशित केला आहे.

‡ एपिग्राफिया इंडिका, पु. १५, पृ. ३९.

§ हे ताम्रपट आता एपिग्राफिया इंडिकांत पु. ३४, (पृ. २६०–२६७) प्रसिद्ध झाले आहेत.

होतें. स्वतः वाकाटकांच्या ताम्रपटांतहि या घटनेचा उल्लेख आहे. द्वितीय प्रवरसेनाचा नातु द्वितीय पृथिवीषेण हा पांचव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला. त्याचा ताम्रपट मध्यप्रांताच्या बालाघाट या गावीं सापडला आहे.* त्यांत पृथिवीषेणाने संकटासुळे अवनत झालेल्या आपल्या वंशाचा उद्धार केला असें म्हटलें आहे. हें संकट म्हणजे विदर्भावरची भवदत्तवर्म्याची स्वारीच असावी. पुढे लौकरच वाकाटकांनी नलराजांना विदर्भांतून हांकून लावलें. एवढेंच नव्हे तर त्यांची राजधानी पुष्करी उद्ध्वस्त केली असें दिसतें. मागे उल्लेखिलेल्या पोडागढच्या शिलालेखांत भवदत्तवर्म्याचा पुत्र स्कन्दवर्मन् याने शत्रूने उद्ध्वस्त केलेली आपली राजधानी पुष्करी ही पुनः वसविली असें म्हटलें आहे. त्यांत त्याच्या शत्रूचा स्पष्ट नामनिर्देश नसला तरी तो वाकाटकनृपति द्वितीय पृथिवीषेणच असावा हें सहज ध्यानांत येईल.

नलांचें महाकोसलांत अर्थपतीनंतर कांही पिढया राज्य होतें हें मागे सांगितलें आहे. इ. स. च्या सहाव्या शतकाअखेर कर्नाटकांत पहिला कीर्तिवर्मन् नामक चालुक्य राजा होऊन गेला. त्याला कांही लेखांत 'नल-राजांची काळरात्र' असें म्हटलें आहे. त्यावरून त्याने नलवंशाचा उच्छेद केला असें दिसतें. तथापि त्यानंतरहि कांही काळ नलवंशी राजे महाकोशलांत कांही भागावर राज्य करीत असावे. कारण मागें उल्लेखिलेला राजीम येथील नलवंशी राजांचा लेख कीर्तिवर्म्यानंतरचा दिसतो. इ. स. च्या आठव्या शतकांतील महाकोशल प्रांताचा इतिहास अद्यापि पूर्णपणें ज्ञात झाला नसल्याने नलवंशी राजांचा शेवटीं कोणी नाश केला हें सध्या निश्चितपणें सांगतां येत नाही. तथापि छत्तीसगडांतील रत्नपुरच्या उत्तरेस पाली नामक गावीं खिस्तोत्तर ८७०–८९५ या कालांत होऊन गेलेल्या बाणवंशी प्रथम विक्रमादित्य ऊर्फ जयमेरु याने एक देवालय बांधून त्यांत आपला लेख कोरला आहे.† त्यावरून नलांनंतर बाणवंशी राजांचें राज्य छत्तीसगडांत कांही काळ स्थापन झालें होतें असें दिसतें.

---

* एपिग्राफिया इंडिका, पु. ९, पृ. २७१.

† इंडियन हिस्टरी कांग्रेस, तृतीय अधिवेशनाचा अहवाल (१९३९), पृ. ३१९–३२७.

वाकाटक साम्राज्याचा ऱ्हास*

प्राचीन काळीं हिंदुस्थानांत जीं अत्यंत बलाढय व सुसमृद्ध अशीं साम्राज्यें अस्तित्वांत आलीं, त्यांमध्ये वाकाटक साम्राज्याचा अन्तर्भाव होतो. इ. स. २५० पासून ५५० पर्यंत वाकाटकांचें विदर्भावर राज्य होतें. या तीनशे वर्षांच्या काळांत वाकाटकांनी आपली सत्ता दक्षिणेंत नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत व अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत पसरविली. नर्मदेच्या उत्तरेस असलेल्या मालव व चेदि या देशांनीहि वाकाटकांचें स्वामित्व कांही काळ मान्य केलें होतें. याच कालखंडांत उत्तरेस गुप्तांचें साम्राज्य भरभराटलें व कांही काळाने ऱ्हास पावलें. गुप्त सम्राटांनी संस्कृत विद्या, कलाकौशल्य, व्यापार इत्यादिकांना दिलेलें उत्तेजन सर्वश्रुत आहे. पण त्याच काळांत वाकाटकांनी दक्षिणेंत केलेली कामगिरी तितकीच महत्त्वाची असूनहि ती केवळ सामान्य जनतेस नव्हे, तर सुशिक्षितांसहि अपरिचित आहे. वाकाटकांचा काळहि सुमारें तीस वर्षांपूर्वीपर्यंत अनिश्चित होता. पण गेल्या पंचवीस–तीस वर्षांत संशोधकांच्या परिश्रमामुळे व कांही नवीन ऐतिहासिक साधनें उपलब्ध झाल्यामुळे वाकाटकांचा उज्ज्वल इतिहास अधिकाधिक ज्ञात होत आहे.

तथापि अजूनहि या इतिहासांत पूर्णपणें अज्ञात अशीं अनेक स्थळें आहेत. वाकाटकांच्या राजवटींत संस्कृत व प्राकृत या विद्येला राजाश्रय मिळून विदर्भांत अनेक उत्कृष्ट काव्यें निर्माण झालीं व त्यांची कीर्ति दूरवर पसरून 'वैदर्भी' नामक एक विशिष्ट काव्यशैली अस्तित्वांत आली. कवि-

---

* युगवाणी, नागपूर, मे, १९४६.

कुलगुरु कालिदास हा कवि माळव्यांतील. पण त्यावरहि वैदर्भी रीतीची मोहिनी पडून त्याने आपले ग्रंथ याच रीतींत लिहिले. तें सुदैवाने अद्यापि उपलब्ध आहेत. पण त्यापूर्वीचीं वैदर्भ कवींचीं काव्यनाटकें, प्रवरसेनाचें 'सेतुबन्ध' हें एकच प्राकृत काव्य वगळल्यास, अद्यापि नामशेषहि राहिलीं नाहीत. शेवटचा ज्ञात वाकाटक राजा हरिषेण याच्या काळचा एक कोरीव लेख अजंठ्याच्या १६ नंबरच्या गुहेंत किंचित् भग्नावस्थेंत अद्यापि विद्यमान आहे. त्यांत त्याच्या साम्राज्याचा विस्तार वर्णिला आहे. त्यावरून या हरिषेणाचें स्वामित्व कुन्तल (सध्याचा दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक), अवन्ति (माळवा), कलिंग (गोदावरी व महानदी या नद्यांमधील पूर्व किनाऱ्यालगतचा प्रदेश), कोसल (सध्याचा छत्तीसगड), त्रिकूट (नाशिक जिल्हा), लाट (गुजराथ), आंध्र (गोदावरी व कृष्णा या नद्यांमधील पूर्व किनाऱ्यालगतचा प्रदेश)–इत्यादि देशांच्या अधिपतींनी स्वीकारलें होतें असें दिसतें. या वर्णनावरून हरिषेणाचें साम्राज्य उत्तरेंत माळव्यापासून दक्षिणेंत तुंगभद्रेपर्यंत पसरलें होतें, हें स्पष्ट आहे. हरिषेणाचा काळ सुमारें इ० स० ४७५–५०० हा उपलब्ध पुराव्यावरून ठरवितां येतो. हरिषेणानंतर सुमारें पन्नास वर्षांच्या अवधींत विदर्भांत कलचुरींचें राज्य झालें, असें दिसतें. कारण या राज्याचा संस्थापक कृष्णराज (सुमारें इ० स० ५५०–५७५) याचीं चांदीचीं नाणीं अमरावती व बैतुल जिल्ह्यांत सापडलीं आहेत. हरिषेणानंतर केवळ तीस–चाळीस वर्षांत एवढ्या विस्तृत साम्राज्याचा कसा अस्त झाला, हें कोडें अद्यापि इतिहासज्ञांस उलगडलें नाही. या प्रश्नावर एका सुप्रसिद्ध संस्कृत ग्रंथावरून काय प्रकाश पडतो, तें प्रस्तुत लेखांत पाहावयाचें आहे.

संस्कृत वाङ्मयांत जे थोडे गद्य ग्रंथ अद्यापि अवशिष्ट राहिले आहेत, त्यांपैकी 'दशकुमारचरित' हा एक आहे. याचा कर्ता दण्डी या कवीची कुलकथा कांही वर्षांपूर्वी सापडलेल्या 'अवन्तिसुन्दरीकथा' व 'अवन्तिसुन्दरीकथासार' या दोन त्रुटित ग्रंथांवरून ज्ञात झाली आहे. त्यावरून असें दिसतें की, दण्डीचा पणजा दामोदर हा विदर्भांतील अचलपूर (सध्याचें एलिचपूर) या नगरांत एका राजाच्या आश्रयास होता. कांही कारणाने त्याला देशत्याग करावा लागला व तो म्हैसूर संस्थानच्या दुर्विनीत नामक

गंग राजकुमाराच्या आश्रयास गेला. नंतर त्याला कांचीच्या पल्लवनृपति सिंहविष्णूचा आश्रय मिळाला. त्याचा पणतु दण्डी यासहि पल्लव नृपतीचा आश्रय होता. त्याने 'अवन्तिसुन्दरीकथा' नामक बाणाच्या कादंबरीशीं काव्यगुणांत स्पर्धा करणारें गद्यकाव्य लिहिलें, अशी माहिती उपरिनिर्दिष्ट दोन खंडित ग्रंथांवरून उपलब्ध झाली आहे.

दण्डीचा पणजा दामोदर कवि याचे आश्रयदाते दुर्विनीत व सिंह-विष्णु हे इ० स० ५८०–६०० या काळांत राज्य करीत होते. तेव्हा दण्डी इ० स० ६५०–६७५ या काळांत होऊन गेला असावा. यावरून वाकाटक नृपति हरिषेण व दण्डी कवि यांच्या काळांत केवळ दीडशें वर्षांचें अंतर होतें, हें दिसून येईल. म्हणून दण्डीस विदर्भाच्या प्राचीन इतिहासाचें परंपरागत ज्ञान होतें, असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाही.

दण्डीच्या मूळच्या 'दशकुमारचरितां'त दहा कुमारांच्या कथा आल्या असाव्या. पण तो मूळ ग्रंथ समग्र स्वरूपांत उपलब्ध नसल्यामुळे त्याचा आरंभींचा व शेवटचा भाग अन्य ग्रंथकारांनी लिहून त्याची पूर्ति केली आहे. आरंभींच्या 'पूर्वपीठिका' नामक भागांत दोन कुमारांच्या कथा आहेत. बाकीच्या आठ कुमारांच्या कथा मूळ ग्रंथाच्या आठ उच्छ्वासांत वर्णिल्या आहेत. हे दहा कुमार मगध देशाच्या राजसिंह नामक पदच्युत झालेल्या नृपतीच्या राजवाहन नांवाच्या पुत्राचे अनुयायी होते. त्यांपैकी विश्रुत नामक कुमाराची कथा 'दशकुमारचरिता'च्या आठव्या उच्छ्वासांत आली आहे, तिचा सारांश असा—

"सुविख्यात भोजवंशाला भूषणभूत असा पुण्यवर्मा नामक राजा विदर्भांत राज्य करीत होता. तो सत्यवादी, न्यायी, उदार, कलानिपुण, धार्मिक, विद्वानांचा आश्रयदाता व प्रजावत्सल असून मनुप्रणीत मार्गाने चातुर्वर्ण्यांचें पालन करीत असे. स्वतःच्या पुण्यकर्मांमुळे त्याला पूर्ण आयुष्य लाभलें होतें. तो स्वर्गवासी झाल्यावर त्याचा मुलगा अनन्तवर्मा हा गादी-वर आला. तो बुद्धीने चलाख होता, पण त्याला राजनीतीची आवड नसे. त्याच्या पित्याच्या वसुरक्षित नामक वृद्ध मंत्र्याने राजनीतीचा अभ्यास

करण्याविषयी त्याला परोपरीने सांगितलें, पण अनन्तवर्मा आपल्या विहारभद्र नामक पैशुन्यपंडित व बाहेरख्याली अशा खुषमस्कऱ्याच्या तंत्राने चालत असल्याने, त्याने त्या वृद्ध मंत्र्याच्या उपदेशाकडे दुर्लक्ष केलें. पुढे पुढे तर तो त्याचा अपमानहि करूं लागला. तेव्हा त्या प्रामाणिक मंत्र्याने त्याला उपदेश करण्याचें सोडून दिलें व कदाचित् भावी आपत्तींनी तो मार्गावर येईल, अशी आशा धरून तो आपल्या पदाला चिकटून राहिला.

" विहारभद्राच्या सल्ल्याने चालणारा अनन्तवर्मा अधिकाधिक व्यसनमग्न होऊं लागला. ही संधि साधून शेजारच्या अश्मक देशाच्या मंत्र्याचा मुलगा चन्द्रपालित हा पित्याने आपणांस निर्वासित केलें, असें लोकांना खोटेंच सांगत विदर्भांत आला व विहारभद्राच्या साहाय्याने त्याने राजाची मर्जी संपादन केली. आपणाबरोबर त्याने अनेक भाट, गवई, नर्तकी व सेवकांचा वेष घेतलेले गूढ पुरुषहि आणले होते. तो अनन्तवर्म राजाला मृगया, द्यूत, परस्त्रीगमन, मद्यपान इत्यादि व्यसनांत अधिकाधिक गुंतवूं लागला. कांही काळाने राजाच्या व्यसनांचें अनुकरण अधिकारी व प्रजाजनहि करूं लागले. राजाचे अधिकारी आपापल्या खात्यांचें उत्पन्न स्वतःच उपभोगूं लागले. त्यायोगें उत्पन्नाचे मार्ग खुंटत गेले, पण खर्च मात्र अतिशय वाढूं लागला. मद्यपान, परस्त्रीगमन, कलह, चौर्य इत्यादिकांना ऊत आला. चन्द्रपालिताच्या बरोबर आलेल्या गूढ पुरुषांनीहि विविध उपायांनी विदर्भराजाच्या सैनिकांचा नाश आरंभिला. शेवटीं या सर्व कारणांनी अनन्तवर्म्याचें सैन्य जर्जर होऊन गेलें.

" ही संधि साधून अश्मकनृपति वसन्तभानु याने वनवासीचा राजा भानुवर्मा यास विदर्भावर स्वारी करण्यास चिथावलं. त्याप्रमाणे भानुवर्म्याने विदर्भावर चाल करून त्याचा सीमाप्रांत काबीज केला. तेव्हा अनन्तवर्म्याचे डोळे उघडून त्याने आपल्या सैन्याची जमवाजमव केली व मांडलिकांनाहि आपल्या साहाय्यार्थ बोलाविलें. त्याप्रमाणे त्याचे सामन्त विदर्भांत जमा झाले. त्यांमध्ये अश्मकनृपति हा प्रथम आला व आपल्या मायावी वर्तनाने त्याने अनन्तवर्म्याची मर्जी संपादन केली. नंतर या सर्व सामंतांसहित अनन्तवर्मा वनवासी नृपतीशीं सामना देण्याकरिता चालून गेला व त्याने वरदा

(वर्धा) नदीच्या तीरावर* आपल्या सैन्याचा तळ दिला. तेथे एके दिवशीं 'महासामन्त' कुन्तलराजाची 'क्ष्मातलोर्वशी' नांवाची खास नर्तकी होती, तिच्या नृत्याची अतिशय स्तुति चन्द्रपालितादिकांनी केल्यावरून अनन्तवर्म्यानें तिला आणवून तिचें नृत्य पाहिलें व ती मद्यपानानें उन्मत्त झाली असतां तिचा त्यानें उपभोगहि घेतला. त्यावर अश्मकनृपति कुन्तलाधिपतीकडे गेला व त्याला एकांतीं म्हणाला, 'पाहा, आता किती अपमान सहन करावा? हा उन्मत्त राजा आमच्या स्त्रियांवर बलात्कार करूं लागला! माझे शंभर हत्ती आहेत, तुमचे पांचशे आहेत. तेव्हा आपण एक होऊन मुरलाधिपति वीरसेन, ऋचीकेश्वर एकवीर, कोंकणपति कुमारगुप्त, नासिक्यनाथ नागपाल यांच्याशीं संगनमत करूं या. हे सामन्त सुद्धा अविनय सहन न झाल्यामुळे आपणांला मिळतील. हा वनवासीचा राजा माझा परम मित्र

---

* 'दशकुमारचरिता'च्या सर्व छापील आवृत्तींत 'नर्मदारोधसि' असा पाठ आहे. पण तो बरोबर दिसत नाही. कारण 'वनवासी' हें मुंबई इलाख्यांतील उत्तर कानडा प्रांताचें नांव होतें. या प्रांतांत वनवासी नामक गाव अद्यापि विद्यमान आहे. तेव्हा विदर्भावर स्वारी झाली, ती दक्षिणेंतून झाली. वनवासी नृपतीने विदर्भाची दक्षिणसीमा जी गोदावरी नदी ती ओलांडून कांही प्रदेश काबीज केला होता, असें दिसतें. ('तत्परामृष्टराष्ट्रपर्यन्तश्चानन्तवर्मा तमभियोक्तुं बलसमुत्थानमकरोत्' हें दशकुमारचरितांतील वर्णन पाहा.) त्याला सामना देण्याकरिता अनन्तवर्मा नर्मदातीरीं जाईल, हें असंभवनीय आहे. तेव्हा येथे कांही चूक असावी, असें वाटून मी दुसरे कांही पाठ आहेत काय म्हणून पाहूं लागलों. आगाशे यांच्या 'दशकुमारचरिता'च्या आवृत्तींत 'वटदारोधसि' असा पाठभेद दिला आहे, तो 'वरदारोधसि' असावा असें मला वाटलें. नंतर चौकशी करतां, माझे मित्र रा. पी. के. गोडे यांनी मला कळविलें की, भांडारकरप्राच्यविद्यासंशोधनमंदिरांत विक्रम संवत् १८१६ (सन १७६०) चें एक हस्तलिखित आहे, त्यांत 'वरदारोधसि' असाच पाठ आहे. तेव्हा विदर्भनृपतीची वनवासी राजाशीं झालेली लढाई वर्धा नदीच्या तीरावर झाली होती, हें स्पष्ट दिसतें.

आहे. याच्याशीं अनन्तवर्मा लढूं लागला की, आपण त्याच्या पिछाडीवर हल्ला करूं व त्याचा खजिना, वाहनें वगैरे वाटून घेऊं.' कुन्तलाधिपतीनें वसन्तभानूचें म्हणणें आनंदाने कबूल केलें. दुसरे दिवशीं अनन्तवर्मा वनवासी नृपतीशीं लढत असतां सामंतांच्या विश्वासघातामुळे मारला गेला. नंतर वसन्तभानूने विदर्भराजाचा खजिना व हत्ती, घोडे इत्यादि वाहनें स्वतःच्या ताब्यांत घेतलीं व त्या सामन्तांत कलागती लावून त्यांचा परस्परांकडून नाश करविला. शेवटीं त्याने वनवासी नृपतीला लुटीचा थोडासा भाग देऊन परत पाठविलें व स्वतः अनन्तवर्म्याचें सर्व राज्य बळकाविलें.

"या प्रसंगीं वृद्धमन्त्री वसुरक्षित याने अनन्तवर्म्याची राणी वसुंधरा, त्याचा आठ वर्षांचा मुलगा भास्करवर्मा व तेरा वर्षांची मुलगी मञ्जुवादिनी यांसह माहिष्मती नगरीकडे प्रयाण केलें. तो वाटेंत ज्वराने मृत्यु पावला, तथापि इतर राजनिष्ठ सेवकांनी राणीला व तिच्या मुलांना माहिष्मतीला पोचविलें. तेथे अनन्तवर्म्याचा सावत्र भाऊ मित्रवर्मा राज्य करीत होता. त्याला वसुंधरा राणीच्या सौंदर्याचा मोह पडून तिच्यावर त्याने वाईट नजर ठेवली. पण तिने त्याची निर्भत्सना केली. तेव्हा आपल्या मुलाला माहिष्मतीच्या गादीवर बसवावें, असा तिचा कावा असावा, असें वाटून मित्रवर्म्याने भास्करवर्म्यास ठार मारण्याचा बेत केला. पण नालीजंघ नामक विश्वासू सेवकाने त्या राजपुत्रास माहिष्मतींतून सुरक्षितपणें बाहेर नेलें. पुढे विंध्यारण्यांत फिरत असतां त्यांची विश्रुताशीं गाठ पडली. त्यांनी सांगितलेल्या माहितीवरून आपण भास्करवर्म्याचे दूरचे नातलग आहों, असें विश्रुतास समजलें. तेव्हा त्याने अश्मकाधिपतीचा उच्छेद करून भास्करवर्म्यास विदर्भाच्या गादीवर बसविण्याची प्रतिज्ञा केली. नंतर तेथे आलेल्या एका व्याधाकडून त्यांना समजलें की, माहिष्मतींत मञ्जुवादिनीच्या विवाहाची तयारी चालू असून त्याकरिता मित्रवर्म्याने मालवाधिपति चण्डवर्म्याचा धाकटा भाऊ प्रचण्डवर्मा यास बोलाविलें होतें. असें करण्यांत भास्करवर्म्याने माहिष्मतींत परत यावें, असा मित्रवर्म्याचा उद्देश असावा, असें वाटून विश्रुताने मित्रवर्म्याचा उच्छेद करण्याचा निश्चय केला. नंतर ते कापालिक वेष धारण करून माहिष्मतीस गेले. तेथे विश्रुताने वसुंधरा राणीला एक जालीम विष देऊन त्यायोगें मित्रवर्म्याला ठार मारण्याची

युक्ति सांगितली. त्याने स्वतः एका नटाचा वेष घेऊन प्रचण्डवर्म्यास ठार मारलें. इकडे वसुंधरा राणीनेहि बाह्यतः अनुकूलता दर्शवून मित्रवर्म्याला आपल्या अन्तःपुरांत बोलाविलें व विषदिग्ध मालेने त्याच्या मुखावर व वक्षःस्थळावर प्रहार केला. त्यायोगें तो तत्काळ मरण पावला. पुढे विश्रुताने भास्करवर्म्याला दैवी साहाय्य आहे, असें माहिष्मतीच्या लोकांना पटवून गादीवर बसविलें व आपण त्याच्या नांवाने राज्यकारभार पाहूं लागला."

येथपर्यंतचीच हकीकत 'दशकुमारचरिता'च्या आठव्या उच्छ्वासांत आली आहे. तो उच्छ्वास अपूर्ण असल्यामुळे दण्डीने या गोष्टीचा शेवट कसा केला होता, भास्करवर्म्यास विदर्भांची गादी मिळवून देण्यांत विश्रुतास यश आलें किंवा नाही, हें समजण्यास साधन नाही. असो.

'दशकुमारचरितां'तील बहुतेक कथा काल्पनिक आहेत, पण विश्रुतकथा तशी दिसत नाही. त्या कथेचें बारकाईने निरीक्षण केल्यास, तिच्यांतील अनेक भौगोलिक व राजकीय उल्लेखांवरून तींत विदर्भाच्या प्राचीन इतिहासांतील एका विशिष्ट प्रसंगाचें प्रतिबिंब पडलें असावें असें सहजच वाटतें. ही कल्पना सुमारें चाळीस वर्षांपूर्वी मार्क कॉलिन्स् या गृहस्थास सुचली होती व त्याने विश्रुतचरिताचें कथानक वाकाटककालीन आहे, हें दाखविण्याचा प्रयत्न केला होता.* पण त्याच्या काळीं वाकाटकांविषयी व तत्कालीन दक्षिणेंतील इतर राजवंशांविषयीहि फारशी माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्याला आपल्या कल्पनेची सत्यता पडताळतां येईना. तसेंच, त्याचीं कांही विधानें व अनुमानें तदनंतरच्या संशोधनाने चूक ठरलीं आहेत. तथापि त्याची जी मुख्य कल्पना की, विश्रुतकथेंत वाकाटककालीन परिस्थितीचें प्रतिबिंब पडलें आहे, ती मात्र अलीकडील संशोधनावरून सिद्ध होत आहे. ती कशी, तें पाहूं.

'दशकुमारचरिता'वरून तत्कालीं दक्षिणेंत एक बलाढ्य व विस्तृत साम्राज्य होतें, असें दिसतें. त्याचा अधिपति भोजवंशी असून त्याच्या

* *Mark Collins*—Geographical Data of the Raghuvamsha and Dashakumaracharita (1907).

प्रत्यक्ष अंमलाखाली विदर्भ देश होता. त्याचा सावत्र भाऊ माहिष्मती नगरींत (सध्याच्या महेश्वरांत) राज्य करीत होता. त्यावरून अनूप देशहि (पूर्वीच्या मध्यप्रांताचा व इंदूर संस्थानाचा नेमाड जिल्हा) विदर्भाशीं संलग्न होता, असें दिसतें. या सम्राटाचे अनेक मांडलिक होते. त्यांपैकी कुन्तल, अश्मक, ऋषीक, नासिक्य, कोंकण व मुरल इतक्या मांडलिक राज्यांचीं नांवें विश्रुतकथेंत प्रसंगवशात् आलीं आहेत. यांपैकी कुन्तल देशांत कृष्णा नदीचें खोरें मोडत असे. सामान्यतः गोदावरी व तुंगभद्रा या नद्यांमधील प्रदेश, ज्याला आपण सध्या दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक म्हणतों तो, कुन्तलदेशांत अन्तर्भूत होत होता. अश्मक देश गोदावरीच्या तीरीं होता, असें 'सुत्तनिपाता'वरून दिसतें. त्याची राजधानी प्रतिष्ठान (सध्याचें पैठण) होती. त्यावरून सध्याच्या औरंगाबाद जिल्ह्याला प्राचीन काळीं अश्मक म्हणत, असें दिसतें. ऋषीकदेश म्हणजे सध्याचा खानदेश, हें मीं इतरत्र* दाखविलें आहे. अश्मक व ऋषीक हे देश अजंटा पर्वतराजीने परस्परांपासून विभक्त झाले होते, असें दिसतें. मुरल हाहि देश गोदावरीच्या आसमंतात असावा. कारण 'उत्तररामचरितां'त मुरला ही गोदावरीला मिळणारी नदी होती, असें भवभूतीने सूचित केलें आहे. नासिक्य हें अर्थात्च सध्याचें नासिक. कोंकण तर प्रसिद्धच आहे.

'दशकुमारचरितां'तील वर्णनावरून अनंतवर्म्याचें साम्राज्य उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस तुंगभद्रा नदीपर्यंत व पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस वैनगंगेपर्यंत पसरलें होतें. या साम्राज्याच्या उत्तरेस मालव देशाचें व पूर्वेस कोसल देशाचें (सध्याच्या छत्तीसगड प्रांताचें) राज्य होतें. दक्षिणेस वनवासी देश (सध्याचा उत्तर कानडा जिल्हा) होता. मालव व कोसल यांचें विदर्भाशीं सख्य होतें. कोसलदेशाच्या राजाशीं तर विदर्भ देशाचा वैवाहिक संबंध होता. कारण वसुंधरा ही कोसलराजकन्या होती. वनवासी देशाचा अधिपति मात्र विदर्भांचा शत्रु होता.

'दशकुमारचरितां'त वर्णिलेली दक्षिणेंतील राजकीय परिस्थिति कधी काळीं खरी असल्यास ती वाकाटककाळींच असणें शक्य आहे. कारण याच

---

* मागे, पृ. ७७-७८ पाहा.

काळांत म्हणजे इ. स. २५० ते ५५० या अवधींत विदर्भांत वाकाटकांचें साम्राज्य होतें. यानंरच्या काळांत कलचुरि, पूर्व चालुक्य, राष्ट्रकूट, उत्तर चालुक्य, यादव यांचीं साम्राज्यें दक्षिणेंत पसरलीं. पण त्यांच्या राजधान्या विदर्भांत नसून अनुक्रमें माहिष्मती, बदामी, मान्यखेट, कल्याणी व देवगिरि या ठिकाणीं विदर्भाबाहेर होत्या. वाकाटककाळींहि कोणत्या राजवटींत ही परिस्थिति विदर्भांत होती, हें समजण्यास वाकाटकांच्या इतिहासाचें सिंहावलोकन करणें अवश्य आहे.

वाकाटक घराण्याचा मूळ पुरुष विंध्यशक्ति हा इ. स. २५० च्या सुमारास सातवाहनानंतर उदयास आला. तो बहुधा दक्षिणेंतून विदर्भांत आला असावा. त्यानंतर त्याचा मुलगा पहिला प्रवरसेन याने आपल्या राज्याचा मोठा विस्तार केला. त्याने चार अश्वमेध व अग्निष्टोम, आप्तोर्याम इत्यादि सोमयागहि केले. त्याला चार मुलगे होते व ते चारहि राजे झाले असें पुराणांत म्हटलें आहे. त्यावरून प्रवरसेनानंतर त्याच्या विस्तृत साम्राज्याचे चार विभाग झालेले दिसतात. पैकी ज्येष्ठ पातीची राजधानी प्रारंभीं रामटेकजवळचें नन्दिवर्धन व नंतर प्रवरपुर ही होती. हिच्या अंमलाखाली उत्तरविदर्भ होता, असें दिसतें. दुसरी शाखा वत्सगुल्म (सध्याचें वाशीम) येथे राज्य करीत होती. तिचा अंमल दक्षिणेस गोदावरीपर्यंत पसरला असावा. या दोन्ही शाखांचे कोरीव लेख सापडले आहेत. बाकीच्या दोन शाखांपैकी एक गोदावरीच्या दक्षिणेस राज्य करीत असावी व दुसरी कदाचित् विदर्भाच्या पूर्वेस दक्षिण कोसलांत राज्य करीत असेल. या शाखांचे लेख अद्यापि सापडले नाहीत. याचें कारण त्या अल्पायुषी झाल्या असाव्या, असें दिसतें. कारण इ. स. ३७५ च्या सुमारास कुंतलदेशांत राष्ट्रकूट वंशाचा उदय होऊन लौकरच त्यांचें राज्य उत्तरेस गोदावरीपर्यंत पसरलें. या राष्ट्रकूटांनी गोदावरीच्या दक्षिणेचा वाकाटकांचा मुलूख गिळंकृत केलेला दिसतो.*

नन्दिवर्धन शाखेंत अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांपैकी दुसरा प्रवरसेन याचे अनेक ताम्रपट विदर्भांत सापडले आहेत. हा सुप्रसिद्ध गुप्त

---

* भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, (पु. २८, पृ. १ इ.), यांतील 'मानपुरचे राष्ट्रकूट' हा आमचा लेख पाहा.

सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य याचा दौहित्र होता. याची माता प्रभावतीगुप्ता हिचे दोन ताम्रपट सापडले आहेत. त्यांत तिने आपल्या माहेरची म्हणजे गुप्त पूर्वजांची वंशावलि दिली असल्याने वाकाटक हे गुप्तांचे समकालीन होते, हें प्रथम त्या ताम्रपटांवरून निश्चितपणें समजलें. हा प्रवरसेन कविकुलगुरु कालिदास याचा परममित्र असून त्याच्या साह्याने त्याने 'सेतुबंध' किंवा 'रावणवहो' हें प्राकृत काव्य लिहिलें. या शाखेचा शेवटचा राजा द्वितीय पृथिवीषेण हा असून त्याने आपला अंमल नर्मदेच्या उत्तरेस मेकला, मालव, चेदि या प्रांतांवर बसविला होता, असें त्याच्या बालाघाट येथे सापडलेल्या ताम्रपटावरून व मध्य हिंदुस्थानांतील त्याच्या सामंताच्या शिलालेखांवरून ज्ञात होतें.

वत्सगुल्म शाखेचेहि अनेक राजे होऊन गेले. त्यांची नामावलि अजंट्याच्या १६ नंबरच्या गुहेंत कोरलेल्या लेखांत आली आहे.* या शाखेचा शेवटचा ज्ञात राजा हरिषेण हा अत्यंत बलाढ्य होता. याने ज्येष्ठ शाखेचें राज्य आपल्या राज्यांत सामील करून घेतलें व आपला अंमल उत्तरेस माळव्यापासून दक्षिणेस कुन्तलदेशापर्यंत व पश्चिमेस कोंकणापासून पूर्वेस आंध्रदेशापर्यंत बसविला, हें मागे दाखविलें आहेच. याच्यानंतर मात्र वाकाटकवंशाचा इतिहास उपलब्ध होत नाही. तथापि हरिषेणानंतर ४०।५० वर्षांच्या अवधींत विदर्भांत कलचुरींचें राज्य झालें, हें मागे सांगितलें आहे.

वरील सिंहावलोकनावरून 'दशकुमारचरितां'त वर्णिलेली परिस्थिति हरिषेणाच्या मुलाच्या वेळची असली पाहिजे, हें वाचकांच्या ध्यानांत येईल. 'दशकुमारचरितां'त अनंतवर्म्याच्या वंशाला भोजवंश असें म्हटलें आहे. वाकाटक आपणांस या वंशाचे म्हणवत नसत; तथापि पौराणिक काळांत विदर्भांवर राज्य करणारे राजे भोजवंशी असल्याने वाकाटकांना लोक भोजवंशी समजत असले, तर आश्चर्य नाही. 'सेतुबंधा'चा कर्ता वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेन होता. त्याला भोजदेव म्हणत, असें त्या काव्याच्या एका

---

* हा लेख 'वाकाटक नृपति आणि त्यांचा काल' या आमच्या आगामी ग्रंथांत दिला आहे.

प्राचीन टीकाकाराने म्हटलें आहे.* त्यावरूनहि वरील अनुमान सयुक्तिक दिसेल. तसेंच, 'दशकुमारचरितां'तील राजनामें ऐतिहासिक राजनामांशीं जुळत नाहीत. तीं मुद्दाम बदललेलीं दिसतात. हा प्रकार केवळ दण्डीनेच केला आहे, असें नसून राजशेखर, पद्मगुप्त, बिल्हण वगैरे अन्य संस्कृत कवींनी स्वकालीन परिस्थितिविषयक काव्यें रचतांना तोच मार्ग अवलंबिला आहे. तथापि अनंतवर्म्याचे मांडलिक म्हणून ज्या देशांच्या राजांचे उल्लेख 'दशकुमारचरितां'त आले आहेत, त्या देशांचे तत्कालीन राजे हरिषेणाचे–व म्हणून त्याच्या पुत्राचे–सामन्त होते, हें कोरीव लेखांच्या पुराव्यावरून दाखवितां येतें. तें कसें, तें आपण पाहूं.

१ **अश्मकनृपति वसन्तभानु**—गोदावरी नदी व अजंटा पर्वतराजि यांच्यामधील प्रदेशास (सामान्यतः सध्याच्या औरंगाबाद जिल्ह्यास) अश्मक म्हणत असत, हें मागे सांगितलेंच आहे. तेव्हा हा देश विदर्भाला लागूनच होता. कांही कोरीव लेखांत परकी राजांनी विदर्भाबरोबर अश्मक देशहि जिंकल्याचा उल्लेख आहे. हा देश वत्सगुल्म शाखेच्या राज्याला लागून असल्यामुळे अश्मकनृपति वाकाटकांचा सामन्त असला, तर नवल नाही. या राजवंशाचे कोरीव लेख अद्यापि सापडले नाहीत, तथापि इ. स. च्या सहाव्या शतकांत अश्मकदेशाच्या एका मंत्र्याने अजंटा येथे २६ नंबरचें लेणें कोरविलें होतें. त्यावरून त्या काळीं अश्मक देश विदर्भाहून निराळा होता, यांत संशय नाही.

२ **कुन्तलाधिपति अवन्तिदेव**—कुन्तल देशाविषयी आतापर्यंत फारशी माहिती उपलब्ध नव्हती. पण गेल्या पंधरा–वीस वर्षांत सापडलेल्या लेखांच्या साह्याने प्रस्तुत लेखकाने इतरत्र† दाखविलें आहे की, वाकाटक काळीं कुन्तलदेशावर राष्ट्रकूटांचें राज्य होतें व त्यांचे वाकाटकांशीं वरचेवर खटके उडत असत. दोन्ही वंशांचे राजे आपापल्या लेखांत आपल्या शत्रूवर

---

* प्रवरसेनो भोजदेव इति केचित्। 'सेतुबंध', (निर्णयसागर प्रत, पृष्ठ १०.)

† 'मानपुरचे राष्ट्रकूट' (भा. इ. सं. मं. त्रै., पु. २८, पृ. १ इ.) हा आमचा लेख पाहा.

मिळविलेल्या विजयांचा उल्लेख करतात. राष्ट्रकूट वंशाचा मूळ पुरुष मानाङ्क याने विदर्भ व अश्मक देश जिंकले होते, असें राष्ट्रकूटांच्या ताम्रपटांत म्हटलें आहे. याच्या उलट अजंट्याच्या एका लेखांत वाकाटक-वंशी सर्वसेन व हरिषेण यांनी कुन्तलाधिपतीचा पराभव केला होता, असा उल्लेख आहे. हरिषेणाकडून पराभव पावल्यावर कुन्तलनृपति वाकाटकांचा मांडलिक बनला असावा. तथापि तो प्रबळ होता. 'दशकुमारचरितां'त त्याला 'महासामन्त' म्हटलें आहे. अनन्तवर्म्याविरुद्ध केलेल्या कटाचें पुढारीपण त्याला दिलें होतें, त्यावरूनहि त्याचें महत्त्व स्पष्ट होतें. हा राजवंश वाकाटक काळानंतरहि टिकून राहिला व पुढे इ. स. आठव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत त्याचें दक्षिणेंत अत्यंत बलाढ्य असें साम्राज्य होतें, हें प्रस्तुत लेखकाने इतरत्र दाखविलें आहे.

३ ऋषीकेश्वर एकवीर—ऋषीक हें सध्याच्या खानदेशचें प्राचीन नांव होतें. ऋषीक देशाचा राजा हा हरिषेणाचा सामन्त होता, हें त्याच्या अजंटा येथील १७ नं. च्या लेण्यांत कोरविलेल्या लेखावरून स्पष्ट होतें. कारण त्यांत त्याने आपल्या सम्राटाचा 'परिपालयति क्षितीन्द्रचन्द्रे हरिषेणे हितकारिणि प्रजानाम्' (प्रजेचा हितकर्ता चन्द्रतुल्य नृपति हरिषेण हा पृथ्वीचें पालन करीत असतां) असा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

४ नासिक्यनाथ नागपाल—हा त्रैकूटक वंशाचा असावा. वाकाटककाळीं त्रैकूटकांचें उत्तर महाराष्ट्र व दक्षिण गुजराथ या भागावर राज्य होतें. या वंशाचे कांही राजे बलाढ्य होऊन गेले. त्यांपैकी दह्लसेन नामक राजाने आपल्या ताम्रपटांत अश्वमेध यज्ञ केल्याचा उल्लेख केला आहे. याचा काळ सुमारें इ. स. ४५० ते ४७५ असावा. दह्लसेनाचा पुत्र व्याघ्रसेन याचा हरिषेणाने पराजय केला असावा. कारण अजंट्याच्या लेखांत हरिषेणाच्या मांडलिकांत त्रिकूट देशाच्या राजाचा उल्लेख आहे. त्रिकूट हा पर्वत नाशिकच्या पश्चिमेस होता, हें अलीकडे त्र्यंबकजवळच्या अंजनेरी गावांत सापडलेल्या ताम्रपटावरून सिद्ध झालें आहे.* त्रैकूटक राजे मूळचे या प्रदेशांतले, म्हणून त्यांस हें नांव पडलें आहे.

* Epigraphia Indica, Vol. XXV, p. 232.

५ **कोंकणाधिपति कुमारगुप्त**—कोंकण देशाचा प्राचीन इतिहास पूर्णपणे उपलब्ध झाला नाही. त्यामुळे वाकाटककाळीं तेथे कोणतें राजघराणें राज्य करीत होतें, तें सांगतां येत नाही. इ. स. च्या आरंभीं प्रथम शक व नंतर सातवाहन यांची सत्ता कोंकणांत होती. त्यानंतर हा देश आभीरांच्या अमलाखाली आला असावा. इ. स. ४९४ चा एक ताम्रपट कान्हेरी येथील स्तूपांत सापडला आहे, त्यांत त्रैकूटकांच्या सत्तेचा उल्लेख आहे. त्यानंतर हरिषेणाने त्रैकूटकांचा पराभव केल्यावर कोंकणचा राजा वाकाटकांचा मांडलिक झाला असावा.

६ **मुरलेश वीरसेन**--गोदावरीतीरीं मुरलदेश होता, हें मागे दाखविलें आहे. त्या देशांत कोणतें राजघराणें राज्य करीत होतें, याविषयी मात्र आपणांस माहिती नाही.

'दशकुमारचरितां'त उल्लेखिलेलीं राज्यें वाकाटककाळीं अस्तित्वांत होतीं, एवढेच नव्हे, तर त्यांतील बहुतेक हरिषेणाचीं मांडलिक होतीं, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. विदर्भाच्या पूर्वेस असलेले कलिंग, कोसल व आन्ध्र देशहि हरिषेणाने जिंकले होते. मग त्यांचा उल्लेख 'दशकुमारचरितां'त नाही कसा, अशी शंका येथे उपस्थित होईल. पण तिचें निराकरण करणें कठीण नाही. 'दशकुमारचरितां'त कांही मांडलिक राजांचा उल्लेख आला आहे, याचें कारण ते राजे विदर्भराजाविरुद्ध कटांत सामील झाले होते, हें होय. या व्यतिरिक्त विदर्भाचे मांडलिक नव्हते, असें अनुमान करणें योग्य होणार नाही. विदर्भाच्या पूर्वेचे मांडलिक अश्मकेन्द्राच्या कटांत सामील झाले नसावे. त्यांपैकी दोन तरी—कोसल व आन्ध्र यांचे अधिपति—विदर्भ राजाचे नातेवाईक होते. अनन्तवर्म्याची माता वसुन्धरा ही कोसलाधिपतीची कन्या होती, असें 'दशकुमारचरितां'त म्हटलें आहे. वाकाटक द्वितीय पृथिवीषेण याच्या ताम्रपटांतहि कोसल राजाचा मांडलिक म्हणून उल्लेख आला आहे. तत्कालीन आन्ध्र राजा विष्णुकुंडी वंशाचा पहिला माधववर्मा हा होता. याने तर वाकाटक राजकन्येशीं विवाह

केला होता असा विष्णुकुंडींच्या ताम्रपटांत उल्लेख आहे.* ही राजकन्या कदाचित् हरिषेणाचीच कन्या असेल.

याशिवाय उत्तरेंतील माहिष्मती व मालव व दक्षिणेंतील वनवासी या राज्यांचा निर्देश 'दशकुमारचरितां'त आला आहे. माहिष्मती ही अनूप देशाची राजधानी होती. या देशावर इ. स. च्या पांचव्या शतकांत सुबन्धु नामक राजाचें राज्य होतें. त्याचे दोन ताम्रपट-एक बडवानी संस्थानांत† व दुसरा ग्वाल्हेर संस्थानांत-असे सापडले आहेत. हा सुबन्धु वाकाटक वंशाचा होता, असें त्या ताम्रपटांवरून दिसत नाही. त्याच्या नंतरचा अनूप देशाचा इतिहास माहीत नाही. तथापि अनूप देशाच्या उत्तरेस असलेल्या मालव देशाचा अधिपति हरिषेणाचा मांडलिक झाला होता, तेव्हा अनूप देशहि हरिषेणाने जिंकून तो आपल्या मुलाच्या स्वाधीन केला असल्यास आश्चर्य नाही.

मालवाधिपति चंडवर्मन्—हरिषेणाच्या काळानंतर माळव्यांत यशोधर्मन् नामक बलाढ्य नृपति उदयास आला. त्याचे मन्दसोर येथे दोन लेख सापडले आहेत. त्यांपैकी एक इ. स. ५३२ चा आहे. गुप्त साम्राज्याचा विध्वंस करणाऱ्या हूणांचा अधिपति मिहिरकुल याचा यशोधर्म्यांने पराभव करून इ० स० च्या सहाव्या सतकांत उत्तर हिंदुस्थानांत गुप्तांच्यापेक्षाहि विस्तृत असें साम्राज्य स्थापलें होतें. असें त्याच्या मन्दसोर येथील स्तंभलेखावरून कळतें. 'दशकुमारचरितां'तील चंडवर्म्याचें वर्णन यशो-

---

* Epigraphia Indica, Vol. IV, pp. 193 f.

† या ताम्रपटाचें वर्ष १६७ हें गुप्त काळाचें असावें, असें या ताम्रपटाचे संपादक रा. हल्दार यांचें मत आहे (एपिग्राफिया इंडिका, पु. १९, पृ. २६१ इ.), पण तें बरोबर नसून तें वर्ष चेदिकालाचें असावें, हें प्रस्तुत लेखकाने कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, चौथा भाग (कलचुरि-चेदि संवताचे कोरीव लेख, पृ. १७ इ.) या ग्रंथांत दाखविलें आहे. त्याप्रमाणे तो ताम्रपट इ. स. ४१६-१७ चा ठरतो. ग्वाल्हेर संस्थानांत सापडलेल्या ताम्रपटाचें वर्ष नष्ट झालें आहे.

वर्म्याला बरोबर लागू पडतें. हरिषेणाच्या मृत्यूनंतर अवन्ति किंवा पश्चिम माळवा हा देश स्वतंत्र झाला, असें दिसतें.

वनवासीनृपति भानुवर्मन्—वनवासी ही मुंबई इलाख्याच्या उत्तर कानडा जिल्ह्यांत अद्यापि प्राचीन नांवाने ज्ञात आहे. इ० स० च्या पांचव्या सहाव्या शतकांत तेथे कदंबांचें राज्य होतें. शेवटचा कदम्बनृपति भानुवर्मा याचा इ० स० ५४५ मध्ये दिलेला एक ताम्रपट उपलब्ध झाला आहे. याचा पिता रविवर्मन् हाच 'दशकुमारचरितां'तील भानुवर्मन् असावा.

याप्रमाणे 'दशकुमारचरितां'त वर्णिलेली राजकीय परिस्थिति इ० स०-च्या सहाव्या शतकाच्या आरंभीं दक्षिणेंत विद्यमान होती, हें उपलब्ध पुराव्यावरून दाखवितां येतें व त्यावरून वाकाटक साम्राज्याचा ऱ्हास कसा झाला, हेंहि ध्यानांत येतें. हरिषेणानंतर विदर्भाच्या गादीवर आलेला त्याचा मुलगा हा नादान व व्यसनी निघाल्यामुळे त्याचा सामन्त अश्मकनृपति याच्या कुटिल कारस्थानास अवसर मिळाला. याच्या मंत्र्याच्या मुलाने विदर्भांत येऊन राजाला व त्याच्या अधिकाऱ्यांना अत्यंत व्यसनासक्त केलें. राजाच व्यसनाधीन झाल्याने प्रजाहि त्याचें अनुकरण करूं लागली. अश्मकेंद्राच्या गूढ पुरुषांनी विदर्भनृपतीच्या सैनिकांचा विविध उपायांनी नाश केला. शेवटीं अश्मकेंद्राच्या चिथावणीवरून कदम्बरनृपतीने विदर्भावर स्वारी केली. ऐन प्रसंगीं विदर्भाच्या सामंतांनी दगा देऊन पिछाडीवर हल्ला केल्यामुळे विदर्भाधिपतीचा पराभव झाला व तो त्या युद्धांत मारला गेला. त्यानंतर त्याच्या राजनिष्ठ मंत्र्याने त्याच्या राणीस व मुलांस माहिष्मतीस पोचतें केलें. तेथे राज्य करणाऱ्या हरिषेणाच्या दुसऱ्या मुलाने राजकुमारास ठार मारण्याचा प्रयत्न केला, पण त्यांतून तो बचावून आपल्या नातेवाइकांच्या साहाय्याने माहिष्मतीच्या गादीवर आला. पुढे त्याला विदर्भाचें राज्य मिळालें किंवा नाही, तें 'दशकुमारचरिता'वरून समजत नाही. त्याचा मेहुणा विष्णुकुंडी सम्राट् प्रथम माधववर्मन् हा त्याच काळीं उदयास येत होता. त्याने अकरा अश्वमेध व वाजपेयादि याग केल्याचा त्याच्या ताम्रपटांत निर्देश आहे. त्याने आपलें साम्राज्य पश्चिमेस महाराष्ट्रापर्यंत पसरविलें होतें,

असें तत्कालीन लेखांवरून दिसतें. याच्या साहाय्यानें हरिषेणाच्या मुलास विदर्भाची गादी मिळालीहि असेल. पण ती मिळाली तरी फार काळ त्याच्या स्वाधीन राहिली नसावी. कारण इ० स० ५५० च्या सुमारास कलचुरि सम्राट् कृष्णराज याने माहिष्मती काबीज करून हळू हळू आपलें स्वामित्व गुजराथ, कोंकण, महाराष्ट्र व विदर्भ या प्रांतांवर स्थापित केलें. अशा रीतीने सुमारें तीनशें वर्षे विदर्भावर राज्य करणाऱ्या सुविख्यात वाकाटकवंशाचा अंत झाला.

प्राचीन महाराष्ट्रांतील विष्णुकुंडी राजवट*

इ० स० २५० सुमारास सातवाहन साम्राज्याचा अस्त झाला. त्यानंतर उत्तर महाराष्ट्रांत आभीरांचें साम्राज्य पसरलें. आभीर नृपतींनी आपला स्वतःचा शक स्थापन केला व तो त्यांच्या साम्राज्याबरोबर उत्तर महाराष्ट्र, गुजराथ व मध्य हिंदुस्थानाचा कांही भाग या प्रदेशांत पसरला. आभीरानंतर प्रथम त्रैकूटक व नंतर कटच्चुरि किंवा कलचुरि यांच्या सत्तेखाली उत्तर महाराष्ट्र व गुजराथ हे प्रांत आले. शेवटीं इ० स० च्या सातव्या शतकाच्या आरंभीं बदामीच्या चालुक्यांची सत्ता प्रबळ होऊन त्यांच्या साम्राज्याचा विस्तार उत्तरेंत नर्मदा नदीपर्यंत झाला. त्यानंतरचा महाराष्ट्राचा मुसलमानपूर्वकालीन इतिहास ज्ञात आहे.

या कालावधींतला दक्षिण महाराष्ट्राचा इतिहास मात्र बराचसा अज्ञात आहे. सातवाहन व बदामीचे चालुक्य यांच्या राजवटींमधला इ० स० २५० ते ६०० हा साडेतीनशें वर्षांचा काळ दक्षिण महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाचें अंधकारयुग असें मानण्यांत येत असे. या अंधकाराचा निरास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखकाने कांही वर्षांपूर्वी 'मानपूरचे राष्ट्रकूट' या लेखांत केला. तो लेख भा. इ. सं. मंडळाच्या ३१ व्या वार्षिक संमेलनांत वाचला होता व तो पुढे त्या मंडळाच्या लेखसंग्रहांत (ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड २, पृ. १-८) प्रसिद्ध झाला आहे. त्या

---

* भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक, पु. २९, पृ. १५-२२.

लेखांत दाखविलें होतें की, दक्षिण महाराष्ट्र किंवा कुन्तल या देशांत इ० स० ३७५ च्या सुमारास मानाङ्क नामक राजाने राष्ट्रकूट वंशाची स्थापना केली. त्याने मानपुर नामक नगर वसवून तेथे आपली राजधानी केली. हें मानपुर सातारा जिल्ह्यांतील माण तालुक्याचें मुख्य ठिकाण **माण** हें असावें.

या मानांक नृपतीचे वंशज इ० स० च्या सातव्या शतकापर्यंत दक्षिण महाराष्ट्रांत राज्य करीत होते. पुढे द्वितीय पुलकेशीने या वंशांतील गोविंद नामक राजाशीं सख्य करून आपल्या चुलत्याचा पराभव केला व बदामीचें राज्य हस्तगत केलें. नंतर त्याने आपली सत्ता उत्तरेंत पसरवून तो तीन महारष्ट्रांचा स्वामी झाला.

यापमाणे इ० स० ३७५ ते ६२५ म्हणजे सुमारें अडीचशें वर्षें या राष्ट्रकूट वंशाचें दक्षिण महाराष्ट्रांत राज्य होतें. या अवधींत कांही काळ त्यांच्या सत्तेला उतरती कळा लागून दक्षिण महाराष्ट्रांत परकी राजवंशाचा प्रवेश झाला होता; याविषयी अलीकडील संशोधनाने प्राप्त झालेली माहिती या लेखांत दिली आहे.

हें राजघराणें विष्णुकुंडी होय. आंध्र प्रांतांत कृष्णा नदीच्या दक्षिणेस सुमारें ५० मैलांवर विणूकोंड नामक गाव अद्यापि विद्यमान आहे. त्या ठिकाणीं एक किल्ला व कांही प्राचीन अवशेष अद्यापि दिसतात. तें गाव या राजवंशाचें मूळ ठिकाण असावें असा तर्क आहे. या वंशाचा मूळ पुरुष विक्रममहेंद्र हा इ० स० ४५० च्या सुमारास होऊन गेला असावा. याचा मुलगा गोविंदवर्मा हा सुविख्यात वाकाटक सम्राट् हरिषेण (इ० स. ४७५ ते ५००) याचा समकालीन होता. हरिषेणाने आंध्र देश जिंकल्याचा अजंठ्याच्या १६ नं. च्या लेण्यांतील कोरीव लेखांत उल्लेख आहे. त्या वेळीं त्याने या गोविंदवर्म्यास त्या देशाचें राज्य दिलें असावें. या गोविंदवर्म्यानेच विष्णुकुंडी वंशांत प्रथम 'महाराज' ही राजपदनिदर्शक पदवी धारण केली होती. गोविंदवर्म्याचा मुलगा प्रथम माधववर्मा याने वाकाटक राजकन्येशीं विवाह केल्याचा कोरीव लेखांत उल्लेख आहे. ही राजकन्या विदर्भसम्राट् वाकाटकवंशी हरिषेणाचीच कन्या

किंवा जवळची नातेवाईक होती, असा तर्क केल्यास तो बहुधा चूक होणार नाही.

ह्या माधववर्म्याच्या काळीं वाकाटक वंशाला उतरती कळा लागली होती. यापूर्वी हरिषेणाने आपलें साम्राज्य अत्यंत विस्तृत व बलाढय केलें होतें. अजंटयाच्या लेखांत म्हटलें आहे की त्याच्या साम्राज्यांत कुन्तल किंवा दक्षिण महाराष्ट्र, अवन्ति अथवा पश्चिम माळवा, कलिंग किंवा सध्याचा ओरिसा प्रदेशाचा कांही भाग, कोसल अथवा छत्तीसगड, त्रिकूट म्हणजे नाशिकच्या जवळचा प्रदेश, आंध्र म्हणजे कृष्णा व गोदावरी यांच्यामधील पूर्व किनाऱ्यालगतचा प्रदेश इत्यादि देश अन्तर्भूत होत होते. हरिषेणानंतर लौकरच वाकाटक साम्राज्याचा अस्त झाला असावा. कारण त्यानंतरच्या एकाहि राजाचें नांव आपणांस ज्ञात नाही. एवढया मोठया व बलाढय साम्राज्याचा एकाएकी कसा नाश झाला हें कोडें इतिहासज्ञांस पडलें होतें. मागे कै. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीहि यासंबंधीं जाहीर पृच्छा नागपूरच्या 'वागीश्वरी' मासिकांत केली होती. हें कोडें अलीकडील संशोधनाने सुटलें आहे. सुप्रसिद्ध संस्कृत ग्रंथकार दण्डी याच्या दशकुमारचरिताच्या आठव्या उच्छ्वासांत अनंतवर्मा नामक विदर्भ नृपतीची कथा आली आहे, तींत ऐतिहासिक भाग पुष्कळ आहे हें मीं इतरत्र* दाखविलें आहे. दण्डीचे पूर्वज अचलपुरीं (वऱ्हाडांतील सध्याच्या एलिचपुरीं) राहत असत. पुढे ते कर्नाटक, आन्ध्र वगैरे प्रांतांत गेले तरी विदर्भांतील तत्कालीन ऐतिहासिक घटना त्यांस व त्यांच्या वंशजांस परंपरागत माहितीवरून अवगत असाव्या. त्यांपैकी वाकाटक राजवटीच्या अंतिम कालांतली घटना दण्डीने उल्लेखिलेल्या आठव्या उच्छ्वासांत वर्णिलेल्या दिसतात. त्या कथेंतील नांवें काल्पनिक दिसतात, पण इतर भाग ऐतिहासिक असावा.

वरील कथेमध्ये विदर्भ राजकुमाराला त्याच्या संकटकाळीं साहाय्य करणारा विश्रुत हा त्याचा नातेवाईक होता असें दाखविलें आहे. त्यांत

---

* मागे, पृ. ८५–१०० पाहा.

ऐतिहासिक सत्य असल्यास विष्णुकुंडी प्रथम माधववर्म्यानें हरिषेणाच्या नातवाला विदर्भाचें राज्य मिळवून देण्यांत मदत केली असावी असें वाटतें. त्यानंतर वाकाटक वंश फार काळ टिकला असावा असें दिसत नाही. कारण नंतर लौकरच या माधववर्म्याचें राज्य दक्षिण हिंदुस्थानच्या बऱ्याचशा भागावर पसरलें असें दिसते. त्याकडे आपण आतां वळूं.

ह्या माधववर्म्याचे दोन ताम्रपट सापडले आहेत. त्याशिवाय त्याच्या वंशजांच्या ताम्रपटांतही त्याच्याविषयी बरीच माहिती मिळते. हा राजा श्रौत यज्ञयागांचा मोठा पुरस्कर्ता होऊन गेला. कोरीव लेखांत याच्या जातीचा उल्लेख नाही. तथापि त्याने वाकाटकवंशी ब्राह्मण राजकन्येशीं केलेला विवाह लक्षांत घेतां तो ब्राह्मण कुळांत जन्मला होता यांत संशय नाही. प्राचीन काळीं अनुलोम विवाहच प्रचलित होते, प्रतिलोम विवाह निषिद्ध मानत. तेव्हा ब्राह्मण राजकन्येचा विवाह ब्राह्मण कुमाराशींच होऊं शके. वाकाटक सम्राट् प्रथम प्रवरसेन याने चार अश्वमेध व अग्निष्टोम, आप्तोर्याम, उक्थ्य, षोडशि, अतिरात्र, वाजपेय, बृहस्पतिसव, साद्यस्क्र इत्यादि श्रौत याग केले होते. त्याचेंच अनुकरण या विष्णुकुंडी माधववर्म्यानें केलेलें दिसतें. याने प्रवरसेनावरहि ताण केली. प्रवरसेनाने चारच अश्वमेध केले होते, पण या विष्णुकुंडी माधववर्म्यानें अकरा अश्वमेध केले होते असें त्याच्या व त्याच्या वंशजांच्या अनेक ताम्रपटांत म्हटलें आहे. इतके अश्वमेध दुसऱ्या कोणत्याहि भारतीय राजाने केल्याचा इतिहासांत उल्लेख नाही. याशिवाय त्याने हजार अग्निष्टोम आणि सर्वमेध, बहुसुवर्ण, पौण्डरीक, पुरुषमेध, वाजपेय, षोडशी, राजसूय, प्राधिराज्य, प्राजापत्य इत्यादि श्रौत याग केले होते. त्यावरून त्याच्या धार्मिकपणाची कल्पना येते.

अकरा अश्वमेध याग करणाऱ्या राजाचें साम्राज्य तसेंच विस्तृत असलें पाहिजे असें कोणीहि अनुमान करील. माधववर्म्यांच्या ताम्रपटांत त्याच्या साम्राज्यांत अन्तर्भूत झालेल्या देशांचा उल्लेख येत नाही व त्याचे स्वतःचे ताम्रपट आन्ध्र प्रांताखेरीज इतरत्र सापडले नसल्याने त्यांच्या प्राप्तिस्थानांवरून त्याच्या साम्राज्याच्या विस्ताराची कल्पना करतां येत

नाही. तथापि त्याच्या स्वतःच्या व त्याच्या वंशजांच्या ताम्रपटांतील वर्णनावरून कांही अनुमानें बांधतां येतात. त्याचे ताम्रपट आन्ध्रप्रांतांत सापडले असल्याने तो प्रदेश त्याच्या अंमलाखाली होता यांत संशय नाही. याशिवाय दक्षिण कोसल (सध्याचा छत्तीसगड) हाहि त्याच्या साम्राज्यांत मोडत असावा. कारण त्याच्या दोन्ही ताम्रपटांत 'त्रिवरनगरभवनगतपरमयुवतिनन्दनः' किंवा 'त्रिवरनगरभवनगतपरमयुवतिजनविहरणरतिः' असें त्याचें वर्णन केलेलें आढळतें. या वर्णनाचा अर्थ संशोधकांना लागत नव्हता. तो प्रस्तुत लेखकाने पंचवीस वर्षांपूर्वी आपल्या लेखांत* प्रथम दाखविला. या वर्णनांत माधववर्म्याने त्रिवरनगरांतील सुंदर स्त्रियांना आनंदित केलें किंवा त्यांच्याशीं विहार केला असें म्हटलें आहे. 'त्रिवरनगर' म्हणजे त्रिवरराजाची राजधानी. हा त्रिवरराजा व मध्यप्रदेशाच्या छत्तीसगड विभागांत राजीम व फुलझर येथे ज्याचे दोन ताम्रपट सापडले आहेत तो तीवरदेव हे एकच होत. हा तीवरदेव आपल्या ताम्रपटांत आपण सोमवंशीं पांडवकुलांत जन्मलों असें सांगतो. त्याच्या ताम्रपटांतील अक्षरवटिकेवरून व कांही प्रमाणांवरून तो वाकाटकांच्या कालानंतर लौकरच होऊन गेला असावा असें दिसतें. या राजाचा पराजय करून विष्णुकुंडी माधववर्म्याने त्याच्या राज्यांत कांही काळ वास्तव्य केलें असावें असें दिसतें.

ह्या माधववर्म्याचा नातू द्वितीय माधववर्मन् याचा ताम्रपट आन्ध्रप्रांतांत सापडला आहे. त्यांत द्वितीय माधववर्म्याला 'त्रिकूटमलयाधिपतिः' त्रिकूट व मलय पर्वतांचा अधिपति असें म्हटलें आहे. यांपैकी मलय पर्वत दक्षिणेंत म्हैसूर संस्थानांत आहे हें सर्वांस माहीत आहे. दुसरा पर्वत त्रिकूट याच्याविषयी अनेकांनी अनेक अनुमानें केलीं होतीं. पण अलीकडे नाशिक जवळच्या अंजनेरी गावीं सापडलेल्या ताम्रपटावरून नाशिकच्या पश्चिमेस पसरलेल्या पर्वतराजीस त्रिकूट हें नांव होतें असें निर्विवादपणें सिद्ध झालें आहे. कालिदासाने रघुवंशाच्या चतुर्थ सर्गांत रघूने अपरान्त म्हणजे उत्तर कोंकण या देशाच्या राजाचा पराभव करून तेथील त्रिकूट पर्वताला आपला जयस्तंभ केलें असें वर्णन केलें आहे. तेंहि

---

* एपिग्राफिया इंडिका, पु. २२, पृ. १९

वरील स्थलनिश्चयाचें समर्थक आहे. तेव्हा या द्वितीय माधववर्म्यांच्या अमलाखाली दक्षिण हिंदुस्थानचा पश्चिम भाग—ज्यांत महाराष्ट्र व कर्नाटक हे प्रांत अन्तर्भूत होतात तो प्रदेश—होता असें दिसतें. माधववर्म्याचा दुसरा नातु इन्द्रभट्टारकवर्मा याच्या वंशजाचे लेख आन्ध्र प्रांतांत सापडले आहेत व त्यांत आन्ध्रांतील गांवें दिल्याचा उल्लेख आहे. तेव्हा इन्द्रभट्टारकवर्मा हा आन्ध्र प्रांतावर राज्य करीत होता असें अनुमान करतां येतें. प्रथम माधववर्मा याचें साम्राज्य दक्षिण हिंदुस्थानच्या बऱ्याच मोठ्या भागावर पसरलें होतें. त्याच्यानंतर त्याच्या मुलांमध्ये किंवा नातवांमध्ये त्याच्या राज्याची वाटणी होऊन एकाला पूर्वेकडचे आन्ध्र, कोसल इत्यादि देश मिळाले व दुसऱ्याच्या सत्तेखाली महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि देश आले असें अनुमान वीस वर्षांपूर्वी प्रस्तुत लेखकाने आपल्या एका लेखांत केलें होतें.* या विष्णुकुण्डी राजांचे लेख आन्ध्रप्रांताबाहेर सापडले नसल्याने त्यांचें राज्य कधी काळीं महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि पश्चिम प्रांतावर होतें ही कल्पना संशोधकांस पटत नसे. द्वितीय माधववर्म्याच्या ताम्रपटांत त्याचें 'त्रिकूटमलयाधिपतिः' असें वर्णन आलें आहे खरें, पण तें वस्तुस्थितिनिदर्शक नसावें; कारण हे पर्वत त्याच्या आन्ध्रदेशापासून शेकडों मैल दूर होते असें डॉ. हुल्श याने म्हटलें आहे. होतें. सुदैवाने याविषयीचा निर्णायक पुरावा आता उपलब्ध झाला आहे. तो येथे मांडतों.

सुमारें तीस वर्षांपूर्वी श्री. य. रा. गुप्ते यांस सातारा जिल्ह्यांतील खानापूर गावीं एक अपूर्ण ताम्रपट सापडला होता. त्यावर त्यांनी एक त्रोटक टिप्पण भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत (व. ८, पृ. १६३) प्रसिद्ध केलें आहे. या ताम्रपटांत माधववर्मन् नामक नृपतीने कृष्णावेण्णा नदीकांठचें रेट्टुरक नांवाचें गाव जवळच्या वाड्यांसहित वैशाखी पूर्णिमेस एका ब्राह्मणास दान केल्याचा निर्देश आहे. हें गाव सातारा जिल्ह्यांत कृष्णेच्या कांठचें रेटरें बुद्रुक या नांवाने अद्यापि विद्यमान आहे व ताम्रपटांत उल्लेखिलेल्या बेलवाटिका, कोलिकवाटिका व वट्टारिका या वाड्या सध्या रेटरें बुद्रुकच्या जवळ अनुक्रमें बेलवडें,

* एपिग्राफिया इंडिका, पु. २२, पृ. २०.

कोळें व वाठार या नांवाने दिसतात हें श्री. गुप्ते यांनी दाखविलें होतें. ताम्रपटाच्या अक्षरवटिकेवरून तो इ. सनाच्या पांचव्या सहाव्या शतकांतील असावा असें अनुमान श्री. गुप्ते यांनी केलें होतें. तथापि हा माधववर्मा कोणत्या वंशांतील याचा उलगडा त्यांस झाला नव्हता. त्या ताम्रपटाचा पहिला पत्रा गहाळ झाल्याने त्यांतील माधववर्म्याच्या वंशाचें व त्याच्या पूर्वजांचें वर्णन नष्ट झालें आहे. या ताम्रपटाविषयी श्री. गुप्ते यांचें टिप्पण वाचल्यावर हा राजा राष्ट्रकूटवंशांतील असावा असें मला प्रथम वाटलें. कारण राष्ट्रकूट नृपति मानाङ्क व त्याचे वंशज दक्षिण महाराष्ट्रांत इ. स. च्या चौथ्या शतकापासून सातव्या शतकापर्यंत राज्य करीत होते व त्यांची राजधानी सातारा जिल्ह्यांतच माण गावीं होती हें मी अनेक ताम्रपटांच्या पुराव्यावरून दाखविलें होतें. माधववर्म्याच्या राजवंशाविषयीं हें माझें मत मंडळापुढे कांही वर्षांपूर्वी वाचलेल्या ‘मानपूरचे राष्ट्रकूट’ या माझ्या लेखांत मांडलें होतें. त्यानंतर हा माधववर्मा विष्णुकुण्डी वंशांतील असावा अशी कल्पना मला सुचली, पण त्या ताम्रपटाच्या अवशिष्ट भागाचें काळजीपूर्वक वाचन केल्याशिवाय या बाबतींत निश्चित मत बनवितां येईना. तेव्हा तो ताम्रपट कोठे तरी प्रसिद्ध करावा अशी निकड मी मंडळाच्या चिटणीसांना व श्री. य. रा. गुप्ते यांना लावली. माझ्या एतद्विषयक आग्रहास मान देऊन श्री. गुप्ते यांनी त्याच्या प्रकाशनास संमति दिली. तो ताम्रपट आता एपिग्राफिया इंडिकामध्ये श्री. गुप्ते यांनी व मी प्रसिद्ध केला आहे.*

या ताम्रपटाच्या अवशिष्ट भागाचें बारकाईने वाचन केल्यावर तो विष्णुकुण्डी प्रथम माधववर्म्यानेच दिला होता याविषयीं माझी खात्री झाली. या ताम्रपटाचा पहिला पत्रा गहाळ झाल्याचें मागे सांगितलें आहेच. दुसऱ्या पत्र्यावर आरंभी माधववर्म्याच्या वर्णनाचा शेवटचा भाग आला आहे. त्यावरून त्याने पुंडरीक, बहुसुवर्ण व एकादश याग केले होते, सार्वभौम पदवी धारण केली होती, आणि त्याचा चातुर्वर्ण्य व चातुराश्रम्य यांस मोठा आश्रय असे अशी माहिती आपणांस मिळते. हें वर्णन विष्णु-

* एपिग्राफिया इंडिका, पु. ३७, पृ. ३१२ इ.

कुण्डी प्रथम माधववर्मा याच्या वर्णनाशीं जुळणारें आहे. मागे सांगितल्याप्रमाणे पुण्डरीक व बहुसुवर्ण हे यज्ञ त्या विष्णुकुण्डी राजाने केले होते हें आपणांस त्याच्या वंशजांच्या ताम्रपटांवरून ज्ञात झालें आहे. राहिलेल्या एकादश यागांचें नांव लेखकाच्या अनवधानाने प्रस्तुत ताम्रपटांत गळलें आहे. पण ते याग अश्वमेधच होते याविषयीं संशय राहात नाही. इ. स. च्या पांचव्या सहाव्या शतकांत दुसऱ्या कोणत्याहि राजाने पुंडरीक, बहुसुवर्ण व एकादश अश्वमेध यज्ञ केल्याचा कोरीव लेखांत उल्लेख नाही. तेव्हा खानापूरचा ताम्रपट देणारा सार्वभौम माधववर्मा हा अकरा अश्वमेध करणारा विष्णुकुण्डी वंशांतील सुविख्यात प्रथम माधववर्माच होय हें स्पष्ट होईल.

ताम्रपटांत उल्लेखिलेलीं मुख्य गावें श्री. गुप्ते यांनी शोधलीं होतीं. त्याशिवाय इतरही गावें सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत नकाशांत मला रेटरेंबुद्रुकच्या जवळपास सापडलीं. मच्छदर्या, सेणवर्या, कोलिका व मलखेटक हीं गावें रेटरें बुद्रुकच्या त्या त्या दिशांस अनुक्रमें राजमाची, शेणोली, कोला व मलखेट या नांवाने अद्यापि विद्यमान आहेत. तेव्हा हा ताम्रपट मूळचा सातारा जिल्ह्यांतील यांत मुळीच संदेह नाही.

या ताम्रपटाने महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर महत्त्वाचा प्रकाश पाडला आहे. त्यावरून असें स्पष्ट दिसतें की, वाकाटकांचा अस्त झाल्यावर त्यांच्या साम्राज्याचा वारसा त्यांचा नातेवाईक विष्णुकुंडी माधववर्मा याच्याकडे आला. त्याने आपल्या शौर्य, धर्मनिष्ठा, औदार्य इत्यादि गुणांनी त्यांची परंपरा पुढे चालविली. वाकाटक सम्राट् हरिषेण याच्या कालानंतर विदर्भाच्या मांडलिकांनी आपल्या अधिराजाविरुद्ध बंड करून त्याच्या सत्तेचें जूं झुगारून दिलें होतें. पण माधववर्म्याने त्यांचा पुनः पराजय करून आपलें साम्राज्य आन्ध्र, कोसल, महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि दक्षिणेंतील बहुतेक देशांवर पसरविलें. तो स्वतः अत्यंत धार्मिक असल्याने त्याने सार्वभौमत्वनिदर्शक अकरा अश्वमेध केले; इतकेंच नाही, तर हजार अग्निष्टोम, आणि पुंडरीक, बहुसुवर्ण, वाजपेय, राजसूय, पुरुषमेध इत्यादि अनेक श्रौत याग करून सर्वत्र सनातन धर्माचें वर्चस्व प्रस्थापित केलें.

त्याने ब्राह्मणांस धार्मिक कृत्यांच्या अनुष्ठानार्थ अनेक ग्राम दान दिले होते. यापुढे दक्षिण हिंदुस्थानांतील सुविख्यात अशा प्राचीन सम्राटांमध्ये विष्णुकुंडी प्रथम माधववर्म्याची गणना केली जाईल.

विष्णुकुंडी वंशाचें महाराष्ट्र व विदर्भ या देशांवरील राज्य माधववर्म्याच्या काळानंतर फार वर्षे टिकलेलें दिसत नाही. माधववर्म्याचा एक ताम्रपट त्याच्या कारकीर्दीच्या ४० व्या वर्षी दिला होता. त्यावरून त्याने दीर्घकाल राज्य केलेलें दिसतें. त्याच्या अगोदर त्याचे पुत्र निवर्तले असल्याने त्याच्या निधनानंतर त्याच्या नातवांमध्ये त्याच्या विस्तृत राज्याची वाटणी झाली. द्वितीय माधववर्मा नामक एका नातवास महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि पश्चिमेकडील देश व विक्रमेंद्रवर्मा नांवाच्या दुसऱ्या नातवास आन्ध्र, कोसल इत्यादि पूर्वेकडचे देश मिळालेले दिसतात. द्वितीय माधववर्म्याला त्याच्या ताम्रपटांत 'त्रिकूटमलयाधिपतिः' म्हटलेलें मागे सांगितलें आहेच. द्वितीय माधववर्म्याच्या वंशजांचे ताम्रपट महाराष्ट्र–विदर्भांत अद्यापि सापडले नाहीत. यानंतरच्या काळांत दक्षिण महाराष्ट्रांत पुनः राष्ट्रकूटांनी आपलें डोकें वर काढलें. उत्तर महाराष्ट्र व विदर्भ या प्रांतांत माहिष्मतीच्या कलचुरींची सत्ता इ. स. ५५० च्या सुमारास प्रस्थापित झाली. त्यावरून विष्णुकुंडींचें साम्राज्य माधववर्म्यानंतर लवकरच संपुष्टांत आलें असावें. आन्ध्र प्रांतांत मात्र त्यांचें राज्य इ. स. च्या सातव्या शतकापर्यंत टिकून होतें. सातव्या शतकाच्या आरंभीं महाप्रतापी चालुक्यनृपति द्वितीय पुलकेशी याने दक्षिणेंतील इतर राजांप्रमाणे विष्णुकुंडींचाहि पराजय करून त्यांचें राज्य आपल्या साम्राज्यांत समाविष्ट केलें. पुढे त्याने आन्ध्र प्रांतांत वेंगी येथे चालुक्यांची निराळी गादी स्थापून तिजवर आपल्या विष्णुवर्धन नामक भावास बसविलें हें इतिहासज्ञांस माहीत आहे. याप्रमाणे खानापूरच्या ताम्रपटाने महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर कसा नवीन प्रकाश पडतो तें यथामति दाखविलें आहे. या राजाचे ताम्रपट कोणाच्या संग्रहीं असल्यास त्यांनी ते अवश्य प्रसिद्ध करावे.

विष्णुकुंडी राजांची वंशावळ पुढे दिली आहे.

- विक्रममहेंद्र
  - महाराज गोविंदवर्मन्
    - सार्वभौम प्रथम माधववर्मन्
      - देववर्मन्
        - महाराज द्वितीय माधववर्मन्
      - विक्रमेंद्रवर्मन्
        - महाराज इन्द्रवर्मन्
          - महाराज विक्रमेंद्रवर्मन्

विदर्भाचे राष्ट्रकूट*

सन १९४८ च्या सप्टेंबरमध्ये नागपूर युनिव्हर्सिटीच्या एका सभे-करिता मी नागपुरास आलों असतां एकाच दिवशीं दोन नवीन ताम्रपट माझ्या दृष्टीस पडले. त्यांपैकी एक डॉ. य. खु. देशपांडे यांना अकोल्यास मिळाला होता व दुसरा रामटेकजवळ नगरधन येथे नागपूरचे श्री. हिरालाल उपासराव महादुले यांना जमीन खणतांना सापडला होता. पहिल्याला या लेखांत 'अकोल्याचा ताम्रपट' व दुसऱ्याला 'नगरधनचा ताम्रपट' असें उल्लेखिलें आहे. प्राचीन ताम्रपट क्वचितच सापडतात. म्हणून एकाच दिवशीं दोन ताम्रपट प्रकाशांत आलेले पाहून मला सानंदाश्चर्य वाटलें. पण यापेक्षा अधिक कौतुकाची गोष्ट ही की ते दोन्ही ताम्रपट राष्ट्रकूटवंशांतील 'नन्नराज' या एकाच नांवाच्या राजांनी दिले होते. या ताम्रपटांविषयी संक्षिप्त टिपणें स्थानिक वर्तमानपत्रांत व युगवाणीच्या त्या वर्षाच्या एका अंकांत प्रसिद्ध झालीं होतीं. त्यानंतर डॉ. य. खु. देशपांडे यांनी अको-ल्याचा ताम्रपट पुण्याच्या 'पराग' मासिकाच्या मार्च १९४९ च्या अंकांत प्रसिद्ध केला व नगरधनचा ताम्रपट प्रस्तुत लेखकाने भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत (दक्षिण महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इति-हासाचीं साधनें, खंड ३, पृ. १०९–११५) प्रकाशित केला.† हे दोन्ही ताम्रपट यथावकाश 'एपिग्राफिया इंडिका' मध्ये अधिकृतरीत्या पुनः

---

* युगवाणी, नागपूर, दिवाळी अंक, १९५०, पृ. ४१६–४२०.

† हा ताम्रपट मी आपल्या 'कलचुरि नृपति आणि त्यांचा काळ' या पुस्तकांतहि (पृ. १२८–१२९) प्रकाशित केला आहे.

प्रकाशित होतील.* तथापि त्यापूर्वी दोन्ही ताम्रपटांवरून विदर्भाच्या प्राचीन इतिहासावर काय प्रकाश पडतो तें प्रस्तुत लेखांत संक्षेपाने सांगावयाचें आहे.

या दोन ताम्रपटांपैकी नगरधनचा ताम्रपट हा अगोदरचा आहे. हा स्वामिराज नामक राजाच्या कारकीर्दीत त्याच्या नन्नराज नामक भावाने नन्दिवर्धनाहून दिला असून त्यांत दोन भूमिदानांचा निर्देश आहे. पहिल्या दानाने महामात्रांच्या किंवा माहुतांच्या गणाच्या (संघाच्या) विनंतीवरून कांही ब्राह्मणांना चिंचपट्टिका गावांत कांही जमीन दिली होती. दुसऱ्या दानाने नन्नराजाने (किंवा त्याचा भाऊ स्वामिराज याने) आषाढ संवत्सरीं चैत्र महिन्याच्या अमावास्येस सूर्यग्रहणप्रसंगीं शूलनदीच्या उत्तर तटावरील अंकोल्लिका गाव त्याच ब्राह्मणांना दिला होता. या ताम्रपटाची मिति शेवटीं '३२२ वें वर्ष, कार्तिक शुक्ल ५' अशी दिली आहे.

ताम्रपटांत दिलेलें वर्ष कलचुरि शकाचें आहे. त्याची तारीख १९ मार्च इ. स. ५७३ ही येते. या तारखेस बार्हस्पत्य संवत्सर 'आषाढ' हाच असून त्या वर्षी चैत्र अमावास्येस सूर्यग्रहणहि होतें. तेव्हा ताम्रपटाचा हा काळ निश्चित झाला असें मानण्यास हरकत नाही.

ताम्रपटांत राजवंशाचें नांव नाही. तथापि स्वामिराज व नन्नराज हीं नांवें राष्ट्रकूटांच्या नामावळींतच दिसत असल्याने हे राजे राष्ट्रकूटवंशाचे होते, यांत संशय नाही. ताम्रपटाच्या आरंभीं स्वामिराज स्वतःचें 'भट्टारकपादानुध्यात' (सम्राटाच्या पायांचें चिंतन करणारा) असें वर्णन करतो, त्यावरून तो स्वतंत्र नसून मांडलिक होता असें स्पष्ट दिसतें. या या ताम्रपटांत कलचुरि शकाचा उपयोग केला आहे तो कलचुरि साम्राज्य-सत्तेचा सूचक आहे. यापूर्वीच्या सातवाहन व वाकाटक राजांच्या लेखांत त्या त्या राजांच्या राज्यारंभापासूनचीं वर्षें दिलेलीं आढळतात. इ. स. ५०० च्या

* आता नगरधनच्या ताम्रपटावर माझा इंग्रजी लेख ए. इं., पु. २८ (पृ. १-११) मध्ये प्रकाशित झाला आहे. अकोल्याचा ताम्रपट ऊटकमंडचे श्री. वेंकटरामय्या यांनी ए. इ., पु. २९, (पृ. १०९ इ.) मध्ये प्रसिद्ध केला आहे.

सुमारास वाकाटक राजवंशाचा अस्त झाला. त्यानंतर सुमारें पन्नास वर्षांच्या अवधींत कलचुरि सम्राट् कृष्णराज हा उदयास येऊन त्याने आपलें साम्राज्य उत्तर महाराष्ट्र, गुजराथ, कोंकण व विदर्भ या प्रांतांवर पसरविलें. कृष्ण-राजाच्या नाण्यांचा एक मोठा संचय अमरावती जिल्हांत धामोरी येथे कांही वर्षांपूर्वी सापडला होता. बैतूल जिल्ह्यांतहि त्याचीं कांही नाणीं सापडलीं आहेत. त्याचा स्वतःचा कोरीव लेख मात्र अद्यापि या प्रांतांत सापडला नाही. प्रस्तुत ताम्रपटावरून कलचुरींचें साम्राज्य इ. स. च्या सहाव्या शतकांत विदर्भावर पसरलें होतें ही नवीन माहिती निश्चितपणें प्रथमच मिळत आहे. विदर्भाच्या इतिहासांत सन ५०० ते ६५० हा दीडशें वर्षांचा काळ अंधकारयुग म्हणून गणला गेला होता. यावर प्रस्तुत ताम्रपटाने किंचित् प्रकाश पडत आहे, यांत त्याचें महत्त्व आहे.

दुसरा आकोल्याचा ताम्रपटहि असाच महत्त्वाचा आहे. तो राष्ट्र-कूटवंशी एका नन्नराजानेच दिला होता. त्या ताम्रपटांत त्याची वंशावळ खाली दिल्याप्रमाणे दिली आहे—

दुर्गराज
|
(पुत्र)
गोविन्दराज
|
(पुत्र)
स्वामिकराज
|
(पुत्र)
नन्नराज

नन्नराजाने हा ताम्रपट पद्मनगराहून दिला असून त्यांत त्याने वटपूरक गावांतील कांही जमीन ब्राह्मणांस दान दिली होती. या ताम्रपटाच्या शेवटीं त्याचा काळ 'शककालसंवत्सर ६१५, कार्तिक शुद्ध पौर्णिमा' असा दिला

आहे. या शकक्कालालाच पुढे 'शालिवाहनशक' असें नांव प्राप्त झालें. तेव्हा या ताम्रपटाचा काळ इ. स. ६९३ हा येतो.

या राष्ट्रकूट नन्नराजाचेच आणखी दोन ताम्रपट या प्रांतांत यापूर्वी सापडले होते. त्यांपैकी एक ताम्रपट मुलताईजवळ तिवरखेड येथे होता. त्याची मिति शककालसंवत्सर ५५३ (इ० स० ६३१) ही त्यांत दिली आहे. दुसरा ताम्रतट मुलताई येथेच सापडला होता. त्याचा काळ शककालसंवत्सर ६३१ (इ० स० ७०९) असा त्यांत दिला आहे. दोन्ही ताम्रपटांत नन्नराजाची वर दिलेलीच वंशावळ आढळते. पण त्या दोहोंत अंतर ७८ वर्षांचें आहे. सामान्यतः कोणाहि राजाची कारकीर्द २०– २५ वर्षांपेक्षा अधिक असत नाही. गुप्तवंशांतील राजे दीर्घायुषी होते. पण त्यांच्यांतहि कोणाहि राजाची कारकीर्द ४०–४५ वर्षांपेक्षा अधिक नव्हती. तेव्हा नन्नराजाने ७८ वर्षांपेक्षा अधिक काळ राज्य केलें असणें असंभवनीय वाटतें. म्हणून या दोन ताम्रपटांपैकी कोणता तरी एक बनावट असावा असा संशय संशोधकांस वाटत होता. डॉ. अ. स. अळतेकरांनी आपल्या 'राष्ट्रकूट व त्यांचा काळ' या इंग्रजी पुस्तकांत या प्रश्नाचा सविस्तर विचार करून मुलताईचा ताम्रपट बनावट असावा असें ठरविलें होतें. आता उजेडांत आलेल्या अकोला ताम्रपटाने हें अनुमान चूक ठरत आहे; कारण त्या ताम्रपटांतील शक संवत्सर ६१५ हें वर्ष मुलताई ताम्रपटाच्या शक संवत्सर ६३१ ला जसें जवळ आहे तसें तिवरखेडच्या शक संवत्सर ५५३ ला नाही. तिवरखेडच्या ताम्रपटाचें बारकाईने निरीक्षण केल्यास त्याच्या बनावटपणाचीं आणखीहि गमकें सांपडतात. तेव्हा अकोल्याच्या ताम्रपटाने नन्नराजाचा शक संवत्सर ६१५ ते ६३१ (इ. स. ६९३ ते ७०९) हा काळ निश्चित ठरला हा मोठाच लाभ त्या ताम्रपटाच्या प्राप्तीपासून झाला आहे.

याप्रमाणे तिवरखेडाचा ताम्रपट बनावट ठरल्याने त्या ताम्रपटांतील कालावर बसविलेलीं डॉ. अळतेकरांचीं आणखी कांही अनुमानें चुकीचीं ठरलीं आहेत. भारतीय इतिहासांत राष्ट्रकूट राजवंशाचें महत्त्व विशेष आहे. या वंशांत एकापेक्षा एक महाप्रतापी राजे होऊन गेले. त्यांनी दक्षिण हिंदुस्थानांत फार मोठें साम्राज्य स्थापिलें व अनेकदा उत्तर हिंदुस्थानांत

हिमालयापर्यंत स्वाऱ्या करून मराठयांच्या अगोदर आपल्या भीमथडीच्या घोडयांस गंगायमुनांचें पाणी पाजलें. त्यांचा विद्या व कला यांसहि उदार आश्रय होता. त्यांच्या दरबारीं बरेचसें अपभ्रंश वाङ्मय निर्माण झालें. जगांतील आश्चर्यांमध्ये ज्याची गणना करण्यांत येते तें वेरूळचें 'कैलास' लेणेंहि या वंशांतील पहिल्या कृष्णराजाने खोदविलें. तेव्हा या राजवंशाचा भारतास व विशेषतः महाराष्ट्रास विशेष अभिमान वाटतो. पण या वंशाचा आरंभींचा इतिहास अद्यापि अज्ञात आहे. याचा पहिला ज्ञात कोरीव लेख सामानगडचा ताम्रपट शक संवत्सर ६७५ (इ. स. ७५३) चा आहे. तो दंतिदुर्ग नृपतीने दिला असून त्यांत दन्तिदुर्गाच्या तीन पूर्वजांचें वर्णन आहे. वेरूळच्या दुसऱ्या एका लेखांत त्यापूर्वीच्या आणखी दोन पूर्वजांचा उल्लेख आहे. या घराण्याचा मूळ पुरुष दन्तिवर्मन् हा सातव्या शतकाच्या आरंभीं कलचुरींचा मांडलिक म्हणून उदयास आला असावा. तिवरखेडचा शके ५५३ (इ. स. ६३१) चा ताम्रपट खरा मानून तो देणारा नन्नराज हा दन्तिवर्म्याचा पिता किंवा भाऊ असावा असें अनुमान डॉ. अळतेकर यांनी केलें होतें व हा साम्राज्यस्थापक राष्ट्रकूट वंश मूळचा विदर्भांतील असें त्यांनी म्हटलें होतें. तें विदर्भाला निःसंशय गौरवास्पद होतें. पण तिवरखेड ताम्रपट बनावट ठरल्याने तें विधान चुकीचें ठरत आहे. मुलताई व अकोला येथे सांपडलेले ताम्रपट देणारा नन्नराज दन्तिदुर्गापूर्वी पांच पिढया होऊन गेला नसून त्या दोघांच्या काळांतील अंतर फार तर २५–३० वर्षांचें असावें असें स्पष्ट दिसतें. तेव्हा विदर्भांतील राष्ट्रकूट वंश हा सम्राट् राष्ट्रकूटवंशाची शाखा नसून त्याहून भिन्न होता हें निर्विवाद आहे.

सम्राट् राष्ट्रकूट वंशाचा विदर्भांत सांपडलेला पहिला ज्ञात ताम्रपट पहिल्या कृष्णराजाचा भांदक येथील शकसंवत्सर ६९४ (इ. स. ७७२) चा आहे. अर्थात् तो मुलताई ताम्रपटानंतर सुमारें पाऊणशें वर्षांनी दिला होता. त्यानंतर या सम्राट् राष्ट्रकूट वंशाचे अनेक ताम्रपट विदर्भांत सांपडले आहेत. तेव्हा इ. स. च्या आठव्या शतकापासून विदर्भ राष्ट्रकूटांच्या साम्राज्यांत अंतर्भूत झाला होता यांत संशय नाही. या काळांत विदर्भाच्या पुरातन मांडलिक राष्ट्रकूट वंशाचें काय झालें असा प्रश्न उद्‌भवतो. त्याचा आता थोडक्यांत विचार करूं.

मागे सांगितल्याप्रमाणे विदर्भांतील राष्ट्रकूट घराणें प्रथम कलचुरींचें मांडलिक म्हणून उदयास आलें. आरंभीं त्याची राजधानी नन्दिवर्धन येथे होती असें दिसतें. नगरधनचा ताम्रपट नन्दिवर्धनाहून दिला होता. नन्दिवर्धन (हल्लीचें रामटेक जवळचें नगरधन) हें पूर्वी वाकाटकांच्या राजधानीचें शहर होतें. वाकाटकांच्या काळीं बस्तर संस्थानांतील नलवंशी राजांची विदर्भावर स्वारी होऊन त्यांनी त्याचा कांही भाग व्यापला होता. या नलवंशी राजांनीहि नन्दिवर्धन हीच आपली राजधानी केली होती असें दिसतें. कारण त्यांचा विदर्भांत सापडलेला ताम्रपट नन्दिवर्धनाहूनच दिला आहे. वाकाटकांनंतर उदयास आलेल्या सामन्त राष्ट्रकूटवंशानेहि या पूर्वीच्या परंपरेस अनुसरून नन्दिवर्धन येथेच राजधानी स्थापिली असावी. पुढे मात्र तेथून राजधानी हलविलेली दिसतें. सातव्या आठव्या शतकांतील नन्नराजाने दिलेल्या मुलताई ताम्रपटांत पद्मनगर या राजस्थानाचा उल्लेख आहे, पण तें पद्मनगर व वाकाटकांच्या एका अपूर्ण ताम्रपटांत उल्लेखिलेलें व संस्कृत वाङ्मयांत भवभूतीचें जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध असलेलें पद्मपुर एकच किंवा भिन्न हें अद्यापि ठरावयाचें आहे. भवभूतीचें पद्मपुर गोंदियाजवळ अद्यापि प्राचीन नांवाने विद्यमान आहे व तेथे प्राचीन अवशेषहि बरेच आहेत हें प्रस्तुत लेखकाने यापूर्वीच दाखविलें आहे. तिवरखेडचा ताम्रपट नन्नराजाने अचलपुराहून दिला होता असा त्यांत निर्देश आहे. तथापि तो ताम्रपट आता बनावट ठरल्याने त्याचें महत्त्व नाही.

विदर्भांतील राष्ट्रकूट वंश प्रथम कलचुरींचा मांडलिक होता म्हणून त्याच्या नगरधनच्या ताम्रपटांत कलचुरि शकाचें वर्ष दिलें आहे. सातव्या शतकाच्या आरंभीं कलचुरि साम्राज्याचा अस्त होऊन चालुक्य उदयास आले. त्यांनी आपल्या प्रांतांत पूर्वीपासून प्रचलित असलेल्या शक संवताचा पुरस्कार केला. त्यांच्या मांडलिकांनीहि त्यांचेंच अनुकरण केलें. कलचुरींच्या अस्तानंतर विदर्भ चालुक्यांच्या साम्राज्यांत अन्तर्भूत झाला. ऐहोळे येथील सुप्रसिद्ध शिलालेखांत चालुक्य सम्राट् द्वितीय पुलकेशी 'तीन महाराष्ट्रांचा स्वामी' झाला, असें म्हटलें आहे. या तीन महाराष्ट्रांत अर्थात् विदर्भ अन्तर्भूत होताच. मुलताई व अकोला येथील ताम्रपट देणारा नन्नराज हा चालुक्यांचा मांडलिक होता, त्यामुळे त्याने आपल्या लेखांत शकसंवताचा

निर्देश केला आहे. चालुक्य इ. स. च्या आठव्या शतकांत नामोहरम होऊन राष्ट्रकूट उदयास आले. राष्ट्रकूटांच्या साम्राज्यांत विदर्भ अन्तर्भूत झाल्यावर येथील मांडलिक घराणें पदच्युत झालें नाही असें दिसतें. यानंतरचे त्या घराण्याचे कोरीव लेख अद्यापि सांपडले नाहीत हें खरें, पण इतर कांही उल्लेखांवरून इ. स. च्या दहाव्या शतकाच्या आरंभीं अचलपुर येथे राष्ट्रकूट सामन्त कर्कर हा राज्य करीत होता असें दिसतें. हा कर्कर कदाचित् पूर्वीच्या सामन्त राष्ट्रकूटवंशांतीलच असेल. हें सामन्त घराणें मालखेडच्या सम्राट् घराण्याशीं शेवटपर्यंत राजनिष्ठ राहिलें व त्यानें त्याच्या वतीने कलचुरि सैन्याशीं पयोष्णी (अचलपुरापासून जवळच वाहत असलेल्या पूर्णा) नदीच्या कांठी सामना दिला. त्याचें वर्णन राजशेखराच्या विद्धशालभंजिका नामक नाटिकेंत केलें आहे. जिज्ञासु वाचकांस त्याविषयी सविस्तर माहिती प्रस्तुत लेखकाच्या 'विद्धशालभञ्जिकेंतील राजकारणाचें प्रतिबिंब' या लेखांत मिळेल.*

---

* संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. १८८–१९५ पाहा.

प्राचीन भारतांतील पांडववंश*

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या एका मागील संमेलन प्रसंगीं ऐतिहासिक काळांतील नलवंशाविषयीं माहिती दिली होती. प्रस्तुत लेखांत त्यासारख्याच दुसऱ्या एका प्राचीन राजवंशाविषयीं माहिती अद्ययावत् उपलब्ध झालेल्या साधनांवरून जमवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

या वंशाला आरंभींच्या लेखांत 'पांडुवंश' किंवा 'पांडववंश' व नंतरच्या लेखांत 'सोमवंश' म्हटलें आहे. या वंशाचा प्रथम सापडलेला लेख रायपूर जिल्ह्यांतील राजीम येथील ताम्रपट होता. तो सन १८२५ मध्यें कलकत्याच्या 'एशियाटिक रीसर्चेस' या संशोधनपर नियतकालिकांत (पु. १५, पृ. ४९९ इ.) एका जैन मुनीनें वाचला होता तसा प्रसिद्ध झाला आहे. त्यानंतर गेल्या सव्वाशें वर्षांत छत्तीसगडच्या रायपूर जिल्ह्यांत या वंशाचे अनेक शिलालेख व ताम्रपट सापडले आहेत. सुमारें दहा वर्षांपूर्वीं डॉ. छाबडा यांना रीवा संस्थानांतील बह्मनी या गावीं एक ताम्रपट सापडला, तोही या वंशाचा असून त्यावरून या राजवंशाविषयीं बरीच नवीन माहिती उपलब्ध झाली आहे. डॉ. छाबडा यांनी तो ताम्रपट एपिग्राफिया इंडिका मध्ये (पु. २७, पृ. १३२ इ.) अलीकडे प्रसिद्ध केला आहे.

इ. स. च्या पहिल्या शतकांत कुशाण वंशाचा उदय होऊन सम्राट् कनिष्काच्या कारकीर्दींत त्याचें साम्राज्य हिंदुस्थानांत उत्तरेंत वायव्य सरहद्द प्रांतापासून पूर्वेस मगधापर्यंत व दक्षिणेस महाराष्ट्रापर्यंत पसरलें. काठेवाडांतील चष्टन व महाराष्ट्र–गुजराथमधील भूमक व नहपान हे क्षत्रप कनिष्कानेच नेमले होते असें बहुतेक विद्वानांचें मत आहे. इ. स. च्या दुसऱ्या शतकाच्या द्वितीयार्धांत या साम्राज्याचा मध्यभारतांत हळू हळू

* दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड ४, पृ. १४–१९.

संकोच होऊन अस्त झाला. त्या काळीं कौशाम्बी ते बान्धवगड या मध्य-हिंदुस्थानच्या प्रदेशांत 'मघ' नामक राजवंशाचा उदय झाला. यांचे अनेक शिलालेख व नाणीं कौशांबी, फैजपूर, गिंजा, बांधवगड इत्यादि ठिकाणीं सापडलीं आहेत, त्यांच्या लेखांत एका अनुल्लिखित संवताची ५१ ते १५८ पर्यंत वर्षे दिलीं आहेत. बहुतेक विद्वानांच्या मतें हा संवत् कनिष्काने सन ७८ मध्ये स्थापलेला शक संवतच असावा. तें खरें असल्यास हे मघ राजे आरंभीं कुशानांचे मांडलिक होते व म्हणूनच त्यांनी सम्राटाच्या संवताचा उपयोग आपल्या लेखांत केला असें म्हणतां येईल. पुढे कुशाण साम्राज्याचा अस्त झाल्यावरहि तीच कालगणना त्या प्रदेशांत कांही काळ चालू राहिली असावी. मघ राजे सुमारें इ. स. १२५ पासून ३३० पर्यंत राज्य करीत होते असें दिसतें. पुराणांतील ऐतिहासिक राजवंशांत 'मेघ' नामक राजवंशांचा उल्लेख आहे तो हाच वंश असावा.

इ. स. चौथ्या शतकांत मगधांत गुप्त राजवंशाचा उदय झाला. त्या वंशांतील दुसरा राजा महाराजाधिराज समुद्रगुप्त ह्याने आपल्या पराक्रमाने नर्मदेच्या उत्तरेचा बराच मोठा प्रदेश काबीज करून दक्षिणेंतहि स्वारी केली आणि कित्येक देश पादाक्रांत केले. त्याने मघ राजांचा पाडाव करून त्यांच्या राज्यांतील यमुनेच्या कांठचा सुपीक 'वत्स' देश आपल्या साम्राज्यांत सामील केला. उरलेल्या बघेलखंड किंवा रीवा प्रदेशांत त्याने अनेक छोटीं छोटीं मांडलिक राज्यें अस्तित्वांत आणलीं. नागोद संस्थानांत व जवळपासच्या प्रदेशांत 'परिव्राजक' व 'उच्चकल्प' या दोन मांडलिक राजवंशांचे अनेक ताम्रपट सापडले आहेत. त्यांमध्ये गुप्त संवताचा उपयोग केला आहे. त्यावरून व इतर कांही प्रमाणांवरून हे राजे गुप्तांचे मांडळिक होते असें स्पष्ट दिसतें. त्यांच्या राज्याच्या दक्षिणेचा मेकलदेश पांडववंशी राजांना दिलेला दिसतो. कारण ते आपणांस मेकलदेशाचे अधिपति म्हणवत व त्यांचा ताम्रपट रीवा संस्थानांतील बांधवगड जवळ बहनी गांवी सापडला आहे. त्यांत उल्लेखिलेली कांही गांवेंहि जवळपास सापडतात.

गुप्तांचें स्वामित्व कबूल करण्यापूर्वी हे राजे मघ राजांचे मांडलिक होते असें दिसतें. बांधवगडास महासेनापति भद्रबल व राजन् वैश्रवण यांचे कोरीव लेख सापडले आहेत. या सारखींच नांवें मघवंशांतील राजांची

असल्याने हे कोरीव लेख मघ राजांचेच असावे असें मानण्यांत येत असे; पण तें बरोबर दिसत नाही. मघराजे आपणांस 'महाराज' म्हणवीत. त्यांच्या एकाहि लेखांत 'महासेनापति' किंवा 'राजन्' या सारख्या हलक्या पदवीचा उपयोग केलेला दिसत नाही. तेव्हा महासेनापति भद्रबल हा पांडववंशी असावा. त्याच्या सारखीं 'बल'शब्दान्त नांवें बम्हनी ताम्रपटांत आलीं आहेत. राजन् वैश्रवण हा भद्रबलाचा मुलगा, तेव्हा तोही पांडववंशीच. त्याच्यानंतरच्या राजांचीं नांवें मात्र अद्यापि अज्ञात आहेत.

बम्हनी ताम्रपटांत खालील वंशावळी दिली आहे.

पांडववंश

जयबल
|
(पुत्र)
वत्सराज (राणी द्रोणभट्टारिका)
|
(पुत्र)
महाराज नागबल (राणी इन्द्रभट्टारिका)
|
(पुत्र)
महाराज भरतबल ऊर्फ इंद्र (राणी कोसलराजकन्या लोकप्रकाशा)

या ताम्रपटांत नागबल व भरतबल दोन राजांची 'महाराज' ही पदवी उल्लेखिली आहे. त्या पूर्वीच्या दोन राजांच्या बाबतींत कोणत्याच पदवीचा उल्लेख नाही. याचें कारण निश्चितपणे सांगता येत नाही. नागबल व भरतबल यांनी आपल्या पराक्रमाने राज्याचा विस्तार करून ही पदवी मिळविली असेल. किंवा त्यापूर्वीच्या राजांचें त्या ताम्रपटांतील सर्व वर्णन पद्यमय असल्याने त्यांत कोणतीच पदवी उल्लेखिली नसेल. असो.

बह्मनी ताम्रपटांत कोणत्याहि संवताचा उल्लेख नाही. त्यामुळे या राजवंशाचा काल अक्षरवटिकादि साधनांवरून ठरवावा लागतो. त्या ताम्रपटाचे संपादक डॉ. छाबडा यांचें मतें त्या ताम्रपटाचा काल इ. स. चें पांचवें शतक हा असावा. शेवटच्या भरतबल राजाच्या वर्णनांत खालील श्लोक आला आहे—

योऽसौ संपूर्णशक्तित्रयविनिपतितानेकसामन्तमूर्ध-
प्रोद्घृष्टोत्फुल्लपद्मद्युतिचलनयुगाक्रान्तिदिक्चक्रवालः ।
सौम्यः सोऽयं च वंशः प्रभव इति जनैं कीर्त्यते यस्य चोच्चैः
स श्रीमान् सार्वभौमप्रथितगुणगणोदीर्णवैरो नरेन्द्रः ॥


यांतील शब्दयोजना श्लेषयुक्त असून तिच्यायोगें नरेन्द्र (राजा) भरतबलाप्रमाणे त्याचा सम्राट् वाकाटक 'नरेन्द्रसेन' याचेंहि वर्णन अभिप्रेत आहे असें डॉ. छाबडा यांनी दाखविलें आहे. हा नरेन्द्रसेन वाकाटकांच्या ज्येष्ठ शाखेंतील द्वितीय प्रवरसेनाचा मुलगा अर्थात् गुप्त सम्राट् द्वितीय चंद्रगुप्त-विक्रमादित्याच्या प्रभावतीगुप्ता नामक मुलीचा नातु. वाकाटकांच्या ताम्रपटांत या नरेंद्रसेनाच्या आज्ञा मालव, मेकल व कोसल या राजांकडून सन्मानिल्या जात असा उल्लेख आला आहे. त्यावरून त्याकाळीं वाकाटकांचें साम्राज्य नर्मदेच्या उत्तरेस माळवा व रीवा संस्थानापर्यंत पसरलें होतें असें दिसतें. मेकल म्हणजे नर्मदेच्या उगमाजवळचा प्रदेश. नर्मदेला मेकलकन्या म्हणतात, कारण तिचा उगम मेकल पर्वतांतून झाला आहे. बह्मनी ताम्रपटांतहि भरतबल राजा मेकल देशावर राज्य करीत होता, असा उल्लेख आहे. तेव्हा त्या ताम्रपटांत त्याचा सम्राट् नरेंद्रसेन याचें वर्णन आल्यास त्यांत नवल नाही. वाकाटक नरेंद्रसेनाचा पुत्र द्वितीय पृथिवीषेण याच्या व्याघ्रदेव नामक सामन्ताचे दोन शिलालेख मेकल देशाच्या उत्तरेस पूर्वीच्या जसो संस्थानांत सापडले आहेत. त्यावरूनहि वाकाटकांचें साम्राज्य त्या भागांत पसरलें होतें हें दिसून येईल. वाकाटक नरेन्द्रसेन इ. स. ४५० ते ४७० या काळांत राज्य करीत असल्याने भरतबलाचा काळ सामान्यतः तोच मानण्यास हरकत नाही.

भरतबलानंतरचा या वंशाचा इतिहास अनुमानाने जुळवावा लागतो. द्वितीय पृथिवीषेणाच्या काळानंतर वाकाटकांच्या ज्येष्ठ पातीचें साम्राज्य संपुष्टांत आलें. त्यावेळीं मेकल देशाच्या उत्तरेस राज्य करणाऱ्या महाराज हस्ति नामक राजाने दक्षिणेचा बराचसा भाग आपल्या राज्यांत सामील केला असें दिसतें. कारण त्याच्या इ० स० ५१७ च्या ताम्रपटांत त्रिपुरी विषयांतील (जबलपूरजवळचा) गांव ब्राह्मणांना दान दिल्याचा उल्लेख आहे. या सुमारास त्याने पांडववंशीयांच्या मेकल देशावर स्वारी करून

तोहि काबीज केला असावा. कारण यानंतरचा पांडववंशीयांचा एकहि लेख मेकल देशांत अद्यापि मिळाला नाही.

यानंतरचे या वंशाचे लेख दक्षिण कोसल देशांत किंवा सध्याच्या मध्यप्रदेशाच्या छत्तीसगड विभागांत सापडले आहेत. या लेखाच्या आरंभीं उल्लेखिलेल्या राजीमच्या ताम्रपटावरून व रायपूर जिल्ह्यांतील इतर कोरीव लेखांवरून खालील वंशावळ ज्ञात झाली आहे.

पांडववंश किंवा **सोमवंश**



राजीमचा ताम्रपट तीवरदेव राजाचा असून तो वाकाटकांच्या ताम्रपटांप्रमाणे पेटिकाशीर्षक लिपींत (box-headed characters) लिहिला आहे. या ताम्रपटांत कोणत्याहि संवताचा उल्लेख नसल्याने डॉ. फ्लीट, डॉ. कील्हॉर्न वगैरेंनी अक्षरवटिकेवरून तीवरदेव आठव्या शतकांत होऊन गेला असावा असें अनुमान केलें होतें. हें अनुमान चूक असून तीवरदेव त्या काळापूर्वी निदान अडीचशें वर्षें इ० स० च्या सहाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास होऊन गेला असावा असें प्रस्तुत लेखकानें सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी प्रथम सप्रमाण दाखविलें. तो काळ आता सर्व-

मान्य झाला आहे. तेव्हा या राजवंशावळींतील पहिला पुरुष तीवरदेवाचा पणजा उदयन हा इ० स० ४८० ते ५०० या काळांत होऊन गेला असें दिसतें. बह्मनी ताम्रपट देणारा भरतबल उर्फ इन्द्र हा वाकाटक नरेन्द्रसेन याचा सामन्त असल्याने इ० स० ४५०–४७५ या काळांत झाला असावा, असें अनुमान करणें बहुधा चूक होणार नाही. त्याच्या मुलाचें नांव इंद्रबल हें आजाच्या (भरतबल उर्फ इन्द्र) नांवांसारखें आहे, यावरूनहि वरील अनुमान सयुक्तिक दिसेल.

या उदयनाचा एक शिलालेख पूर्वीच्या ग्वाल्हेर संस्थानांतील कालञ्जरच्या किल्ल्यांत विष्णूच्या देवालयावर लावलेला सापडला आहे. यावरून त्याच्या काळीं पांडववंशाचें मेकलदेशांतून उच्चाटन झालें नसावें असें दिसतें. त्याचा मुलगा इन्द्रबल याला मात्र मेकल देश सोडून कोसलदेशांत (छत्तीसगडांत) यावें लागलें. कोसलदेशांत त्यावेळीं शरभपुरचे राजे राज्य करीत होते. या वंशांतील महासुदेवराज नामक राजाच्या अलीकडे सापडलेल्या ताम्रपटांत एका इंद्रबल नामक महासामन्त–सर्वाधिकाऱ्याचें नांव आलें आहे. हा इंद्रबल पांडववंशी इन्द्रबलच दिसतो. तेव्हा मेकल देशांतून उच्चाटन झाल्यावर इंद्रबलाने छत्तीसगडांत येऊन शरभपुरच्या राजाचें मांडलिकत्व स्वीकारलें असें अनुमान करण्यास हरकत नाही. त्यानंतर लौकरच इंद्रबलाने आपल्या सम्राटास पदच्युत करून त्याचें राज्य बळकावलें व अशा रीतीने छत्तीसगडांतील आपल्या राज्याचा पाया घातला.

हा पांडववंश छत्तीसगडांत अनेक पिढया राज्य करीत होता हें मागें दिलेल्या वंशावळीवरून दिसून येईल. या राजांनी छत्तीसगडांत अनेक नगरें वसविलीं, देवालयें बांधलीं व मठ स्थापिले. आरंग, शिरपुर, खरोद, मल्लार वगैरे ठिकाणीं यांचे शिलालेख व ताम्रपट सापडले आहेत. त्यांवरून त्यांचा हिंदुधर्माप्रमाणे बौद्धधर्मासहि उदार आश्रय होता, असें दिसतें. रायपूर जिल्ह्यांतील श्रीपुर (सध्यांचें शिरपूर) ही यांची राजधानी होती. तेथें यांचे अनेक कोरीव लेख अद्यापि विद्यमान आहेत.

इ० स० च्या सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत चीनी यात्रेकरू युवन च्वांग हिंदुस्थानांत आला होता. त्यावेळीं त्याने कोसल देशाला भेट देऊन आपल्या प्रवासवर्णनांत तेथील राजधानी, राजा व लोक यांचें वर्णन केलें

आहे. त्यावेळचा पांडववंशी राजा महाशिवगुप्त हा होता. बालपणींच गादीवर आल्यामुळे याने जवळ जवळ साठ वर्षे राज्य केलें. हा धनुर्विद्येंत लहानपणापासून तरबेज असल्याने त्याला 'बालार्जुन' असें म्हणत. युवन च्वांगनें आपल्या काळचा कोसलदेशचा राजा क्षत्रियवंशी असून बौद्ध होता असें म्हटलें आहे. महाशिवगुप्ताने बौद्धधर्म स्वीकारला नव्हता; कारण त्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं दिलेल्या ताम्रपटांतहि त्याने आपलें 'परममाहेश्वर' असेंच वर्णन केलें आहे. तथापि त्याचा बौद्धधर्मासहि उदार आश्रय असल्याने त्या चिनी यात्रेकरूचा तसा समज झाला असावा.

महाशिवगुप्त-बालार्जुनानंतर लौकरच पांडववंशाचा दक्षिण कोसलदेशांत अस्त झाला. त्यानंतर त्या प्रदेशांत नलवंशीयांचें राज्य झालें. नलवंशी राजांचा एक शिलालेख राजीमच्या राजीवलोचनाच्या देवालयांत अद्यापि विद्यमान आहे. तो प्रस्तुत लेखकाने एपिग्राफिया इंडिकांत (पु. २६, पृ. ४९ इ.) प्रसिद्ध केला आहे. अक्षरवटिकेवरून त्याचा काळ इ. स. चें आठवें शतक हा येतो. त्यांत तीन–चार राजांचा उल्लेख आहे. त्यावरून नलवंशीयांनी महाशिवगुप्तानंतर लौकरच छत्तीसगडांत आपलें राज्य स्थापलें असें दिसतें.*

छत्तीसगडांतून उच्चाटन झाल्यावर पांडववंशाचें काय झालें तें निश्चितपणे सांगता येत नाही. छत्तीसगडाच्या पूर्वेस पूर्वीच्या पाटणा संस्थानांत व संबळपूर जिल्ह्यांत सापडलेल्या अनेक ताम्रपटांत सोमवंशाचा उल्लेख आहे. पांडव हे सोमवंशी होते व छत्तीसगडांतील कांही लेखांत त्या राजांना सोमवंशी असेंच म्हटलें आहे. शिवाय या संबळपुर–पाटणा प्रदेशांतील लेखांत महाशिवगुप्त हें नाम अनेक राजांनी धारण केलेलें दिसतें. त्यावरून पांडववंशी राजांनी छत्तीसगडांतून निघून संबळपूर–पाटणा या विभागांत राज्य स्थापिलें असें कांही विद्वानांचें म्हणणें आहे. कै. देवदत्तपंत भांडारकर यांचे मतें हे दोन राजवंश भिन्न होते. त्याचीं कारणेंहि त्यांनी दिलीं आहेत. या प्रश्नाचा विचार पुढे एखाद्या प्रसंगीं करूं.

---

* नलवंशाविषयी माहिती मागे (पृ. ७९ इ.) दिली आहे.

धाराधीश सिंधुराजाच्या चरित्रांतील एक प्रसंग*

हिंदी व विदेशी इतिहाससंशोधकांच्या अविरत प्रयत्नांमुळे माळ-व्याच्या प्रसिद्ध परमार घराण्यांतील विद्वान् व दानशूर राजांविषयीं पुष्कळ माहिती उपलब्ध झाली आहे. त्या घराण्यांतील सुप्रसिद्ध भोजराजाविषयी गेल्या दोन वर्षांच्या संमेलनांत धारानगरीचे विद्वान् संशोधक रा. लेले व रा. ओक यांनी दोन लेख वाचले होते. आज भोजराजाचा पिता सिंधुराज याविषयीं संस्कृत वाङ्मयांतील एका प्रसिद्ध काव्यावरून जी माहिती उपलब्ध होते ती येथील विद्वन्मंडळापुढे मांडीत आहे.

सिंधुराजाचा वडील बंधु वाक्पति-मुंज व पुत्र भोज यांचीं अनेक दानपत्रें प्रसिद्ध झालीं आहेत व संस्कृत वाङ्मयांतील अनेक ग्रंथांमध्ये त्यांच्याविषयी उल्लेख आले आहेत, त्यावरून या दोन्ही विद्वान्, गुणज्ञ व दानशूर राजांच्या कारकीर्दींतील पुष्कळ गोष्टी इतिहासज्ञांस परिचित झाल्या आहेत. पण सिंधुराजाचें तसें नाही. त्याचें एकहि दानपत्र उपलब्ध झालेलें नाही. कांही वर्षांपूर्वी धार संस्थानांत धरमपुरी येथे एक शिलाखंड सापडला होता. त्यावरील त्रुटित लेखांत नवसाहसांकदेवाचा उल्लेख आहे.† सिंधुराज आपल्या साहसप्रियतेमुळे‡ 'नवसाहसांक' या नांवानें प्रसिद्ध होता त्यावरून तो शिलालेख त्याच्या कारकीर्दींत कोरला गेला असावा. पण तो

---

* भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक, वर्ष १३, पृ. ३३-४५.

† डो. बी. डिस्कळकर—The Chronology of the Paramara Rulers of Malwa, Journal of Indian History, Vol. VI, Part I.

‡ नवसाहसांकचरित, ११, १०२.

अद्यापि अप्रकाशित असल्याने त्यांत सिंधुराजाविषयीं काय माहिती आली आहे तें सांगतां येत नाही.

सिंधुराजाच्या चरित्राचें मुख्य साधन म्हणजे तत्कालीन पद्मगुप्त उर्फ परिमल या कवीचें 'नवसाहसांकचरित' हें काव्य होय. संस्कृत वाङ्मयांत हें काव्य अत्यंत उत्कृष्ट असें गणलें गेलें आहे. याचा कर्ता पद्मगुप्त हा प्रथम मुंज व नंतर सिंधुराज यांच्या दरबारीं राजकवि होता. हें काव्य लिहिल्या-नंतर लौकरच त्याची सर्वत्र प्रसिद्धि व प्रशंसा झाली. पद्मगुप्ताचा समकालीन व 'दशरूपक' या नाट्यशास्त्रविषयक ग्रंथाचा टीकाकार धनिक याने आपल्या टीकेंत त्यांतून उदाहरणार्थ उतारे घेतले आहेत, यांत आश्चर्य नाही. पण ५०-७५ वर्षांत त्याची इतकी प्रसिद्धि झाली की, दूरच्या काश्मीर देशांतील प्रसिद्ध आलंकारिक मम्मट यानेहि आपल्या 'काव्यप्रकाश' या सर्वमान्य ग्रंथांत ठिकठिकाणीं उदाहरणाकरिता त्यांतून वेंचक पद्यें उद्धृत केलीं आहेत. इतरहि अनेक अलंकारशास्त्रावरच्या ग्रंथांत त्यांतून उतारे घेतलेले आढळतात.

असा हा सर्वोत्कृष्ट काव्यग्रंथ इ. स. १८८३ पर्यंत अज्ञात होता. त्यावर्षीं कै. पंडित वामनशास्त्री इसलामपूरकर यांनी भरतपूर येथे त्याची एक हस्तलिखित प्रत विकत घेतली व पुढे इ. स. १८९५ मध्ये बॉंबे संस्कृत सीरिजमध्ये त्यांनीं तें काव्य प्रकाशित केलें. हा ग्रंथ ज्ञात झाल्या-बरोबर त्याच्या उत्कृष्ट काव्यगुणांमुळे व त्यांतील ऐतिहासिक उल्लेखांमुळे युरोपीय पंडितांचें त्याच्याकडे लक्ष वेधलें व नंतर लौकरच इ. स. १८८६ मध्ये झखारिए व बुल्हर या विद्वानांनीं एका युरोपीय मासिकांत त्यावर वर्णनात्मक व चर्चात्मक विस्तृत निबंध लिहिला. त्याचें इंग्लिश भाषांतर इंडियन ॲंटिक्वरीच्या पु. ३६ मध्ये प्रसिद्ध झालें आहे. या निबंधाचा वर्णनात्मक भाग झखारिए याने व ऐतिहासिक चर्चात्मक भाग डॉ. बुल्हर याने लिहिला आहे. डॉ. बुल्हर याचा भारतीय प्राचीन इतिहासाचा व्यासंग सर्वश्रुत असल्याने त्याचा हा 'नवसाहसांकचरिता'वरील निबंध अद्यापि प्रमाणभूत मानण्यांत येतो. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या संस्कृतवाङ्मयेति-हासाच्या सर्व ग्रंथांत त्यांतील माहितीचा उपयोग केला आहे.

पण त्या लेखांत नवसहसांकचरितांतील सिंधुराज व त्याचे पूर्वज यांच्या दिग्विजयाबद्दल जे प्रत्यक्ष उल्लेख आले आहेत त्यांचेंच डॉ. बुल्हरने विस्तृत विवेचन केलें आहे. या काव्याचा मुख्य विषय जें सिंधुराजचरित तें यामध्यें इतक्या असंभाव्य रीतीने व पौराणिक पद्धतीने वर्णिलें आहे की, त्यांत कोणता व किती भाग ऐतिहासिक आहे हें तत्कालीन विश्वसनीय उत्कीर्ण लेखांच्या अभावीं आपणांस ठरवितां येत नाही अशी स्पष्ट कबुली डॉ. बुल्हरने प्रांजलपणे दिली आहे.* पण सध्या उपलब्ध झालेल्या उत्कीर्ण लेखांवरून या काव्यांत वर्णिलेला प्रसंग खरोखरीच घडला असला पाहिजे अशी खात्री होते.

यांतील कथानक येणेप्रमाणें:—

'परमारनृपति सिंधुराज विंध्यपर्वतावर शिकार करीत असतां शशिप्रभा नामक नागकन्येला पाहून मोहित होतो. नर्मदा नदीकडून सिंधुराजास कळतें की, शशिप्रभेचा पिता शंखपाल हा नागराजा पातालांत भोगवती येथे राज्य करीत असून त्याने 'जो कोणी माझा शत्रु असुरनृपति वज्रांकुश याचा पराभव करून त्याच्या उद्यानांतील सुवर्ण कमळें आणून देईल त्याला शशिप्रभा दिली जाईल' असा पण केला आहे. वज्रांकुशाची राजधानी रत्नवती ही नर्मदेच्या दक्षिणेस ५० गव्यूतींवर (२०० मैलांवर) आहे आणि तेथे जातांना वंकुऋषीचा आश्रम लागेल अशीहि माहिती नर्मदा नदीकडून सिंधुराजास मिळते. नंतर सिंधुराज रत्नचूड नामक नागयुवकाला एका ऋषीच्या शापाने प्राप्त झालेल्या शुक योनींतून मुक्त करतो आणि त्याच्या मार्फत शशिप्रभेला आपला संदेश पाठवतो. पुढे सिंधुराज रत्नवतीवर सैन्यासह चाल करतो. वाटेंत त्याला वंकु ऋषीचें तपोवन लागतें. तेथे त्याची विद्याधरनृपति शिखंडकेतु याचा पुत्र, शापाने मर्कटयोनि प्राप्त झालेला,

* Cf: 'The story from the personal history of Sindhuraja which represents the true object of Padmagupta's work is unfortunately surrounded with so thick a mythological covering that it is impossible, without the help of accounts containing only sober facts, to give particular details with certainty.' Ind. Ant., Vol. XL, p. 172.

शशिखंड याच्याशीं गांठ पडते. सिंधुराज शशिखंडाला मर्कटयोनींतून मुक्त करतो. तेव्हा शशिखंड आपलें विद्याधरसैन्य घेऊन सिंधुराजाच्या साहाय्यास येतो. नंतर ते सर्व रत्नवतीला वेढा घालतात. तेथील युद्धांत सिंधुराज वज्रांकुशाला ठार मारतो, व त्याच्या उद्यानांतील सुवर्ण कमळें भोगवतीस जाऊन नागराजास अर्पण करतो आणि शशिप्रभेशीं विवाह करतो. त्या प्रसंगीं शंखपाल त्वष्टयाने केलेलें स्फटिकाचें शिवलिंग सिंधुराजास भेट म्हणून देतो. नंतर सिंधुराज प्रथम उज्जैनीस व नंतर धारानगरीस जातो आणि तेथे त्या शिवलिंगाची स्थापना करतो.'

हर्षचरित व विक्रमांकदेवचरित या संस्कृतग्रंथांत ऐतिहासिक कथाभाग पुष्कळच आहे हें संशोधकांनी सिद्ध केलें आहे व मीहि राजशेखरशेखराच्या विद्धशालभञ्जिकेवरून तत्कालीन इतिहासावर कसा प्रकाश पडतो हें इतरत्र* दाखविलें आहे. प्रस्तुत काव्यांत राजाचें पातालांत जाणें, नर्मदा नदीने स्त्रीरूपाने राजाचें स्वागत करणें, रत्नचूड व शशिखंड यांचें अनुक्रमें शुक व कपि या योनींतून मुक्त होणें इत्यादि अद्भुत गोष्टी वगळल्यास बाकीचा कथाभाग ऐतिहासिक असेल असें सकृद्दर्शनींच वाटतें. सिंधुराजाने एका नागराजाच्या प्रोत्साहनावरून वज्रांकुश नामक असुरराजावर स्वारी केली, त्या कामांत त्याला एका विद्याधर राजकुमाराचें साहाय्य झालें, पुढे त्याने त्या नागराजाच्या कन्येशीं विवाह केला, या गोष्टी प्रस्तुत काव्यांत प्रमुख आहेत. यांतील नागराजा म्हणजे कोणी सर्पराजा नसून हिंदुस्थानांत सर्वत्र पसरलेल्या नागवंशांतील कोणी राजा असला पाहिजे अशी डॉ. बुल्हरलाहि कल्पना आली होती. वज्रांकुश हाहि कोणी ऐतिहासिक पुरुष असावा, कारण तसें नसतें तर त्याच्या राजधानीचें अंतर इतक्या निश्चितपणे दिलें नसतें; पण तो कोण असावा, तसेंच सिंधुराजाला साहाय्य करणारे विद्याधर हे कोण असावे हें सध्या तरी निश्चित करणें अशक्य आहे† असें एपिग्राफिया इंडिकामध्ये उदेपूर येथील मालवराज-

* संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. १८८–१९५ पाहा.

† Cf. Buhler's introduction to the Udepur Prasasti of the Rulers of Malwa, Ep. Ind., Vol. I, p. 232.

प्रशस्तीचें संपादन करतांना डॉ. बुल्हरने म्हटलें आहे. आपणांस सध्या असलेल्यां माहितीवरून विद्याधर राजकुमार शशिखंड हा कोणी स्वर्गीय पुरुष नसून शिलाहारवंशीय राजकुमार असावा असें म्हणतां येतें. कारण शिलाहार राजे आपणांस विद्याधरवंशीय जीमूतवाहनाचे वंशज म्हणवीत असत हें इतिहासज्ञांस माहीत आहे.* हे शिलाहार राजे कोठे राज्य करीत होते, त्यांचें सिंधुराजाशीं कां सख्य जमलें, वज्रांकुश हा असुर राजा कोठला, त्यावर सिंधुराजाने स्वारी करण्याचें कारण काय, शंखपालाची राजधानी कोठें होती इत्यादि गोष्टींचा निर्णय करण्यापूर्वी तत्कालीन इतिहासाचें विहंगमदृष्टया निरीक्षण करणें अवश्य आहे.

कल्याणीचे चालुक्य व धारचे परमार राजे यांचें कित्येक पिढया हाडवैर होतें, हें सर्वांस माहीत आहे. सिंधुराजाचा वडील भाऊ मुंज याने कल्याणीच्या चालुक्यांच्या घराण्याचा मूळ पुरुष तैलप याचा लढाईंत सहा वेळा पराभव केला; पण सातव्या खेपेस रुद्रादित्य नांवाच्या आपल्या मंत्र्याचा सल्ला न ऐकता त्याने गोदावरी पार करून चालुक्यांच्या राज्यांत प्रवेश केला. पुढे झालेल्या युद्धांत त्याचा पराजय होऊन तो पकडला गेला व कांही दिवसांनी तैलपाने त्याचा शिरच्छेद केला इत्यादि इतिहास मेरुतुंगाच्या 'प्रबंधचिन्तामणी'वरून आपणांस कळतो. इ. स. ९९५ च्या सुमारास मुंज मारला गेला असावा. मुंज निपुत्रिक असल्याने त्याच्यामागून त्याचा भाऊ सिंधुराज गादीवर आला. मुंज हा मोठा शूर, विद्वान्, रसिक व उदार होता. त्यामुळे त्याचा अशा भयंकर रीतीने शेवट झालेला पाहून सर्वांस हळहळ वाटली असेल. पण पुढे लौकरच सिंधुराजाने आपल्या पराक्रमाने चालुक्यांचा पराजय करून त्यांनी गिळंकृत केलेलें आपलें राज्य परत मिळविलें. याविषयीचा उल्लेख 'नवसाहसांकचरितां'त आला आहे; पण त्याकडे विद्वानांचें अद्यापि लक्ष गेलेलें दिसत नाही. तो उल्लेख असा:—

---

* Cf.–अतः स्वकीयपुण्योदयात्समधिगताशेषपञ्चमहाशब्दमहासामन्ताधिपतितगरपुरपरमेश्वरशिलाहारनरेन्द्रजीमूतवाहनान्वयप्रसूत ...... श्रीमच्छित्तराजदेवे। Ep. Ind., Vol. XII, p. 262.

आक्रान्तदिङ्मण्डलकुन्तलेन्द्रसान्द्रान्धकारान्तरितं रणे यः ।
स्वराज्यमस्त्रारुणमण्डलाग्रो गृहीतवान् दीधितिमानिवाहः ॥ १, ७४.

भावार्थ—ज्याप्रमाणे सूर्य दिङ्मण्डलास व्यापणाऱ्या अन्धकारापासून अरुणमण्डलाच्या साहाय्याने दिवसास मुक्त करतो, त्याप्रमाणेच सिंधुराजाने सर्व दिशा आक्रमण करणाऱ्या कुन्तलराजाकडून (चालुक्य राजाकडून) अस्त्रांनी रक्तवर्ण झालेल्या आपल्या तरवारीने स्वराज्य परत मिळविलें.

'नवसाहसांकचरितां'त दोन ठिकाणीं सिंधुराजाच्या पराक्रमाचें वर्णन आलें आहे. त्याने कोसल (हल्लींचा छत्तीसगड), लाट (मध्य व दक्षिण गुजराथ), वागड (कच्छचा पूर्वभाग), मुरल इत्यादि देशांच्या राजांचा व हूणाधिपतीचा पराभव केला होता असें या काव्यांत (सर्ग १०, १४–२०) वर्णन केलें आहे. तसेंच त्याने अपरान्त देशांतहि विजय मिळविला होता असें पद्मगुप्ताने वर्णिलें आहे. अपरान्त म्हणजे कोंकण. त्या वेळीं कोंकणांत शिलाहार राजे राज्य करीत होते. हे पूर्वी राष्ट्रकूटांचे मांडलिक होते. उत्तर चालुक्यांनी राष्ट्रकूटांचा उच्छेद केल्यावर इतर मांडलिकांप्रमाणे नवीन सम्राटापुढे मान न वांकवितां प्रथम प्रथम तरी त्यांनी स्वतंत्रपणे राज्य केलें. त्या वंशांतील अपराजितदेव नांवाचा राजा कोंकणांत राज्य करीत होता. याचे शके ९१५ व ९१९ (इ० स० ९९३ व ९९७) चे दोन ताम्रपट उपलब्ध आहेत. त्यांत त्याने प्रथम उत्तर चालुक्यांची वंशावळ न देतां आपले पूर्वीचे सम्राट् राष्ट्रकूट यांचीच वंशावळ दिली आहे व शेवटीं त्यांच्या उच्छेदाबद्दल अश्रु गाळले आहेत. इ० स० ९९७ नंतर चालुक्यांनी त्याचा पराभव केला असावा; कारण रण्ण नांवाच्या कानडी कवीच्या ग्रंथांत तैलपाचा मुलगा सत्याश्रय याने अपराजिताचा पुरा मोड केला असें वर्णन आहे. असो. यानंतर अपराजित लौकरच वारला. त्याला केशिदेव ऊर्फ अरिकेसरी व वज्जड असे दोन मुलगे होते. वज्जडाचा मुलगा छित्तराजदेव याच्या भांडुप येथे सापडलेल्या ताम्रपटावरून केशिदेव हा वडील भाऊ होता असें दिसतें.* तथापि त्याला राज्य न मिळतां तें वज्जडानेच

* Cf. तस्मादभूद्वज्जडदेवनामा ततोऽग्रजः श्रीकेशिदेवश्च । Ep. Ind., Vol. XII, p. 262.

चळकावलें. या वज्जडाचा एकहि लेख उपलब्ध नाही. याच्या उलट अरिकेसरी याने शके ९३९ (इ० स० १०१७) मध्ये दिलेला एक ताम्रपट सापडला आहे.* शिवाय त्याने दक्षिण कोंकणच्या शिलाहारांचा पराभव करून त्यांचें राज्य खालसा केलें होतें† व काठेवाडांत स्वारी केली होती‡ इत्यादि इतर ताम्रपटांतील उल्लेखावरून वज्जडाने थोडींच वर्षें राज्य केलें व नंतर केशिदेव ऊर्फ अरिकेसरी हा गादीवर आला असें दिसतें. सिंधुराजाची अपरांतांतील स्वारी वज्जडाच्या कारकीर्दींत झाली असावी व तिचें कारण केशिदेव ऊर्फ अरिकेसरी याने आपल्याला गादी मिळविण्याकरिता सिंधुराजाकडे मदतीची याचना केली असावी हें उघड दिसतें. अरिकेसरी हा आपल्या नांवाप्रमाणे शूर पुरुष होता. गादीवर आल्यावर लौकरच त्याने दक्षिण कोंकणचें राज्य काबीज केलें. 'नवसाहसांकचरितां'त वर्णिलेल्या शशिखण्डाचा पिता शिखण्डकेतु म्हणजे अरिकेसरीच असावा. संस्कृत कवींच्या संप्रदायाप्रमाणे पद्मगुप्तानेहि आपल्या काव्यांत समकालीन पुरुषांचीं नांवें किंचित् बदलून घातलीं आहेत असें दिसतें. शिखण्डकेतु व केशिदेव (अरिकेसरीचें दुसरें नांव) यांतील साम्य सहज लक्षांत येईल. तेव्हा अरिकेसरीने कृतज्ञतेने आपल्या मुलाबरोबर सैन्य पाठवून सिंधुराजास या स्वारींत मदत केली असावी हें उघड आहे.

यानंतर सिंधुराजानें ज्या नागराजाच्या शशिप्रभा नामक कन्येशीं विवाह करून सख्य संपादिलें तो कोठें राज्य करीत होता याचा विचार करूं. डॉ. बुल्हरच्या मतें हा नागराजा राजपुतान्यांत किंवा मध्य हिंदुस्थानांतील असावा.§ पण तें सयुक्तिक दिसत नाही. वज्रांकुशावर स्वारी करतांना सिंधुराजास नर्मदा पार करावी लागली व तसेंच पुढें जाऊन त्यानें शशिप्रभेशीं लग्न केलें यावरून शशिप्रभेचा पिता नर्मदेच्या दक्षिणेस कोठें तरी

---

* Thana Plates of Arikesarin, Asiatic Researches Vol. I p. 357.

† Fleet—Dynasties of the Kanarese districts, p. 538.

‡ Cf. Aparaditya's grant of Śaka 1049, ed. by Prof. Pathak, Bom. Br. of R. A. S., Vol. XXI, p. 505.

§ Ep. Ind., Vol. I, p. 229.

राज्य करीत असावा हें उघड आहे. शिवाय, इ. स. च्या तिसऱ्या चौथ्या शतकांत नागराजे उत्तर हिंदुस्थानांत राज्य करीत होते यांत संशय नाही; पण ते इ. स. च्या दहाव्या अकराव्या शतकांतहि उत्तर हिंदुस्थानांत प्रबळ होते याला पुरावा नाही. याच्या उलट त्या शतकांत सध्याच्या मध्यप्रदेशांतील कवर्धा व बस्तर या पूर्वीच्या दोन संस्थानांत नागराजे राज्य करीत होते याला शिलालेखाचा पुरावा आहे.* त्यांपैकी बस्तर संस्थानांत त्या वेळीं राज्य करणारे राजे विशेष प्रबल होते. ते आपणांस 'फणिवंशोत्पन्न' व 'भोगवतीपुरवराधीश्वर' म्हणवीत. 'नवसाहसांकचरितां'तहि शशिप्रभेस भोगवती नगरीला अदृश्य नागांनी नेलें व तेथेच तिचें पुढें सिंधुराजाशीं लग्न झालें असा कथाभाग आला आहे. ही भोगवती नगरी कोठें होती हें अद्यापि निश्चित झालें नाही. तथापि ती बस्तर संस्थानांतच कोठें तरी असावी असें वाटतें. या राजांची त्या वेळची चक्रकोटय ही राजधानी होती.† चक्रकोटय नगराचा अनेक शिलालेखांत व बिल्हणाच्या 'विक्रमांकदेवचरितां'तहि‡ उल्लेख आला आहे. त्यावरून त्याचें तत्कालीन इतिहासांत महत्त्व दिसून येतें. या कालाच्या सुमारास तेथें नृपतिभूषण नांवाचा राजा राज्य करीत होता असें एका शिलालेखावरून समजतें.§

चक्रकोटयनगराधिप नागराजाच्या मुलीशीं विवाह करून सख्य संपादन करण्यांत सिंधुराजाचा कोणता उद्देश असावा याचा आता विचार करूं. सिंधुराज गादीवर आल्यावर लौकरच तैलप वारला. त्याचा मुलगा सत्याश्रय हा महान् योद्धा व शूर पुरुष होता. पण याच्या सबंध कारकीर्दीत याला तत्कालीन बलाढय चोलराजांशीं झगडावें लागलें. या अवकाशांत

* See Rai Bahadur Hiralal's Descriptive List of Inscriptions in C. P. and Berar (Second Edition), p. 154 and 174.

† ही चक्रकोटय नगरी बस्तर संस्थानच्या मध्यभागीं होती हें रा. ब. हिरालाल यांनी सिद्ध केलें आहे. त्यांचें List of C. P. Inscriptions, पृ. १६४ पाहा.

‡ विक्रमांकदेवचरित, सर्ग ४, श्लोक ३०.

§ See Errakot Telagu Inscription, R. B. Hiralal's List of C. P. Inscriptions, p. 166.

सिंधुराजानें संधि साधून आपला गेलेला मुलुख मिळविला व कोंकणच्या राज्यावर आपला स्नेही बसवून उत्तरेस चालुक्यांच्या सत्तेला पायबंद घातला. इ. स. १००८ मध्ये सत्याश्रय वारला. त्यानंतर पुढील सहा वर्षांत दशवर्मन्, पांचवा विक्रमादित्य व अय्यण असे तीन राजे होऊन गेले, त्यावरून त्या काळांत चालुक्यांच्या राज्यांत कशी बंडाळी व अव्यवस्था माजली होती याचें अनुमान करतां येतें. तेव्हा परमारांच्या सत्तेला चालुक्यांकडून उपसर्ग पोंचणें शक्य नव्हतें हें उघड आहे. पण या चालुक्यांच्या निर्बलतेमुळे दक्षिणच्या चोल राजांची सत्ता याच वेळीं प्रबळ झाली. या काळांत चोल वंशांतील महान् व महत्त्वाकांक्षी राजराजदेव व त्यानंतर त्याचा पुत्र पहिला राजेंद्रचोलदेव हे राज्य करीत होते. यांपैकी पहिल्या राजाने वेंगी, कूर्ग, पांडय, सिंहल इत्यादि देश जिंकून आपली सत्ता वाढविली* व दुसऱ्यानें पुढें उत्तर हिंदुस्थानांत स्वारी करून बंगालच्या महीपालाचा पराभव केला व गंगानदीपर्यंत दिग्विजय केला. यावरून त्यांच्या महत्त्वाकांक्षेची व शौर्याची कल्पना येईल. चोलांच्या या वाढत्या सत्तेचें नियमन करण्याकरितां चक्रकोटयाच्या नागराजाचें साहाय्य असणें जरूर होतें व त्याकरितांच सिंधुराजाने हा विवाहसंबंध घडवून आणला असावा.

या विवाहसंबंधावरून नागराजाचाहि फायदा झाला, हें 'नवसाहसांकचरिता'वरून स्पष्ट दिसून येतें. वज्रांकुश या आपल्या बलाढय शत्रूचा नाश करण्याकरिता नागराजास कोणाचें तरी साहाय्य अवश्य असून तें सिंधुराजाने दिलें असावें. वज्रांकुशाच्या क्रीडावापींतील सुवर्णकमळें शशिप्रभेच्या कर्णाभरणार्थ मागण्यांत शंखपालाच्या मनांत त्याचा नाश, पुरा पाडाव किंवा निदान मानहानि तरी व्हावी हाच हेतु असावा, यांत संशय नाही. हा वज्रांकुश म्हणजे रतनपुरच्या कलचुरींचे शिलालेख व ताम्रपट यांवरून ज्ञात झालेला छत्तीसगडांतील कोमोमण्डलाधिपति वज्जूक†

---

* Smith–Early History of India (Third Edition), p. 465.

† कोमोमण्डलभूभर्तुर्वज्जूकस्य श्रुता सुता । नोनल्ला रत्नराजेन परिणीता नृपश्रिया । Ep. Ind., Vol. I, p. 22.

किंवा एका ताम्रपटांत म्हटल्याप्रमाणें वज्रुवर्मन्* हाच असावा. या बाबतींत कवीने स्वकालीन ऐतिहासिक व्यक्तींच्या नांवांत थोडा फरक करून त्यांचें संस्कृत रूप योजिलें आहे हें सहज ध्यानांत येईल. इ. स. १११४ मध्ये लिहिलेल्या पहिल्या जाजल्लदेवाच्या शिलालेखावरून ह्या वज्जूकाने आपली मुलगी नोनल्ला ही जाजल्लदेवाचा पितामह रत्नदेव याला दिली होती व या लग्नसंबंधाने रत्नदेव प्रबळ झाला होता असें दिसतें. या कारणामुळे रत्नदेवाच्या वंशजांच्या अनेक लेखांतून—गुप्तांच्या लेखांत लिच्छविकुलोत्पन्न कुमारदेवीचें नांव येतें त्याप्रमाणे—या विवाहाचा गौरवपर उल्लेख आला आहे.† रत्नदेवाचा पिता कमलराज हा त्रिपुरीच्या गांगेयदेवाचा समकालीन होता.‡ गांगेयदेवाचा भोजाने पराभव केला होता.§ म्हणून कमलराज हा भोजाचा समकालीन ठरतो. तेव्हा कमलराजाचा व्याही सिंधुराजापेक्षा वयाने थोडा लहान पण समकालीन असणें शक्य आहे. वज्रांकुश म्हणजेच वज्जूक असें मानण्यास दुसरेंहि एक कारण आहे. रत्नवतीवर चाल करतांना सिंधुराजास वाटेंत वङ्कमुनीचा आश्रम लागला असें या काव्यांत वर्णन आहे. छत्तीसगडांतील कलचुरींच्या शाखेची प्रथम तुम्माण ही राजधानी होती हें उत्कीर्ण लेखांवरून सिद्ध झालें आहे. या तुम्माणांत वङ्केश्वर या नांवाचें एक शिवालय होतें.¶ त्याची प्रसिद्धि

---

* नोनल्लाख्या प्रिया तस्य शूरस्येव हि शूरता । कोमीमण्डलनाथस्य सुता या वज्रूवर्म्मणः ॥ Amoda Plates of Prithvideva I, Ep. Ind., Vol. XIX, p. 79.

† Cf. Amoda Plates of Jajalladeva II, Ep. Ind., Vol. XIX, p. 209.

‡ गाङ्गेयदेवविभवे समदाच्छ्रियं यः।, Ep. Ind., XIX, p. 76.

§ See Dhar Praśasti of Arjunavarmadeva, Ep. Ind., Vol. VIII, p. 96.

¶ श्रीवङ्केशसुरालयप्रभृतयो रत्नेश्वराद्यास्तथा यत्रोद्यानमसङ्ख्यपुष्पसुफलं चारूच्चमाम्रं वनम् । रत्नेशेन ससौधसद्मनिचितश्चारुश्रिया भूषितस्तुम्माणः समकारि लोचनसुखः संवीक्ष्यमाणो जनैः ॥ Ep. Ind., Vol. I, p. 32.

इतकी होती की तुम्माण नगराला वङ्कोतुम्माण असें नांव एका ताम्रपटांत आलें आहे.* हा वङ्केश्वर कोणा वङ्कुमुनीनें स्थापिला असल्याचा संभव आहे. निदान वङ्केश्वर या नांवावरून रत्नवतीवर चाल करून जातांना वाटेंत वङ्कुमुनीचा आश्रम घालण्याची कल्पना कवीला सुचली असावी असें आपणांस म्हणतां येईल. हें वङ्केश्वरालय जेथें होतें तें तुम्माण नगर फार प्राचीन आहे. इ. स. नवव्या शतकांत त्रिपुरी (सध्यांचें जबलपुराजवळचे तेवर) येथील कलचुरींच्या घराण्यांतील एका शूर पुरुषाने तेथे आपली राजधानी केली होती व पुढे अकराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास रत्नदेवाने ती दुसरीकडे नेईपर्यंत ती त्याच्या वंशजांची राजधानी होती, असें दिसतें. अर्थात् आपल्या कथानकाच्या वेळीं तें शहर भरभराटींत होतें यांत संशय नाही. हें शहर प्रथम काबीज करून नंतर रत्नवतीवर सिंधुराजानें चाल केली असावी असें वाटतें.

वरील विवेचनावरून रत्नवती हें सध्याचें रतनपुरच असावें असें कोणालाहि सकृद्दर्शनीं वाटेल; पण यावर एक आक्षेप संभवतो, तो हा की, रतनपुर हें सिंधुराजानंतर थोड्या वर्षांनी होऊन गेलेल्या रत्नदेवाने वसविलें असा स्पष्ट उल्लेख कित्येक उत्कीर्ण लेखांत आला आहे.† यावर असें उत्तर देतां येईल की रतनपूर हें महाभारतकाळचें मणिपुर—जेथे एका नागराजाच्या चित्रांगदा नामक कन्येशीं अर्जुनाने लग्न केलें व तिच्यापासून त्यास बभ्रुवाहन नांवाचा शूर पुत्र झाला तें—होय, अशी समजूत फार प्राचीन काळापासून रतनपुरांत प्रचलित आहे असें जनरल कनिंग्ह्यामचा सहाय्यक बेग्लर याने आपल्या आर्किआलॉजिकल सर्व्हे रिपोर्टांत म्हटलें आहे.‡ तें खरें असल्यास रत्नदेवाने नवीन शहर वसविलें नसून मणिपुर

---

* त्रिपुरीशानुजस्यासीद्वंकोतुम्माणभूभुजः । कलिंगराजस्तत्सूनुरासीत्कमलराड् नृपः । Ind. Hist. Quarterly, Vol. IV, p. 31.

† व्यधापयन्मां भुवि रत्नराजः श्रेष्ठी यशश्चेदधितिष्ठति स्म । वक्तीत्यदो रत्नपुरं समन्तान्मत्तोऽनयोर्यातु यशस्त्रिलोकम् ॥ Ep. Ind., Vol. I, p. 32.

‡ Archaeological Survey of India Reports, Vol. X, p. 216.

या प्राचीन शहरास रत्नपुर हें नांव दिलें असें मानण्यास हरकत नाही. रतनपुर हें तुम्माणपासून ४५ मैलांवर आहे. रतनपुरच्या उत्तरेस सुमारें ३० मैलांवर कोमो नांवाचा गाव आहे. त्यावरून कोमोमंडळांत रतनपुरचा अंतर्भाव होत असावा व तेथेच वज्जूकाची राजधानी असावी असें अनुमान करता येतें. 'नवसाहसांकचरितां'त नर्मदा नदीच्या भाषणांत 'येथून पन्नास गव्यूतींवर (म्हणजे सुमारें २०० मैलांवर) रत्नवती नांवाची वज्रांकुशाची राजधानी आहे' असा स्पष्ट निर्देश आला असून तो वस्तुस्थितिनिदर्शक असावा. सिंधुराजाने नर्मदा कोणत्या ठिकाणीं पार केली हें या काव्यांत सांगितलें नाही. तथापि ओंकार मांधाता या पवित्र स्थळाच्या आसपास सिंधुराजानें नर्मदा नदी ओलांडली असल्यास तेथून रतनपुर सुमारें २०० मैलच अंतरावर पडेल असें वाटतें.

सिंधुराज सुमारें इ. स. ९९५ मध्ये गादीवर आला. पण तो किती वर्षें राज्य करीत होता याविषयी विद्वानांत एकमत नाही. त्याचा पुत्र सुप्रसिद्ध विद्वान् व दानशूर भोज याने ५५ वर्षें ७ महिने ३ दिवस राज्य केलें असें 'भोजप्रबंधां'त म्हटलें आहे. भोजानंतर गादीवर आलेल्या जयसिंहाचा वि. सं. १११२ (इ. स. १०५६) चा एक ताम्रपट उपलब्ध झाला आहे, त्यावरून भोज निदान वि. सं १९११ (इ. स. १०५५) मध्ये कालवश झाला असावा व भोजप्रबंधकर्त्यांने दिलेली कालगणना खरी मानल्यास तो इ. स. १००० च्या सुमारास गादीवर आला असावा असें अनुमान निघतें.* पण या कालगणनेने सिंधुराजाच्या कारकीर्दीस चारच वर्षें उरतात. या चार वर्षांत लाट, वागड, अपरान्त इत्यादि ठिकाणच्या राजांवर व हूण नृपतीवर त्याने विजय मिळविला, छत्तीसगडांत स्वारी करून वज्जूकाचा पराभव केला व चक्रकोटय नगराच्या राजकन्येशीं विवाह केला; नंतर 'नवसाहसांकचरितां'त शेवटीं म्हटल्याप्रमाणें† पद्मगुप्ताने राजाज्ञेने हें विविध अलं-

* See D. B. Diskalkar—The Chronology of the Paramara Rulers of Malwa. Journal of Indian History, Vol. IV, Part I.

† यच्चापरं किमपि मन्दधिया मयैवम् आसूत्रितं नरपते नवसाहसाङ्क। आज्ञैव हेतुरिह ते शयनीकृतोग्रराजन्यमौलिकुसुमा न कवित्वदर्पः॥

कारांनी नटलेलें अठरा सर्गांचें काव्य लिहिलें, इतक्या गोष्टी घडल्या असणें संभवनीय दिसत नाही. 'नवसाहसांकचरितांत'त भोजाच्या नांवाचा उल्लेख नाही तेव्हा भोज त्यावेळीं युवराज झाला नव्हता, असें डॉ. बुल्हरने अनुमान काढलें आहे व सिंधुराजानें इ. स. ९९५ ते १०११–२ पर्यंत राज्य केलें असावें असें म्हटलें आहे.* शशिप्रभा या नागकन्येवर सिंधुराजाचें फार प्रेम होतें व म्हणूनच त्याने पद्मगुप्तास तिजविषयी हें काव्य रचण्यास आज्ञा केली. कदाचित् भोज हा तिच्याच पोटीं आला असावा. तसें असल्यास सिंधुराजाची कारकीर्द सुमारें इ. स. १०१५ पर्यंत चालली असावी.†

येथवर 'नवसाहसांङ्कचरिता'वरून सिंधुराजाविषयी आपणांस काय माहिती मिळते तें आपण पाहिलें. या लेखाचा शेवट करण्यापूर्वी सिंधुराजाने कोंकणाच्या कारभारांत जो हात शिरकवला त्याचें पुढे काय परिणाम झाले हेंहि पाहाणें अप्रस्तुत होणार नाही असें वाटतें. सिंधुराजानंतर लौकरच अरिकेसरी हाहि वारला असें दिसतें. त्यानंतर त्याच्या मुलास गादी न मिळता कांही कारस्थानाने त्याचा पुतण्या छित्तराजदेव याने ती बळकाविली असावी. इकडे धारच्या गादीवर भोज बसला होता. आपल्या पित्याचा मित्र व साहाय्यक अरिकेसरी याच्या मुलाचा हक्क छित्तराजाने दूर सारला असें पाहतांच भोजाने कोंकणावर चाल केली व तेथील राजाचा पराभव करून कोंकण आपल्या ताब्यांत घेतलें. कोंकण जिंकल्या वेळेस व तें आपल्या अमलाखाली असतांना असे दोन ताम्रपट भोजाने वि. सं. १०७६ (इ. स. १०१९) या एकाच वर्षीं दिलेले उपलब्ध आहेत.‡ भोजाचें वय या वेळीं पंधरा वीस वर्षांचें

---

* Ep. Ind., Vol. I, p. 282.

† व्हिन्सेंट स्मिथच्या मतें सिंधुराज १०१८ पर्यंत राज्य करीत होता. पण इ. स. १०१८ च्या पूर्वीं चालुक्य जयसिंहाने भोजाचा पराभव केला होता. म्हणून १०१५ च्या सुमारास भोज गादीवर आला असावा असें वाटतें. रा. नानासाहेब वैद्य यांचे मतें सिंधुराज इ. स. १०१० पर्यंत गादीवर होता. History of Mediaeval Hindu India, II, p. 123.

‡ Ep. Ind., Vol. XI, p. 181, and Vol. XVIII, p. 320.

असावें. इतक्या लहान वयांत कोंकणासारख्या दूरच्या प्रदेशांत भोजानें स्वारी करण्याचें कारण काय झालें असावें याचा विद्वानांस समाधानकारक उलगडा झालेला नाही. डॉ. देवदत्तपंत भांडारकर हे तैलपाने केलेल्या मुंजाच्या वधाचा सूड घेण्याकरिता भोजाने ही स्वारी केली असावी असें म्हणतात;* पण तें सयुक्तिक दिसत नाही. यावेळीं मुंजाच्या वधास चोवीस वर्षें होऊन गेलीं होती. शिवाय कोंकणचे शिलाहार आपल्या शासनांत उत्तर चालुक्यांची वंशावळ देत नसल्याने ते त्यांचें मांडलिकत्व कबूल करीत असावे असें दिसत नाही. तेव्हा चालुक्यांवर सूड उगविण्याकरिता शिलाहारांच्या मुलखावर स्वारी करणें म्हणजे वड्याचें तेल वांग्यावर काढण्यासारखेंच झालें असतें. तेव्हा या स्वारीची उपपत्ति मागे सांगितल्या-प्रमाणे लाविली पाहिजे.

कोंकण फार दिवस भोजाच्या किंवा त्याने गादीवर बसविलेल्या अरिकेसरीच्या मुलाच्या ताब्यांत राहिलें असावें असें दिसत नाही. कारण पुढे पांच वर्षांनी उत्तर चालुक्य वंशांतील जयसिंहाने कोंकणाधिपतीचा पराभव केला, असें त्याच्या इ. स. १०२४ च्या मिरज येथील दानपत्रावरून दिसतें.† कोकणप्रांत जिंकून जयसिंहाने छित्तराजास दिला असावा, कारण पुढे दोनच वर्षांनी (इ. स. १०२६) छित्तराजाने आपला भांडुपचा ताम्रपट दिला आहे.‡ असो.

याप्रमाणे शिलालेख व ताम्रपट यांच्या साहाय्याने 'नवसाहसांक-चरितां'त वर्णिलेलें कथानक ऐतिहासिक आहे असें निर्विवादपणे आपणांस म्हणतां येतें.

---

* Ind. Ant., Vol. XLI, p. 201.

† cf. सप्तकोंकणाधीश्वराणां सर्वस्वं गृहीत्वा उत्तरदिग्विजयार्थं कोल्लापुरसमावासितनिजविजयस्कंधावारे &c., Ep. Ind., Vol. XII p. 303.

‡ Ep. Ind., Vol. XII, p. 250.

हेमाद्रीचा अंतकाल*

रामदेवराव यादवाचा करणाधिप व 'चतुर्वर्गचिन्तामणि' इत्यादि संस्कृत ग्रंथांचा कर्ता हेमाद्रि किंवा हेमाडपंत यांचें नांव सुविख्यात आहे. याने विद्वानांना उदार आश्रय दिला, स्वतः अनेक विषयांवर ग्रंथरचना केली, मोडी लिपि प्रचलित केली व स्वतःच्या नांवाने पुढे प्रसिद्ध झालेली 'हेमाडपंती' स्थापत्यपद्धति प्रचारांत आणली. या विविध कामगिरीमुळे त्याचें नांव भारतीय इतिहासांत चिरस्मरणीय राहील. असा हा महापण्डित यादवनृपति महादेव व रामदेव यांच्या दरबारीं त्यांचा करणाधिप किंवा लेखनाध्यक्ष व मन्त्री म्हणून होता, असें त्याच्या स्वतःच्या व त्याचा आश्रित बोपदेव याच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून दिसतें. त्यावरून तो इ. स. च्या तेराव्या शतकाच्या द्वितीयार्धांत होऊन गेला यांत संशय नाही. त्याच्या आयुष्यांतील इतर घटनांविषयी मात्र आपणांस विशेष माहिती नाही. पण अलीकडे डॉ. कोलते यांनी महानुभावी वाङ्मय व 'महिकावतीची बखर' यांतील कांही उल्लेखांवरून त्याच्या अंतकाळच्या प्रसंगावर प्रकाश पाडला आहे, त्याविषयीं थोडक्यांत चर्चा प्रस्तुत लेखांत करावयाची आहे.

हेमाद्रीच्या अंतासंबंधीं डॉ. कोलते यांचें मत

'नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल'च्या सन १९४१ च्या अंकांत 'हेमाद्रीचा निधनकाल' या शीर्षकाखालीं डॉ. कोलते यांनीं एक टिप्पण लिहिलें आहे, त्यांत त्यांनी खालील माहिती दिली आहे:

"महानुभावपंथ-संस्थापक श्रीचक्रधर याचा जीवनचरित्रविषयक 'लीळाचरित्र' नामक ग्रंथ इ. स. १२७६ ते १२८६ या काळांत केव्हा तरी

---

* नवयुग, पुणें, वर्ष ३ (१९४९), अंक २, पृ. २०-२४.

लिहिला गेला. याच्या जाखोत्रा पाठांत हेमाद्रीचा अंत हृदयद्रावक रीतीने कसा व केव्हा झाला याविषयीं माहिती मिळते. श्रीचक्रधर हा द्वैतमार्गाचा उपदेश करी. विद्वान् लोकांमध्यें त्याच्या पंथाचा पुष्कळ प्रसार होऊं लागला. त्यामुळें शंकराचार्यांच्या अद्वैतमार्गावरून लोकांचें लक्ष उडालें. तेव्हा यादवांचा उपाध्याय ब्रह्मसानु व हेमाद्रीचा उपाध्याय महदाश्रम यांना त्याचें वैषम्य वाटून त्यांनी चक्रधराला विषप्रयोग करण्याचा प्रयत्न केला; पण तो फसला म्हणून महदाश्रम याने आपला शिष्य हेमाद्रि यास चक्रधराचा कसेंहि करून नाश करण्याचा आदेश दिला. तेव्हां हेमाद्रीने चक्रधरावर कांही सैन्य पाठविलें; पण चक्रधर व त्याचा शिष्य नागदेव यांनी त्याचा मोड केला. नंतर हेमाद्रीला पश्चाताप होऊन त्याने चक्रधराला देवगिरीस बोलावलें. तिकडे जात असतां वाटेंत खोकर गावीं मेघगर्जना व विजांचा कडकडाट होऊन चक्रधर त्यांत अदृश्य झाला.

"वरील वृत्तांतांत चक्रधर अदृश्य झाला, असें म्हटलें आहे, पण खरोखरी त्याचा खून झाला होता; व तसें कांही पोथ्यांत म्हटलेंहि आहे. महानुभाव पंथसंस्थापक व ईश्वरी अवतार म्हणून अनेकांस पूज्य वाटणाऱ्या चक्रधराचा असा दगलबाजीनें खून झाल्याचें ऐकतांच रामदेवरावाचा क्रोध अनावर होऊन त्यानें हेमाद्रीची सर्व मालमत्ता जप्त केली, त्याच्या घरावर नांगर फिरविला व त्याला लागलीच देहांताची शिक्षा दिली. हेमाद्रीचा अत्यंत क्रूरपणें अंत करण्यांत आला. त्याच्या अंगाचें कातडें सोलून व उपाशीं ठेवून त्याला हालहाल करून ठार मारण्यांत आलें.

" महानुभाव ग्रंथांत दिलेल्या हेमाद्रीच्या हृदयद्रावक अंताच्या या वृत्तांतास 'महिकावतीच्या बखरीं'त दुजोरा मिळतो. या बखरींत म्हटलें आहे की, 'रामचंद्र राजा राज्य करीत असतां ब्रह्महत्त्येच्या दूषणाने मोठें अशुभ झालें. त्यायोगें त्याचा शक्तिक्षय होऊन तुर्कांनी त्याचा पाडाव केला' (महिकावतीची बखर, पृ० ८१). बखरींतील या वृत्तांतांत रामदेवरावाने कोणा ब्राह्मणास मारलें याचा निर्देश नाही. तथापि महानुभावीय ग्रंथांतील वर्णनावरून तो हेमाद्रीच होता याविषयी संशय राहत नाही. चक्रधराचा खून झाल्यावर हेमाद्रीस लवकरच ठार मारण्यांत आलें असावें. चक्रधराचा

खून शके ११९८ किंवा इ० स० १२७६ मध्ये झाला. तेव्हा हेमाद्रीचा निधनकाल यानंतर लौकरच असला पाहिजे."

डॉ. कोलते यांनी प्रस्तुत मत प्रतिपादिल्याला आज आठ वर्षें झालीं. या अवधींत त्यावर कोणी आक्षेप घेतलेला माझ्या वाचनांत आला नाही. अलीकडे 'नवभारतां'तील (ऑगस्ट १९४८) लेखांत त्यांनी हेंच मत पुनः प्रतिपादिलें आहे. सत्यान्वेषणार्थ त्याचा थोडया बारकाईने विचार करूं

डॉ कोलते यांचा पुरावा डळमळीत

श्री. ह. ना. नेने यांनी 'लीळाचरित्र' हा ग्रंथ मोठ्या परिश्रमाने संपूर्ण प्रकाशित केला आहे. त्यामध्ये हेमाद्रीच्या वरील कारवाईचा निर्देश नाही. त्यामुळे या वृत्तांताविषयी संशय उत्पन्न होतो. 'लीळाचरित्रा'च्या उत्तरार्धांतील (पृ० २७७) ५०३ या लीळेंत 'चक्रधराने आपणांस राजाचें बोलावणें येईल व तेथे गेल्यावर आपणांस लोटून देतील' असें सांगितल्याचा उल्लेख आहे. पुढील लीळेंत चक्रधर राजाकडे गेल्यावर त्याच्या बरोबरच्या भटोबासांवर लाठीहल्ला झाल्याचें वर्णन आहे. पण चक्रधर त्या दंगलींत प्राणास मुकल्याचें सांगितलें नाही. इतकेंच नव्हे तर तो उत्तरदिशेस निघून गेला; जातांना विंध्यपर्वत ओलांडीत असतां त्याची व गोदातीरनिवासी चाटे लोकांची भेट झाली; त्याने त्यांस आपल्या शिष्यांस सांगण्याकरिता संदेश दिला, इत्यादि वर्णन आहे. पुढे चक्रधर उज्जैनीस गेला असेंहि म्हटलें आहे. या सर्व वर्णनावरून चक्रधर त्या दंगलींतून वाचून उत्तरहिंदुस्थानांत निघून गेला असें दिसतें. श्री. नेने सांगतात की, आपण 'लीळाचरित्रा'च्या अनेक प्रति पाहिल्या, पण त्यामध्ये कोठेंहि जाखोबा पाठांतल्यासारखें वर्णन आढळलें नाही. विशेष लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही की 'लीळाचरित्रा'च्या प्रचलित पाठांत चक्रधराला बोलाविलें तें राजाने, असें स्पष्ट म्हटलें आहे. या सर्व प्रकरणांत कोठेहि हेमाद्रीचा नामनिर्देश नाही, त्याला जिवंत सोडल्याचें वर्णन तर नाहीच नाही !

'महिकावतीच्या बखरीं'त ब्रह्महत्येमुळे रामचंद्राच्या राज्याचा नाश झाला असें म्हटलें आहे खरें. पण तीमध्ये ज्याची हत्या झाली तो ब्राह्मण हेमाद्रि होता असें सांगितलें नाही. शिवाय त्या बखरींतील वर्णन ऐतिहासिक

कसोटीस उतरत नाही. या बखरीची सहा प्रकरणें असून तीं भिन्न भिन्न काळीं रचलीं गेलीं, असें कै. राजवाड्यांनी आपल्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. देवगिरीच्या युद्धाचें वर्णन भगवान् दत्ताने केलें असें तींत म्हटलें आहे. पण ती हकीकत सुमारें शके १५०० नंतर लिहिली असावी, असें कै. राजवाड्यांचें अनुमान आहे. अर्थात् हें वर्णन यादवकाळापासून सुमारें तीनशें वर्षांनंतर लिहिलें होतें. इतक्या दीर्घावधीनंतर यादवकालीन घटना यथातथ्य लोकांच्या स्मरणांत राहिल्या असतील, हें संभवनीय वाटत नाही. या बखरींतला यादव वंशाचा इतिहास तत्कालीन कोरीव लेखांतील माहितीशीं अगदीच जुळत नसल्यामुळे सर्वस्वी त्याज्य होय, हेंहि कै. राजवाड्यांनीच दाखविलें आहे. 'भगवान् दत्ताला व पांचव्या प्रकरणाच्या कर्त्याला रामदेवरावाच्या म्हणून ज्या वंशावळी वाटल्या त्या त्या राजांच्या नाहीत. ह्या ठिकाणीं भगवान् दत्त व पांचव्या प्रकरणाचा कर्ता हे सपशेल घसरले' असें कै. राजवाडे यांनी स्पष्ट म्हटलें आहे (प्रस्तावना, पृ० ७४). राजवंशावळीसारख्या महत्त्वाच्या बाबींत जी बखर इतकी अविश्वसनीय, तिच्यांतील इतर विधानांवर विश्वास कसा ठेवावयाचा ?

येथवर हेमाद्रीच्या हृदयद्रावक अंताविषयी ज्या पुराव्यावर डॉ. कोलते यांनी भिस्त ठेवली तो कसा डळमळीत आहे तें दाखविलें. पण याहिपुढे जाऊन हेमाद्रीला शके ११९८ (सन १२७६) मध्ये हृदयद्रावक पद्धतीने राहोच, पण कोणत्याहि रीतीने मृत्यु प्राप्त झाला नव्हता, एवढेंच नव्हे तर तो त्यापुढे कित्येक वर्षें रामदेवरावाचा करणाधिप म्हणून अधिकारी होता हें एका निर्विवाद पुराव्यावरून सिद्ध करतां येतें. त्याजकडे आता वळूं.

चक्रधरामागून हेमाद्रि नऊ वर्षें तरी होता

चक्रधराच्या उत्तरापथीं निर्याणाच्या मितीबद्दल महानुभावांच्या ग्रंथामध्ये एकवाक्यता नाही. तथापि त्यांतल्या त्यांत तीर्थमालिकेंत दिलेला शके ११९४ (इ० स० १२७३) अंगिरा संवत्सर, माघ वद्य ४ मंगळवार, हा विश्वसनीय दिसतो. कारण यांत शकवर्षाचा, संवत्सराचा व तिथिवारांचा वेळ जमतो. पण लीळाचरित्र व रत्नमालास्तोत्र यांतील सिंहस्थाचा

उल्लेख प्रमाण मानून व तेथपासून कालगणना करून चक्रधराने शके ११९८ मध्ये उत्तरेकडे गमन केलें असें डॉ. कोलते यांनी ठरविलें आहे.* यापैकी कोणताहि काल खरा म्हणून स्वीकारला तरी चक्रधराच्या खुनामुळे किंवा खुनाचा प्रयत्न केल्यामुळे हेमाद्रीला निर्दयपणाने ठार मारण्यांत आलें असल्यास ती घटना शके ११९८ मध्ये किंवा शके ११९९ या वर्षी तरी झाली असली पाहिजे. त्यानंतर कित्येक वर्षें स्वस्थ बसून मग राजाने हेमाद्रीला अशी घोर शिक्षा दिली असणें संभवनीय वाटत नाही.

हेमाद्रि हा राजदरबारीं करणाधिप किंवा मंत्री म्हणून महत्त्वाच्या हुद्दयावर होता. म्हणून तत्कालीन कोरीव लेखांत इतर मंत्र्यांप्रमाणे त्याचेंहि नांव येतें. अशा प्रकारचे उल्लेख एका ताम्रपटांत व दोन शिलालेखांत आलेले आम्हांस माहीत आहेत. यांपैकी पहिला उल्लेख ठाणें जिल्ह्यांत ओवळें येथे सापडलेल्या रामदेवरावाच्या शके ११९४ च्या ताम्रपटांत आहे. या ताम्रपटांत हेमाद्रीला सर्व हस्तिपकांचा अध्यक्ष, समस्तकरणाधिप व मंत्रिचूडामणि असें म्हटलें आहे. त्यावरून राजदरबारच्या त्याच्या महत्त्वाची कल्पना येते; तथापि चक्रधराचा खून किंवा निर्याण ११९८ मध्ये झालें असल्यास या उल्लेखाचा कांही उपयोग नाही. यानंतरचा शके १२०१ चा लेख पूर्वीच्या हैदराबाद संस्थानांतील उनकेश्वर गावीं आहे. तो डॉ. य. खु. देशपांडे यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत (पु० ९ वें, पृ० २९–३०) प्रसिद्ध केला आहे. डॉ. देशपांडे यांनी या लेखाचें वर्ष शके १२११ विक्रम संवत्सर असें वाचलें होतें. पण त्यानंतर घेतलेल्या नवीन छापावरून लेखाची मिति 'शके १२०१, विक्रम संवत्सर, आषाढ (?)' अशी आहे असें त्यांनी प्रसिद्ध केलें आहे. शके १२०१ (इ. स. १२७९) ला प्रमाथी संवत्सर व शके १२०२ ला विक्रम संवत्सर येतो. इतर कांही लेखांतल्या प्रमाणे हा शके १२०१ गत संवत्सर मानल्यास हा कालनिर्देश बरोबर ठरेल. या लेखांतहि हेमाद्रि पंडिताचें नांव रामदेवरावाचा मंत्री म्हणून आलें आहे. तेव्हा शके ११९८ (किंवा ११९६) मध्ये चक्रधराचा

* नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'श्रीचक्रधरचरित्रां'त (पृ. ३१८) डॉ. कोलते 'चक्रधरांनी शके ११९६ च्या माघ महिन्यांत प्रयाण केलें' असें म्हणतात.

खून झाला असल्यास त्यानंतर निदान तीन वर्षें (किंवा पांच वर्षें) हेमाद्रि पंडित आपल्या अधिकारावर होता हें उघड आहे. यानंतर हेमाद्रीचा निर्देश सासवड-(जिल्हा पुणें)-जवळच्या पूर गावीं सापडलेल्या शिलालेखांत आहे हा शिलालेख भारत इतिहास संशोधक मंडळांत ठेवला आहे. तो मंडळांतील पुरातत्त्वज्ञ श्री. ग. ह. खरे यांनी 'दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें', खंड दुसरा (पृ० ६-८), यामध्ये प्रकाशित केला आहे. या लेखाची मिति आरंभींच 'स्वी सकू १२०७ वर्षे प (पा)र्थिवसवछरे आस्विन (ना) दौ' अशी दिली आहे. पुढे श्रीमत्प्रौढप्रतापचक्रवर्ती श्रीरामचंद्रदेवाच्या विजयराज्यांत तत्पादपद्मोपजीवी सकलकरणाधिप हेमाद्रिपंडित व इतर अधिकारी असतांना कांही इनाम दिल्याचा उल्लेख होता; पण पुढील भाग खंडित झाला आहे. तथापि यांतील हेमाद्रीचा निर्देश महत्त्वाचा आहे. श्री. खरे यांनी हा लेख वाचला असल्यामुळे लेखाचा छाप प्रसिद्ध केला नसला तरी त्याचें वाचन बरोबर आहे, असें गृहीत धरण्यास हरकत नाही. शिवाय शके १२०७ ला पार्थिव हाच संवत्सर येत असल्याने लेखाच्या सत्यतेविषयी संशय राहत नाही. कोणास संशय आल्यास त्या इतिहासमंडळांत तो लेख समक्ष पाहून खात्री करून घेतां येईल.

या लेखावरून शके १२०७ (सन १२८५ पर्यंत) म्हणजे चक्रधरनिर्याणानंतर निदान नऊ वर्षें हेमाद्रि आपल्या महत्त्वाच्या अधिकारावर होता असें स्पष्ट दिसतें. तेव्हा त्याच्या हृदयद्रावक अंताची कथा कल्पित असली पाहिजे; व ती इ० स० १२७६ ते १२८६ या काळांत लिहिलेल्या 'लीळाचरित्रां'त येणें शक्य नाही, हें उघड आहे.

शके १२१२ चा रामदेवराव यादवाचा ठाणा (अण्जूर) येथे सापडलेला दुसरा एक ताम्रपट प्रसिद्ध झाला आहे. त्यांत मात्र हेमाद्रीचें नांव येत नाही. मागे ११९४ च्या ताम्रपटांत व महाराष्ट्रांतील रामदेवरावाच्या कांही शिलालेखांत हेमाद्रीचें नांव येत असल्याने याही लेखांत तें यावें अशी सहजच अपेक्षा होते. या ताम्रपटांत महामात्य एकदेवपंडित व कोशाधिपति चांगदेव यांचीं नांवें आलीं आहेत; पण हेमाद्रीचें नाही. ह्यावरून हेमाद्रि शके १२०७ ते १२१२ या अवधींत दिवंगत झाला असावा.

हेमाद्रीच्या अंताविषयीची कथा बनावट

वरील विवेचनावरून हेमाद्रीने महानुभावपंथसंस्थापक चक्रधर यांस ठार मारलें व त्यामुळे त्याचा राजाज्ञेने हृदयद्रावक रीतीने अंत करण्यांत आला, या आख्यायिकेला काडीचाहि आधार नाही; किंबहुना ती सर्वस्वी खोटी आहे, याविषयीं वाचकांची खात्री होईल. आपल्या धर्माविरुद्ध असलेल्या माणसांचा अशा रीतीने शेवट झाला हें सांगण्याची प्रवृत्ति सर्वत्र आढळते. उदाहरणार्थ, इसवी सनाच्या सातव्या शतकांत बंगालच्या शशांक-नामक राजाने गयेच्या बोधिवृक्षाचीं पाळेंमुळें खणून काढलीं व त्यामुळे त्याला अतिशय दुर्धर असा रोग होऊन त्यांत त्याचा अंत झाला अशी किंवदन्ती चिनी यात्रेकरू ह्यूएनत्संग याने लिहून ठेविली आहे तीहि या प्रकारचीच आहे. हेमाद्रीच्या हृदयद्रावक अंतविषयीची आख्यायिका सुद्धा अशीच बनावट असावी.

महानुभावपंथ वैदिक धर्माला कांही बाबतींत विरोधी असल्याने तत्पंथीयांचा यादवांच्या राजवटींत छळ झाला असणें अगदी संभवनीय आहे. फार प्राचीन काळापासून चारी वर्णांना श्रुतिस्मृतिविहित कर्में करावयास लावून वर्णसंकर होऊं न देणें राजाचें प्रमुख कर्तव्य गणलें जात असे. वर्णसंकर होणें अनिष्ट आहे, हें केवळ ब्राह्मणाचेंच नव्हे, तर सर्व-साधारण जनतेचें मत होतें व तें अनेक पिढ्यांपासून चालत आलेलें म्हणून लोकांच्या हाडींमासीं भिनलें होतें. महानुभावांचे कांही आचारविचार या परंपरागत धर्माविरुद्ध असल्याने तत्कालीन राजे किंवा त्यांचे अधिकारी यांचेकडून त्यांचा छळ झाला असला तर त्यांत आश्चर्य नाही. पण या छळाला हेमाद्रिच कारण होता व त्याच्या निधनानंतर तो थांबला असें दिसत नाही. कांही वर्षांपूर्वी निजामच्या राज्यांतील बीड जिल्ह्यांत गोदाकाठीं पुरुषोत्तमपुरी येथे सापडलेला ताम्रपट मी 'एपिग्राफिया इंडिकां'त प्रसिद्ध केला आहे. हा ताम्रपट शके १२३२ (इ. स. १३१०) चा म्हणजे रामदेवाच्या कारकीर्दीच्या अगदी अखेरीचा आहे. त्यांत राम-देवरावाचा मंत्री पुरुषोत्तम याच्या विनंतीवरून रामदेवरावाने गोदावरीच्या

काठीं एक अग्रहार करून तो ८३ ब्राह्मणांस दिल्याचा निर्देश आहे. या पुरुषोत्तम-मंत्र्याचें वर्णन करतांना खालील श्लोक घातले आहेत—

स विद्युतेवोज्ज्वलया निजाज्ञया
प्रदर्श्य वर्णाश्रमयोः पृथक्क्रमान्।
महीपतेः कोशगृहे महीयसीं
सुवर्णवृष्टिं व्यतनोद् घनोपमः ॥
स्वामिद्रोहकृतामयोवलयवद्वक्रं कठोरं मन–
स्तस्य प्रज्वलता प्रतापशिखिना नीतं जवादार्जवम् ।
क्रूरास्तेषु सकंटकद्रुमनिभाः प्लुष्टा निकृष्टास्ततो
रामक्षोणिपतेः सुवर्णसदृशं तेजः कृतं प्रोज्ज्वलम् ॥

[भावार्थ—जसा एखादा मेघ झगझगीत अशा विजेने मार्ग निरनिराळे दाखवून मोठी वृष्टि करतो, तसाच तो पुरुषोत्तममंत्री आपल्या उज्ज्वल आज्ञेने वर्ण व आश्रम यांचे आचारमार्ग पृथक् दाखवून राजाच्या कोठीमध्यें सुवर्णाची मोठी वृष्टि करता झाला.

राजद्रोह करणाऱ्या लोकांचें लोखंडासारखें कठोर व वक्र असें मन त्याच्या अग्नीप्रमाणे ज्वलज्जहाल अशा पराक्रमाने लागलीच सरळ केलें. त्याच्या त्या प्रतापाग्नींत क्रूर लोक काटेरी झाडासारखें जळून बाहेर आलें व त्यायोगें रामभूपतीचें तेज सुवर्णासारखें उज्ज्वल झालें.]

वरील श्लोकांपैकी पहिल्यांत पुरुषोत्तम मंत्र्याची धार्मिक बाबतींतील व दुसऱ्यांत राजकीय क्षेत्रांतील कामगिरी वर्णिली आहे. रामदेवराव यादवाच्या काळीं महानुभावासारखे वैदिकमार्गविरोधी पंथ होते, त्याप्रमाणे राजाचे विरोधी असेहि कांही लोक होते. या दोघांनाहि पुरुषोत्तम मंत्र्याने आपल्या कडक धोरणाने आपल्या काबूंत आणलें असें दिसतें. यांत एखाद्या विशिष्ट पाखंडाचा निर्देश नाही हें खरें. तथापि त्यावरून हेमाद्रीच्या मृत्यूनंतरहि यादवांच्या शासनपद्धतींत कांही फरक पडला होता असें दिसत नाही. तेव्हा त्या पद्धतीला हेमाद्रिच जबाबदार होता असें मानणें योग्य होणार नाही.

महाराष्ट्र आणि बौद्धधर्म*

वैशाखी पूर्णिमा हा दिवस बौद्धधर्मांत अत्यंत पवित्र गणला जातो. कारण या दिवशीं भगवान् बुद्धाच्या चरित्रांतील तीन महत्त्वाच्या घटना—त्याचा जन्म, त्याला झालेली ज्ञानप्राप्ति आणि त्याचें महापरिनिर्वाण किंवा निधन—घडल्या होत्या. प्रतिवर्षीं या दिवशीं भारतांत व इतरत्र बौद्धजयंतीचा उत्सव केला जातो. यावर्षीं मात्र या उत्सवास बुद्धजयंतीचा उत्सव न मानतां त्याला बुद्धपरिनिर्वाणाचा उत्सव असें नांव दिलें होतें. कारण लंकेंतील संप्रदायानुसार यावर्षीं बुद्धाच्या महापरिनिर्वाणास अडीच हजार वर्षें झालीं. यामुळे या उत्सवास विशेष महत्त्व आलें होतें.

भगवान् बुद्धाचा जन्म व निधन यांचीं वर्षें अद्यापि सर्वसंमत झालीं नाहीत. त्याविषयी विद्वानांत मतभेद आहे. लंकेंतील संप्रदायानुसार बुद्धाचें महापरिनिर्वाण ख्रिस्तपूर्व ५४४ या वर्षीं झालें. पण हें वर्ष अनेक संशोधकांस मान्य नाही. याचें मुख्य कारण हें की भगवान् बुद्ध ज्या दोन मगध राजांचा समकालीन होता त्यांच्या कालाशीं हें वर्ष जुळत नाही. ते राजे म्हणजे बिंबिसार व त्याचा पुत्र अजातशत्रु हे होत. गौतमबुद्धाला ज्ञानप्राप्ति झाल्यावर तो आपल्या शेंकडों शिष्यांसह राजगृहास गेला. तेथे बिंबिसार राजाने त्यांचें मोठ्या आदराने स्वागत केलें. त्यांना भिक्षेस बोलाविलें, इतकेंच नाही तर त्याने स्वतः त्यांना खाद्यपेयादि पदार्थ वाढले आणि शेवटीं आपलें वेळुवन नामक उद्यान संघास अर्पण केलें. पुढे बिंबिसाराचा पुत्र अजातशत्रु याने आपल्या पित्यास ठार मारून गादी बळकाविली. कांही काळाने त्यास पश्चात्ताप होऊन तो मनःशांतीकरिता बुद्धास शरण गेला, असें वर्णन बौद्ध वाङ्मयांत आढळतें. अर्थातच गौतमबुद्ध बिंबि-

* **नवभारत, पुणें**, वर्ष ९ (१९५५–५६), अंक १२, पृ. १–१२.

साराच्या कारकीर्दीच्या उत्तरभागांत आणि अजातशत्रूच्या कारकीर्दीच्या पूर्वभागांत होऊन गेला असावा. आधुनिक इतिहासकार बिंबिसार हा सुमारें खिस्तपूर्व ५४४ ते ४९३ आणि त्याचा पुत्र अजातशत्रु हा खिस्तपूर्व ४९३ ते ४६२ या काळांत होऊन गेला असें मानतात. हे कालहि अगदी निश्चित नाहीत. तथापि ते सामान्यतः बरोबर मानल्यास बुद्धाचें परिनिर्वाण खिस्तपूर्व ५४४ ह्या वर्षी झालें असणें शक्य नाही, हें उघड आहे. अनेक संशोधकांच्या मतें बुद्धपरिनिर्वाणवर्ष खिस्तपूर्व ४८३ हें असावें. या तऱ्हेचें सांप्रदायिक मत पूर्वी लंकेमध्येहि प्रचलित होतें असें एका विद्वानाने दाखविलें आहे. तथापि सध्या खिस्तपूर्व ५४४ हें वर्ष बुद्धपरिनिर्वाणाचें वर्ष म्हणून लंकेंत मानलें जातें. त्याला अनुसरून या वर्षी भारतांत बौद्धपरिनिर्वाणाच्या अध्यर्धद्विसहस्राब्दीचा उत्सव मोठ्या थाटाने करण्यांत आला. या उत्सवाच्या निमित्ताने बौद्धधर्माचा महाराष्ट्राशीं केव्हां संबंध आला, तो महाराष्ट्रांत किती प्रसार पावला, त्याचे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर व कलादिकांवर कोणते परिणाम झाले इत्यादि प्रश्नांचा विचार प्रस्तुत लेखांत केला आहे.

बुद्धनिर्वाणानंतर जवळ जवळ तीनशें वर्षें त्याच्या धर्माचा प्रसार दक्षिण हिंदुस्थानांत झाला नसावा. बौद्धांच्या प्राचीन वाङ्मयांत महाराष्ट्राचें नांव येत नाही. प्राचीन पाली वाङ्मयांत खालील सोळा महाजनपदांचा किंवा देशांचा उल्लेख आढळतो—अंग, मगध, काशी, कोसल, वृजि, मल्ल, चेदि, वत्स, कुरु, पांचाल, मत्स्य, शूरसेन, अश्मक, अवन्ति, गान्धार, आणि काम्बोज, यांमध्ये अश्मकाखेरीज बाकी सर्व देश उत्तरेंतील आहेत. गोदावरीतीरावरील प्रदेशास अश्मक असें नांव होतें. सुत्तनिपातांत त्याचा उल्लेख आला आहे. कांही विद्वानांच्या मतें अश्मक (किंवा अश्वक) हा देश अवन्तिदेशाच्या वायव्येस असावा आणि गोदातीरचा अश्मक ही नंतरची वसाहत असावी. सुत्तनिपातांत या गोदातीरच्या अश्मकदेशाचा उल्लेख येण्याचें कारण त्या देशांतील बावरि नामक ब्राह्मणाने आपल्या शिष्यांस बुद्धाचें दर्शन घेऊन त्यास कांही प्रश्न विचारण्यासाठी पाठविलें होतें हें होय. बुद्धाच्या काळांत मगध, कोसल, वत्स व अवन्ति हीं उत्तरभारतीय राज्येंच प्रबळ होतीं. मगधांत बिंबिसार, कोसलांत प्रसेनजित्,

वत्सांत उदयन आणि अवन्तींत चण्डमहासेन प्रद्योत हे बलाढ्य राजे राज्य करीत होते. त्यांचीं आपापसांत कधीं मैत्री व शरीरसंबंध तर कधीं युद्धें होत. बुद्धचरित्रांत महाराष्ट्राचें किंवा तेथील एखाद्या राजाचें नांव येत नाही.

महाराष्ट्रांत बौद्ध धर्माचा प्रवेश मौर्यकालांत प्रथम झाला असावा. लंकेंत 'दीपवंस' व 'महावंस' नामक इतिहासग्रंथ खिस्तोत्तर चौथ्या-पांचव्या शतकांत लिहिले गेले. त्यांमध्ये वर्णिलें आहे की अशोकाच्या कारकीर्दींत पाटलिपुत्र येथे तिसरी बौद्धसंगीति (Buddhist Council) भरली होती. त्या प्रसंगीं मोग्गलीपुत्त तिस्स याने अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. संगीतीचें काम आटोपल्यावर महास्थविर तिस्साने निरनिराळ्या देशांत धर्मोपदेशक पाठवून बौद्धधर्माचा प्रसार करण्याचें ठरविलें. त्यांत कोणत्या देशांत कोणत्या स्थविराला पाठविलें हेंहि त्या ग्रंथांत दिलें आहे. स्थविर मज्झन्तिकाला काश्मीर व गान्धारमध्ये, महारक्षिताला यवन देशांत, मज्झिमाला हिमालयांत, धर्मरक्षिताला अपरांतकांत (कोंकणांत), महाधर्मरक्षिताला महाराष्ट्रांत, महादेवाला महिषमंडळांत (दक्षिण हैदराबादेंत व त्यालगतच्या प्रदेशांत), रक्षिताला वनवासींत (उत्तर कानडा जिल्ह्यांत), सोण व उत्तर यांना सुवर्णभूमींत (ब्रह्मदेशांत) आणि महेन्द्र व त्याचे सहचारी यांना लंकेंत पाठविलें. ही बौद्धसंगीति अशोकाच्या कारकीर्दीच्या सतराव्या वर्षीं भरली होती. तेव्हा अशोकाच्या कारकीर्दीच्या सतराव्या-अठराव्या वर्षीं महाराष्ट्रांत बौद्धधर्मप्रसारास सुरवात झाली असावी.

अशोकाच्या प्रस्तरलेखावरूनहि त्या काळीं धर्मप्रसारार्थ असा प्रयत्न केला होता असें दिसतें. अशोक आपल्या तेराव्या प्रस्तरलेखांत म्हणतो— "सहाशें योजनांवर जेथे अंतियोग (Antiochus) नामक यवनराजा, तसेंच आणखी चार राजे—तुरमय (Ptolemy), अंतेकिन (Antigonus), मग (Magas) आणि अलिकसुंदर (Alexander), तसेंच चोल, पांडय, यवन, कंबोज, नाभक, नाभपंक्ति, भोज, पेतनिक, आन्ध्र, पुलिंद हे सर्व देवांनांप्रियाच्या धर्मोपदेशाचें अनुसरण करीत आहेत." यांतील भोज म्हणजे विदर्भ आणि पेतनिक (किंवा पैठणिक) म्हणजे पैठणजवळचा प्रदेश यांचे उल्लेख आपल्या प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने महत्त्वाचे

आहेत. इतरत्र अपरान्त (कोंकण) याचा उल्लेख आला आहे. या प्रस्तरलेखाचा काल अशोकाच्या राज्याभिषेकापासून बारावें किंवा तेरावें वर्ष, हा असावा. लंकेंतील महावंसांत हें वर्ष सतरावें असें दिलें आहे. अशोकाला राज्याभिषेक तो गादीवर आल्यानंतर चार वर्षांनी झाला होता हें लक्षांत घेतल्यास या दोन्ही उल्लेखांची संगति लावणें कठीण होणार नाही. तेराव्या प्रस्तरलेखांत उल्लेखिलेले सर्व पाश्चात्य राजे खिस्तपूर्व २६० (कांहींच्या मतें २५०) या वर्षीं हयात होते. त्यावरून खिस्तपूर्व तिसऱ्या शतकाच्या मध्याच्या सुमारास महाराष्ट्रांत बौद्धधर्मप्रसारास सुरुवात झाली असें म्हणण्यास हरकत नाही.

अशोकाच्या राज्यारंभापासून बाराव्या किंवा तेराव्या वर्षीं महाराष्ट्रांत बौद्धधर्माच्या प्रसारास आरंभ झाला, याचें एक गमक मध्यप्रदेशांत सापडलें आहे. चांदा जिल्ह्यांतील देवटेक गावीं सापडलेला ब्राह्मी लिपींतील एक खंडित लेख कांही वर्षांपूर्वीं मी प्रसिद्ध केला होता. त्यांत प्राण्यांचें बंधन किंवा हिंसा करूं नये अशी एका स्वामीची (अधिपतीची) आज्ञा जाहीर केली होती. लेखाच्या अक्षरवटिकेवरून हा स्वामी अशोकच असावा असें दिसतें. या लेखाच्या शेवटीं १४ वें वर्ष उल्लेखिलें आहे. अशोकाने विदर्भांत नेमलेल्या धर्ममहामात्राने राज्याभिषेकाच्या चौदाव्या वर्षीं ही राजाज्ञा सर्व लोकांस कळविलेली दिसते. त्यावरून विदर्भांत तसेंच महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांतहि राजाज्ञेवरून बौद्धधर्माच्या अहिंसातत्त्वाचा कसा प्रसार चालू होता तें समजेल.

महाधर्मरक्षिताने महाराष्ट्रांत बौद्धधर्माचा कसा प्रसार केला यासंबंधी 'महावंसां'त खालील गाथा आल्या आहेत—

महारट्ठं इसी गन्त्वा सो महाधम्मरक्खितो ।
महानारदकस्सपाव्हं जातकं कथयी तहिं ॥
मग्गफलं पापुणिंसु चतुरासीति सहस्सका ।
तेरसं तु सहस्सानि पब्बजिंसु तदन्तिके ॥

[तो महात्मा महाधर्मरक्षित महाराष्ट्रांत गेला आणि तेथे त्याने महानारदकस्सप नामक जातकाची कथा सांगितली. तेव्हा चौऱ्यायशीं हजार

लोक बौद्धमार्गांचें फल प्राप्त करते झाले आणि तेरा हजार लोकांना त्याने भिक्षु केलें.]

एका जातकाच्या प्रचाराने इतके लोक बौद्धधर्माची दीक्षा घेते झाले हें वर्णन पुराण ग्रंथांत शोभण्यासारखें आहे. तथापि या जातकांत वर्णिलेल्या पद्धतीने महाधर्मरक्षिताने महाराष्ट्रांत बौद्धधर्माचा प्रचार केला असणें अशक्य नाही. हें 'महानारदकस्सप 'जातक त्रिपिटकांतील जातकसंग्रहांत ५४४ क्रमांकाचें आहे. त्याची कथा संक्षेपाने पुढे दिली आहे :

"प्राचीन काळीं विदेहदेशांत मिथिलानगरींत अंगतिनामक राजा राज्य करीत होता. त्याला रुजा नामक एक अत्यंत सुंदर व धार्मिक कन्या होती. एकदा पूर्णिमेच्या महोत्सवप्रसंगीं राजाने आपल्या तीन मंत्र्यांना आपण ही चांदण्याची रात्र कशी घालवावी याविषयी सल्ला विचारला. तेव्हा एका मंत्र्याने शत्रूंवर स्वारी करावी असें सुचविलें; दुसऱ्याने ऐषआरामांत, नृत्यगीतवाद्यांत काल घालवावा असें आपलें मत दिलें; तर तिसऱ्याने एखाद्या धर्मशास्त्रविशारद अशा श्रमणाला किंवा ब्राह्मणाला हा प्रश्न विचारून त्याच्या उपदेशाप्रमाणे वागावें असा सल्ला दिला. राजाला हा शेवटचा सल्ला पसंत पडला. तेव्हा ते सर्वजण एका काश्यपगोत्री गुण नामक नग्न क्षपणकाकडे गेले. त्याने राजाला दैववादाचा उपदेश केला. तो म्हणाला, 'राजा, परलोक वगैरे सर्व मिथ्या आहे. सद्वर्तनाचा कांही उपयोग नाही. प्रत्येकाला त्याच्या दैवांत असेल तेंच मिळतें. प्रत्येकाला चौऱ्यायशीं महाकल्पांतून जावेंच लागतें. तोंपर्यंत पुण्य केलें तरी सुटका नाही, आणि पाप केलें तरी ही कालमर्यादा वाढत नाही.' राजाने हा उपदेश ऐकून विषयोपभोगांत आपला सर्व काळ घालविण्याचा निश्चय केला. राज्यकारभार आपल्या मंत्र्यांवर सोपवून तो ऐषआरामांत गढून गेला. पण त्याची कन्या रुजा ही अत्यंत धार्मिक वृत्तीची होती. तिने त्याला सद्वर्तनाचा उपदेश केला. तिला आपल्या पूर्वजन्मांचें ज्ञान असल्यामुळे तिने आपणांस पूर्वजन्मीं केलेल्या पापांमुळे रौरवनरकांत अनेक वर्षे कसें पिचत पडावें लागलें, नंतर आपण मर्कट, वृषभ वगैरे योनींतून कसे गेलों, शेवटीं सद्वर्तनाने आपणांस सध्याचा मनुष्यजन्म कसा प्राप्त झाला वगैरेंचें वर्णन करून राजाचें मन सदाचरणा-

कडे वळविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत तिला यश आलें नाही. तेव्हा तिने लोकरक्षक महात्म्यांची प्रार्थना केली. तिची प्रार्थना ऐकून नारद-कस्सप नामक बोधिसत्त्व परिव्राजकवेषाने तेथे आला. राजाने त्याचा सन्मान करून परलोकाच्या अस्तित्वाविषयी प्रश्न केला. 'परलोक आहे यांत संशय नाही, पण लोभमोहाने ग्रस्त झालेल्या लोकांना तो नाहीसा वाटतो' असें परिव्राजकाने सांगतांच राजाने म्हटलें : 'असें असेल तर मला आता ५०० नाणीं द्या, मी तुम्हांस स्वर्गांत १००० नाणीं परत करीन.' त्यावर परिव्राजक म्हणाला, "राजा, तूं मृत्यूनंतर स्वर्गांत थोडाच जाणार आहेस! तूं आपलें पापाचरण सोडलें नाहीस तर नरकास जाशील व तेथे विविध यातना भोगीत राहशील. तेथे तुझ्याकडे नाणीं परत मागण्यास कोणी जावें?" नंतर नारदाने नरकांतील अनेक भयंकर दुःखांचें अंगावर शहारे आणणारें शब्दचित्र काढलें. तेव्हा भयभीत होऊन राजा त्याला शरण गेला. नंतर नारदाने अनेक प्राचीन सद्वर्तनी राजांचीं उदाहरणें देऊन त्याला सद्धर्माचा उपदेश केला आणि स्वतः अन्तर्धान पावला."

या जातकांत पापाचरणामुळे नरकांत कशा यातना भोगाव्या लागतात याचें हृदयद्रावक चित्र काढलें आहे. महावंसांतील वर्णनांत तथ्य असल्यास अशा गोष्टींनी महाधर्मरक्षितादि प्रसारकांनी आपल्या धर्माचा प्रचार केला असेल. अशोकानेहि अशाच साधनांचा उपयोग धर्मप्रसाराकरिता केला होता असें त्याच्या प्रस्तरशासनावरून दिसतें. चौथ्या प्रस्तरशासनांत अशोक म्हणतो : "पुष्कळ काळ, शेकडों वर्षांपासून, प्राण्यांचा नाश, जीवांची हिंसा, नातेवाईक, ब्राह्मण, श्रमण वगैरेविषयी अनादर वाढत आला होता. पण आता देवानांप्रिय प्रियदर्शी राजाच्या धर्माचरणाने भेरीघोष हा (युद्धघोष न होतां) धर्मघोष झाला आहे. त्याने विमानें (आकाशांतील दिव्य वाहनें किंवा स्वर्गांतील प्रासाद), हत्ती, अग्निस्कन्ध इत्यादि दिव्य देखावे दाखविले आहेत. त्यामुळे शेकडों वर्षें झाली नव्हती अशी धर्मवृद्धि झाली आहे." नारदकस्सप बोधिसत्त्वाने जें शब्दांनी वर्णिलें होतें तें अशोकाने प्रत्यक्ष देखाव्यांच्या रूपाने दाखवून पुण्याचरणामुळे स्वर्गांतील प्रासादांत किंवा दिव्य विमानांतून व हत्तीवरून कसा विहार करतां येतो, उलट पापाचरणामुळे कसे अग्निस्तंभ कवटाळावे लागतात, हें लोकांस पटवून दिलें.

महाराष्ट्रांत बौद्ध धर्माचा प्रसार होऊं लागल्यावर तेथील भिक्षूंची संख्या वाढूं लागली आणि त्यांच्या राहण्याकरिता विहार, धर्मोपदेशाकरिता चैत्यगृहें किंवा गन्धकुटी, आणि पूजेकरिता स्तूप ठिकठिकाणीं पर्वतांतून कोरण्यांत आले. महाराष्ट्रांतील लेणीं व त्यांतील कोरीव लेख हीं प्राचीन काळीं महाराष्ट्रांत झालेल्या बौद्धधर्मप्रसाराचीं दृश्य चिन्हें होत.

अशोकाच्या कारकीर्दींतच भारतांत लेणीं कोरण्यास सुरवात झाली होती. अशोकाने मगधांत बराबर येथे व त्याचा नातु दशरथ याने नागार्जुनी टेकडींत आजीविक पंथाच्या भिक्षूंकरिता लेणीं कोरविलीं होतीं, हें त्यांतील कोरीव लेखांवरून माहीत झालें आहे. भारताच्या इतर भागांत, उदाहरणार्थ, ओरिसांत उदयगिरि व खंडगिरि, मद्रासेंत महाबलिपुरम्, काठेवाडांत जुनागड, ढांक वगैरे ठिकाणीं पर्वतांतून किंवा विशाल खडकांतून कोरलेलीं लेणीं आहेत; पण महाराष्ट्रांतील लेण्यांइतकीं तीं विपुल, विशाल व सुंदर नाहीत. महाराष्ट्रांतील लेण्यांची संख्या जवळजवळ हजार आहे. त्यांतील कांही अगदी लहान, तर इतर कांही अत्यंत विशाल असून त्यांचें स्थापत्य, शिल्प व कांहींत सुदैवानें अद्यापि अवशिष्ट असलेलीं चित्रें हीं अत्यंत सुंदर व आश्चर्यकारक आहेत. हीं लेणीं महाराष्ट्रांत खिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून खिस्तोत्तर आठव्या शतकापर्यंत जवळजवळ हजार वर्षें कोरलीं जात होतीं. त्यांनी महाराष्ट्राला गौरवास्पद केलें आहे.

हीं लेणीं तीन प्रकारचीं आहेत. कांही स्तूपरूपी आहेत. स्तूप म्हणजे पूज्य व्यक्तीच्या अवशेषांवर उभारलेला व दगड, माती, विटा यांनी बनविलेला किंवा पर्वतांत कोरलेला अर्धगोलाकृति ढिगारा. यालाच दागोब (धातुगर्भ), चत्य, अशीं दुसरीं नांवें आहेत. बौद्धधर्माचे दोन मुख्य पंथ आहेत : (१) हीनयान व (२) महायान. हीनयान हा प्राचीन पंथ. याच्या अनुयायांनी उभारलेले स्तूप साधे असत. पुढे महायान पंथ उत्पन्न झाल्यावर त्यांना अनेक तऱ्हांनी भूषविण्याचा व चैत्यगृहांतील स्तूपांत दर्शनी भागांवर बुद्धाची मूर्ति कोरण्याचा प्रघात पडला. स्तूपावर हर्मिका (पेटी) असून तिजवर एकावर एक अशीं तीन (क्वचित् सात) छत्रें उभारलीं असत. तीं भगवान् बुद्धाच्या एकछत्री धार्मिक साम्राज्याचीं द्योतक असत.

बौद्धस्थापत्याचा दुसरा प्रकार विहार हा होय. हे विहार भिक्षूंना राहण्याकरितां बांधले जात. आरंभींच्या विहारांत एकच गर्भ किंवा अपवारक (cell) व त्यांच्यापुढे व्हरांडा किंवा पोर्च असे. पुढे एकापुढे एक अशीं दोन अपवारकें करून आंतील अपवारकांत भिक्षूला झोपण्याकरितां दगडी पलंग कोरण्यांत येई. पुढे भिक्षूंची संख्या वाढल्यावर अनेक भिक्षूंना एकत्र राहतां यावें म्हणून मोठमोठे 'मंडप' कोरून त्याच्या दोन्ही बाजूंच्या (क्वचित् तीन बाजूंच्या) भिंतींत भिक्षूंकरिता अपवारक काढले जात. हे विहार लहान होते तेव्हा त्यांच्या छताच्या आधाराकरिता खांब देणें जरूर नव्हतें. पण पुढे त्यांचा आकार वाढल्यावर कांही अंतरावर चारी भिंतींना समांतर असे खांब कोरण्यांत येऊं लागले. पुढे या खांबांना तऱ्हेतऱ्हेच्या वेलपत्तींनी, शीर्षकांनी, शिल्पांनी व चित्रांनी भूषविण्याची पद्धत पडली. कार्ले, नाशिक, अजंटा, वेरूळ येथील लेण्यांतील मंडपांचे खांब अत्यंत सुंदर कोरले आहेत. आरंभींच्या विहारांना भूषविण्याकरिता काढलेल्या आकृतींत बोधिवृक्ष, चक्र किंवा पादुका यांनी बुद्धाचें अस्तित्व सूचित केलें आहे. महायान पंथाच्या उदयानंतर मूर्तिपूजेला महत्त्व येऊन मंडपाला गर्भगृह जोडण्यांत आलें आणि त्यांत बुद्धाच्या भव्य मूर्ति कोरण्यांत येऊं लागल्या. या मूर्ति अनेक मुद्रांत असतात व त्या मुद्रा बुद्धचरित्रांतील अनेक प्रसंगांच्या सूचक असतात. उदाहरणार्थ, धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेंत भगवान् बुद्ध उजव्या हाताचा अंगठा व तर्जनी यांमध्ये डाव्या हाताची करंगळी धरून धर्माचीं तत्त्वें मोजून सांगत आहे असें दाखविलेलें असतें. त्याच्या आसनाखाली, मध्ये चक्र आणि दोन्ही बाजूस हरिण कोरले असल्यास त्याने सारनाथ येथे मृगवनांत पहिला धर्मोपदेश केला त्याचें तें सूचक असतें. भूमिस्पर्शमुद्रेंत बुद्ध हाताने भूमीला स्पर्श करून पृथ्वीला साक्षीला बोलावीत आहे, असें सूचित केलेलें असतें. आसन घालून तळहात एकावर एक ठेवले असल्यास तो ध्यानस्थ आहे असें समजावें. बुद्धाच्या मूर्तीच्या एका बाजूस वज्रपाणि व दुसऱ्या बाजूस पद्मपाणि चामरें घेऊन बुद्धाची सेवा करण्यास उभे आहेत दाखविलेलें असतें.

बौद्धस्थापत्याचा तिसरा प्रकार म्हणजे चैत्यगृह किंवा गन्धकुटी हा होय. हें चैत्यगृह एक किंवा अनेक विहारांच्या जवळपास असे आणि

त्याचा उपयोग भिक्षूंच्या प्रार्थनेकरिता केला जात असे. आरंभींचें चैत्यगृह चौकोनी, लांबट आकाराचें असून त्याच्या दरवाज्यासमोर मागील भिंतींत चैत्य किंवा स्तूप कोरलेला असे. पुढे मागील भिंतीला अर्धवर्तुलाकार देण्यांत आला. चैत्यगृहाचा आकार वाढल्यामुळे खांबांच्या दोन रांगा दोन्ही बाजूंस भिंतीशीं समांतर कोरण्यांत येऊं लागल्या. तसेंच चैत्य किंवा स्तूप मागील भिंतीपासून पुढे आणून सभोवतीं प्रदक्षिणापथाची सोय करण्यांत आली. या चैत्यगृहांवरून पुढे हिंदु देवळांतहि प्रदक्षिणापथ ठेवण्याची प्रथा पडली. चैत्यगृहाचें छप्पर आरंभीं सपाट असे, तें आंतून अर्धवर्तुलाकार झालें. शिवाय चैत्यगृहाचा आकार वाढल्यामुळे आंतील चैत्यावर किंवा त्यांत कोरलेल्या बुद्धमूर्तीवर चांगला प्रकाश पडावा म्हणून दर्शनी भिंतीवर एक मोठी खिडकी जाळीसहित कोरण्यांत आली. या खिडकीला चैत्य-वातायन (Chaitya window) असें म्हणतात. ही अर्धवर्तुलाकार असल्याने तिला घोडयाच्या नालाची कमान (horse-shoe arch) असें नांव पडलें आहे. वास्तविक तिचा आकार अश्वत्थपत्रासारखा आहे. गौतमबुद्धाला ज्ञानप्राप्ति झाली ती अश्वत्थवृक्षाखाली. म्हणून त्याला बोधिवृक्ष असें नांव पडलें व पवित्रता आली. अशा वृक्षाच्या पानाचा आकार चैत्यवातायनास दिला जावा हें अत्यंत उचित असेंच आहे.

विहार व चैत्यगृहाजवळ भिक्षूंच्याकरिता पिण्याच्या पाण्याचीं टाकीं खोदलीं जात. त्यास प्राकृतमध्ये 'पोढि' असें म्हणत. विहार व चैत्य लेण्यांप्रमाणे हीं टाकींहि खोदून भिक्षुसंघास अर्पण करणें हें पुण्यकारक समजलें जात असे. अजंटा येथील सव्वीस क्रमांकाच्या लेण्यांतील लेखांत म्हटलें आहे.

यावत्कीर्तिर्लोके तावत्स्वर्गेषु मोदते देही ।
चन्द्रार्ककालकल्पा कार्या कीर्तिर्महीध्रेषु ॥

[जोंपर्यंत विहार चैत्यादिकांसारखें पुण्यकृत्य या जगांत विद्यमान आहे, तोंपर्यंत मनुष्य स्वर्गलोकांत आनंदाने राहतो. म्हणून पर्वतामध्ये यावच्चन्द्रदिवाकर टिकणारीं लेणीं कोरवावीं.] या कारणानेच बहुधा प्रत्येक लेण्यांत तें कोणी कोरलें याचा निर्देश असतो.

महाराष्ट्रांतील लेणीं अशोकाच्या कालांतच खोदण्यास आरंभ झाला हें त्यांपैकी अत्यंत प्राचीन अशा भाजें येथील लेण्यांतील लेखावरून स्पष्ट दिसतें. भाजें हें गाव पुणें-मुंबई रेल्वे रस्त्यापासून जवळच असलेल्या कार्ल्याच्या दक्षिणेस दोन मैलांवर आहे. त्यांत खालील लेख आहे.

१ नडसवस नायस
२ भोगवतस गाभो दानं ।

[भोगवतीचा नाग नडसव (नटशर्व ?) याचें हें गर्भ (अपवारक) लेणें दान होय.]

या लेखाची लिपि अशोककालीन ब्राह्मी व भाषा प्राकृत आहे. खिस्ती शकापूर्वी आणि नंतरहि दोनतीन शतकें प्राकृत भाषेचा सार्वत्रिक प्रसार असल्याने महाराष्ट्राच्या लेण्यांतील बहुतेक लेख बौद्धांचेच नव्हे, तर वैदिकधर्मीयांचेहि प्राकृतमध्ये आहेत. पुढे तिसऱ्या–चौथ्या शतकांत गुप्त–वाकाटकांचा उदय झाल्यावर कोरलेल्या कान्हेरी, अजंटा, वेरूळ इत्यादि ठिकाणच्या लेण्यांत संस्कृतभाषेंत लेख कोरविण्याचा प्रघात पडला. प्रस्तुत लेखाविषयी दुसरी ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट ही की त्यामध्ये एका नागाचें दान उल्लेखिलें आहे. महाराष्ट्रांत त्या काळीं नागांची पुष्कळ वस्ती होती. अनेक लेखांत नागांच्या दानांचा उल्लेख आहे. सातवाहन राजा सातकर्णि ह्याची राणी नागनिका ही नागकन्या होती, हें तिच्या नांवावरून स्पष्ट दिसतें. लेणीं कोरविणारे स्थपतिहि नागच असावे. म्हणून या लेण्यांत अनेक ठिकाणीं नाग राजांचीं व राण्यांचीं शिल्पें आढळतात. अजंट्याच्या लेण्यांत नाग राजा-राण्यांचीं चित्रें आहेत. या राजांच्या व राण्यांच्या डोक्यावर नागांच्या फण्या दाखविलेल्या असतात. अशा एका नागवंशी उपासकाने हें भाजें येथील लेणें कोरविलें होतें.

बौद्धलेणीं महाराष्ट्राच्या सर्व भागांत कोरलेलीं आढळतात. त्यांचे पश्चिम, मध्य व पूर्व असे तीन भाग करतां येतील. पश्चिम भागांत कोकणांतील राजपुरीच्या खाडीजवळ कुडा व महाड आणि ठाण्याजवळ कान्हेरी येथील लेणीं येतात. मध्यभागांत पितळखोरें, नाशिक, जुन्नर, कोंडाणें, भाजें, बेडसा, कार्लें, कऱ्हाड इत्यादि ठिकाणच्या आणि पूर्व

भागांत अजंटा, वेरूळ, औरंगाबाद येथील लेण्यांचा समावेश होतो. याशिवाय इतर ठिकाणीं विखुरलेलीं लहान लहान लेणीं अनेक आहेत. या लेण्यांच्या स्थलांचा विचार केला असतां तीं एकतर अरण्यांतील निसर्गरमणीय अशा स्थलीं अथवा राजधानीच्या किंवा पवित्र ठिकाणच्या आसपास कोरलेलीं आढळतील. उदाहरणार्थ, अजंट्याचीं लेणीं हीं जलप्रपाताने रमणीय झालेल्या एका पर्वताच्या खिंडींत कोरलीं आहेत. कुडा व महाड येथील लेणीं कोंकणची पुरातन राजधानी पुरी (हल्लीची राजपुरी) हिच्यापासून फार अंतरावर नाहीत. कान्हेरीची लेणीं अपरान्तांतील दुसरें मुख्य शहर शूर्पारक (हल्लीचें सोपारा) याच्याजवळ आहेत. सोपारा येथे अशोकाचे प्रस्तरलेख सापडले आहेत. नाशिक हें फार प्राचीन काळापासून पवित्र तीर्थ म्हणून गणलें आहे. त्याच्यापासून पांचसहा मैलांवर त्रिरश्मिपर्वतावर अनेक सुंदर लेणीं कोरलीं आहेत.

अशोकाच्या काळापासून बौद्धधर्माला राजाश्रय लाभून त्याच्या प्रसारास अतिशय मदत झाली. अशोकाच्या कालानंतर महाराष्ट्रांत सातवाहनांचें विस्तृत साम्राज्य स्थापन झालें. या वंशांतील आरंभींचा राजा सातकर्णि याने दोन अश्वमेध, राजसूय, अग्न्याधेय, गवामयन, आप्तोर्याम, अंगिरसामयन इत्यादि अनेक श्रौत यज्ञ केले होते, हें नाणेघाटांतील लेखावरून ज्ञात झालें आहे. याच वंशांतील नंतरचा राजा गौतमीपुत्र सातकर्णि याचें नाशिकच्या एका लेखांत 'एकब्राह्मण' व 'क्षत्रियदर्पदमन' असें वर्णन आलें आहे, त्यावरून सातवाहन राजे वैदिकधर्मानुयायीच नव्हे तर ब्राह्मणजातीय होते यांत संशय नाही. तथापि भारतीय राजांच्या उज्ज्वल परंपरेस अनुसरून सातवाहन राजांनी बौद्धधर्मासहि उदार आश्रय दिला होता. अनेक सातवाहन राजांनीं व त्यांच्या कुटुंबीयांनी नाशिक येथे भिक्षुसंघाकरिता लेणीं कोरविलीं, गांव दान दिले व भिक्षूंचीं चीवरें, औषधें, पिण्डपात (भिक्षा) याकरिता नाशिकच्या श्रेण्यांत ठेवी ठेवून त्यांच्या व्याजांतून सर्वकाळ टिकावी अशी व्यवस्था केली होती. महाराष्ट्रांतून परकी शकक्षत्रपांना पिटाळून लावणारा गौतमीपुत्र सातकर्णि, त्याची माता गौतमी बलश्री, त्यांचा पुत्र वासिष्ठीपुत्र पुळुमावि, तसेंच त्याचा नंतरचा वंशज यज्ञश्री सातकर्णि यांनी बौद्धसंघाकरिता लेणीं कोरविल्याचा उल्लेख आहे.

सातवाहनकालांत मध्यंतरीं कांही वर्षें शकवंशी क्षत्रप नहपान याचें राज्य महाराष्ट्राच्या पश्चिम प्रदेशावर झालें होतें. त्याचा जामात ऋषभदत्त याचा हिंदुधर्माला बराच आश्रय होता. नाशिक व कार्ले येथील लेण्यांत याच्या दानधर्माचें वर्णन आलें आहे. त्यांत त्याने तीन लाख गाई दान दिल्या होत्या, देवांना व ब्राह्मणांना सोळा गांवें धर्मादाय म्हणून दिलीं होतीं, दरवर्षी तो लक्ष ब्राह्मणांना भोजन घालीत असे, प्रभास नामक पुण्यतीर्थीं त्याने आठ ब्राह्मणांचीं लग्नें लावून दिलीं होतीं, असें वर्णन त्याच्या कोरीव लेखांत येतें. त्यावरून तो ब्राह्मणधर्माचा चाहता होता यांत संशय नाही. पण त्यानेहि नाशिक व कार्ले येथील भिक्षुसंघाकरिता लेणीं कोरविलीं होतीं. नाशिकच्या लेण्यांत राहणाऱ्या भिक्षूंच्या उपजीविकेकरिता त्याने ४००० कार्षापण देऊन नाशिकजवळचा एक गांव विकत घेऊन लावून दिला होता. तसेंच कार्ल्यांजवळचाहि एक गांव कार्ल्यांच्या भिक्षुसंघाला दान दिला होता. नहपान क्षत्रपाच्या अमात्याचेहि लेख इतर लेण्यांत सापडले आहेत. त्यावरून क्षत्रपांच्या काळींहि बौद्धधर्माला राजांचा व अमात्यादि अधिकाऱ्यांचा उदार आश्रय होता यांत संशय नाही.

सातवाहन व क्षत्रप यांच्या राजवटींत इतरहि अनेक मांडलिकांचा व सरदारांचा बौद्धधर्मास आश्रय होता व त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी बौद्ध भिक्षूंकरिता अनेक लेणीं कोरविलीं होतीं हें त्यांतील कोरीव लेखांवरून दिसतें. या मांडलिकांना महाभोज व महारथि अशा पदव्या असत. उदाहरणार्थ, कुडा येथील लेण्यांत महाभोजी विजयेचा पुत्र महाभोज स्कन्दपालिताचा, महाड येथील लेण्यांत कुमार काणभोजाचा, भाजें येथील लेण्यांत महारथि कौशिकीपुत्राचा, बेडसा येथील लेण्यांत महाभोजबालिका महादेवी महारथिनी सामडनिकेचा आणि कार्ल्यांच्या चैत्यगृहांत महारथि गोतीपुत्र अग्निमित्रणकाचा उल्लेख आहे.

सातवाहनकालानंतर पश्चिम महाराष्ट्रांत आभीरांचें व विदर्भांत वाकाटकांचें राज्य झालें. आभीरांचे स्वतःचे लेख अद्यापि सापडले नाहीत. त्यामुळे त्यांचा बौद्धधर्मास आश्रय होता किंवा नाही हें सांगता येत नाही. वाकाटक स्वतः वैदिकधर्मानुयायी होते, त्यांनी मोठमोठे यज्ञ केले आणि

शिव, विष्णु इत्यादि देवांचीं देवालयें बांधिलीं. त्यांनीहि स्वतः बौद्धधर्मास आश्रय दिल्याचें दिसत नाही. तथापि त्यांच्या कांही मांडलिकांनी व अमात्यांनी बौद्धधर्माचा पुरस्कार केला होता यांत संशय नाही. वत्सगुल्म (वाशीम) शाखेचा शेवटचा ज्ञात राजा हरिषेण याचा अमात्य वराहदेव याने अजंठा येथील सोळावें लेणें व गुलवाडा येथील घटोत्कचलेणीं हीं कोरवून बौद्धसंघास अर्पण केलीं होतीं. अजंठयाच्या या लेण्यांत गौतम-बुद्धाच्या चरित्रांतील अनेक प्रसंग उत्कृष्ट रीतीने रंगविले आहेत. यांतील अनेक चित्रांची पाश्चात्त्य व भारतीय कलाकोविदांनी मुक्तकंठाने स्तुति केली आहे. हरिषेणाचा मांडलिक व ऋषीक(खानदेश)चा राजा याला आपल्या लहान भावाच्या अकालीं निधनाने अत्यत दुःख झालें. जीवनाची असारता पटल्यामुळे त्याचें मन बौद्धधर्माकडे आकृष्ट झालें. तो बौद्ध भिक्षूंची सेवा करूं लागला. त्याने अनेक स्तूप व विहार यांनी पृथ्वीला भूषित केलें. अजंठयाचीं सतरा व एकोणीस क्रमांकांचीं लेणीं त्यानेच कोरविलीं होतीं. सतरा क्रमांकाचें लेणें 'विहार' रूपाचें असून त्यांत काढलेलीं बुद्धाच्या जातककथांचीं चित्रें सुदैवाने अद्यापि सुस्थितींत आहेत. हीं चित्रें भारतीय चित्रकलेचे उत्कृष्ट नमुने म्हणून अद्यापि प्रशंसिलीं जातात. एकोणीस क्रमांकाच्या चैत्यलेण्याचा दर्शनी भाग सुंदर शिल्पकृतींनी खालपासून वरपर्यंत सुशोभित केला आहे. हें तेथील सर्व चैत्यलेण्यांत उत्कृष्ट गणलें जातें. अजंटयाचीं कांही नंतरचीं लेणीं राष्ट्रकूटांच्या काळचीं आहेत.

आतापर्यंत राजे, क्षत्रप, त्यांचे मांडलिक, सरदार वगैरेंनी महाराष्ट्रांत बौद्धधर्मास कसा आश्रय दिला हें सांगितलें. पण यापेक्षाहि खिस्तपूर्व व खिस्तोत्तर दोनतीन शतकांत महाराष्ट्रांत सामान्य जनांनी बुद्धधर्माचा अधिक पुरस्कार केला होता. महाराष्ट्रांतील अनेक लेण्यांत त्यांच्या नांवांचे उल्लेख आहेत. त्यामध्ये समाजांतील सर्व थरांचे लोक आहेत. त्यामध्ये भदन्त किंवा भिक्षु, प्रव्राजिका किंवा भिक्षुणी, ब्राह्मण, ब्राह्मणी, यवन, शक, त्यांच्या स्त्रिया, माळी, सुवर्णकार (सोनार), लोहवणिज, वंशकार (बुरुड), कांस्यकार, गृहपति (गृहस्थ), सार्थवाह (व्यापारी), हालिक (शेतकरी), त्यांच्या स्त्रिया, श्रेष्ठी (सावकार), गंधिक इत्यादि अनेक वंशांचे, जातींचे व धंद्यांचे लोक आढळतात. महाराष्ट्रांतील पर्वत लेणीं कोरण्यास चांगले

असल्यामुळे तेथे तीं कोरवून घेऊन भिक्षुसंघास अर्पण करण्याकरिता दूरदूरचे लोक येत. कान्हेरी प्राचीन (कृष्णगिरि) येथील स्तूप गौतमबुद्धाचा अग्रशिष्य सारिपुत्र याच्या स्मरणार्थ सिंध प्रदेशांतून आलेल्या बुद्धरुचीने बांधला होता. कार्ल्याच्या मुख्य चैत्यलेण्यांत खालील लेख आढळतो—

वेजयंतितो सेठिणा भूतपालेन सेलघरं परिनिठपितं जंबुदीपम्हि उत्तमं।

त्यावरून सर्व जंबुद्वीपांत (भारतांत) अद्यापि अत्युकृष्ट असें गणलें गेलेलें हें चैत्यलेणें वैजयंतीचा श्रेष्ठी (सावकार). भूतपाल यानें कोरविलें होतें, असें समजतें. वैजयंती ही उत्तरकानडा जिल्ह्यांतील सध्याची वनवासी. ती एका सातवाहन शाखेची राजधानी होती. इतक्या दूरच्या प्रदेशांतून येऊन त्या सावकारानें कार्ल्याचें हें सुंदर लेणें कोरविलें होतें. तेव्हा करहाकड (कऱ्हाड), धेनुकाकट (डहाणू), शूर्पारक (सोपारा), कलीअण (कल्याण), चेमुल (चौल), वस्य (वसई), स्थानक (ठाणें) इत्यादि जवळपासच्या स्थलांचा निर्देश पश्चिम भारतांतील लेण्यांच्या लेखांत असला तर त्यांत आश्चर्य नाही.

महाराष्ट्रांतील या बौद्धलेण्यांवरून व त्यांतील लेखांवरून आपल्या प्रदेशाचा राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक इतिहास ज्ञात होतो, यांत त्यांचें महत्त्व आहे. लेण्यांतील अनेक लेखांत तत्कालीन राजांचे व त्यांच्या कारकीर्दीच्या वर्षांचे उल्लेख आहेत. त्यांवरून खिस्तपूर्व दुसऱ्या-तिसऱ्या शतकापासून खिस्तोत्तर सातव्या आठव्या शतकापर्यंतच्या सुमारें एक हजार वर्षांच्या राजकीय इतिहासावर बराच प्रकाश पडला आहे. हीं लेणीं व त्यांतील लेख कोरले गेले नसते तरी गौतमीपुत्र, पुळुमावि, यज्ञश्री सातकर्णि यांचीं नांवें पुराणांवरून आपणांस माहीत झालीं असतीं; पण नहपान, ऋषभदत्त वगैरे परकी क्षत्रपांचीं व त्यांच्या कुटुंबीयांचीं नांवें समजलीं नसतीं. तसेंच त्यांच्या कालाची माहिती मुळीच मिळाली नसती. धार्मिक इतिहासाविषयी मागे विवेचन आलें आहेच. मुख्यतः या लेण्यांवरूनच महाराष्ट्रांतील बौद्धधर्मप्रसाराची आपणांस कल्पना करतां येते. लेण्यांतील लेखांत अनेक धंद्यांच्या लोकांचा व त्यांच्या श्रेणींचा (trade-guilds) उल्लेख येतो. उदाहरणार्थ, एका लेखांत सुवर्णकार संघाचा, तर

दुसऱ्यांत धान्यकश्रेणीचा निर्देश आहे. तिसऱ्या एका नाशिकच्या लेण्यांतील लेखांत कुलरिकश्रेणी (विणकऱ्यांची श्रेणी), औदयंत्रिकश्रेणी व तिलपिषक-श्रेणी यांचा उल्लेख आहे. या श्रेणींचा बँकासारखा उपयोग होत असे. त्या रोख रक्कम अक्षयनीवि (कायम निधि) म्हणून स्वीकारून त्यावर वर्षांनुवर्षे नियमितपणें व्याज देत. राज्यांचा उदयास्त होई, पण या श्रेणी दीर्घकाल टिकत. म्हणून धार्मिक लोक आपल्या दानांच्या रकमा त्यांच्याजवळ ठेव म्हणून ठेवीत व त्यांच्या व्याजाचा विनियोग भिक्षूंच्या चरितार्थाकरिता व्हावा अशी व्यवस्था करीत.

या लेण्यांवरून प्राचीन काळीं भारतांत स्थापत्याची उत्क्रांति कशी होत गेली हें समजतें. भारतांतील प्राचीन देवालयें व चैत्यगृहें लाकडाचीं बनविलेलीं असत. त्यांचें अनुकरण आरंभींच्या लेण्यांत केलें आहे. लाकडी कामाचे कांही अवशेष कार्लेसारख्या ठिकाणच्या कांही लेण्यांत अद्यापि आढळतात. नंतरच्या लेण्यांत लाकडी काम नाहीसें झालें असलें तरी त्यांचें अनुकरण केलेलें दिसतें. उदाहरणार्थ, अजंठ्याच्या ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकाच्या अखेरीस कोरलेल्या लेण्यांतहि तुळया (beams) व वर्गे (rafters) कोरून दाखविले आहेत. तसेंच आपल्या सध्याच्या हिंदु देवळांतील गर्भगृह, अंतराल, सभामंडप व प्रदक्षिणापथ हळूहळू कसे उत्क्रांत होत गेले हें समजण्यास या बौद्धलेण्यांशिवाय अन्य साधन नाही. स्थापत्याप्रमाणेच शिल्पकलेची व चित्रकलेचीहि उत्क्रांति कशी होत गेली हें या बौद्ध लेण्यांतील शिल्पांवरून व चित्रांवरून समजतें.

याशिवाय महाराष्ट्रांतील वस्त्रप्रावरणांच्या व अलंकारांच्या पद्धति कालक्रमानुसार कशा बदलत गेल्या हेंहि या लेण्यांतील शिल्पें, चित्रें वगैरे-वरून ध्यानांत येतें. कुडा येथील लेण्यांत तसेंच अजंठ्याच्या आरंभींच्या नऊ व दहा क्रमांकांच्या लेण्यांतील मूर्तींच्या पेहरावावरून महाराष्ट्रांतील लोक ख्रिस्ती शकाच्या आरंभींच्या काळांत डोकीस पागोटें घालत व नेसलेल्या धोतराच्या निऱ्या पुढे सोडून तें कमरेस त्याच्या पट्टयाने बांधीत असें समजतें. अजंठ्याच्या नंतरच्या लेण्यांतील पुरुषांची धोतर नेसण्याची पद्धत

निराळी आहे. त्यांच्या धोतरांच्या निऱ्या पुढे दिसत नाहीत तर त्या पाठीमागे शेपटासारख्या लोंबत असलेल्या दिसतात. या प्रकारच्या वस्त्र-परिधानपद्धतीचें विनोदी वर्णन कल्हणाने खालील श्लोकांत केलें आहे. काश्मीरच्या एका राजाचें वर्णन करतांना तो म्हणतो—

क्षितिभृद्दाक्षिणात्यानां तिर्यक्त्वज्ञापनाय सः ।
पुच्छं महीतलस्पर्शि चक्रे कौपीनवाससि ॥

(दाक्षिणात्य लोक पशूसारखे आहेत हें दाखविण्याकरिता त्याने त्यांना स्वतःच्या कोपीनवस्त्राचा कासोटा जमिनीपर्यंत लोंबत ठेवण्यास भाग पाडलें.)

प्राचीनकाळीं महाराष्ट्रांतील स्त्रिया एकप्रकारचें शिरोभूषण वापरीत किंवा डोकीवरून पदर घेत. तसेंच त्यांच्या कपाळावर मोठा तिलक असे. त्यांच्या हातापायांतले अलंकार बोजड असत. या सर्व बाबतींत पुढे निराळीच फॅशन प्रचारांत आली हें अजंट्याच्या वाकाटककालीन लेण्यांतील चित्रांवरून समजतें. तेव्हा महाराष्ट्रांतील प्राचीन रीतिभातींचा परिचय होण्यास या बौद्ध लेण्यांसारखें साधन नाही.

बौद्ध धर्माचा प्रचार खिस्तपूर्व तिसऱ्या शतकापासून खिस्तोत्तर आठव्या शतकापर्यंत महाराष्ट्रांत चालू होता. पुढे मात्र त्याला राजे, मांडलिक, सरदार वगैरे मातबर मंडळींचा आश्रय राहिला नाही. हिंदु-धर्मांचें तसेंच संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन होऊन राजेलोकांचें, तसेंच सामान्य जनतेचेंहि लक्ष बौद्ध धर्मांकडून निघून पौराणिक हिंदु धर्मांकडे वळलें. इ. स. च्या बाराव्या शतकापर्यंत बंगाल्यांत पाल राजांचा बौद्ध धर्माला आश्रय होता, पण तोहि त्यांच्या अस्तानंतर नाहीसा झाला. बौद्ध धर्माच्या कांही तत्त्वांना हिंदु धर्मांत मान्यता मिळाल्यामुळे या दोन धर्मांतील अंतर कमी झालें आणि गौतमबुद्धाला विष्णूचा नववा अवतार मानण्यांत आलें. याचा परिणाम असा झाला की बौद्धधर्म त्याच्या जन्मभूमींतून–भारतांतूनच–नाहीसा झाला.

महाराष्ट्रांत जवळ जवळ हजार वर्षें बौद्ध धर्म प्रचलित होता. या काळांत येथे नामांकित साहित्यिक, तत्त्वज्ञ वगैरे निर्माण झाले असावे; पण

दुर्दैवाने त्यांचीं नांवें कालाच्या ओघांत लुप्त झालीं आहेत. कांही स्थविरांचीं नांवें लेण्यांतील लेखांत येतात, पण त्यांच्याविषयीं आपणांस जास्त माहिती मिळत नाही. खिस्तोत्तर सातव्या शतकांत ह्यूएनत्संग महाराष्ट्रांत आला होता. त्याने ऐकीव माहितीवरून पर्वताच्या दरींत कोरलेल्या एका बौद्ध विहाराचें वर्णन केलें आहे तें अजंट्याच्या लेण्यांस लागूं पडतें. हीं लेणीं अचल नामक बौद्ध स्थविराने कोरविलीं होतीं अशी माहिती ह्यूएनत्संग देतो. अजंट्याच्या सव्वीसाव्या लेण्यांतील लेखांत अचल नामक मुनीने तेथे पूर्वी बुद्धाचें शैलगृह कोरविलें होतें, असा उल्लेख आहे. हा अचल सुप्रसिद्ध बौद्ध स्थविर होता असें दिसतें. त्यानंतर सुविख्यात झालेला दुसरा आचार्य नागार्जुन होय. हा विदर्भांत जन्मला होता. तो अल्पायुषी होईल असें कोणी भविष्य वर्तविल्यामुळे त्याचा अंत आपल्या डोळयांसमोर होऊं नये म्हणून तो पांचसहा वर्षांचा असतांच त्याच्या मातापित्यांनी एका सेवकाबरोबर त्याला रामगिरीला (सध्याच्या नागपूरजवळच्या रामटेकला) पाठविलें. ते ज्या गुहेंत राहत होते तिला अद्यापि नागार्जुनी गुहा असें नांव आहे. पुढे तेथील साधुपुरुषांच्या कृपेने त्याचा अपमृत्यु टळला व तो बौद्ध धर्माचा मोठा आचार्य व नालंदा विद्यापीठाचा मुख्य झाला अशी आख्यायिका आहे. नागार्जुन एका सातवाहन राजाचा समकालीन व मित्र होता. त्याने स्वतःला नागांकडून मिळालेली मोत्यांची एकावलि त्या राजाला नजर केली, अशी आख्यायिका बाणाने आपल्या ' हर्षचरितां 'त दिली आहे. नागार्जुनाचें नांव माध्यमिक तत्त्वज्ञानाचा किंवा शून्यवादाचा जनक म्हणून भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत सुविख्यात आहे. या मताचें खंडन श्रीशंकराचार्यांनी केलें आहे, पण त्याचा प्रभाव त्यांच्या स्वतःच्या तत्त्वज्ञानावर झाला होता असें अनेक संशोधकांचें मत आहे.

बौद्ध धर्म भारतांतून नाहीसा झाल्यावर त्याच्या लेण्यांविषयी व त्यांतील मूर्तींविषयी लोकांमध्ये वेडगळ समजुती प्रचलित झाल्या. मी कांही वर्षांपूर्वी नालंदाला गेलों होतों. तेथे मुख्य विहारापासून बऱ्याच अंतरावर एक बुद्धमूर्ति अंगावर लहान मोठे खड्डे पडलेली दिसली. चौकशी करतां असें समजलें की त्याला तेथील लोकांनी ' ढेलुआ महाराज ' असें नांव दिलें

आहे. येणारा जाणारा मनुष्य जवळ असलेले गोटे त्याला मारून पुढे जातो. याविषयी अशी समजूत तेथे प्रचलित आहे कीं अशा रीतीनें दगड मारले असतां 'ढेलुआ महाराज' परमात्म्याला 'दगड मारणाऱ्यांचे मनोरथ पूर्ण कर, नाहीतर ते मला आणखी गोटे मारतील' अशी प्रार्थना करतो. काय ही वेडगळ समजूत !

महाराष्ट्रांतहि या लेण्यांविषयी अनेक गैरसमजुती प्रचलित झाल्या होत्या. नाशिकजवळचीं लेणीं पांडवांनी कोरलीं अशी सामान्यतः समजूत असल्याने त्यांना 'पांडवलेणीं' असें नांव पडलें आहे. तेथील बुद्धाच्या व इतर भव्य मूर्तींना लोक युधिष्ठिर, भीम, अर्जुन असें समजतात. तेथील क्रमांक १९ च्या लेण्यांत स्तूपाच्या जागीं भैरवाची मूर्ति कोरून तें लेणें शैवपंथाचें आहे असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. स्तूपाच्या वरची हर्मिका व तीन छत्रें मात्र अद्यापि अवशिष्ट आहेत, त्यांवरून या लेण्याच्या मूळ स्वरूपाविषयी संशय राहत नाही. तसेंच जुन्नरच्या उत्तरेस सुलेमान टेकडीवरील विहारलेण्यांत पूर्वी स्तूप होता, त्याच्या जागीं नंतर गणपतीची मूर्ति कोरली आहे. या लेण्याला आता गणेशलेणें असें नांव प्रचलित झालें असलें, तरी पूर्वी तें बौद्ध लेणें होतें यांत संशय नाही. बौद्ध लोक आपल्या देवदेवतांना हिंदु देवादिकांपेक्षा श्रेष्ठ मानीत असत. त्यांनी वज्रपाणि इंद्राला व पद्मपाणि विष्णूला बुद्धाचे सेवक बनविलें होतें. नालंदाला त्रैलोक्यविजय देवाची मूर्ति आहे, ती शिव व पार्वती यांच्यावर पाय देऊन उभी असलेली दाखविली आहे. अशा प्रकारच्या कृत्यांची प्रतिक्रिया झाली नसती तरच नवल. तथापि एकंदरींत बौद्ध व वैदिकधर्मी यांच्यांमध्ये सलोखा नांदत होता यांत संशय नाही. अनेक वैदिकधर्मी राजांनी बौद्धविहारांस उदार देणग्या दिल्या होत्या, आणि विहार व चैत्य बांधून किंवा पर्वतांत खोदून दिले होते. सातवाहन, क्षत्रप व खानदेशच्या राजांनीं बौद्ध लेणीं कोरल्याचें मागे सांगितलें आहेच. मध्यप्रदेशांतील या प्रकारचें ठळक उदाहरण श्रीपुरच्या महाशिवगुप्त–बालार्जुनाचें. हा राजा क्षत्रियजातीय व शिवोपासक होता. तो स्वतःला आपल्या दानपत्रांत 'परममाहेश्वर' म्हणवितो. त्याच्या ताम्रपटाच्या मुद्रेवर नंदीची आकृति आहे. तेव्हा त्याच्या शिवभक्तीविषयी संशय राहत नाही. पण यानेहि बौद्ध विहारांना अनेक देणग्या दिल्याचें त्याच्या ताम्रपटांत व

शिलालेखांत नमूद आहे. याच्या काळीं ह्यूएनत्संग दक्षिणकोसलांत (छत्तीसगडांत) आला होता. त्याने याचें वर्णन लिहून ठेवलें आहे. त्यांत त्याला बौद्धधर्मानुयायी म्हटलें आहे–इतका त्याचा बौद्ध धर्माला आश्रय होता. बंगालचे पाल राजे बौद्धधर्मी होते, तरी त्यांनी ब्राह्मणांना अनेक दानपत्रें दिलेलीं उपलब्ध झालीं आहेत.

युरोपांत रोमनकॅथोलिक राजांनी प्राटेस्टंटांचा कसा छळ केला तें प्रसिद्ध आहे. तसा प्रकार बहुधा कोठे भारतांत झाल्याचें नमूद नाही. याच्या उलट अनेक हिंदु ग्रंथकारांनी बौद्ध ग्रंथांचा व बौद्ध विद्वानांनी हिंदु ग्रंथांचा अभ्यास करून त्यावर टीकाटिप्पण्यादि लिहिल्याचे उल्लेख आहेत. सुप्रसिद्ध अमरकोशाचा कर्ता अमरसिंह हा बौद्ध होता, तथापि त्याचा ग्रंथ आजहि सर्वत्र अत्यंत आदराने अभ्यासिला जातो. सुविख्यात साहित्यशास्त्रकार आनंदवर्धन याने बौद्ध धर्मकीर्तीच्या 'प्रमाणविनिश्चय' नामक ग्रंथावरील धर्मोत्तमा टीकेवर विवृति लिहिली होती असें अभिनवगुप्त सांगतो. ह्यूएनत्संगने लिहून ठेवलें आहे की नालंदा विद्यापीठांत कांही प्राध्यापक वेदांचें अनुशीलन करीन असत. बौद्ध व हिंदु पंडितांमध्ये अनेकदा वादविवाद होत व विचारांची देवाणघेवाण होत असे. पण त्यांत दुष्टभाव नसे. गेल्या शतकापासून बौद्ध ग्रंथांचें प्रकाशन व अभ्यास होऊं लागल्यापासून हेंच विशुद्ध वातावरण पुनः आपल्या देशांत उत्पन्न झालें आहे. भारतांतील भगवान् बुद्धाच्या महापरिनिर्वाणाचा अध्यर्धद्विसहस्राब्दी उत्सव याचाच निदर्शक आहे.

३. प्राचीन भारतांतील स्त्रीरत्नें

सातवाहनराज्ञी नागनिका*

प्राचीन काळच्या स्त्रियांविषयी माहितीचा अभाव

प्राचीन काळीं आपला भारत देश वैभवाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान होता. विद्वत्ता, शौर्य, कलानैपुण्य इत्यादि गुणांमुळे त्याची कीर्ति सर्वत्र पसरली होती. प्राचीन काळीं भारताला हें जें अत्युच्च स्थान प्राप्त झालें होतें, तें तत्कालीन व्यक्तींच्या असामान्य गुणांमुळेच होय, यांत संशय नाही. पण त्या व्यक्तींविषयी आपलें ज्ञान अत्यंत मर्यादित आहे. त्यांतहि प्राचीन काळच्या स्त्रियांपेक्षा पुरुषांविषयी आपणांस बरीच माहिती आहे. राजे, सेनापति, मंत्री व इतर अधिकारी, कवि, नाटककार, शिल्पकार, लेखक इत्यादिकांचे उल्लेख संस्कृत व प्राकृत वाङ्मय, कोरीव लेख इत्यादिकांत येत असल्यामुळे त्यांच्या वैयक्तिक जीवनाविषयी नाही, तरी त्यांचें नांव, निवासस्थान, गुण इत्यादिकांविषयी थोडीबहुत माहिती आपणांस मिळते. पण स्त्रियांविषयी तसें नाही. त्यांचा उल्लेख वाङ्मयांत व कोरीव लेखांत क्वचितच येतो. उत्तरकालीन दानपत्रांत व क्वचित् मुद्रांवरहि राजांबरोबर राण्यांचाहि नामनिर्देश करण्याची प्रथा पडली; पण आरंभींच्या कोरीव लेखांत तीहि माहिती आढळत नाही. अशा परिस्थितींत प्राचीन कोरीव लेखांत स्त्रियांविषयी जे अत्यल्प उल्लेख आढळतात त्यांचें महत्त्व विशेष आहे. प्रस्तुत लेखांत महाराष्ट्राच्या अत्यंत प्राचीन व वैभवशाली

* 'तरुण भारत', नागपूर, दिवाळी अंक, १९५२

सातवाहन वंशांतील एका महनीय राज्ञीविषयी कोरीव लेखांवरून मिळालेली माहिती दिली आहे.

सातवाहन राजवंश

आपल्या देशाचा विश्वसनीय इतिहास मौर्यकाळापासून सुरू होतो. पुण्यश्लोक अशोकाच्या काळीं आपला महाराष्ट्र मौर्यसाम्राज्यांत मोडत होता. अशोकाच्या निधनानंतर केंद्रसत्ता दुर्बळ झाल्यामुळे देशांत सर्वत्र लहान लहान राज्यें अस्तित्वांत आलीं. महाराष्ट्रांतहि सातवाहनांनी आपलें स्वतंत्र राज्य स्थापलें. या वंशाचा संस्थापक सातवाहन याचीं तीन नाणीं हैद्राबाद संस्थानांत सापडलीं आहेत. त्यावरून त्याचें राज्य हैद्राबाद संस्थानच्या मध्यभागीं होतें असें दिसतें. प्रतिष्ठान, हल्लीचें पेठण, ही त्याची राजधानी असावी. या सातवाहनाचें नांव पुराणांतील वंशावळींत येत नाही याचें कारण त्याचें राज्य स्वतंत्र असलें तरी बरेंच लहान असावें, हें दिसतें. पुराणांतील वंशावळ शिमुक राजापासून सुरू होते. हा राजा सातवाहनाचा नातू असावा. याच्या काळाविषयी आपणांस फारशी माहिती नाही. हा निधन पावला, त्या वेळीं याचा पुत्र सातकर्णि हा अल्पवयी असल्यानें याचा भाऊ कृष्ण हा गादीवर बसला. त्यानंतर सातकर्णि राजा झाला.

सातवाहनांचा राज्यविस्तार

सातकर्णीच्या काळीं सातवाहनांचें राज्य दूरवर पसरलें. याचीं नाणीं महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेशांतील जबलपूर जिल्हा, हैदराबाद संस्थान इत्यादि भागांत सापडलीं आहेत. शिवाय सांचीच्या अत्युत्कृष्ट तोरणावर याच्या शिल्पकाराचा निर्देश असलेला लेख आहे. या सर्व पुराव्यावरून याचें साम्राज्य दक्षिणच्या बऱ्याच भागावर व मध्यहिंदुस्थानांतहि पसरलें होतें असें दिसतें.

नागवंशीय महारठी

सातकर्णीचा विवाह महारठी कळलाय याच्या नागनिका नामक कन्येशीं झाला होता. हा कळलाय नागवंशी होता. प्राचीन काळीं महाराष्ट्रांत सर्वत्र नागसंस्कृति पसरली होती. नागांचीं लहान लहान राज्यें दक्षिणच्या

ऱ्याच भागांत नांदत होतीं. उत्तर भारतांतहि अनेक ठिकाणीं नागांचीं राज्यें होतीं. पुढे गुप्तकालांत उत्तरेंतील नागराज्यें नष्ट झालीं तरी दक्षिणेंत विशेषतः आपल्या मध्यप्रदेशाच्या पूर्वीच्या बस्तर व कवर्धा संस्थानांत, तीं इ. स. च्या अकराव्या शतकापर्यंत टिकून होतीं, असें कोरीव लेखांवरून दिसतें. महाराष्ट्रांतील नाग राजे व सरदार महारठी ही पदवी धारण करीत. महाराष्ट्रांतील अनेक लेण्यांतील कोरीव लेखांत महारठींच्या देणग्यांचा उल्लेख आहे. महारठींच्या अंमलाखालील प्रदेशांस राष्ट्र म्हणत. उदाहरणार्थ, गोपराष्ट्र हें नांव इगतपुरीजवळच्या प्रदेशास होतें, हें कोरीव लेखांवरून दिसतें. अशीं लहान लहान राष्ट्रें एकत्र झाल्यावर महाराष्ट्र अस्तित्वात आलें. असो.

नागनिका म्हणजे नाग स्त्री

महारठी कळलाय हा मोठा शूर राजा होता. नाणें घाटांतील लेखांत याच्या 'अंगिय' कुलाचा निर्देश आहे, व 'समुद्रवलयांकित पृथ्वीवरील प्रथमवीर' असें याचें वर्णन केलें आहे. याच्याशीं वैवाहिक संबंध झाल्यामुळे सातकर्णीला आपलें साम्राज्य वाढविण्यास पुष्कळ साहाय्य झालें असावें. हा पुढे सातकर्णीचा मांडलिक झाला, तरी त्याने स्वतःच्या नांवें नाणीं पाडण्याचा हक्क राखून ठेवला होता असें दिसतें. कारण याचीं नाणीं हैदराबाद, कर्नाटक व म्हैसूरमध्ये सापडलीं आहेत. अशा या बलाढ्य मांडलिक महारठीची कन्या नागनिका हिचा विवाह सातवाहन नृपति सातकर्णि याच्याशीं झाला. प्राचीन काळीं 'निका' हा शब्द 'स्त्री' या अर्थीं योजीत असत. जसें 'शकनिका' म्हणजे शकस्त्री. तेव्हा नागकन्या नागनिका हिचें नांव सार्थ होतें यांत संशय नाही.

नाणेघाटांतील कोरीव लेणीं

पुण्याच्या उत्तरेस ५६ मैलांवर जुन्नर नांवाचें गाव आहे. त्याच्याजवळ कोकणांतून देशावर येण्याकरिता नाणेघाट नामक प्रसिद्ध घाट आहे. नाणेघाटाच्या मार्गाने अद्यापिहि पुष्कळ माल कोंकणातून देशावर येतो. प्राचीन काळीं तर या मार्गाने यापेक्षा जास्त रहदारी होत असावी. या नाणेघाटांत फार प्राचीन लेणीं असून त्यांपैकी एका लेण्यांत सातवाहनांचे

कोरीव लेख आहेत. याशिवाय या लेण्यांत सातवाहन वंशांतील व्यक्तींचे व त्यांच्या नातेवाइकांचे पुतळे कोरविलेले आहेत. त्यांच्या खाली त्यांचीं नांवेंही कोरविलीं होतीं. सध्या सर्व पुतळे भग्न झाले आहेत, व त्याखालचे कांही लेखहि नष्ट झाले आहेत. तथापि कांही अद्यापि वाचतां येतात. त्यावरून हे पुतळे (१) शिमुक सातवाहन (२) देवी नागनिका व राजा सातकर्णि (३) कुमार भाय—(४-५) (लेख नष्ट) (६) महारठी त्रणकयिर (७) कुमार हकुश्री (८) कुमार सातवाहन यांचे होते असें दिसतें. हे पुतळे सातकर्णि राजाच्या कारकीर्दींत कोरविले असावे. यांत त्याचा पिता शिमुक, तो स्वतः, त्याची राणी, व तीन मुलगे, त्याचा मेहुणा व त्याचे दोन मुलगे यांचा अन्तर्भाव केला आहे. आपल्या प्राचीन प्रथेप्रमाणे स्त्रियांचा निर्देश त्यांच्या पतीनंतर केला जातो. पण या पुतळ्यावरील लेखांत नागनिकेचा उल्लेख तिच्या पतीपूर्वी केला आहे, त्यावरून त्यावरच्या जोड पुतळ्यांत तिच्यानंतर तिच्या पतीचा पुतळा कोरविला होता असें दिसतें. यायोगें तिजवरचें तिच्या पतीचें प्रेम तसेंच तिचें महत्त्वहि व्यक्त होतें.

नागनिकेला तीन मुलगे होते. त्यांचे पुतळेहि नाणेघाटांत कोरविले होते. त्यांपैकी वडील मुलाचें भाय - असें अपूर्ण नांव सध्या अवशिष्ट आहे. बाकीच्या दोन मुलांचीं नांवें तर पूर्णपणें नष्ट झालीं आहेत. तथापि तीं नाणेघाटांतील लेण्यांतच इतरत्र कोरलेल्या लेखावरून वेदिश्री व सति (किंवा शक्ति) अशीं होतीं असें समजतें.

नागनिकेच्या वर्णनपर लेख

हा दुसरा लेख बऱ्याच काळानंतर नागनिकेच्या वृद्धापकाळीं कोरला असावा. तो महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाकरिता अत्यंत उपयुक्त व महत्त्वाचा आहे. तो कोरला, त्या वेळीं सातकर्णि राजा कालवश झाला होता व त्याचा मुलगा वेदिश्री हा राज्य करूं लागून कांही वर्षें झालीं होतीं. हा लेख नागनिकेच्या वर्णनपर असून त्यामध्ये तिच्या पतीच्या व तिच्या स्वतःच्या धार्मिक कृत्यांचा निर्देश आहे. आरंभीं धर्म, इंद्र, संकर्षण, वासुदेव, चंद्र, सूर्य, यमवरुणादि चार लोकपाल व कुमारवर (कार्तिकेय)

यांना नमन केलें आहे.* त्यावरून तत्कालीन पूज्य मानलेल्या देवांविषयी माहिती होते. यामधील संकर्षण व वासुदेव या भागवत संप्रदायांतील देवांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. नंतर नागनिकेचें वर्णन केलें आहे. त्यांत म्हटलें आहे की दक्षिणापथपति, वीर, शूर व अप्रतिहतचक्र अशा वेदिश्री राजाच्या कारकीर्दींत अंगियकुलवर्धन कळलाय नामक महारठीची कन्या, अत्यंत श्रेष्ठ अशा श्रीसातकर्णीची भार्या व पूर्तंद,† वरद, कामद व धनद अशा वेदिश्री राजाची व श्रीमान् सति (शक्ति) याची माता (नागनिका) हिने आपल्या पतीची सहधर्मचारिणी म्हणून व स्वतःही अनेक श्रौत याग केले. प्रथम राजाबरोबर केलेल्या यज्ञांचा व त्यांतील प्रत्येकांत ब्राम्हणांना दिलेल्या गाई, हत्ती, घोडे, रथ, कार्षापण नामक चांदीचीं नाणीं, सोन्या-चांदीचे अलंकार इत्यादिकांचा सविस्तर उल्लेख आहे. या यज्ञांत दोन अश्वमेध व एक राजसूय, आणि त्याखेरीज अग्न्याधेय, अन्वारंभणीय, गवामयन, भगालदशरात्र, आप्तोर्याम, अंगिरसामयन, गर्गत्रिरात्र, अंगिरसातिरात्र, छंदोगपवमान, त्रिरात्र, शतातिरात्र इत्यादि श्रौत याग होते. कांहींचीं नांवें लेख खराब झाल्यामुळे आता नष्ट झालीं आहेत. नंतर स्वतः (पतीच्या निधनानंतर) केलेल्या (किंवा ब्राह्मणांमार्फत करविलेल्या) अंगिरसामयन, त्रयोदशरात्र, दशरात्र इत्यादिकांचा उल्लेख आहे. या यज्ञांत एक हजारापासून वीस हजारांपर्यंत कार्षापण, शंभरपासून दहा हजारांपर्यंत गाई, शेकडो घोडे, अनेक हत्ती, गावें, वस्त्रें इत्यादि दानें दिल्याचा उल्लेख आहे. त्यावरून तत्कालीन सातवाहन साम्राज्याच्या वैभवाची व राजांच्या दानशूरत्वाची कल्पना करतां येते.

पतिनिधनानंतरचा संन्यस्त जीवनक्रम

नाणेंघाटांतील हा लेख नागनिकेचा मुलगा वेदिश्री याच्या काळचा आहे. त्या वेळीं ती वृद्ध झाली होती. तिचा मुलगा भाय हा त्यापूर्वी कालवश झाला होता. वडील मुलाच्या मृत्यूने तिचें हृदय होरपळून निघालें होतें.

---

* मागे पृ. ६७ वर दिलेला या लेखाचा उतारा पाहा.

† पूर्तंद म्हणजे पूर्तकर्में (अन्नसत्रें घालणें, वापी व कूप बांधणें या सारखीं लोकोपयोगी कामें) करणारा.

तशांत तिच्यावर पतिनिधनाचा घोर प्रसंग ओढवून आकाशच कोसळलें; तथापि तिंने धीर न सोडतां आपल्या इतर मुलांकडे पाहून उर्वरित आयुष्य संन्यस्त वृत्तीने धार्मिक आचरणांत घालविण्याचें ठरविलें. गतभर्तृका स्त्रियांनी कसें रहावें याविषयी धर्मशास्त्रकारांनी नियम घालून दिले आहेत. 'मनुस्मृतीं'त (अध्याय ५, श्लोक १२८) म्हटलें आहे—

आसीतामरणात्क्षान्ता नियता ब्रह्मचारिणी ।
यो धर्म एकपत्नीनां कांक्षन्ती तमनुत्तमम् ॥

विधवा स्त्रियांनी क्षमाशीलपणाने, संयमाने व ब्रह्मचर्याने पतिव्रताधर्माचें यावज्जीव पालन करीत राहावें, असें मनु म्हणतो. नागनिकेचें जीवन अगदी याच प्रकारचें होतें. नाणेघाटांतील प्राकृत लेखांत अगदी मोजक्या शब्दांत तिच्या जीवनाचें चित्र काढलें आहे. तें असें—मासोपवासिनिय गहतापसाय चरितब्रम्हचरियाय दिखव्रतयंञसुंडाय यञा हुता । याचा अर्थ असा— 'नागनिका महिना महिना उपवास करीत असे, ती आपल्या प्रासादांतहि तापसीप्रमाणे साधेपणाने राहत असे, ती ब्रम्हचर्यव्रताचें पालन करी, व्रतें व यज्ञ करण्यांत तर ती अतिशय निपुण होती. अशा तिने अनेक यज्ञ केले.'

दक्षिणापथस्वामी सम्राट् वेदिश्री याची माता नागनिका हिला कांही कमी नव्हतें. तिला आपले दिवस अत्यंत ऐषआरामांत घालवितां आले असते. तथापि तिने पतिनिधनानंतर अत्यंत संन्यस्त वृत्तीने आपलें आयुष्य घालविलें, हें वरील वर्णनावरून दिसून येईल. प्राचीन भारतांतील अत्यंत महनीय स्त्रियांमध्ये तिची गणना केली पाहिजे.

सातवाहनराजमाता गौतमी बलश्री*

'तरुण भारता'च्या १९५२ च्या दिवाळी अंकांत प्राचीन भारतांतील ऐतिहासिक स्त्रीरत्नांचा परिचय करून देण्याचा उपक्रम करून सातवाहन-राज्ञी नागनिकेविषयी प्राचीन कोरीव लेखांतून मिळालेली माहिती दिली होती. प्रस्तुत लेखांत त्याच सातवाहन वंशांतील दुसरी महनीय स्त्री राजमाता गौतमी बलश्री हिचा परिचय करून देण्याचें योजिलें आहे.

सातवाहन राजवंश

प्राचीन काळीं महाराष्ट्रांत जीं अत्यंत विस्तृत व बलाढय साम्राज्यें स्थापन झालीं, त्यांमध्ये सातवाहन साम्राज्य हें कालक्रमाने तसेंच शौर्य, दातृत्व, विद्या, कलाश्रय इत्यादि गुणांनी अग्रेसर होतें. या राज्याचा आरंभ पुण्यश्लोक अशोकाच्या निधनानंतर लौकरच खिस्तपूर्व तिसऱ्या शतकाच्या अखेरीस सातवाहन नामक राजाने केला म्हणून त्याच्या वंशजांच्या राजवटीला सातवाहन असें नांव पडलें. या वंशाच्या आरंभींच्या राजांपैकी फक्त शिमुक, कृष्ण, सातकर्णि, वेदिश्री, सतिश्री अशा पांच सहा राजांचींच नांवें जुन्नर व नाशिक येथील कोरीव लेखांत येतात. सातकर्णीनंतर गादीवर आलेल्या एकोणीस राजांचीं नांवें पुराणें देतात, पण त्यांचे कोरीव लेख अद्यापि सापडले नाहीत. त्यांपैकी आपीलक नामक राजाचें नाणें छत्तीसगडमध्ये सापडलें आहे. दुसरा एक राजा हाल याने केलेला 'गाथासप्तशती' नामक प्राकृत सुभाषितसंग्रहहि प्रसिद्ध आहे. पण इतर सतरा राजांविषयी कांहीच माहिती उपलब्ध नाही. त्यानंतर पुराणांतील वंशावळींतील तेविसावा राजा गौतमीपुत्र सातकर्णि याच्या काळापासून पुनः शिलालेख, नाणीं वगैरे ऐतिहासिक साधनें मिळण्यास सुरवात होते.

---

*'तरुण भारत', नागपूर, दिवाळी अंक, १९५३.

शकांची राजवट

गौतमीपुत्र सातकर्णि हा ऐतिहासिक कालांत महाराष्ट्राला परकीयांच्या दास्यांतून मुक्त करणारा पहिला वीर पुरुष. याच्यापूर्वी कांही काळ महाराष्ट्रांत शकवंशी क्षत्रपांचें राज्य स्थापन झालें होतें. हे शक उत्तरेंतील कुशान सम्राट् कनिष्काचे क्षत्रप किंवा प्रांताधिकारी होते. महाराष्ट्र व गुजराथमध्ये शक क्षत्रप भूमक व नहपान यांचीं नाणीं सापडलीं आहेत. नाशिक, जुन्नर व कार्लें येथे नहपानाचा जामात ऋषभदत्त व अमात्य अर्यमा यांचे कोरीव लेख मिळाले आहेत. त्यावरून या क्षत्रपांनी ब्राह्मणांना तसेंच बौद्ध भिक्षूंना कित्येक गाव दान दिले, भिक्षूंना चातुर्मासांत राहण्याकरिता लेणीं कोरविलीं, नद्यांना घाट बांधले, तलाव खणले, तीर्थस्थानीं यात्रेकरूंकरिता धर्मशाळा बांधल्या, नद्यांवर तरींची सोय केली व उन्हाळ्यांत प्रवाश्यांकरिता ठिकठिकाणीं पाणपोया घातल्या असें दिसून येतें. शक क्षत्रप नहपान याचें नांव फारशी भाषेंतील आहे; पण त्याची मुलगी दक्षमित्रा व जामात ऋषभदत्त यांचीं नांवें संस्कृत आहेत. त्यांवरून एका पिढींतच या शक राजकर्त्यांना हिंदु संस्कृतीने कसें आत्मसात् करून घेतलें याची कल्पना येते. क्षत्रपांची राजवट जुलमी नव्हती; त्यांची स्वतःची निराळी संस्कृति व धर्म नसल्यामुळे त्यांनी आपल्या राज्यांत धर्मछळ केला नाही; त्यांनी अनेक लोककल्याणाचींहि कामें केली. तथापि स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नसल्याने त्यांच्या राजवटीवर महाराष्ट्र सर्वस्वी खूष होता असें दिसत नाही.

शकांचें राज्य गुजराथ–महाराष्ट्रांत स्थापन झालें त्या वेळीं सातवाहनांना पश्चिम महाराष्ट्रांतून आपला पाय काढावा लागला. त्यानंतर ते कोठे राज्य करूं लागले याविषयी निश्चित माहिती नाही. पण खिस्तोत्तर दुसऱ्या शतकाच्या आरंभीं नहपानाचा पराभव करून पश्चिम महाराष्ट्र पुनः आपल्या अमलाखाली आणणारा गौतमीपुत्र सातकर्णि आपल्या नाशिक लेण्यांतील कोरीव लेखांत स्वतःचा 'बेनाकटकस्वामी' असा निर्देश करतो. त्यावरून तो व त्याचे कांही पूर्वज बेनाकटक येथे राज्य करीत असावे असें वाटतें. बेनाकटक म्हणजे बेना (किंवा वेणा) नदीच्या काठचा प्रदेश. याच प्रदेशाचा उल्लेख गौतमीपुत्रानंतर दोन अडीचशें वर्षांनी होऊन गेलेल्या

वाकाटकनृपति द्वितीय प्रवरसेनाच्या तिरोडी ताम्रपटांत येतो. या ताम्रपटांत निर्दिष्ट केलेलीं गावें बालाघाट जिल्ह्यांत वैनगंगेच्या परिसरांत सापडतात हें मी इतरत्र दाखविलें आहे. तेव्हा गौतमीपुत्र व त्याचे कांही पूर्वज वैनगंगेच्या तीरीं कांही काळ राज्य करीत होते व तेथून गौतमीपुत्राने पश्चिम महाराष्ट्रावर चाल करून शक क्षत्रप नहपानाचा उच्छेद केला असें दिसतें.

गौतमीपुत्राचा उदय

गौतमीपुत्राला नाशिकच्या लेण्यांतील प्राकृत लेखांत ‘ सकयवनपल्हव-निसूदन ’ (शक, यवन व पल्हव यांचा निःपात करणारा) व ‘खखरातवस-निरवसेसकर’ (क्षहरात वंशाचा समूळ उच्छेद करणारा) अशीं दोन विशेषणें लावलीं आहेत. त्यावरून त्याने पश्चिम महाराष्ट्रांत क्षहरातवंशी शकांचीं पाळेंमुळें खणून काढलीं असें दिसतें. आपल्या विजयानंतर त्याने शकांचीं सर्व चांदीचीं नाणीं परत मागविलीं व आपल्या नांवाचा व आपल्या विशिष्ट प्रकारच्या उज्जैनी चिन्हाचा असे दोन छाप त्या नाण्यांच्या पुढील व मागील बाजूवर मारून मग तीं आपल्या राज्यांत चालू करण्यास परवानगी दिली. अशा रीतीने पुनः छाप मारलेल्या नाण्यांचा एक मोठा संचय नाशिक जिल्ह्यांत जोगलतेंभी या गावीं कांही वर्षांपूर्वी सापडला होता.

क्षत्रपांचा पराभव केल्यावर गौतमीपुत्र सातकर्णीने आपलें राज्य उत्तरेस सुराष्ट्र (काठेवाड), अनूप (महेश्वराजवळचा प्रदेश) व माळवा, पश्चिमेस कोंकण, पूर्वेस आन्ध्र व दक्षिणेस मलय पर्वत (म्हैसूर–कर्नाटक) पर्यंत पसरविलें. कोरीव लेखांत त्याला ‘तिसमुदतोयपीतवाहन (ज्याचे घोडे अरबी समुद्र, दक्षिण महासागर व बंगालचा उपसागर या तीन समुद्रांचें पाणी प्याले आहेत) असें विशेषण लावलें आहे. त्यावरून त्याच्या राज्यविस्ताराची कल्पना करतां येते.

गौतमीपुत्र सातकर्णीनें एकवीस वर्षें राज्य केलें असें पुराणांत म्हटलें आहे. पण यांत थोडी चूक दिसते. कारण त्याच्या कारकीर्दीच्या चोवीसाव्या वर्षांतील एक लेख नाशिकच्या लेण्यांत कोरलेला अद्यापि विद्यमान आहे. त्यावरून त्याने निदान चोवीस वर्षें राज्य केलें असावें यांत संशय नाही.

अशा या रणधुरंधर महाप्रतापी राजाविषयी सुमारें शंभर वर्षांपूर्वीपर्यंत आपणास कांहीच माहिती नव्हती. सन १८६४ मध्ये नाशिकच्या लेण्यांतील लेखांचा शोध लागला, तेव्हा त्याचें नांव प्रथम ज्ञात झालें. नाशिकच्या तीन नंबरच्या लेण्यांत या राजाच्या कारकीर्दीतील दोन लेख कोरले आहेत. त्यापैकी पहिला लेख त्याच्या कारकीर्दीच्या अठराव्या वर्षी—बहुधा नहपानावर मिळविलेल्या विजयानंतर लौकरच—कोरविला होता. त्यांत त्याने पूर्वी ऋषभदत्ताच्या मालकीचें असलेलें एक शेत नाशिकच्या लेण्यांतील भिक्षूंना दान दिल्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या, चोवीसाव्या वर्षी कोरविलेल्या, लेखांत त्याच्या मातेने त्याच लेण्यांत राहणाऱ्या भिक्षूंना आणखी एक शेत दिलें असा निर्देश आहे. पण या लेखांत गौतमीपुत्राविषयी—त्याचे रूप, गुण, राज्यविस्तार इत्यादिविषयी—आपणांस कांहीच माहिती मिळत नाही. कोरीव लेखांत अशी माहिती क्वचितच असते. पण सुदैवाने त्याची माता गौतमी बलश्री हिने त्याच्या निधनानंतर एकोणीस वर्षांनी—त्याचा मुलगा वासिष्ठीपुत्र पुळुमावि याच्या कारकीर्दींत—त्याच नंबर तीनच्या लेण्यांत एक विस्तृत लेख कोरविला होता, त्यांमध्ये ही माहिती सविस्तर दिली आहे. अशी माहिती समुद्रगुप्तासारख्या फारच थोडया प्राचीन राजांविषयी आपणांस मिळते. म्हणून तिचें फार महत्त्व आहे. याच लेखावरून त्याच्या मातेविषयीहि आपणांस थोडीबहुत माहिती मिळते. तीहि प्रस्तुत लेखांत द्यावयाची आहे.

राजमाता गौतमी बलश्री

मागे सांगितल्याप्रमाणे हा लेख सातकर्णीची माता गौतमी बलश्री हिचा आहे. सातवाहन राजे ब्राह्मण होते. सातकर्णीची माता गौतमी होती म्हणून त्याला गौतमीपुत्र सातकर्णि म्हणत. गौतमी हें तिचें गोत्रनाम. कारण ती गौतमगोत्रोत्पन्न होती. बलश्री हें तिचें स्वतःचें नांव. प्राकृत भाषेंत ‘श्री’ हें नांवाच्या शेवटीं लावण्याचा प्रघात होता. उदाहरणार्थ, यज्ञ सातकर्णि याचें नांव पुराणांत यज्ञश्री असें येतें. पुराणांतील वंशावळी आरंभीं प्राकृतांत असून नंतर त्यांचें संस्कृतीकरण झालें, याचें हें गमक आहे. असो. तेव्हा गौतमीचें व्यक्तिनाम बला (किंवा बाला) असावें.

नाशिकच्या नंबर ३ च्या लेण्यांतील हा लेख प्राकृत भाषेंत आहे. पण त्याची रचना संस्कृतांतल्याप्रमाणे दीर्घसमासयुक्त आहे. या लेखाचा उद्देश नाशिकजवळच्या त्रिरश्मि पर्वतांत कोरलेलें विशाल लेणें गौतमी बलश्रीने भद्रायणीय नामक बौद्ध भिक्षूंच्या संघास दिलें हें जाहीर करण्याचा होता. हा लेख कोरला तेव्हा गौतमीपुत्र सातकर्णि निधन पावला असून, त्याच्यानंतर त्याचा मुलगा वासिष्ठीपुत्र पुळुमावि हा गादीवर आल्यास एकोणीस वर्षें झालीं होतीं. हें लेणें कोरण्यास आरंभ गौतमीपुत्राच्या कारकीर्दींत झाला असावा. पण तें पुरें होण्यास एवढा कालावधि लागला. तें पुरें झाल्यावर भिक्षुसंघाच्या स्वाधीन करतांना गौतमी बलश्रीला आपल्या पराक्रमी पुत्राची आठवण झाली. तिचें हृदय शोकाने भरून आलें. तिने आपल्या पुत्राच्या रूपाचें, गुणांचें, शौर्याचें व राजनीतीचें, तसेंच त्याच्या राज्यविस्ताराचें विस्तृत वर्णन करवून घेऊन तें त्या लेण्यांत कोरविलें. या लेखावरून गौतमी बलश्रीचें पुत्रप्रेम व्यक्त होतेंच. पण त्याशिवाय तिच्या पुत्राचेंहि मातृप्रेम व तिचा स्वतःचा जीवनक्रम याविषयीहि माहिती मिळते.

हा लेख कोरविला तेव्हा गौतमी फार वृद्ध झाली होती. या लेखांत तिला महादेवी, राजर्षिवधू, महाराजमाता व महाराजपितामही अशीं चार विशेषणें लावलीं आहेत. ती स्वतः आपल्या पतीची पट्टराणी होती. तिचा आपल्या सासऱ्याविषयी आदर राजर्षिवधू या शब्दाने व्यक्त होत आहे. तिचा मुलगा सातकर्णि याने आपल्या पराक्रमाने महाराजपद भूषविलें होतें. तिचा नातू पुळुमावि हाहि आपल्या पित्याप्रमाणेच शूर व महत्त्वाकांक्षी होता व त्यानेहि 'महाराज' पदवी धारण केली होती. या इतरत्र क्वचितच आढळणाऱ्या महाभाग्याचा तिला यथार्थ अभिमान होता व तो तिने स्वतःला लावलेल्या वरील चार विशेषणांत व्यक्त केला आहे. पण ती अभिमानी असली तरी गर्विष्ठ नव्हती. ती सदैव सदाचरणांत व यमनियमादिकांच्या आचरणांत आपला काळ घालवी असें तिच्या पुढील वर्णनावरून दिसून येईल. तिच्याविषयी म्हटलें आहे की, ती सत्यवचन, दान, क्षमा, अहिंसा यांमध्ये सदैव निरत असे, ती आपला काळ तपश्चर्या, इंद्रियनिग्रह, ईश्वरोपासनादि नियम, उपवास इत्यादिकांत घालवी, व 'राजर्षिवधू' या पदवीला अनुरूप असें तिचें आचरण असे. या मोजक्या

शब्दांत त्या धर्मपरायण, सच्छील व साध्वी वृद्ध राजमातेचें चित्र लेखकानें काढलें आहे.

गौतमीपुत्राचें वर्णन

गौतमी बलश्रीला आपल्या पराक्रमी पुत्राचा यथार्थ अभिमान होता. त्याचें सविस्तर वर्णन तिने आपल्या लेखाच्या आरंभीं पुढील शब्दांत केलें आहे—" सातकर्णि हा हिमालय, मेरु, मंदर या पर्वतांसारखा थोर होता. त्याचें राज्य ऋषीक (खानदेश), अश्मक (गोदातीरचा प्रदेश) मूळक (पैठणजवळचा प्रदेश), सुराष्ट्र (काठेवाड), कुकुर (राजपुताना), अपरान्त (कोंकण), अनूप, विदर्भ, आकरावंती (माळवा) इत्यादि प्रदेशांवर पसरलें होतें. विंध्य, ऋक्षवत् (सातपुडा), पारियात्र (अरवली), सह्याद्रि, कृष्णगिरि (कान्हेरी), मलय, श्वेतगिरि, चकोर इत्यादि पर्वतांचा तो स्वामी होता; सर्व राजमंडल त्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानीत असे; त्याचें वदन सूर्य-किरणांनी प्रफुल्ल झालेल्या कमलाप्रमाणे होतें; त्याचे घोडे तीन समुद्रांचें पाणी प्याले होते; पूर्णचंद्राप्रमाणे तो प्रियदर्शन होता; गजश्रेष्ठाप्रमाणे त्याची गति सुन्दर होती; त्याचे भुज शेषासारखे दीर्घ व भरदार होते; शरणागतांना अभयदान देण्यांत त्याचे हात सदैव ओले होत; आपल्या मातेची शुश्रूषा करण्यांत तो व्यग्र असे; धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांचें आचरण तो योग्य स्थलीं व कालीं करीत असे; अपराधी अशा शत्रूंना सुद्धा प्राणदंड करणें त्याला आवडत नसे; ब्राह्मण व इतर जन अशा सर्वांचा तो योगक्षेम चालवी; क्षहरात वंशाचा त्याने समूळ उच्छेद केला होता व सातवाहन वंशाला त्याने पूर्वीचें वैभव प्राप्त करून दिलें होतें; त्याने चातुर्वर्ण्यसंकर बंद केला होता; अनेक युद्धांत त्याने आपल्या शत्रूंचा पराजय करून आपली विजयपताका व राजधानी अजेय केली होती; अनेक पूर्वजांपासून चालत आलेली राजपदवी त्याने भूषविली होती; तो शास्त्रांचा आधार, सज्जनांचा आश्रय, लक्ष्मीचें अधिष्ठान, सच्चारित्र्याचा प्रभव असून, नियन्तृत्व, धनुर्धारित्व व ब्राह्मण्य यांमध्ये अनुपमेय होता; त्याचा पराक्रम रामचन्द्र, कृष्ण, अर्जुन व भीमसेन यांसारखा होता; तो नाभाग, नहुष, जनमेजय, सगर, ययाति, राम, अंबरीष यांसारखा तेजस्वी होता;

समरांगणांत युद्ध करीत असतां पवन, गरुड, सिद्ध, यक्ष, राक्षस, विद्याधर, भूत, गन्धर्व, चारण, चन्द्र, सूर्य इत्यादि गगनचारी आश्चर्यानें तें पाहत असत; यानें अनेक शत्रुसंघांचा पराजय करून आपल्या कुळाची कीर्ति वाढविली होती " इत्यादि.

प्रेमळ मातापुत्रांची जोडी

वरील वर्णनांत कांही ठिकाणीं अतिशयोक्ति आहे हें उघड आहे; पण त्यावरून त्या वृद्ध राजमातेला आपल्या दिवंगत पराक्रमी पुत्राविषयी वाटत असलेला यथार्थ अभिमान व्यक्त होत आहे. उलटपक्षीं याच लेखनावरून अशा दिगन्तकीर्ति सम्राटालाहि आपल्या मातेविषयी किती प्रेम वाटत होतें, तिची शुश्रूषा करण्यांत तो किती तत्पर असे, हेंहि दिसून येतें. रा. ब. डॉ. सरदेसाई यांनी एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणे भारतीय इतिहासांतील अशा प्रेमळ मातापुत्रांची दुसरी एकच जोडी, हें वर्णन वाचतांना, आपल्या मनश्चक्षूंपुढे येते. ती म्हणजे राजमाता जिजाबाई व छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांची होय. गौतमीपुत्र सातकर्णी व श्रीशिवाजी यांच्या चरित्रांत अनेक साम्यें आढळतात. दोघेहि अत्यंत पराक्रमी, धर्मशील व सदाचारी होते. वरील उताऱ्यांतील गौतमीपुत्राच्या चारित्र्याचें, गुणांचें व राजनीतीचें वर्णन शिवाजी महाराजांनाहि तितकेंच लागू पडेल. दोघांनीहि आपल्या मातृभूमीला परकीयांच्या दास्यांतून मुक्त केलें होतें व स्वराज्याची स्थापना केली होती. दोघांनाहि आपल्या मातेविषयी निरतिशय प्रेम व आदर वाटत होता व ते तिची शुश्रूषा करण्यांत तत्पर असत. दोघांच्याहि माता अत्यंत धार्मिक, प्रेमळ व सच्छील होत्या, व त्यांना आपल्या न्यायी, पराक्रमी व सदाचरणी पुत्राबद्दल अत्यंत प्रेम व अभिमान वाटत होता. मातुःश्री जिजाबाईंनी आपल्या मुलाला लहानपणापासून कसें वळण लावलें, त्याच्या मनांत देशप्रेमाची ज्योत कशी सतत तेवत ठेवली हें आपणांस माहीत आहे. सातकर्णीच्या कालाला आज जवळ जवळ दोन हजार वर्षें झालीं असल्यामुळे त्याच्या बालपणाविषयी आपणांस माहिती नाही. तथापि त्याला एवढें मोठेपण प्राप्त होण्यांत त्याची माता गौतमी बलश्रीचाहि वाटा होता असें अनुमान केलें तर तें बहुधा चूक होणार नाही.

वाकाटकराज्ञी प्रभावतीगुप्ता*

प्राचीन ऐतिहासिक कालांतील स्त्रीरत्नांची माहिती मराठी वाचकांस करून देण्याच्या उद्देशाने 'तरुण भारता'च्या १९५२ व १९५४ सालच्या दिवाळी अंकांत अनुक्रमें सातवाहनराज्ञी नागनिका आणि सातवाहनराजमाता गौतमी बलश्री या दोन श्रेष्ठ सातवाहनराज्ञींविषयी लिहिलें होतें. प्रस्तुत लेखांत वाकाटकराज्ञी प्रभावतीगुप्तेविषयी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

दोन वाकाटक राण्या

कोरीव लेखांत वाकाटक नृपतींच्या दोनच राण्यांचा उल्लेख येतो—एक गुप्तराजकन्या प्रभावतीगुप्ता आणि दुसरी कुन्तलराजकन्या अज्झितभट्टारिका. यांपैकी दुसरीविषयी आपणांस फारशी माहिती मिळत नाही. ती सुमारें इसवी सन ४५० ते ४७० या कालांत होऊन गेलेल्या वाकाटकनृपति नरेन्द्रसेनाची पट्टराणी होती आणि तिचा मुलगा द्वितीय पृथिवीषेण हा वाकाटकांच्या ज्येष्ठ शाखेचा शेवटचा ज्ञात राजा होय, हें आपणांस वाकाटकांच्या लेखांवरून समजतें. ही अज्झितभट्टारिका कुन्तलाधिपतीची कन्या होती, हेंहि बालाघाट ताम्रपटांत सांगितलें आहे. यावरून ती दक्षिण महाराष्ट्रांतील कृष्णानदीच्या खोऱ्यांत राज्य करणाऱ्या राष्ट्रकूट वंशांत जन्मली होती, असें म्हणतां येतें. कुन्तल व विदर्भ देश एकमेकांस लागून असल्याने राजनीतीच्या सामान्य नियमाप्रमाणे त्यांच्यामध्ये वैरभाव उत्पन्न होऊन कधी कधी लढाया होत. त्याविषयीचे उल्लेख दोन्ही राजवंशांच्या लेखांत आढळतात. पण पुढे अज्झितभट्टारिकेच्या विवाहाने त्यांच्यामध्ये सख्य उत्पन्न झालेलें दिसतें. याशिवाय जास्त माहिती या राणीविषयी मिळत नाही.

---

* 'तरुण भारत', नागपूर, दिवाळी अंक, १९५५.

प्रभावतीगुप्तेविषयी मात्र त्या मानाने बरीच माहिती मिळते. तिचा उल्लेख तिचा पुत्र द्वितीय प्रवरसेन याच्या सर्व ताम्रपटांत अगत्यपूर्वक केला आहे. याशिवाय तिने स्वतः दिलेले दोन ताम्रपट–पुणें व ऋद्धपूर येथे सापडलेले–प्रकाशित झाले आहेत. त्यांवरूनहि तिच्याविषयी बरीच माहिती मिळते. किंबहुना तिचा पुणें ताम्रपट सापडल्यावरच वाकाटकवंशाच्या कालगणनेला निश्चितता आली. त्यामुळे त्या ताम्रपटाला प्राचीन इतिहासाच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. तिच्या दुसऱ्या–ऋद्धपूरच्या–ताम्रपटावरून कालिदासाच्या मेघदूतांत उल्लेखिलेल्या रामगिरीचा शोध लागला व कालिदासाच्या कालनिर्णयाला मदत झाली. त्यामुळे त्याचेंहि संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्व आहे. तिच्याविषयी कोरीव लेखांतून व इतर साधनांवरून मिळालेली माहिती साकल्याने येथे दिली आहे.

प्रभावतीगुप्तेचें माहेर

प्रभावतीगुप्ता ही सुविख्यात गुप्त सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्तविक्रमादित्य याची कन्या. चन्द्रगुप्ताच्या दोन राण्यांचा उल्लेख कोरीव लेखांत येतो. पहिली, पट्टमहिषी ध्रुवदेवी, हिच्यापासून त्याला कुमारगुप्त नामक पुत्र झाला. तो पुढे गुप्तसिंहासनावर बसला. दुसरी राणी नागकुलोत्पन्न कुबेरनागा. ताम्रपटांत हिच्या 'धारण' गोत्राचा उल्लेख आहे. इ० स० च्या तिसऱ्या चौथ्या शतकांत उत्तर भारतांत पद्मावती (मध्य भारतांतील नरवारजवळचें पदमपवाया), कान्तीपुरी (मिर्झापूरजवळचें कन्तीत) आणि मथुरा या ठिकाणीं नागराज्यें होतीं असें पुराणांत म्हटलें आहे. हीं नागराज्यें पुढे समुद्रगुप्ताने नष्ट केलीं. समुद्रगुप्ताच्या प्रयागच्या प्रशस्तींत त्याने गणपतिनाग, नागसेन इत्यादि नागराजांचा उच्छेद केल्याचा उल्लेख आला आहे. अशा एका नागवंशांत कुबेरनागा या द्वितीय चद्रगुप्ताच्या राज्ञीचा जन्म झाला असावा. तो वंश कोठे राज्य करीत होता याची निश्चित माहिती मात्र मिळत नाही. या कुबेरनागेपासून द्वितीय चन्द्रगुप्ताला प्रभावतीगुप्ता ही मुलगी झाली.

प्रभावतीचा विवाह

प्रभावतीगुप्तेचा विवाह वाकाटक राजपुत्र द्वितीय रुद्रसेन याच्याशीं इ० स० ३९५ या वर्षाच्या सुमारास झाला असावा. या विवाहाच्या

मागेहि राजकारण होतें असें दिसतें. समुद्रगुप्त हा मूळचा मगधांतला. पुढे त्याने दिग्विजय करून उत्तर भारताच्या बऱ्याचशा भागावर आपलें साम्राज्य पसरविलें. पण त्याला आर्यावर्ताच्या नैऋत्य कोनांतील सौराष्ट्र व माळवा या देशांवर राज्य करणाऱ्या क्षत्रपांवर आपलें स्वामित्व प्रस्थापित करतां आलें नाही. तें काम त्याचा पुत्र द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य याने केलें. क्षत्रपांचा उच्छेद करावयाचा, तर त्यांच्या राज्यास लागून ज्यांचें राज्य होतें त्या वाकाटकांचें साहाय्य मिळविणें जरूर होतें हें जाणून चन्द्रगुप्ताने वाकाटक नृपति पहिला पृथिवीषेण याच्याशीं मैत्रीचा संधि केला आणि नंतर त्याचें साहाय्य घेऊन क्षत्रपांवर चाल केली. या युद्धांत तो पूर्णपणें यशस्वी झाला. क्षत्रपांचा समूळ उच्छेद होऊन त्यांचे सौराष्ट्र व माळवा हे प्रदेश गुप्त साम्राज्याला जोडले गेले. त्यानंतर चन्द्रगुप्ताने उज्जयिनी येथे आपली राजधानी केली. क्षत्रपांच्या नाण्यांवरील शेवटचें वर्ष सन ३८८ किंवा त्यानंतरचें आहे. माळव्यांतील कालनिर्देश असलेला गुप्तांचा पहिला लेख सन ४०१ चा आहे. या दोन वर्षांमध्ये केव्हा तरी क्षत्रपांचा पाडाव झाला असावा. म्हणून त्याचें वर्ष अंदाजाने इ० स० ३९५ हें धरलें जातें.

गुप्त व वाकाटक या तत्कालीन दोन बलाढ्य राजवंशांचें क्षत्रपांच्या उच्छेदाच्या निमित्ताने झालेलें हें सख्य दृढ व चिरस्थायी करण्याकरिता गुप्त राजकन्या प्रभावती व वाकाटक राजकुमार (द्वितीय) रुद्रसेन यांचा विवाह मोठ्या थाटाने उज्जयिनींत झाला असें दिसतें. अशा विवाहप्रसंगीं एखादें नवें नाटक रंगभूमीवर आणलें जातें. राजशेखराची 'विद्धशालभञ्जिका', बिल्हणाची 'कर्णसुंदरी' या सारखीं कांही नाटकें अशाच प्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलीं. तसें याहि प्रसंगीं होऊन कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' या पहिल्या नाट्यकृतीचा प्रथम प्रयोग उज्जयिनीच्या राजदरबारांतील विद्वत्सभेपुढे झाला असावा. या नाटकांतील संविधानक त्या प्रसंगाला अनुरूप असेंच होतें. त्या काळीं माळवा व विदर्भ या देशांच्या राजघराण्यांत वैवाहिक संबंध घडून आला, तसाच योग पूर्वी शुंगकालांत विदिशा (पूर्व माळवा) येथे राज्य करणाऱ्या अग्निमित्राचा विदर्भराजकन्या मालविका हिच्याशीं विदिशेस विवाह झाला, त्याप्रसंगीं आला होता. व हेंच

कथानक कालिदासाने आपल्या नाटकाकरिता निवडलें होतें. विद्वत्परिषदेने भास, सौमिल्ल, कविपुत्र यांसारख्या प्राचीन प्रथितयश कवींच्या नाट्यकृति दूर सारून तरुण कवि कालिदास याच्या 'मालविकाग्निमित्र' नाटकाची निवड केली. तिच्या कारणांमध्ये संविधानकाचें औचित्य हेंहि एक कारण असण्याचा संभव आहे.

वाकाटक नृपति प्रथम पृथिवीषेण आपल्या पुत्राच्या या विवाहप्रसंगीं बराच वृद्ध झाला होता. कोरीव लेखांतील वर्णनावरून तो सन ३५० च्या सुमारास गादीवर आला होता असें दिसतें. तेव्हा या विवाहाच्या वेळीं त्याने जवळ जवळ ४५ वर्षें राज्य केलें असावें. यानंतर लौकरच त्याचा देहान्त होऊन सन ४०० च्या सुमारास द्वितीय रुद्रसेन गादीवर आला.

वाकाटक राजे ब्राह्मणजातीय आणि गुप्त वैश्यजातीय होते. तथापि तत्कालीन धर्मशास्त्राप्रमाणे आन्तरजातीय अनुलोम विवाह निषिद्ध नसल्यामुळे रुद्रसेन–प्रभावती यांच्या विवाहांत कोणतीच अडचण आली नाही. इतकेंच नव्हे तर प्रभावती रुद्रसेनाची अग्रमहिषी (पट्टराणी) हि झाली. आपल्या ताम्रपटांत या पदाचा ती मोठ्या अभिमानाने उल्लेख करतांना दिसते.

प्रभावतीचा राज्यकारभार

पण प्रभावतीगुप्तेला विवाहसौख्य फार काळ लाभलें नाही. राज्यारोहणानंतर चारपांच वर्षांतच रुद्रसेन कालवश होऊन प्रभावतीगुप्तेवर दुःखाचा डोंगर कोसळला. त्या वेळीं तिला दिवाकरसेन व दामोदरसेन असे दोन मुलगे होते. त्यांपैकी वडील मुलगा दिवाकरसेन हा सुमारें पांच सहा वर्षांचा असावा. पति वारलेला, मुलगे अत्यंत अल्पवयी, राज्य तर बरेंच मोठें— अशा प्रसंगीं एखाद्या सामान्य स्त्रीचें धैर्य खचलें असतें. पण प्रभावतीने हताश न होतां आपल्या अल्पवयी मुलातर्फे राज्य करण्याचा निश्चय केला. पुणें येथे सापडलेल्या ताम्रपटाच्या मुद्रेवर 'जनन्या युवराजस्य शासनं रिपुशासनम्' (युवराजाच्या मातेची शत्रूंना शासन करणारी अशी ही आज्ञा आहे) असे तिचे शब्द आहेत. त्यांवरून तिने स्वतः राज्यकारभार चालविला होता असें स्पष्ट दिसतें. या प्रसंगीं तिला राज्यकारभारांत मदत करण्याकरिता तिचा पिता द्वितीय चन्द्रगुप्त याने आपल्या पदरचे अत्यंत

विश्वासू असे मुत्सद्दी व सेनानायक विदर्भांत पाठविले असावे. त्या काळीं विदर्भांच्या दरबारीं उत्तर भारतीय राजसेवकांचें किती प्रस्थ झालें होतें तें कांही गमकांवरून अनुमानितां येतें. त्या काळीं विदर्भांत पेटिकाशीर्षक लिपी (box-headed characters) प्रचलित होती. वाकाटकांचे बहुतेक सर्व लेख याच लिपींत लिहिले आहेत. याला अपवाद फक्त एकच—प्रभावती-गुप्तेच्या पुणें ताम्रपटाचा. तो कीलकशीर्षक लिपींत (nail-headed characters) लिहिला आहे. त्याच्या लेखकाला पेटिकाशीर्षक लिपींत लिहिण्याची सवय नव्हती. त्याने मुद्रेवरील 'वाकाटक' हीं चारच अक्षरें त्या लिपींत लिहून नंतर तो प्रयत्न सोडून दिला आणि बाकीचा मुद्रेवरील व ताम्रपटावरील लेख स्वतःला परिचित असलेल्या कीलकशीर्षक लिपींत लिहिला. यावरून त्या काळीं विदर्भांच्या सचिवालयांत वरिष्ठ अधिकाऱ्या-पासून अगदी सामान्य कारकुनापर्यंत उत्तर भारतीय राजसेवकांचा कसा भरणा झाला होता तें दिसून येईल.

याचें आणखीहि एक प्रत्यंतर देतां येईल. प्रभावती ही वाकाटक राजाची राणी. तिने आपलें दानपत्र देतांना आपल्या सासरची वाकाटक वंशाची वंशावळ द्यावी अशीच कोणीहि अपेक्षा करील. इतर राजवंशाच्या राण्यांनी हीच पद्धत स्वीकारली आहे, व तीच योग्य आहे यांत संशय नाही. पण प्रभावतीगुप्तेने आपल्या ताम्रपटांत वाकाटकांची वंशावळ न देता गुप्तांची दिली आहे, व आपला पति वाकाटकनृपति द्वितीय रुद्रसेन याचा उल्लेख केवळ आनुषंगिक रीतीने केला आहे. हें तिला स्वतःच्या माहेरच्या वैभवशाली गुप्त सम्राटांविषयी वाटत असलेल्या अभिमानाचें द्योतक आहेच; पण तिला अशा वंशावळीचें अनौचित्य न दाखविणाऱ्या अधिकाऱ्यांच्या गुप्तपक्षपातित्वाचेंहि तें निदर्शक आहे. तेव्हा प्रभावतीच्या रीजन्सीच्या काळांत गुप्तांचे मोठमोठे अधिकारी व मुत्सद्दी विदर्भांत येऊन तिला राज्यकारभारांत मदत करीत होते यांत संशय नाही.

कालिदासाचें विदर्भांतील वास्तव्य

या मुत्सद्द्यांमध्ये द्वितीय चन्द्रगुप्ताचा आश्रित कविकुलगुरु कालिदास हाहि असावा. कालिदास हा केवळ पढिक पंडित नसून कुशल

राजनीतिज्ञहि होता हें त्याच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून दिसून येतें. गुप्तकालांत अनेक संस्कृतज्ञ, विद्वान् व कवि मोठमोठ्या अधिकारांवर होते हें सांधिविग्रहिक (परराष्ट्रमंत्री) हरिषेण, व सचिव कौत्सगोत्री शाब याच्या कोरीव लेखांतील वर्णनावरून स्पष्ट दिसतें. कालिदासासारखा चतुर विद्वान् अशाच एखाद्या मोठ्या अधिकारपदावर असल्यास नवल नाही. चन्द्रगुप्ताने राजनीतिनैपुण्यास्तव त्याला कुन्तलेश राष्ट्रकूटांच्या दरबारीं आपला वकील म्हणून नेमलें होतें हें 'कुन्तलेशदौत्या'वरून दिसतें. तेव्हा इतर मोठमोठ्या अधिकाऱ्यांबरोबर कालिदासहि विदर्भांत आला असावा असें अनुमान करण्यास हरकत नाही. त्याच्या 'मेघदूतां'तील यक्षाचें निवासस्थान म्हणून वर्णिलेला रामगिरि हा सध्याचें रामटेक होय, हें आता बहुतेक विद्वानांना मान्य झालें आहे. हा रामगिरि तत्कालीन वाकाटक राजधानी नन्दिवर्धन (सध्याचें रामटेकजवळचें नन्दरधन किंवा नगरधन) पासून केवळ तीन मैलांवर होता. त्या ठिकाणीं त्या काळीं भगवान् रामचंद्राची पादुकारूपाने पूजा होत असे, हें प्रभावतीच्या ऋद्धपूर ताम्रपटांतील 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' या शब्दांवरून स्पष्ट आहे. मेघदूतांतहि रामगिरीचें वर्णन 'वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु ।' (ज्याच्यावर जनांना वन्द्य अशा भगवान् रामचंद्राच्या पादुका आहेत) अशा शब्दांनी केलें आहे. अशा रामगिरीवर रामप्रभूच्या दर्शनाकरिता कालिदास गेला असतां त्याला मेघदूतकाव्याची कल्पना सुचली असावी असें अनुमान करण्यास हरकत नाही. कालिदासाने 'मेघदूतां'त यक्षाचें निवासस्थान म्हणून रामगिरीची निवड कां केली याची समाधानकारक उपपत्ति दुसऱ्या कोणत्याहि रीतीने लावतां येत नाही.

बालराजांचें वर्णन

'मेघदूतां'तील रामगिरीचा उल्लेख हें कालिदासाच्या विदर्भांतील निवासाचें एकच गमक नाही. नन्दिवर्धनास वाकाटक दरबारीं बालराजा दिवाकरसेन याच्या कारभाराचें जें दृश्य कवीने प्रत्यक्ष पाहिलें त्यावरून रघुवंशाच्या अठराव्या सर्गातील सुदर्शन या बालनृपतीचें वर्णन त्याला सुचलें, असें दिसतें. 'विष्णुपुराणा'दि ग्रंथांत रघुवंशांतील राजांची नामावलि आली आहे,

पण त्यांमध्ये सुदर्शन राजा बालपणीं गादीवर आला होता असें कोठेहि म्हटलें नाही. तेव्हा हें वर्णन कवीला प्रत्यक्ष दृश्यावरून सुचलें असावें. वाकाटक बालनृपति दिवाकरसेन पांचव्या सहाव्या वर्षी गादीवर आला असावा हें आपण मागे पाहिलें आहे. रघुवंशांतील सुदर्शनहि याच बालवयांत राज्य करूं लागला होता. त्याचें खालील वर्णन वाचतांना बहुश्रुत वाचकांस आपण वाकाटक बालराजाच्या काळचें दृश्य पाहत आहों, असें वाटूं लागतें.

तं राजवीथ्यामधिहस्ति यान्तमाधोरणालम्बितमग्र्यवेशम् ।
षड्वर्षदेशीयमपि प्रभुत्वात्प्रैक्षन्त पौराः पितृगौरवेण ।।
कामं न सोऽकल्पत पैतृकस्य सिंहासनस्य प्रतिपूरणाय ।
तेजोमहिम्ना पुनरावृतात्मा तद्व्याप चामीकरपिञ्जरेण ॥
तस्मादधः किञ्चिदिवावतीर्णावसंस्पृशन्तौ तपनीयपीठम् ॥
सालक्तकौ भूपतयः प्रसिद्धैर्ववन्दिरे मौलिभिरस्य पादौ ।
पर्यन्तसञ्चारितचामरस्य कपोललोलोभयकाकपक्षात् ।
तस्याननादुच्चरितो विवादश्चस्खाल वेलास्वपि नार्णवानाम् ॥
निर्वृत्तजाम्बूनदपट्टशोभे न्यस्तं ललाटे तिलकं दधानः ।
तेनैव शून्यान्यरिसुन्दरीणां मुखानि स स्मेरमुखश्चकार ॥
शिरीषपुष्पाधिकसौकुमार्यः खेदं स यायादपि भूषणेन ।
नितान्तगुर्वीमपि सोऽनुभावाद् धुरं धरित्र्या बिभरांबभूव ॥

(भावार्थ--तो सहा वर्षांचा बालराजा सुदर्शन राजमार्गाने हत्तीवर बसून चालला असतां माहुताने तो खाली पडूं नये म्हणून धरून ठेवलेल्या व उंची वस्त्रें धारण केलेल्या त्याला पौरजन त्याच्या पित्यासारखाच आदर दर्शवीत असत. तो सिंहासनावर बसला म्हणजे आपल्या लहान आकृतीमुळे सबंध सिंहासन व्यापूं शकत नसे, पण तें त्याच्या तेजाने व्यापलें जाई. सिंहासनावर बसल्यावर त्याचे किंचित् लोंबणारे पाय सुवर्णाच्या पादपीठापर्यंत पोचत नसत. तथापि राजे लोक आपल्या रत्नजडित मुकुटांनी त्यांना वंदन करीत. दोन्ही बाजूंना चामरांच्या ढाळण्यामुळे त्याचीं झुलपें गालांवर हलत असत. पण त्याच्या मुखांतून निघालेली आज्ञा समुद्राच्या किनाऱ्यावरहि भंग पावत नसे. त्याच्या सुवर्णपट्टाने सुशोभित केलेल्या ललाटावर

तिलक लावला जाई, पण त्यायोगें त्याच्या शत्रूच्या स्त्रियांचीं मुखें तिलक-रहित होत. शिरीषपुष्पापेक्षाहि सुकुमार असलेल्या त्याला अलंकारहि जड वाटत, पण आपल्या अंगच्या अनुभावाने तो पृथ्वीची अत्यंत जड अशी राज्यकारभाराची धुरा धारण करीत असे.)

प्रभावतीने आपल्या मुलांच्या शिक्षणाची चांगली काळजी घेतली होती. त्यांना राजनीतीचेंच नव्हे तर वाङ्मय, कला इत्यादिकांचेंहि शिक्षण देऊन सुसंस्कृत केलें होतें. दिवाकरसेनाने अनेक संस्कृत सुभाषितें रचलीं होतीं. त्यांपैकी कांही 'सदुक्तिकर्णामृता' दि सुभाषितसंग्रहांत 'युवराज-दिवाकरसेना' चीं म्हणून घेतलेलीं आढळतात. तिचा दुसरा पुत्र दामोदर-सेन-प्रवरसेन याने अनेक सुंदर प्राकृत गाथा रचल्या होत्या. त्यांपैकी कांही नंतर गाथासप्तशतींत घातल्या हें मी इतरत्र* दाखविलें आहे. त्याशिवाय त्याने श्रीरामचंद्राच्या चरित्रावर सेतुबंध हें काव्य महाराष्ट्री प्राकृतांत रचलें होतें. त्यांतील काव्यगुणांची प्रशंसा बाण, आनंदवर्धन इत्यादि संस्कृत कवींनी व आलंकारिकांनी मुक्तकंठाने केली आहे. या काव्याच्या रचनेंत त्याला कालिदासाची बरीचशी मदत झाल्यामुळे तें काव्य कालिदासानेच रचलें अशी समजूत प्रचलित झाली. तिचा उल्लेख रामदास नामक टीकाकाराने केला आहे.

द्वितीय प्रवरसेनाचें राज्यारोहण

दिवाकरसेन अल्पवयी असल्यामुळे प्रभावतीने त्याच्या वतीने अनेक वर्षें राज्यकारभार पाहिला. तिचा पुणें ताम्रपट त्या युवराजाच्या तेराव्या शासनवर्षीं दिला होता. तेव्हा तिचा कारभार निदान तेरा वर्षें चालला होता यांत संशय नाही. त्यानंतर लौकरच दिवाकरसेनाचा देहान्त होऊन प्रभा-वतीला दुर्दैवाचा दुसरा तडाखा बसला. पण या सुमारास तिचा दुसरा मुलगा दामोदरसेन हा वयांत आल्यामुळे तिने त्याच्यावर राज्यशासनाचा भार सोपवून आपलें उर्वरित आयुष्य रामभक्तींत घालविण्याचें ठरविलें. दामोदरसेनाने राज्यारोहणानंतर (द्वितीय) प्रवरसेन हें नांव धारण केलें. त्याचा जांब

* संशोधनमुक्तावलि, सर पहिला (पृ. १०४–१२३), यांतील 'गाथासप्तशतीचा काळ' हा लेख पाहा.

ताम्रपट त्याच्या शासनाच्या द्वितीय वर्षी दिला होता. यावरून तो राज्य करूं लागला तेव्हा वयांत आला होता यांत संशय नाही.

प्रभावतीचें आयुर्मान

प्रभावती पुढे पुष्कळ वर्षें जगली असें दिसतें. द्वितीय प्रवरसेनाच्या ताम्रपटांतील दानें 'मातृभट्टारिके'च्या पुण्योपचयाकरिता दिलीं होतीं. त्यांत पित्याच्या पुण्योपचयाचा उल्लेख नसून मातेच्याच आहे, त्यावरून ती त्या काळीं हयात होती यांत संशय नाही. अशा ताम्रपटांपैकी तिरोडी ताम्रपट हा द्वितीय प्रवरसेनाच्या तेविसाव्या शासनवर्षी दिला होता. त्यावरून तिने जवळ जवळ पंचवीस वर्षें आपल्या द्वितीय पुत्राचा राज्यकारभार पाहिला होता असें दिसतें. प्राचीन काळीं स्त्रियांचे विवाह लहान वयांत होत नसत. 'अष्टवर्षा भवेत् कन्या' हें वचन नंतरचें आहे. म्हणून सन ३९५ च्या सुमारास प्रभावतीचा द्वितीय रुद्रसेनाशीं विवाह झाला, त्या वेळीं तिचें वय अठरा वर्षांचें होतें असें मानण्यास हरकत नाही. त्यानंतर तिने सुमारें दहा वर्षें विवाहसुख अनुभविलें असें दिसतें. पुढे पतिनिधनानंतर सुमारें पंधरा वर्षें तिने अल्पवयी मुलातर्फे राज्यकारभार पाहिला असावा. त्याच्या निधनानंतर दुसऱ्या मुलाच्या जवळ जवळ पंचविसाव्या शासनवर्षापर्यंत ती जिवंत होती. तेव्हा निधनसमयीं तिचें वय (१८+१०+१५+२५=६८) सुमारें अडुसष्ट वर्षांपेक्षा कमी नसावें असें वाटतें.

प्रभावतीने द्वितीय प्रवरसेनाच्या एकोणिसाव्या वर्षी दिलेल्या ऋद्धपूर ताम्रपटांत तिचें वर्णन 'साग्रवर्षशतजीवपुत्रपौत्रा' असें केलें आहे. त्यावरून ती शंभर वर्षांपेक्षा अधिक काळ जिवंत होती असें अनुमान कांहींनी केलें आहे. पण तें बरोबर नाही. प्राचीन काळीं सौभाग्यवती स्त्रियांप्रमाणे ज्यांचे पुत्र जिवंत आहेत अशा स्त्रियांनाहि भाग्यवान् मानत असत. म्हणून ऋग्वेद, महाभारत, रामायण इत्यादि प्राचीन ग्रंथांत, तसेंच कोरीव लेखांतहि अनेक स्त्रियांचें 'जीवपुत्रा' असें वर्णन येतें. उदाहरणार्थ, खालील संदर्भ पाहा:—कृष्णशिष्टाई निष्फळ झाल्यावर विदुर कुन्तीला म्हणतो:—

जानासि मे जीवपुत्रे भावं नित्यमविग्रहे ।
क्रोशतो न च गृह्णीते वचनं मे सुयोधनः ।।

यांत कुन्तीला 'जीवपुत्रा' असें विशेषण लावलें आहे. रामायणांत 'जीवपुत्रे निवर्तस्व पुत्रं रक्षस्व चाङ्गदम्।' यांत अंगदमाता तारा हिला 'जीवपुत्रा' म्हटलें आहे. नाशिकच्या लेण्यांतील लेखांत सातवाहननृपति गौतमीपुत्राची माता बलश्री हिचें 'जीवसुता' असें वर्णन केलें आहे. तेव्हा प्रभावतीगुप्तेच्या वरील वर्णनांत तोच अर्थ अभिप्रेत आहे यांत संशय नाही. 'जीव' पदापूर्वी आलेल्या 'साग्रवर्षशत' या उपपदाने प्रभावतीच्या पुत्रपौत्रांचें—तिचें नव्हे—आयुर्मान विवक्षित आहे. त्या वेळीं तिचे पुत्रपौत्र पूर्ण शंभर वर्षें जगले होते असा अर्थ अर्थातच घ्यावयाचा नाही, तर ते दीर्घायु व्हावेत ही इच्छा त्यांत व्यक्त झाली आहे, असें समजलें पाहिजे. लहान मुलांना आपण 'दीर्घायु' 'चिरंजीव' अशीं विशेषणें लावतों, तेव्हा जो अर्थ विवक्षित असतो तोच याहि ठिकाणीं घेतला पाहिजे हें उघड आहे.

प्रभावतीचा स्वभाव

प्रभावती ही मोठी मानी व करारी स्वभावाची स्त्री होती. आपल्या माहेरच्या बलाढ्य व वैभवशाली गुप्त वंशाबद्दल तिला वाटणारा अभिमान तिच्या पुणें ताम्रपटांत कसा व्यक्त झाला आहे हें आपण मागे पाहिलें आहे. त्यानंतर सुमारें वीस वर्षांनी दिलेल्या ऋद्धपूरच्या ताम्रपटांतहि तिने आपल्या सासरच्या वाकाटकवंशाची वंशावळ न देतां, माहेरच्या गुप्तवंशाचीच दिली आहे. ही गोष्ट केवळ यदृच्छेने झाली नसून तिच्या आग्रहाने झाली असावी असें दिसतें. द्वितीय प्रवरसेनाने गादीवर बसल्यावर अनेक ताम्रपट दिले होते त्या सर्वांत वाकाटकांची वंशावळ दिली आहे. ऋद्धपूर ताम्रपटांतहि कालनिर्देशार्थ द्वितीय प्रवरसेनाच्या राज्यशासनाचा उल्लेख आहे, पण त्याची वंशावळ दिली नाही. प्राचीन काळच्या राण्यांनी दिलेलीं कांही दानपत्रें उपलब्ध आहेत. त्यांत तीं दानें त्यांनी तत्कालीं राज्य करणाऱ्या आपल्या पतीच्या किंवा पुत्रांच्या संमतीने दिलीं असा उल्लेख बहुधा आढळतो. ऋद्धपूरच्या ताम्रपटांत त्या वेळीं द्वितीय प्रवरसेन एकोणीस वर्षें राज्य करीत असतांहि प्रभावतीने त्याच्या संमतीचा उल्लेख केला नाही. त्यांत दिलेलें दान प्रभावतीने स्वतः ब्राह्मणांना दिलें आहे असें स्पष्टपणें म्हटलें आहे. तेव्हा स्वतः राज्यकारभार पाहत नसतांहि तिचा दरारा पूर्वीप्रमाणेच होता यांत संशय नाही.

पतीवर धार्मिक वर्चस्व

प्रभावतीच्या राजकुलांतील वर्चस्वाचीं आणखीहि कांही गमकें आहेत. बहुतेक वाकाटकनृपति शिवोपासक होते. प्रथम प्रवरसेनाने मोठमोठे श्रौत याग केले होते. पण तो केवळ वैदिक देवतांचा उपासक नसून एकनिष्ठ शिवभक्त होता. त्याने एक देवालय बांधून त्यामध्ये प्रवरेश्वर या नांवाने शिवलिङ्गाची स्थापना केली होती. त्याचा नातू प्रथम रुद्रसेन हा महाभैरवभक्त होता. या रुद्रसेनाचा पुत्र प्रथम पृथिवीषेण हाहि परममाहेश्वर म्हणजे अत्यंत शिवभक्त होता. अशा रीतीने वाकाटक घराण्यांत शिवोपासना कित्येक पिढया चालू होती. पण या पृथिवीषेणाचा पुत्र द्वितीय रुद्रसेन हा भगवान् चक्रपाणीचा म्हणजे विष्णूचा भक्त झाला. या देवाच्या प्रसादाने आपणास राज्यलक्ष्मीचा लाभ झाला अशी त्याची श्रद्धा होती. तिचा उल्लेख अनेक ताम्रपटांत आला आहे. राजघराण्याच्या इष्ट दैवताच्या बाबतींत हा जो बदल घडून आला त्याचें कारण प्रभावती हीच असली पाहिजे. आपल्या माहेरच्या गुप्तनृपतींप्रमाणे ती स्वत विष्णूपासक होती. ताम्रपटांत तिचें वर्णन 'अत्यन्तभगवद्भक्ता' असें केलें आहे. ती रामगिरीवरच्या भगवान् रामचंद्राची एकनिष्ठ भक्त असून एकादशी व्रताचें अनुष्ठान करीत असे. तिचा मुलगा द्वितीय प्रवरसेन हा स्वतः शिवोपासक होता, तरी त्याचे कित्येक ताम्रपट द्वादशीस किंवा त्रयोदशीस दिले आहेत. ते अर्थातच त्याने आपल्या मातेच्या आदेशावरूनच तिच्या एकादशीव्रताच्या पारण्याच्या प्रसंगीं दिले असावे. वर्षाच्या चोवीस एकादश्यांपैकी आषाढ शुक्ल एकादशी व कार्त्तिक शुक्ल एकादशी या अनुक्रमें चातुर्मासाच्या आरंभींच्या व शेवटच्या एकादशींचें महत्त्व विशेष असतें व तें अद्यापिहि महाराष्ट्रांत टिकून आहे. यांपैकी पहिलीस शयनी एकादशी म्हणतात. कारण त्या तिथीस भगवान् विष्णु क्षीरसमुद्रांत शेषशयनावर निद्रावश होतात अशी समजूत आहे. चातुर्मासानंतर कार्त्तिक शुक्ल एकादशीस ते आपल्या भुजगशयनावरून झोपून उठतात म्हणून तिला प्रबोधिनी एकादशी म्हणतात. कालिदासानेहि आपल्या 'मेघदूतां'त 'शापान्तो मे भुजगशयनादुत्थिते शार्ङ्गपाणौ' अशा रीतीने यक्षाच्या शापान्ताची तिथि सांगण्याकरिता तिचा उल्लेख केला आहे. प्रभावतीगुप्तेचे दोन्ही ताम्रपट—पुणें व ऋद्धपूर

येथे सापडलेले—तिने प्रबोधिनी एकादशीस उपोषण करून द्वादशीस पारण्याच्या वेळीं दिले होते. पहिल्यांतील दान 'भगवत्पादमूले निवेद्य' म्हणजे भगवंताच्या पादुकांना अर्पण करून नंतर एका 'भगवद्भक्त' आचार्यांस दिलें होतें. हा भगवान् म्हणजे रामगिरीवरचा रघुपति राम होय. दुसरा ताम्रपट तर रामगिरिस्वामीच्या (म्हणजे रामचंद्राच्या) पादुकांजवळच (रामगिरिस्वामिनः पादमूलात्) कार्त्तिक शुक्ल द्वादशीस दिला होता. तेव्हा प्रभावती रामभक्त होती यांत संशय नाही. तिच्याच वर्चस्वामुळे तिच्या पतीच्या धार्मिक श्रद्धेंत बदल झाला असला पाहिजे.

द्वितीय प्रवरसेनाची मातृभक्ति

प्रभावतीचा पुत्र द्वितीय प्रवरसेन हा स्वतः 'परममाहेश्वर' होता. श्रीशंकराच्या प्रसादाने त्याला शूलायुध मिळालें होतें असें एका ताम्रपटांत वर्णन आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही की आतापर्यंत सापडलेल्या त्याच्या दहाबारा ताम्रपटांपैकी एकहि शिवोपासनेकरिता किंवा शिवोपासकास दिलेला नाही. त्यांतील कांही रामगिरीवर भगवान् रामचंद्राच्या पादुकांजवळ, तर कांही इतर ठिकाणच्या विष्णूच्या देवळांतील अन्नसत्राकरिता किंवा तीर्थस्थानीं दिले आहेत. त्यांतील कांही प्रभावतीगुप्तेच्या आदेशावरून दिलेले दिसतात. त्यावरून त्याच्या मातृभक्तीप्रमाणे तिचें त्याच्या वरचें वर्चस्वहि प्रत्ययास येतें.

द्वितीय प्रवरसेन अत्यंत शिवभक्त होता. तथापि त्याने आपल्या प्राकृत काव्याकरिता शिवचरित्रांतील एखादा प्रसंग न घेतां रामचरित्राचीच निवड केली होती, तीहि अर्थातच आपल्या मातेच्या इच्छेवरूनच केली असली पाहिजे. कालिदास स्वतः शिवोपासक असतांहि त्याने बहुधा आपल्या आश्रयदात्या विष्णूपासक चन्द्रगुप्ताच्या आज्ञेवरून रघुवंशावर महाकाव्य रचलें तसाच हा प्रकार असावा.

प्रवरसेनाने आपल्या मातेच्या इच्छेवरून रामचरित्रावर दीर्घ काव्य रचलें एवढेंच नाही, तर तिच्याकरिता भगवान् रामचंद्राचें एक उत्तुंग देवालयहि बांधून दिलें. वाकाटकांची आरंभींची राजधानी नन्दिवर्धन येथे होती. तेथून रामगिरि जवळच सुमारें तीन मैलांवर असल्याने

प्रभावतीला आपलें इष्ट दैवत प्रभु रामचंद्र याच्या पादुकांचें दर्शन हवें तेव्हा सहज रामगिरीस जाऊन घेतां येत असे. प्रवरसेन गादीवर आल्यावर लौकरच अकराव्या शासनवर्षापूर्वी त्यानें आपल्या नांवें प्रवरपुर नामक नगर वसवून तेथे आपली राजधानी नेली. हें प्रवरपुर म्हणजे वर्ध्याजवळचें सध्याचें पवनार होय. त्या ठिकाणीं राजधानी झाल्यावर अर्थातच प्रवरसेनाबरोबर प्रभावतीहि तेथे राहावयास गेली. तेथे तिला आपल्या इष्ट दैवताचें दर्शन घेतां यावें म्हणून प्रवरसेनानें भगवान् रामचंद्राचें एक उत्तुंग देवालय धाम नदीच्या काठावर बांधविलें व त्याला सुंदर शिल्पपट्टांनी सुशोभित केलें. या देवळाचे अवशेष पवनार खेडयाच्या बाहेर धाम नदीच्या काठीं आचार्य विनोबाजींचा आश्रम आहे त्याच्या परिसरांत थोडया वर्षांपूर्वी सापडले आहेत. त्यांमध्ये रामजन्म, वनवासगमन, भरतभेट, सुग्रीव–वालि–युद्ध वगैरे प्रसंगांचे शिल्पपट्ट आहेत.* त्यावरून तें देवालय श्रीरामचंद्राचें होतें यांत संशय नाही. शिल्पांच्या घाटणीवरून तीं गुप्त–वाकाटक कालांतील होत असें शिल्पकलाविशारदांचें मत आहे. तेव्हा हें देवालय द्वितीय–प्रवरसेनानें आपल्या मातेकरिता बांधलें असावें असें अनुमान करण्यास हरकत नाही.

प्राचीन काळच्या ज्या थोडया राण्यांच्या चरित्राची आपणांस थोडीबहुत माहिती आहे. त्यांपैकी प्रभावतीगुप्ता ही एक आहे. ती मोठी मानी, कर्तबगार, राजकारणकुशल व धार्मिक प्रवृत्तीची स्त्री होऊन गेली. वाकाटक कालांतील एका आणीबाणीच्या कालखंडांत तिने पुढे होऊन आपल्या राज्याचें संरक्षण केलें व आपल्या अल्पवयी मुलांना योग्य शिक्षण देऊन त्यांना राज्यधुरा धारण करण्यास समर्थ केलें. प्राचीन काळच्या थोर राजस्त्रियांमध्ये तिची गणना केली पाहिजे.

---

* यांचें सविस्तर वर्णन आमच्या 'पवनार येथील प्राचीन अवशेष' (संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. ११७–१८७) या लेखांत आढळेल.

४. ग्रंथपरीक्षण

'मऱ्हाटी संस्कृति' : कांही समस्या*

श्री. शं. बा. जोशी यांच्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'मऱ्हाटी संस्कृति'—कांही समस्या या ग्रंथाचा सुंदर परिचय श्री. दि. के. बेडेकर यांनी 'नवभारता'च्या जून १९५३ च्या अंकांत करून दिला आहे. तेव्हा त्या ग्रंथाविषयी परिचयात्मक लिखाणाची आवश्यकता नाही. श्री. बेडेकर यांनी ग्रंथाचा परिचय करून देत असतांना त्यांतील कांही प्रश्नांविषयीं आपले विचार मांडले आहेतच. तरीहि ग्रंथकर्त्यांने या ग्रंथांत महाराष्ट्रीय इतिहास व संस्कृति यांविषयी अनेक वर्षें विस्तृत वाचन व खोल मनन करून अनेक प्रश्नांविषयी आपले सिद्धांत मांडले असल्यामुळे त्यांची आणखी चर्चा होणें जरूर आहे. म्हणून संपादकांच्या सूचनेवरून त्यांतील कांही प्रश्नांविषयी मी आपले विचार व्यक्त करीत आहे. प्रथमच एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. ती ही की पुढील विवेचन केवळ सत्यान्वेषणाच्या दृष्टीने केलें आहे. ज्या आन्तरभारतीच्या विद्यमानें प्रस्तुत ग्रंथाचें प्रकाशन झालें आहे तिच्या उद्देशाविषयी व कार्याविषयी मला नितान्त आदर आहे. श्री. जोशी यांनीहि इतिहास, भाषा, देवदेवळें, धर्मग्रंथ इत्यादिकांच्या पुराव्यांचे धागेदोरे मोठ्या कौशल्याने गुंफून आपले सिद्धांत मांडले आहेत. त्यांनी परिश्रम अपार केले आहेत यांत संशय नाही. तथापि त्यांच्या संशोधनाला न जुळणारा असा कांही पुरावा असल्यास तोहि लक्षांत घेऊन

* 'नवयुग' पुणें, डिसेंबर १९५३.

त्याची सत्यासत्यता पडताळणें आवश्यक आहे. या दृष्टीने खालील प्रयत्न केला आहे.

समस्या : १ : मऱ्हाट व वऱ्हाड यांची व्युत्पत्ति

श्री. जोशी यांनी आपल्या ग्रंथाला 'मऱ्हाटी संस्कृति' असें नांव मुद्दामच दिलें आहे. कारण त्यांच्या ग्रंथाचा विषय मुसलमानपूर्वकालीन महाराष्ट्रीय संस्कृति असा आहे. त्या काळीं मऱ्हाटी हें रूपच प्रचलित होतें, हें ज्ञानेश्वरीवरून स्पष्ट दिसतें. मऱ्हाट हा शब्द प्राकृत 'मरहट्ट' या शब्दापासून बनला आहे. प्राकृत व्याकरणकार 'मरहट्ट' शब्दाची व्युत्पत्ति 'महाराष्ट्र' शब्दापासून लावतात. हेमचन्द्राची 'महाराष्ट्रे' आणि 'महाराष्ट्रे हरोः' (८, १, ६९; २, ११९) अशीं याविषयी दोन सूत्रें आहेत. 'महाराष्ट्र' शब्दांतील 'आ' बद्दल 'अ' येऊन व वर्णव्यत्यास होऊन 'मरहट्ट' बनला, असें त्याचें मत आहे. 'अचलपुर' पासून 'अलचपुर' व 'वाराणसी' पासून 'वाणारसी' अशीं वर्णव्यत्यासाचीं इतरहि दोन उदाहरणें त्याने दिलीं आहेत. 'मरहट्ट' हा शब्द 'महाराष्ट्रा'पासून बनला अशी संस्कृत व प्राकृत ग्रंथकारांची समजूत होती यांत संशय नाही. पाली महावंसो ग्रंथांतहि (१२, ५ व ३७) 'महारठ्ठ' असें रूप आढळतें तें 'महाराष्ट्र' शब्दापासूनच निघालें आहे.

पण श्री. जोशी यांस ही व्युत्पत्ति मान्य नाही. त्यांच्या मतें मरहट्ट हा देशवाचक शब्द 'महाराष्ट्र' पासून बनला असणें शक्य नाही, कारण—

(१) प्राचीन काळीं देशांना जीं नांवें मिळालीं तीं तेथील मूळ वसाहत करणाऱ्या जनांवरून. पण महाराष्ट्र हा शब्द जनवाचक नाही.

(२) 'महाराष्ट्र' याचा अर्थ 'मोठें राष्ट्र'. हें नांव देशाची पाहणी होऊन मोजमाप केल्यावरच येऊं शकेल. तें मूळ नांव असणें शक्य नाहीं.

(३) 'महाराष्ट्र' शब्द खिस्ती शकाच्या आरंभीं होऊन गेलेल्या वररुचीच्या व्याकरणांत प्रथम आढळतो. त्याकाळीं महाराष्ट्री भाषा म्हणून प्रसिद्ध होती; पण राष्ट्र या नात्याने महाराष्ट्राचें अस्तित्व मान्य नव्हतें. तेव्हां 'महाराष्ट्र' हें देशनाम प्राचीन नाही. हें नाम रूढ होण्यापूर्वी

देशाला कांहीतरी नांव असलेंच पाहिजे. तें नांव 'मरहट्ट' असें होतें. हें नांव कानडी आहे. कानडींत 'मर' याचा अर्थ झाड असा होतो. वऱ्हाड ह्या मूळचा महाराष्ट्र. यांत सध्याहि हटगार नांवाचे धनगर लोक बऱ्याच महत्त्वाचे आहेत. या हटगारांची प्रमुख वस्ती ज्या प्रदेशांत आहे त्याला हट्ट देश असें नांव मिळाल्यास आश्चर्य नाही. तेव्हा 'मरहट्ट' म्हणजे हाट लोकांचा झाडीयुक्त देश. या अर्थाचा 'झाडिमंडळ' असा शब्द यादवकालीन शिलालेखांत आढळतो. हेमाद्रीने झाडिमंडळ जिंकून घेतल्याचें वर्णन आहे. महानुभावांच्या 'लीळाचरित्र' व 'रुक्मिणीस्वयंवर' ह्या प्राचीन ग्रंथांत 'झाडिमंडळ' हा शब्द आला आहे. त्याचा अर्थ 'गोंडवन' किंवा 'आजचा मध्यप्रांत'. तेव्हा मरहट्ट म्हणजे वऱ्हाड. 'वऱ्हाड' हा शब्दहि 'मऱ्हाट' शब्दापासून बनला आहे. कानडीमध्ये 'म' चा 'व' होतो; तेव्हा मऱ्हाटचें वऱ्हाट–वऱ्हाड होणें अशक्य नाही. मरहट्ट याचें मरहाट–मऱ्हाट असें रूप होऊन त्याच्याशीं उच्चारांत साम्य असलेलें महाराष्ट्र असें संस्कृत रूपान्तर घुणाक्षरन्यायाने झालें असणें शक्य आहे.

श्री. जोशी यांची मऱ्हाट व वऱ्हाड या देशनामांची व्युत्पत्ति शक्य तों त्यांच्या शब्दांत दिली आहे. आता उपलब्ध साधनांवरून तिचें परीक्षण करूं.

'महाराष्ट्र' शब्दाची व्युत्पत्ति लावण्याचे अनेक प्रयत्न आतापर्यंत करण्यांत आले. महारांचें राष्ट्र तें महाराष्ट्र, महान् राष्ट्र किंवा महारठींचा देश म्हणून महाराष्ट्र, अशा व्युत्पत्त्या देण्यांत आल्या. पण त्या सर्वसंमत नसल्याने समंजस नाहीत असें श्री. जोशी म्हणतात. आमच्या मतें 'समंजसपणा'ची ही कसोटी भ्रामक आहे. कोणतेंहि संशोधन सर्वसंमत होईलच असा नेम नाही. श्री. जोशी यांची व्युत्पत्तिहि सर्वसंमत होईल असें कोणी सांगावें ? तेव्हा कोणत्याहि प्रमेयाची सत्यासत्यता उपलब्ध प्रमाणांवरूनच ठरविली पाहिजे.

'महाराष्ट्र' हें देशनाम फार प्राचीन ग्रंथांत येत नाही हें खरें. त्याचा पहिला उल्लेख इ० स० च्या चौथ्या शतकांतील एरण येथील स्तंभलेखांत आढळतो. त्यापूर्वी झालेल्या वररुचीने 'महाराष्ट्री' हें त्या प्रदेशांतील प्राकृत भाषेचें नांव दिलें आहे. देशावरून भाषेला नांव पडतें हें लक्षांत घेतां वररुचीच्या काळीं महाराष्ट्र हें देशनाम प्रचलित होतें यांत संशय

नाही. 'महाराष्ट्री' भाषा त्या काळीं प्रसिद्ध होती पण महाराष्ट्र हें देशनाम मात्र मान्यता पावलें नव्हतें, या विधानाचा अर्थ आम्हांस समजत नाही. 'महाराष्ट्र' हें नाम आरंभींच्या लेखांत येत नाही हें प्रमाण अभावात्मक (argumentum ex silentio) आहे. तें निर्णायक मानतां येत नाही. उल्लेखाभावाचीं कारणें अनेक असूं शकतील. उदाहरणार्थ, वाकाटकांचें राज्य विदर्भदेशावर जवळ जवळ तीन शतकें होतें. पण त्यांच्या एकाहि कोरीव लेखांत विदर्भाचा निर्देश नाही. याचें कारण तसा निर्देश करण्याचा प्रसंग आला नाही हें होय. गौतमी बालश्रीच्या नाशिक येथील लेण्यांत तिचा मुलगा गौतमीपुत्र सातकर्णि ज्या प्रदेशांवर राज्य करीत होता त्यांचा निर्देश आहे. त्याचें राज्य महाराष्ट्रावर होतें. तथापि त्या लेखांत त्याचा उल्लेख नाही. याचें कारण त्यांत विदर्भ, अश्मक, ऋषीक इत्यादि महाराष्ट्रांत अन्तर्भूत होणाऱ्या अनेक देशांचा नामनिर्देश आहे.* तेव्हा 'महाराष्ट्र' हें देशनाम निदान खिस्तीशकाच्या आरंभाइतकें तरी प्राचीन आहे असें म्हणण्यास हरकत नाही.

महाराष्ट्र हें नांव फार प्राचीन नाही असें मान्य केलें तरी श्री. जोशी यांना संमत असें मरहट्ट हें नांव तरी त्याच्यापेक्षा प्राचीन आहे काय ? तें तर कुवलयमाला (इ० स० चें ८ वें शतक), राजशेखर (इ० स० चें १० वें शतक) इत्यादिकांच्या ग्रंथांत इ० स० ७५० नंतर प्रथम आढळतें. त्यापूर्वीच्या 'महावंसो' (इ० स० चें पाचवें शतक) ग्रंथांत 'महारठ्ठ' शब्द आला आहे. पण तो संस्कृत 'महाराष्ट्रा'पासून बनला आहे असें श्री. जोशी कबूल करतात. तेव्हा 'मरहठ्ठ' शब्द 'महाराष्ट्रा'पेक्षा प्राचीन नाही. संस्कृत व प्राकृत ग्रंथकारांच्या मतें तर तो 'महाराष्ट्रा'चें प्राकृत रूप आहे. अर्थात् तो त्यानंतरचा आहे. महाराष्ट्रींतील पहिलें काव्य 'सत्तसई' यामध्येहि त्यांतील भाषेला 'मरहट्टी' असें म्हटलें नसून 'पाउअ' (प्राकृत) असेंच म्हटलें आहे.

हीच गोष्ट 'वऱ्हाड' या देशनामाची. हा शब्दहि प्राचीन वाङ्मयांत येत नाही. महानुभावी वाङ्मयांत तो प्रथम आढळतो. प्राचीन संस्कृत

---

* एपिग्राफिया इंडिका, पु. ८, पृ. ६० इ.

वाङ्मयांत याचें नांव 'विदर्भ' व प्राकृत कोरीव लेखांत 'विदभ' असेंच येतें. वऱ्हाड हें नांव तेराव्या शतकांत रूढ झालें आहे, मग त्याची व्युत्पत्ति कांहीहि असो.—"मरहट्ट ह्या शब्दाचा प्रयोग फार प्राचीन नसला तरी त्याच्या अर्थाकडे लक्ष देतां तो शब्द फार प्राचीन काळापासून वऱ्हाडला लावला जात असावा. यादवकाळीं वऱ्हाडला 'झाडीमंडळ' म्हणत असत. 'मरहट्ट' याचा अर्थहि झाडी असलेला हट्ट लोकांचा देश असाच होतो" असें श्री. जोशी यांचें म्हणणें आहे; त्याचा आता विचार करूं—

कोणत्याहि प्राचीन ग्रंथांत किंवा कोरीव लेखांत वऱ्हाडचें 'दाट झाडी असलेला देश' अशा अर्थाचें नांव आढळत नाही. यादवांच्या ठाण्यास सापडलेल्या ताम्रपटांत हेमाद्रीने झाडीमंडळ जिंकलें, असा निर्देश आहे खरा, पण त्याचा अर्थ त्याने वऱ्हाड जिंकला होता असा होत नाही. हेमाद्रि हा यादवनृपति महादेव व रामचंद्र यांच्या काळीं करणाधिप व मुख्य मंत्री होता. तो उदयास येण्यापूर्वीच वऱ्हाडचा बराचसा भाग यादवांच्या अंमलाखाली आला होता. वऱ्हाडच्या बुलढाणा जिल्ह्यांतील अमडापूर गावीं यादवनृपति सिंघण याचा शके ११३३ (सन १२११-१२) चा शिलालेख* सापडला आहे. सिंघणाचा सेनापति खोलेश्वर याने अमरावती जिल्ह्यांतील अचलपुर, खोलापूर वगैरे ठिकाणीं मंदिरें बांधलीं व अग्रहार दिले असा त्याच्या आंबे येथील लेखांत† उल्लेख आहे. सिंघणाचा नातू कृष्ण याचाहि शके ११७७ चा लेख अमरावतीहून वीस मैलांवर नांदगांव येथील खंडेश्वराच्या देवळांत आहे.‡ त्याच राजाचा दुसरा लेख चांदा जिल्ह्यांत मार्कंडी येथील पुरातन देवालयाजवळ सापडला आहे.§ तेंव्हा हेमाद्रीपूर्वीच हल्लींचा वऱ्हाड यादवांच्या अमलाखाली आला होता यांत संशय नाही. कृष्णाचा मुलगा रामचंद्र किंवा रामदेवराव याच्या काळीं नागपूर, भंडारा व चांदा जिल्ह्याचा कांही भाग जिंकून यादवांच्या

* एपिग्राफिया इंडिका, पु. २१, पृ. १२७.
† दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, भाग १ पृ. ७३.
‡ ए. इं., पु. २७, पृ. ९.
§ भा. इं. सं. मं. त्रै., पु. १९, पृ. ८५.

राज्याला जोडला गेला असें पुरुषोत्तमपुरी ताम्रपटावरून* दिसतें. रामदेवरावाचा एक लेख नागपूरजवळ रामटेक येथे सापडला आहे.† नागपूर, भंडारा, चांदा या भागालाच सध्या झाडी म्हणतात. हा भाग जिंकण्यांत हेमाद्रीने प्रमुख भाग घेतला असावा म्हणून त्याने झाडीमंडळ जिंकलें होतें असें ठाणें ताम्रपटांत म्हटलें आहे.

वरील विवेचनावरून वर्धा नदीच्या पूर्वेस असलेल्या मध्यप्रदेशाच्या भागासच 'झाडीमंडळ' अशी संज्ञा होती असें दिसून येईल. 'रुक्मिणी-स्वयंवरां'त (ओ. २४५) झाडमंडळाचा उल्लेख आहे पण त्याने कोणता देश विवक्षित आहे हें निश्चितपणें सांगतां येत नाही. 'लीळाचरित्रां'तील झाडीच्या उल्लेखावरून तें अचलपुरापासून फार दूर नसलेलें एक ठिकाण दिसतें. (ह. ना. नेने कृत 'लीळाचरित्र', एकांक, पृ. ३७.)

महाराष्ट्रांत प्राचीन काळीं हट्टि किंवा हाट लोकांची वस्ती होती असें एकाहि कोरीव लेखावरून दिसत नाही. नाशिक, कार्लें, कान्हेरी, भाजा, बेडसा, जुन्नर वगैरे ठिकाणच्या लेण्यांत समाजाच्या वरच्या तसेंच अगदी खालच्या थरांतील लोकांचे–श्रेष्ठी, सोनार, सुतार, कारकून, व्यापारी इत्यादिकांचे–लेख आहेत. पण त्यांत हट्टि किंवा हाट लोकांचा नामनिर्देश आढळत नाही. तेव्हा देशाला आपलें नांव देण्याइतक्या प्रामुख्याने त्यांची महाराष्ट्रांत वस्ती होती असें दिसत नाही. त्या काळीं महाराष्ट्रांत प्रमुख वस्ती नागांची होती. महाराष्ट्रांतील कित्येक रठी व महारठी नागवंशाचे किंवा नागपूजक होते. गतवर्षी सापडलेल्या एरणस्तम्भलेखांत आपला 'महाराष्ट्रीय' म्हणून साभिमान उल्लेख करणारा शकांचा सेनापति सत्यनाग हा नागवंशी होता.‡ अजंट्याचीं लेणीं कोरण्यांत नागांनी पुढाकार घेतला होता म्हणून त्या ठिकाणीं नाग राजांचीं अनेक शिल्पें व चित्रें आढळतात. हट्टि किंवा हटगार हे लोक त्या काळीं प्रमुख असते तर त्यांचाहि नामनिर्देश किंवा इतर खुणा महाराष्ट्रांत आढळल्या असत्या.

---

* ए. इं., पु. २५ पृ. २११.

† ए. इं., पु. २५, पृ. ७.

‡ संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. १५९–१६७.

पट्टि किंवा हट्टि लोकांवरून महाराष्ट्रांतील 'पाडा', 'वाडा' अन्तीं असलेलीं स्थलनामें बनलीं असें श्री. जोशी सांगतात. पण तीं नांवें महाराष्ट्रांत किंवा कर्णाटकांतच आढळत नसून उत्तर हिंदुस्थानांतहि आढळतात. तीं संस्कृत 'पाटक' शब्दावरून बनलीं आहेत. 'पाटक' पाटय्* धातूपासून बनला असून त्याचा अर्थ 'भूविभाग' असा आहे. देशांतील जमिनीचे विभाग होऊन बनलेल्या खेडयांच्या नामांच्या अन्तीं पाटक किंवा वाटक हा शब्द आढळतो. उदाहरणार्थ, उत्तरप्रदेशच्या गोरखपूर जिल्ह्यांतील कल्ह गांवीं सापडलेल्या ताम्रपटांतील असथीपाटक, थिउलपाटक, वणिआपाटक, दुआरिपाटक हीं ग्रामनामें घ्या. यासारखींच ग्रामनामें इतर प्रदेशांतहि आढळतात. पाटकपासून पुढे पाडा व वाटकपासून वाडा हे सध्या ग्रामनामांच्या शेवटीं आढळणारे शब्द बनलेले दिसतात. त्यांचा 'पट्टि' 'हट्टि' शब्दांशीं संबंध जोडण्याची जरूरी नाही.

'मरहट्ट' याचा अर्थ दाट झाडी असलेला हट्ट लोकांचा देश मानल्यास त्याचें महाराष्ट्र असें संस्कृतीकरण कसें झालें अशी अडचण उत्पन्न होते. मरहट्ट व महाराष्ट्र यामध्ये कांही उच्चारसाम्य आहे म्हणून घुणाक्षरन्यायाने महाराष्ट्र शब्द बनला हें स्पष्टीकरण मनाला पटत नाही. श्री. जोशी यांनी मोक्षमूलर व इष्टुर फाकडा हीं उदाहरणें दिलीं आहेत. प्रो. मॅक्स मुल्लर संस्कृत विद्वान् असल्याने तो मजेखातर आपली सही मोक्ष मूलर अशी कधी कधी करीत असे.† इस्टुर फाकडा हें स्टुअर्ट नांव उच्चारण्यास कठीण म्हणून अज्ञ लोकांनी केलेलें त्याचें अपभ्रष्ट रूप. त्याचा दाखला येथे उपयोगी पडणार नाही. मरहट्ट हें मूळ रूप असून त्याचें

* पट् (१ प.)चें प्रयोजकरूप. या अर्थाचा 'भूश्छेदीकृत्य' हा गंगताम्रपटांतील प्रयोग पाहा. ए. इं., पु. ३, पृ. १२८.—कांही लेखांत 'छेद' हें 'पाटक' सारखें ग्रामनामाच्या शेवटीं येतें. आन्ध्रदेशांतील 'भुक्कुकुरच्छेद' हें ग्रामनाम पाहा. ए. इं., पु. १४, पृ. ३६२.

† जर्मन विद्वान् बर्टलिंग् ह्याने सन १८३९ मध्ये छापलेल्या 'अष्टकं पाणिनीयम्' नांवाच्या ग्रंथावर संपादक म्हणून आपलें नांव 'बोधलिङ्ग' असें घातलें आहे.

नंतर संस्कृत रूपांतर केलें असल्यास संस्कृतज्ञांनी तें मूळ शब्दार्थाचें वाचकच बनविलें असतें, केवळ उच्चारणसाम्य साधण्याचा प्रयत्न केला नसता असें वाटतें.

मग मऱ्हाट व वऱ्हाड यांच्या खऱ्या व्युत्पत्त्या कोणत्या? असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचें उत्तर देण्याचा यथामति प्रयत्न करूं.

मऱ्हाट हा शब्द 'महाराष्ट्र'पासूनच बनला आहे. हेमचन्द्राने सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्र याचें 'मरहट्ट' असें रूप प्राकृतांत बनतें. त्यानंतर मऱ्हाट व मराठा अशीं रूपें कालान्तराने झालीं. हीच व्युत्पत्ति समाधानकारक वाटते.

'महाराष्ट्र' हें नांव अत्यंत प्राचीन नाही हें खरें. पण तें खिस्ती शकाच्या आरंभाइतकें तरी जुनें आहे. प्राचीन काळीं देशांचीं नांवें त्यांत वसाहत करणाऱ्या लोकांच्या नांवांवरूनच पडत असत असें नाही. कारण 'महाराष्ट्र'सारखेंच व त्याच्या इतकेंच जुनें 'सुराष्ट्र' हें नांव प्राचीन कोरीव लेखांत 'सुरठ' या प्राकृत रूपाने आढळतें.*

पहिल्या पुलकेशीच्या काळीं तीन महाराष्ट्र ज्ञात होते, ते विदर्भ, उत्तर महाराष्ट्र व कुन्तल किंवा दक्षिण महाराष्ट्र हे होत. कलचुरींचें राज्य या तीन्ही प्रदेशांवर होतें. तेव्हा त्यांना जिंकल्यावर पुलकेशी तीन महाराष्ट्रांचा स्वामी झाला. यांपैकी दोन महाराष्ट्रांना विदर्भ व कुंतल अशीं स्वतंत्र नावें होतीं. उत्तर महाराष्ट्रांत मात्र अनेक लहान लहान देश होते. त्यांपैकी ऋषीक (खानदेश), अश्मक (गोदावरीच्या काठचा प्रदेश), मूळक (पैठणाजवळचा प्रदेश) यांचा उल्लेख गौतमी बलश्रीच्या नाशिकच्या लेखांत आला आहे. या शिवाय गोपराष्ट्र† या सारखे राष्ट्रशब्दान्त प्रदेशहि त्यांत अन्तर्भूत असावे. या सर्वांचा समावेश महाराष्ट्रांत करण्यांत आला. कुन्तल व विदर्भ यांनाहि महाराष्ट्र म्हणत

---

* ए. इं., पु. ८, पृ. ६० इ.—भौगोलिक परिस्थितीवरूनहि देशनामें पडतात. 'अनूप' हें नांव व त्याची व्युत्पत्ति (पाणिनि, ६, ३, ९८) पाहा.

† हा प्रदेश नाशिकच्या पश्चिमेस होता. ए. इं., पु. २५, पृ. २३०.

असें राजशेखराच्या 'बालरामायणा'वरून दिसतें. कुन्तलांत प्राचीन काळीं कृष्णानदीच्या उत्तर खोऱ्याचा समावेश होई. कांही ठिकाणीं कुन्तलाचा विस्तार गोदावरीनदीपर्यंत होता असें म्हटलें आहे. सोड्ढलाच्या 'उदयसुन्दरीकथें'त (पृ. २१, ८३) 'कुन्तलेषु तटे गोदावरीति महासरितः प्रतिष्ठानं नाम नगरम्' 'प्रतिष्ठाननगरीपरमेश्वरः कुन्तलानामधीश्वरः' अशीं वर्णनें येतात. प्रतिष्ठान (पैठण) येथे राज्य करणाऱ्या सातवाहन राजांनाहि कांही ठिकाणीं 'कुन्तलेश्वर' म्हटलें आहे. कुन्तल हा प्रदेश महाराष्ट्र व कर्णाटक यांच्या सीमेवरचा असल्याने त्याचा अन्तर्भाव कधी महाराष्ट्रांत तर कधी कर्णाटकांत होत असे. कालाच्या ओघांत देशांच्या सीमा बदलत असतात. उत्तरकालीन लेखांत कुन्तलदेशांत प्रामुख्याने कर्णाटकी प्रदेशाचा अन्तर्भाव होत असे. बिल्हणाच्या 'विक्रमांकदेवचरितां'त कल्याणीच्या चालुक्य (सहाव्या) विक्रमादित्याला कधी 'कुन्तलेन्द्र' तर कधी 'कर्णाटेन्दु' असें म्हटलें आहे. सध्याच्या बेळगांव जिल्ह्यासारखी त्याची स्थिति होती. तथापि त्यावरून कर्णाटक व महाराष्ट्र हे यादवकाळापर्यंत एकच मानले जात असत असें अनुमान करणें योग्य होणार नाही. हीच गोष्ट चिनी प्रवासी ह्यूएन्त्संग याच्या वर्णनाची. ह्यूएन्त्संग द्वितीय पुलकेशीला 'महाराष्ट्रनृपति' म्हणतो. पुलकेशी हा तर वातापीपुरीचा—कर्णाटकांतील बदामीचा—राजा. तेव्हा या उल्लेखावरून नर्मदेपासून कावेरीपर्यंतच्या प्रदेशाला कधी महाराष्ट्र तर कधीं कर्णाटक म्हणत असावे, असें श्री. जोशी अनुमान करतात. पण तेंहि बरोबर दिसत नाही. ह्यूएन्त्संगच्या वर्णनावरून तो पुलकेशीला महाराष्ट्रांत कोठेतरी—बहुधा नाशिकजवळ—भेटला असावा असें संशोधकांनी अनुमान केलें आहे. कदाचित् नाशिक हीच पुलकेशीची दुसरी राजधानी असेल. तसें असल्यास त्याने पुलकेशीला 'महाराष्ट्रनृपति' म्हणून उल्लेखिलें यांत नवल नाही.

आता विदर्भाला 'वऱ्हाड' हें नांव कसें प्राप्त झालें याचा विचार करूं. वऱ्हाड हें नांव प्राचीन नाही हें मागे सांगितलें आहेच. प्राचीन काळीं या प्रदेशाचीं विदर्भ व क्रथकैशिक अशीं नांवें होतीं. हीं दोन्ही नांवें 'रघुवंशां'त आलीं आहेत. विदर्भाचे अनेक जिल्हे होते, त्यांचीं नांवें 'कट'-शब्दान्त असत. उदाहरणार्थ बेन्नाकट (वाइन-गंगेच्या दोन्ही तीरांवरचा

प्रदेश) याचा उल्लेख वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेनाच्या तिरोडी ताम्रपटांत* आला आहे. या तऱ्हेचेच भोजकट† (अमरावती जिल्हा) व नान्दीकट‡ (नान्देडजवळचा प्रदेश) यांचाहि निर्देश वाकाटकांच्या ताम्रपटांत आढळतो. तसाच 'वरदाकट' असाहि एक जिल्हा प्राचीनकाळीं असावा. त्यांत वरदा (सध्याच्या वर्धा) नदीच्या दोन्ही तीरांवरचा प्रदेश अन्तर्भूत होत असावा. कालान्तराने 'कट'शब्दाचा अर्थ लोकांना समजेनासा झाल्यावर त्याला वरदातट म्हणूं लागले असें दिसतें. विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये याला महत्त्व प्राप्त झाल्यावर 'वरदातट' हें नांव विदर्भ या अर्थी प्रचलित झालें असावें. 'नलचम्पू' (इ. स.चें दहावें शतक) च्या खालील श्लोकांत (६, ६६) वरदातटाचा विदर्भदेश या अर्थी उल्लेख आला आहे :

'वीरपुरुषं तदेतद्वरदातटनामकं महाराष्ट्रम् ।
दक्षिणसरस्वती सा वहति विदर्भा नदी यत्र ॥'

अबुल फाजलनेहि वऱ्हाडचें वर्धातट असें जुनें नांव होतें असें म्हटलें आहे.§ तेव्हा वरदाकट–वरआअड–वराड–वऱ्हाड अशी या देशनामाची व्युत्पत्ति मानणें योग्य होईल.

समस्या २ : जुळीं भावंडें : मरहट्टे आणि कानडे

महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या निर्मितीस कारणीभूत झालेले मरहट्टे व कानडे हे प्राचीन काळीं एकाच प्रदेशांत जवळ जवळ राहत होते हें सिद्ध करण्याकरिता श्री. जोशी खालील पुरावा पुढे मांडतात—

"अशोकाच्या शिलालेखांत रिस्टिक व भोजक यांचा उल्लेख एकत्र आढळतो. भोज हे विदर्भांत राहत होते तर रिस्टिक हे खानदेशाच्या जवळपास राहात असावे. खानदेश याची कन्नदेश अशी व्युत्पत्ति आता

---

* ए. इं., पु. २२, पृ. १७२.

† फ्लीट, गुप्त इन्स्क्रिप्शन्स्, पृ. २३७.

‡ ए. इं., पु. २६, पृ. १५१.

§ या. मा. काळे, 'वऱ्हाडचा इतिहास,' पृ. २३. वर्धा ही नदी ओहोळासारखी लहान नाही. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रां'त विदर्भाचे दोन भाग दाखविण्याकरिता तिचा निर्देश केला आहे.

सर्वमान्य झाली आहे. या कन्न देशांत कानडी लोक वसाहत करून होते. सध्याहि खानदेशांत कानड गवळ्यांची वस्ती आहे. खानदेशांतील हे राष्ट्रीय लोक मूळचे रहिवासी होत. हेच पुढे राष्ट्रकूट म्हणून प्रसिद्धीस आले. राष्ट्रकूट घराणें कर्णाटकीय होय असें डॉ. अळतेकरांचें निश्चित मत आहे. विदर्भांतील रहिवासी हट्ट यांचें नांवहि कानडीच आहे. खिस्ती शकाच्या दुसऱ्या शतकानंतर कर्णाट–महाराष्ट्रीयांचा उल्लेख निःसंदिग्धपणें स्वतंत्र असा बऱ्याच काळापर्यंत मिळत नाही. जुन्या कोरीव लेखांतून 'कर्णाटलाट' असा जोडशब्द येतो त्यावरून महाराष्ट्र देश कर्णाटकांत समाविष्ट झालेला दिसतो. तेव्हा मरहट्टे व कानडे हे जुळीं भावंडें होत. पुढे देवगिरि व हळेबिडु यादवांच्या यादवीपासून या दोघांमध्ये वितुष्ट येऊं लागून राज्याभिमानाला व प्रान्ताभिमानाला रंग चढूं लागला व पुढे अनेक घटनांनी त्यांचा विभक्तपणा वाढूं लागला."

वरील प्रमेयांतील अनेक विधानें वादग्रस्त आहेत. मराठी व कानडी लोक खुद्द महाराष्ट्रांत एकत्र राहत नसले तरी महाराष्ट्र व कर्णाटक या लगतच्या प्रदेशांत राहत होते. पुष्कळदा हे प्रदेश एकाच राजवटींत समाविष्ट असत. तेव्हा त्यांचा परस्परांशीं निकट संबंध यावा, त्यांचें वाङ्मय परस्परांच्या वाचनांत यावें व त्यांच्या भाषांवर त्याचा परिणाम व्हावा यांत आश्चर्य नाही. मराठींत तसे कित्येक शब्द कानडींतून घेतले आहेत, हें अनेकांनी दाखविलें आहे. तथापि सध्या महाराष्ट्र म्हणून गणल्या गेलेल्या प्रदेशांत कानडी लोकांची वस्ती यादव काळापर्यंत प्रामुख्याने होती हें सिद्ध करण्यास पुरेसा पुरावा ग्रंथकर्त्यांनी मांडला आहे असें वाटत नाही.

खानदेशचें कन्नदेश हें नांव मुसलमानपूर्व काळांत प्रचलित होतें असें श्री. जोशी म्हणतात, पण त्याविषयी पुरावा त्यांनी दिलेला आढळला नाही. खानदेशचें प्राचीन नांव ऋषीक किंवा ऋचिक होतें हें ते मान्य करतात.* त्यानंतर सेउण देश असें त्या प्रदेशाला नांव पडलें तें कोरीव लेखांत व हेमाद्रीच्या 'व्रतखंडां'तील राजप्रशस्तींत आढळतें. पण कर्णा–

---

* याविषयी सविस्तर विवेचन 'खानदेशांतील एक प्राचीन राजवंश' (मागे, पृ. ७२–८०) या लेखांत पाहा.

टांच्या प्राचीन काळच्या वसतीचें द्योतक असें कन्नदेश हें नांव मात्र प्राचीन कोरीव लेखांत मला दिसलें नाही.

राष्ट्रकूट हे खानदेशचे रहिवासी. ते कानडी होते म्हणून खानदेशांत प्राचीन काळीं कानडी भाषा प्रचलित होती हें अनुमानहि चिन्त्य आहे. प्राचीन ताम्रपटांत राष्ट्रकूट व ग्रामकूट यांच्यासह ग्रामीण जनांना राजांचा आदेश कळविला जात असे. देशाच्या विभागांना राष्ट्र अशी संज्ञा होती. ती केवळ कानडी मुलखांतच आढळते, असें नसून, दक्षिण-हिंदुस्थानाच्या सर्व भागांत आढळते.* ग्रामांचे प्रमुख जसे ग्रामकूट, तसे राष्ट्रांचे प्रमुख राष्ट्रकूट असत. यांतून पुढे कांही घराणीं महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत उदयास आलीं. सुमारें वीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या आपल्या 'राष्ट्रकूट आणि त्यांचा काल' या ग्रंथांत डॉ. अळतेकरांनी राष्ट्रकूटांची भाषा कानडी होती असें विधान मुख्यतः खालील प्रमाणांवरून केलें होतें:—(१) त्यांच्या दरबारीं कानडी वाङ्मयाला उत्तेजन मिळालें. (२) गुजराथेंतील कर्क, ध्रुव इत्यादि सामंतांच्या सह्या दक्षिणच्या मूळ कानडी (proto–Canarese) लिपींत आहेत. त्यानंतर गेल्या वीस वर्षांत राष्ट्रकूटांच्या इतिहासावर पुष्कळच नवीन प्रकाश पडला आहे. बदामीच्या चालुक्यांच्या उदयापूर्वी दक्षिणेंत राष्ट्रकूटांचें राज्य होतें, हें डॉ. अळतेकरांना संमत नव्हतें, पण अलीकडील संशोधनावरून सर्वांत जुनें राष्ट्रकूट घराणें कृष्णानदीच्या उत्तर खोऱ्यांत इ० स० च्या चौथ्या शतकांत उदयास आलें हें सिद्ध झालें आहे.† त्यांचे ताम्रपट महाराष्ट्रांत कोल्हापूर, दौंड वगैरे ठिकाणीं सापडले आहेत.‡ यांची राजधानी मानपुर ही सातारा जिल्ह्यांतील माण असावी. हे राष्ट्रकूट वाकाटकांचे समकालीन होते. वाकाटकांशीं यांचीं कधी युद्धें तर कधी सोयरिकीहि झाल्या होत्या. यांना वाकाटकांच्या लेखांत 'कुन्तलेश' असें म्हटलें

* छत्तीसगडांतील पूर्वराष्ट्र (फ्लीट, गु. इं., पृ. १९३) व आंध्रदेशांतील कूरकराष्ट्र (ए. इं., पु. १४, पृ. ३६२) यांचे उल्लेख पाहा.

† प्रस्तुत लेखकाचा 'मानपुरचे राष्ट्रकूट' (अॅ. भां. इ., पु. २५, पृ. ३६) हा लेख पाहा.

‡ 'महाराष्ट्रांतील कांही प्राचीन ताम्रपट व शिलालेख' (भा. इ. सं. मं.), पृ. १.

आहे. कृष्णानदीच्या उत्तर खोऱ्याला कुन्तल अशी संज्ञा होती. तेव्हा हें घराणें महाराष्ट्रीय होतें असें मानण्यास हरकत नसावी. त्यानंतर कांही शतकांनी दुसरें राष्ट्रकूट घराणें उदयास आलें. त्यांना मान्यखेटचे (किंवा मालखेडचे) राष्ट्रकूट म्हणतात; कारण पुढे त्यांची राजधानी मान्यखेट (हैद्राबाद संस्थानांतील मालखेड) येथे होती. मालखेड हें कानडी मुलुखांत आहे. तेव्हा हें घराणें पुढे कर्णाटकीय गणलें गेलें तर आश्चर्य नाही. तथापि हें घराणें मूळचें महाराष्ट्रीय होय. याचे आरंभीचे लेख वेरुळजवळ सापडले आहेत. हे स्वतःस कर्णाटकीय समजत नव्हते याला एक पुरावा देतां येईल. यांच्या आरंभींच्या कित्येक ताम्रपटांत या वंशाचा पहिला बलाढ्य नृपति दन्तिदुर्ग याच्याविषयी खालील श्लोक आला आहे.*

'काञ्चीशकेरलनराधिपचोलपाण्ड्य-
श्रीहर्षवज्रटविभेदविधानदक्षम् ।
कर्णाटकं बलमनन्तमजेयमन्यै-
र्भृत्यैः कियद्भिरपि यः सहसा जिगाय ॥'

यांत चालुक्यांच्या सैन्याला 'कार्णाटकं बलम्' असें म्हटलें आहे. दन्तिदुर्ग स्वतः कर्णाटकीय असता तर त्याने पराजित केलेल्या चालुक्यांच्या सैन्याला 'कार्णाटक' असें विशेषण लावलें नसतें. या राष्ट्रकूटांची आरंभींची राजधानी मयूरखंडी ही नाशिकजवळील मोरखंड होय असें कांही विद्वानांचें मत आहे. पुढे मात्र पहिला अमोघवर्ष याने मान्यखेट येथे राजधानी नेल्यावर राष्ट्रकूटांच्या दरबारीं कानडी वाङ्मयाला उत्तेजन मिळालें. तेथे कानडी मुलखांत वाढलेले राजपुत्र गुजराथेंत गेले असतां आपली सही आपणांस लहानपणापासून परिचित असलेल्या मूळ कानडी लिपींत करूं लागले, तर त्यांत आश्चर्य नाही. तेव्हा नर्मदेपासून कावेरीपर्यंतच्या दक्षिणच्या भागाला कधी महाराष्ट्र तर कधी कर्णाटक म्हणत असत असें दिसत नाही. †

---

* ए. इं., पु. २३, पृ. १४.

† अलीकडे नागपूरजवळहि राष्ट्रकूटांचा इ. स. च्या सहाव्या शतकांतील ताम्रपट सापडला आहे. प्रस्तुत लेखकाच्या 'कलचुरि नृपति आणि त्यांचा काल' या ग्रंथांत पृ. (१२८–१२९) तो छापला आहे.

कर्णाट व महाराष्ट्र हे एकच होत हें दाखविणारे कोरीव लेखांतील कांही उतारे श्री. जोशी यांनी उद्धृत केले आहेत (पृ. १९९), तेहि निर्णायक मानतां येत नाहीत. या उताऱ्यांत कर्णाट व लाट यांचीं नांवें जवळ जवळ येतात म्हणून यांत लाट (गुजराथ)पासून कर्णाटापर्यंतचा प्रदेश अभिप्रेत आहे, मधल्या महाराष्ट्राचा निर्देश नाही म्हणून महाराष्ट्राचा कर्णाटकांत अन्तर्भाव होत असे, असें श्री. जोशी यांचें म्हणणें आहे. पण तें परीक्षणांत टिकत नाही. या उताऱ्यांत कर्णाट व लाट यांचीं नांवें जवळ जवळ आलीं असलीं तरी त्यांचा समास विवक्षित होता असें मानण्यास प्रमाण नाही. शिवाय हे सर्व उतारे पद्यांत आहेत. पद्यांत सर्वच गोष्टींचा अन्तर्भाव करणें शक्य नसतें. या उताऱ्यांतहि कर्णाट व लाट देशांबरोबर सेउणदेश (सध्याचा खानदेश व मराठवाडा) व करहाट (कऱ्हाड) या देशांचा स्पष्ट निर्देश आहे. त्यांवरून महाराष्ट्राचा सेउणदेश व करहाट एवढाच भाग कर्णाटकांत मोडत नव्हता असें अनुमान करणें योग्य होईल काय ?*

"कर्णाटकीय वैशिष्ट्य दाखविणाऱ्या कांही गोष्टी महाराष्ट्रांत आढळतात. वीरगळ हें प्राचीन हट्टिजनांचें वैशिष्ट्य आहे. वीरगळ किंवा वीरपुरुषांच्या स्मारकशिला नाशिक जिल्ह्यांत पुष्कळ आहेत. त्यावरून नाशिक-खानदेश या भागास हट्टिकारांचें माहेरघरच म्हणणें अयोग्य होणार नाही" असें श्री. जोशी म्हणतात. पण अशा स्मारकशिला किंवा स्तंभ हिंदुस्थानच्या सर्व भागांत आढळतात. त्यांचें संस्कृत नांव यष्टि (प्राकृत, यठी, लट्ठि) होतें. यांचें सर्वांत प्राचीन उदाहरण उत्तर हिंदुस्थानांतील पूर्वीच्या बहावलपूर संस्थानांत सुइविहार येथे सापडलेल्या कनिष्ककालीन ताम्रपटांत आढळतें.† एरणचा शिलास्तंभ—ज्यामध्ये सत्यनागाचा महाराष्ट्रीय म्हणून उल्लेख

---

* 'जित्वा चोलकलिंगसेवणवृहत्कर्णाटलाटाधिपान्' (ए. इं., पु. ४, पृ. ८७) हें वर्णन काकतीय गणपति राजाच्या लेखांत येतें. याला सेउणदेशच्या (देवगिरीच्या) राजांचा चांगलाच परिचय असला पाहिजे. देवगिरीच्या यादवांनी याच्या पित्याला व चुलत्याला ठार मारलें होतें व याचाहि पराभव केला होता. ए. इं., पु. २५, पृ. २०२ पाहा.

† कोनो, कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, पु. २, भा. १, पृ. १४१.

आहे तो–या प्रकाराचाच स्मारकस्तंभ (यष्टि) आहे. अशा स्मारकशिला कच्छमध्ये अन्धौ येथेहि सापडल्या आहेत.* गुजराथेंत त्यांना पालिया म्हणतात. महाराष्ट्रांत त्यांना सध्या वीरगळ हें कानडी नांव असलें तरी अशा स्मारकशिला उभारणें हें केवळ हट्टिकारांचें वैशिष्ट्य होतें असें म्हणतां येत नाही.

समस्या ३ : मरहट्टे व कानडे यांचे पूर्वज : पत्ति – यदु – तुर्वश

मरहट्टे यांच्या पूर्वपरंपरेविषयी लिहितांना श्री. जोशी म्हणतात :

" मऱ्हाटी संस्कृति ही प्राचीन महाराष्ट्रांतील हट्टिजनांची संस्कृति. हे हट्टिजन आर्यांच्या पूर्वींपासून या देशांत होते. यांचें पूर्वीचें नांव 'पत्ति', हें यजुर्वेदांतील रुद्राध्यायांत 'नम उच्चैर्घोषा-याक्रंदयते पत्तीनां पतये नमः।' या उताऱ्यांत येतें. वराहमिहिर पत्ति-जनांचा उल्लेख करतो. हे 'पत्ति'च पुढे 'हट्टि' झाले. कारण कानडींत पकाराच्या ऐवजीं हकार येतो. हेच पत्ति ऋग्वेदांत यदु, तुर्वश इत्यादि नांवाने येतात. यदु, तुर्वश हे ऋग्वेदांत (९,६२,२) आर्यशत्रु शंबराच्या पक्षांत येतात तेव्हा ते आर्येतर असावेत. याशिवाय अनु, द्रुह्यु, पूरु हीं तीन नांवें यदु व तुर्वश यांच्याबरोबर येतात. हीं सर्व एकाच घराण्याची मंडळी असावी. पूरु शब्दांत ऊरु हा द्रविडवर्गीय शब्द दिसतो. तेव्हा हे सर्व आर्येतर होत. डॉ. प्रिलस्की यांनी अंधकवृष्णि यादववंश हा आर्येतर होता हें संस्कृत, पाली भाषेंतील पुराणें, नाना जातककथा वगैरेंच्या आधाराने सिद्ध केलें आहे. आजच्या मराठ्यांतील पुष्कळ कुळांचा संबंध यादववंशाशीं जाऊन पोचतो. डॉ. अळतेकरांनी अभिजात कर्णाटकीय म्हणून ठरविलेला राष्ट्रकूटवंश यादववंशीय सात्यकिशाखेपासून निघाला होता. कर्णाटकांतील गंग व विजयनगरचे राजे तुर्वसुवंशीय होते. तेव्हा मरहट्टे व कानडे यांचा यदुतुर्वसूंशीं अतिनिकट संबंध होता."

महाराष्ट्रांतील मूळच्या हट्टजनांचे वेदकालीन पूर्वज 'पत्ति' नामक लोक होते, असें श्री. जोशी यांनी अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. त्याला

* २३. ए. इं. पु. १६, पृ. १९ इ.

आधार यजुर्वेदांतील वाक्य 'पत्तीनां पतये नमः' हा एकच. वराहमिहिराने पत्तिजनांचा निर्देश केला आहे असें त्यांनी एके ठिकाणीं म्हटलें आहे (पृ. ४७), पण त्याचा संदर्भ दिला नाही. वराहमिहिराच्या 'बृहत्संहितें'त अनेक देशांचा व जनांचा उल्लेख आहे, पण तींत पत्तींचें नांव मला दिसलें नाही. तेव्हा त्यांच्या प्रमेयांचा मुख्य पाया 'पत्तीनां पतये नमः' हें वाक्य होय. त्याचा थोडा विस्ताराने विचार करूं.

रुद्राध्यायांत रुद्राच्या एक किंवा अनेक रूपांचें विविध प्रकारांनी वर्णन करून नमन केलें आहे. त्यामध्ये 'पत्तीनां पतये नमः' याखेरीज 'नमो अश्वेभ्योऽश्वपतिभ्यश्च वो नमः ।' (३, १७), 'नमो रथेभ्यो रथपतिभ्यश्च वो नमः ।' (३, ९), नमः सेनाभ्यः सेनानिभ्यश्च वो नमः (४, १०) इत्यादि नमनें येतात. या नमनांत 'पत्ति' प्रमाणे अश्व, रथ, अश्वपति, रथपति, सेनानी, निषङ्गी, वर्मी, क्षत्तृ इत्यादि युद्धसंबंधी अनेक शब्द आढळतात. म्हणून सायणाचार्यांनी पत्ति याचा 'पादचारी योद्धा' असा अर्थ केला आहे तोच योग्य दिसतो.* अनेक युद्धविषयक शब्दांतून 'पत्ति' शब्द तेवढा निराळा काढून तो जनवाचक मानण्याचें कारण श्री. जोशी यांनी कोठे सांगितलेलें आढळत नाही. कानडींत पकाराचा हकार होतो व मरहट्ट यांतील हट्ट किंवा हट्टिजनांचें पूर्वरूप पत्तिजन मानल्यास हें वचन उपयोगी पडेल असें पाहिल्यावर, त्यांना त्यांतील पत्ति हा शब्द जनवाचक आहे ही कल्पना सुचलेली दिसते.

'पत्ति' हा शब्द आर्येतर जनांचा वाचक असता तर तो ऋग्वेदांत दास, दस्यु, इत्यादि शब्दांप्रमाणे यावयास पाहिजे होता. पण सबंध ऋग्वेदांत 'पत्ति' शब्द याच काय पण इतर कोणत्याहि अर्थाने आलेला आढळत नाही.

ऋग्वेदांत आर्येतर जनांचा निर्देश पत्ति म्हणून आला नसला तरी यदु, तुर्वश, द्रुह्यु, अनु व पूरु या नांवाने येतो असें श्री. जोशी म्हणतात त्याचा आता विचार करूं.

---

* दुसरा टीकाकार भट्टभास्कर याने पत्ति याचा अर्थ 'एक रथ, एक हत्ती, तीन घोडे व पांच सैनिक' असाहि सुचविला आहे.

या जनांचा उल्लेख ऋग्वेदांत दाशराज्ञ युद्धाच्या वर्णनांत व इतरत्र अनेक ठिकाणीं येतो. परुष्णी (रावीच्या) तीरावर भरतवंशी सुदासाचे दहा राजांशीं युद्ध झालें. ते दहा राजे अलिन, पक्थ, भलानस, शिव, विषाणिन्, अनु, दुह्यु, तुर्वश, यदु व पूरु हे होत. यांपैकी पहिल्या पांच राजांचीं नांवें इतरत्र क्वचितच येतात, पण शेवटच्या पांच राजांचा उल्लेख 'पंचजनाः' या शब्दाने ऋग्वेदांत कांही ठिकाणीं आला आहे असें मानण्यांत येतें. हे दहाहि राजे आर्य होते असें विद्वानांचें मत आहे.* याशिवाय अज, शिग्रु व यक्षु या तीन टोळयांनी भेद नांवाच्या राजाच्या आधिपत्याखाली सुदास-बरोबर यमुनेच्या काठीं युद्ध केलें. या टोळया मात्र आर्येतरांच्या असाव्या असें प्रचलित मत आहे.

यदुतुर्वशांना आर्येतर मानण्याचें समाधानकारक कारण श्री. जोशी यांनी दिलें नाही. एके ठिकाणीं यदु व तुर्वश यांचीं नांवें आर्यशत्रु शंबरा-बरोबर गोवलीं गेलीं आहेत (ऋ., ९, ६२, २) त्यावरून ते आर्येतर असावेत असें अनुमान ते करतात, पण तें सयुक्तिक भासत नाही. सुदासा-च्या शत्रूंमध्ये अनार्यांबरोबर आर्यहि होते असें ऋग्वेदांतील (७, १८, ५-१९) दाशराज्ञयुद्धाच्या वर्णनावरून दिसतें, व म्हणूनच कांही ठिकाणीं (ऋ. ७, ८३, १) दास व वृत्राबरोबर आर्यांचाहि निःपात करून सुदासाचें रक्षण करण्याविषयी वसिष्ठांनी इंद्रवरुणांची प्रार्थना केली आहे.

संस्कृत पुराणें व पाली जातकादि ग्रंथ यांवरून अन्धकवृष्णि यादवांची परंपरा आर्येतर असावी असा सिद्धान्त डॉ. प्रिलस्की यांनी काढला आहे असें श्री जोशी सांगतात. पण त्यांचीं प्रमाणें त्यांनी दिलीं नसल्यामुळे त्यांची चर्चा येथे करतां येत नाही. शिवाय ऋग्वेदकालीन जनांचे आर्या-नार्यत्व ठरविण्यास त्यानंतर हजारों वर्षांनी रचलेल्या पुराण–जातकादि ग्रंथांचा उपयोग करणें योग्य होणार नाही. हे प्रश्न ऋग्वेदादि वैदिक ग्रंथां-तील वचनांवरूनच सोडविले पाहिजेत. यदु, तुर्वश, अनु, द्रुह्यु व पूरु हे आर्येतर असते तर त्यांचें पौरोहित्य वैदिक ऋषींनी कसें केलें असतें ?

* 'केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया', पु. १, पृ. ८१.

यदूंचें पौरोहित्य कण्वांकडे व द्रुह्यूंचें भृगूंकडे होतें.* तेव्हा यदु, तुर्वश आदि जन आर्यच होते यांत संशय नाही.

उत्तरकालीन राष्ट्रकूट राजे आपण यदूच्या वंशांत आणि गंग व विजयनगरचे राजे आपण तुर्वशाच्या वंशांत जन्मलों असें आपल्या दानपत्रांत सांगण्यांत भूषण मानूं लागले. यदु व तुर्वश हे जन आर्येतर नव्हते हें वर दाखविलें असल्यामुळे या प्रमाणाचा प्रस्तुत प्रश्नांशीं कांही संबंध येत नाही. वास्तविक पाहतां या उत्तरकालीन वंशावळींच्या वर्णनावर फारशी भिस्त ठेवतां येत नाही. इ. स. च्या सातव्या आठव्या शतकापासून उत्तर तसेंच दक्षिण हिंदुस्थानांतील राजे सूर्य, चंद्र, अग्नि यांसारखे देव, रघु, कर्ण, सात्यकि यांसारखे पुराणप्रसिद्ध योद्धे, भारद्वाजासारखे ऋषि यांपासून निघालेल्या वंशांत आपण जन्मलों असें सांगण्यांत भूषण मानूं लागले.† उदाहरणार्थ, गुजराथेंतील गुर्जर राजे आपल्या आरंभींच्या ताम्रपटांत आपल्या गुर्जरवंशाचा अभिमानाने उल्लेख करीत, पण इ. स. ६७५ च्या ताम्रपटांत या वंशाचा तिसरा दद्द राजा हा आपला वंश महाराज कर्ण यापासून निघाला असें सांगतो. हीच स्थिति राष्ट्रकूटांच्या ताम्रपटांत दिसते. सन ८७१ च्या संजान ताम्रपटांत, राष्ट्रकूट वंश यदूपासून निघाला, असें विधान प्रथमच केलें आहे. तेव्हा या उत्तरकालीन काल्पनिक वर्णनावरून राष्ट्रकूट व गंग हे यदु व तुर्वश या वंशांत जन्मले होते हें म्हणणें धाडसाचें होणार आहे.

---

* दाशराज्ञयुद्धांत द्रुह्यूंबरोबर भृगूहि होते. भृगु पुरोहितकुल होतें याविषयी तरी संशय नसावा.

† बिल्हण कवि आपल्या 'विक्रमांकदेवचरितां'त चालुक्यवंशाचा मूळ पुरुष ब्रह्मदेवाच्या संध्यासमयींच्या चुलुकांतून (ओंजळींतील पाण्यांतून) उत्पन्न झाला असें वर्णन करतो. एका शिलालेखांत तो भारद्वाज ऋषीच्या चुलुकांतून निघाला असें वर्णन आहे. हीं सर्व वर्णनें काल्पनिक आहेत हें सांगण्याचें कारण नाही. पण या राजवंशांना 'तुम्ही आर्येतर वंशांतले आहां' हें सांगणें कितपत रुचलें असतें याची शंका आहे.

येथवर श्री. जोशी यांच्या ग्रंथांतील मुख्य प्रमेयांचें परीक्षण उपलब्ध साधनांच्या साहाय्यानें केलें. त्यांच्या ग्रंथांतील देव-देवता, धर्मपंथ इत्यादि इतर भागांतील विषयांसंबंधीहि थोडेंबहुत लिहिण्यासारखें आहे. पण हा लेख प्रमाणाबाहेर वाढल्यामुळे त्यांची चर्चा येथे करीत नाही.

आपल्या संस्कृतीचें संपूर्ण दर्शन-विशेषतः प्रागैतिहासिक कालांतील संस्कृतीचें ज्ञान-केवळ शिलालेख, ताम्रपटादि साधनांवरून होणें शक्य नाही हें खरें आहे. या ज्ञानाकरिता भाषा, धर्म, देवदेवकें, चालीरीती यांचा उपयोग अवश्य केला पाहिजे. पण या इतर साधनांवरून अनुमानें करतांना तीं शिलालेख-ताम्रपटादि अव्वल दर्जाच्या साधनांपासून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाशीं विसंगत होत नाहीत ना हें पाहण्याचीहि काळजी घेतली पाहिजे. शिलालेख-ताम्रपटादि साधनेंहि सर्वच बाबतींत विश्वसनीय असत नाहीत. त्यांतील माहितीचा पडताळा अन्य साधनांवरून पाहावा लागतो. नवीं साधनें उजेडांत आल्यावर अनेकदा पूर्वीच्या अनुमानांत फरक करावा लागतो. सर्व साधनांचा तारतम्यानें उपयोग करून सत्याचा आविष्कार करण्यास झटणें एवढेंच आपल्या हातीं आहे.

श्री. जोशी यांच्याशीं अनेक ठिकाणीं आम्ही मतभेद दर्शविला असला तरी त्यांच्या अपार परिश्रमांबद्दल व भाषा, ग्रामनामें, चालीरीती, धर्मपंथ इत्यादि साधनांतून प्राचीन संस्कृतीचें दर्शन घडवून आणण्याच्या त्यांच्या कौशल्याबद्दल आम्हांस अत्यंत आदर आहे. त्यांचें पुस्तक अत्यंत उद्बोधक व विचारांस चालना देणारें झालें आहे यांत संशय नाही.

गुप्तविषयक मोहिनी*

नैष स्थाणोरपराधो यदेनमन्धो न पश्यति, पुरुषापराधः स भवति ।†

— यास्काचार्य, निरुक्त, १.

'युगवाणी 'च्या गेल्या सप्टेंबरच्या अंकांत रियासतकार रा. ब. डॉ. गो. स. सरदेसाई यांचें पत्र छापलें आहे. त्यांत मुंबईच्या सेंट झेविअर कॉलेजांतील संस्कृतचे प्राध्यापक श्री. शेंबवणेकर यांनी अलीकडे प्रसिद्ध केलेल्या 'The Glamour about the Guptas' (गुप्त-विषयक मोहिनी) या पुस्तकांत कालिदासाच्या विक्रमादित्याचा व विक्रम-संवताचा संबंध महेन्द्रादित्य परमार व त्याचा पुत्र विक्रमादित्य याच्याशीं जोडून कालिदासाचा काळ संवताच्या सुरवातीस पोचविला आहे, त्याविषयी मला काय वाटतें तें जाणण्याची इच्छा व्यक्त केली आहे. डॉ. सरदेसाईंचें पत्र मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या चिटणिसांनी सुमारें तीन महिन्यांपूर्वी मला दाखविलें त्या वेळीं त्यांना उत्तर पाठवून याविषयी मी आपलें मत थोडक्यांत कळविलें होतें. आता डॉ. सरदेसाईंचें पत्र प्रसिद्ध झालें आहे व या विषयाच्या महत्त्वामुळे त्यांच्यासारखी जिज्ञासा अनेकांच्या मनांत उत्पन्न झाली असेल, म्हणून प्रा. शेंबवणेकरांच्या पुस्तकांत चर्चिलेल्या विविध विषयांचा थोडक्यांत परामर्श घ्यावयाचा आहे.

प्रा. शेंबवणेकरांच्या प्रस्तुत पुस्तकांत नवीन असें कांही नाही. गेल्या पंधरा वीस वर्षांत जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी, मुंबई युनिव्हर्सिटीचें जर्नल

* 'युगवाणी', नागपूर, दिवाळी अंक (नोव्हेंबर, १९५४).

† आंधळ्याला खांब दिसत नाही हा त्या खांबाचा दोष नाही, तो त्या आंधळ्या माणसाचा दोष आहे.

व भांडारकर संशोधन मंडळाचे ॲनाल्स् या नियतकालिकांत त्यांनी विक्रमादित्य, कालिदास व गुप्तसम्राट् यांच्याविषयी जे चार पांच लेख लिहिले तेच या पुस्तकांत एकत्र छापले आहेत. याशिवाय त्यांनी या विषयावर मराठींतही कांही लेख लिहिले आहेत. त्यांतील विवाद्य विधानांना डॉ. अ. स. अळतेकर व प्रस्तुत लेखक यांनी वेळोवेळीं उत्तरेंही दिलीं होतीं. ('सह्याद्रि,' डिसेंबर १९४३, मधील डॉ. अळतेकरांचा व 'प्रसाद' जुलै १९५० मधील माझा लेख पाहा.) पण आपल्या मताविरुद्ध असलेल्या प्रमाणांचा निःपक्षपाताने विचार न करतां तींच तीं मतें पुनः अभिनिवेशाने मांडण्याकडे प्रा. शेंबवणेकरांची प्रवृत्ति दिसते. म्हणून त्यांच्या मतांचें पुनः परीक्षण करणें जरूर झालें आहे.

प्रा. शेंबवणेकरांनी वरील विषयासंबंधी काढलेले सिद्धांत व त्यांचीं प्रमाणें संक्षेपाने देऊन यथाक्रम त्यांचें परीक्षण खाली केलें आहे.

सिद्धांत पहिला

गुप्त राजांच्या काळाला आधुनिक युरोपीय संशोधकांनी 'सुवर्णयुग' अशी संज्ञा देऊन उगीचच त्यांचें महत्त्व वाढविलें आहे. त्याला काडीइतकाहि आधार नाही, कारण—

(१) एकहि संस्कृत कवि किंवा ग्रंथकार गुप्तांच्या काळीं होऊन गेला असें निर्विवादपणे सिद्ध करतां येत नाही. वराहमिहिर इ. स. च्या पांचव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला, पण त्यालाहि त्यांचा आश्रय होता असें दिसत नाही.

(२) पुराणांत गुप्तांच्या फक्त नांवांचा उल्लेख आहे. त्यांच्या कामगिरीबद्दल चकार शब्द नाही. पुराणांतील गुप्तविषयक भाग त्यांच्या काळानंतर कोणीतरी त्यांत घुसडला असावा.

(३) गुप्तांविषयी लिहितांना अलबेरूनी म्हणतो की, ते फार दुष्ट लोक होते. अलबेरूनीचें हें विधान फार महत्त्वाचें आहे. गुप्तकालानंतर महमुद गजनीच्या स्वाऱ्या होईपर्यंत हिंदुस्थानांत राज्यक्रांति झाली नसल्यामुळे गुप्तांविषयी खरी माहिती अलबेरूनीच्या काळापर्यंत टिकून राहिली होती.

(४) गुप्तांनी ब्राह्मणी संस्कृतीला उत्तेजन दिल्याचा पुरावा नाही. उलट त्यांनी वसुबन्धुसारख्या बौद्ध ग्रंथकारांना आश्रय दिला व सांचीच्या

बौद्ध विहाराला एक गाव दान दिला. ब्राह्मणी संस्कृतीचें पुनरुज्जीवन श्रीहर्ष, बाण, भवभूति यांच्या काळानंतर एक शतकाने झालें. त्याचें श्रेय गुप्तांना देणें योग्य नाही.

तेव्हा गुप्तकालांत संस्कृतविद्येचें पुनरुज्जीवन झालें व त्या काळीं कालिदास झाला असावा या मताला आधार नाही, असें प्रा. शेंब्रवणेकरांचें मत आहे.

वरील प्रमाणांचें परीक्षण

वरील प्रमाणांचा विचार करतांना एक गोष्ट सकृद्दर्शनींच ध्यानांत येते. ती ही की, प्रा. शेंब्रवणेकरांचा मुख्य भर संस्कृत वाङ्मयांतील उल्लेखांवर आहे. संस्कृत वाङ्मयांत गुप्तांविषयी उल्लेख आढळत नाहीत ना, मग त्यांच्या काळीं संस्कृतविद्येचें किंवा ब्राह्मणी संस्कृतीचें पुनरुज्जीवन झालें असणें शक्य नाही, अशी त्यांची विचारसरणी आहे. ही अत्यंत भ्रामक आहे. पहिली गोष्ट ही की, गुप्तकालीन संस्कृत वाङ्मय जसेंच्या तसेंच आतापर्यंत चालत आलें आहे असें नाही. अनेक ग्रंथ कालाच्या ओघांत नष्ट झाले आहेत. दुसरी गोष्ट ही की, आपल्या आश्रयदात्याचा व त्याच्या काळाचा स्पष्ट निर्देश करण्याची प्रवृत्ति संस्कृत ग्रंथकारांमध्ये दिसत नाही. ती असती तर कालिदासासारख्या ग्रंथकाराच्या काळाविषयी इतकीं रणें माजतीं ना! संस्कृत वाङ्मयांत गुप्तांचा उल्लेख नाही म्हणून त्या नांवाचे राजेच होऊन गेले नव्हते असें म्हणण्यासारखेंच हें विधान हास्यास्पद होत आहे. संस्कृत वाङ्मय हें आपल्या प्राचीन इतिहासाच्या ज्ञानाच्या अनेक साधनांपैकी एक आहे. त्याशिवाय कोरीव लेख, नाणीं, तत्कालीन इमारती व शिल्पें, परदेशी यात्रेकरूंचीं प्रवासवर्णनें इत्यादि अनेक साधनें आहेत. त्यांचा उपयोग न करतां एखाद्या कालांतील परिस्थितीविषयी अनुमानें केल्यास तीं बरोबर ठरणार नाहीत. यांत त्या साधनांचा दोष नाही, तर संशोधकांचा आहे. निरुक्तकार यास्काचार्य म्हणतात त्याप्रमाणे आंधळ्याला खांब दिसत नाही हा त्या खांबाचा दोष नाही, तो त्या आंधळ्या माणसाचा आहे. तिसरी गोष्ट ही की, शेंब्रवणेकर उपलब्ध पुराव्याचा उपयोग तारतम्याने करीत नाहीत. गुप्तकालानंतर शेंकडो वर्षांनी होऊन गेलेल्या अलबेरूनी व फेरिश्ता या ग्रंथकारांच्या विधानांना ते गुप्तकालीन कोरीव

लेखांइतकेंच किंबहुना त्यापेक्षाहि जास्त महत्त्व देतात. संशोधकाने न्यायाधीशाप्रमाणे उपलब्ध पुराव्याची कसोशीने छाननी करून त्याची ग्राह्याग्राह्यता ठरविली पाहिजे. न्यायाधीश कोर्टांत आलेला सर्व पुरावा सारखाच महत्त्वाचा मानीत नाही. एखाद्या घटनेच्या स्थळीं उपस्थित असलेल्या मनुष्याच्या साक्षीला तो इतरांच्या ऐकीव माहितीपेक्षा जास्त विश्वसनीय मानतो. ऐतिहासिक साधनांचा उपयोग करतांनाहि असाच्च विवेक ठेवला पाहिजे. असो. आता प्रा. शेंब्रवणेकरांच्या वरील प्रमाणांचें यथाक्रम परीक्षण करूं.

संस्कृत ग्रंथकारांचे काल अनिश्चित असल्यामुळे अमुक संस्कृत ग्रंथ गुप्तकालांत लिहिले गेले असें निश्चितपणे सांगणें कठीण आहे. तथापि पुष्कळ विद्वानांच्या मताप्रमाणे कालिदास हा गुप्तकालांतच होऊन गेला. या मताला उपोद्बलक असा पुरावा दिवसेंदिवस अधिकाधिक उपलब्ध होत आहे. ('कालिदास' पृ. ३५–४१; सह्याद्रि, जुलै १९५४ पहा.) याशिवाय मृच्छकटिकाचा कर्ता शूद्रक, मुद्राराक्षस व देवीचन्द्रगुप्त यांचा कर्ता विशाखदत्त, नीतिसाराचा कर्ता कामन्दक व पञ्चतन्त्राचा निर्माता विष्णुशर्मा हेहि गुप्तकालांत होते, असें कांही विद्वानांचें मत आहे. वात्स्यायनाचें कामसूत्र या कालाच्या आरंभीं लिहिलें गेलें असावें. कारण त्यांत वत्सगुल्म देशांत राहणाऱ्या लोकांचा निर्देश आला आहे. वत्सगुल्म (अकोला जिल्ह्यांतील वाशीम) हें वाकाटक नृपति सर्वसेन याच्या काळीं इ. स. ३२५ च्या सुमारास वाकाटकांची राजधानी म्हणून प्रसिद्धीस आलें असें दिसतें. याशिवाय सुविख्यात ज्योतिर्विद् आर्यभट ह्याचा 'आर्यभटीय' हा ग्रंथ इ. स. ४९९ मध्ये कुसुमपुर (पाटलीपुत्र) येथे लिहिला गेला म्हणून तो, व इ. स. च्या पांचव्या शतकाच्या उत्तरार्धांतील वराहमिहिर, हेहि गुप्तकालांतच होऊन गेले. इतर संस्कृत ग्रंथकारांप्रमाणे उपरिनिर्दिष्ट ग्रंथकारांनी आपल्या काळाचा किंवा आश्रयदात्यांचा उल्लेख केला नसला, तरी अन्य प्रमाणांवरून ते गुप्तकालीन होते हें दाखवितां येतें.

संस्कृत ग्रंथकारांच्या ग्रंथांत गुप्तनृपतींचा निर्देश नसला तरी त्यांच्या काळीं संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन झालें हें दाखविणें कठीण नाही. गुप्तपूर्वकालीन बहुतेक कोरीव लेख प्राकृतांत आहेत. नाणेघाटांतील सातवाहन राज्ञी नागनिका हिच्या लेखांत अनेक श्रौत यज्ञ केल्याच्या निर्देश आहे,

पण तो सबंध लेख प्राकृतांत आहे. तेव्हा नाशिकच्या व इतर ठिकाणच्या बौद्ध लेण्यांतील लेख प्राकृतमध्ये लिहिले आहेत, हें सांगण्याची जरूरी नाही. गुप्तवाकाटकांच्या काळीं मात्र संस्कृत भाषेस राजाश्रय लाभून संस्कृताचा कोरीव लेखांकरिता सर्रास उपयोग होऊं लागला. भिलशाजवळच्या उदयगिरींत कोरलेल्या गुप्तकालीन हिंदु लेण्यांतच नव्हे, तर जवळच्या सांचीच्या बौद्ध स्तूपाच्या तोरणांवर व अजंटयाच्या बौद्ध लेण्यांतहि संस्कृत लेखच कोरले आहेत. गुप्तपूर्वकालीन सातवाहन, कुशाण व शक नाण्यांवरील लेख प्राकृतांत आहेत, तर गुप्तांच्या नाण्यांवर 'समरशतविततविजयो जितरिपुरजितो दिवं जयति । (समुद्रगुप्त), क्षितिमवजित्य सुचरितैर्दिवं जयति विक्रमादित्यः। (द्वितीय चन्द्रगुप्त), क्षितिपतिरजितो विजयी महेन्द्रसिंहो दिवं जयति (कुमारगुप्त) यासारखे लेख काव्यमय पद्यांत आहेत. समुद्रगुप्ताच्या अलाहाबादच्या स्तंभलेखांत त्याने विद्वानांनाहि स्फूर्ति देणारीं काव्यें लिहिल्यामुळे त्याला 'कविराज' ही पदवी मिळाली होती, असें म्हटलें आहे. सार्वजनिक ठिकाणीं उभारलेल्या स्तंभावरील या लेखांतील वर्णन धादांत असत्य असेल असें मानण्यास कांही कारण नाही. गुप्तवाकाटकांच्या काळांत उत्कृष्ट संस्कृत काव्यें वैदर्भी रीतींत निर्माण झाल्यामुळे तिला विद्वन्मान्यता मिळाली व म्हणून इ. स. च्या सातव्या शतकांत झालेल्या दण्डीने आपल्या 'काव्यादर्श'त तिचा सर्वोत्कृष्ट रीति म्हणून उल्लेख केला आहे.

प्रा. शेवणेकरांचें हें पहिलें प्रमाण दुधारी शस्त्रासारखें आहे. प्रतिपक्षाविरुद्ध उगारलेलें हें शस्त्र त्यांच्यावरच उलटणारें आहे. त्यांच्या मतें कालिदास हा संवत्स्थापक विक्रमाच्या काळीं खिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला. त्या काळचे कोणते संस्कृत कवि किंवा ग्रंथकार त्याच्या काळीं होऊन गेले असें निर्विवादपणें दाखवितां येतें असा प्रश्न त्यांनाहि करतां येईल, व त्याचें उत्तर देणें त्यांना अधिकच कठीण जाईल.

(२) पुराणांतील गुप्तविषयक उल्लेख खालील श्लोकांत आहे—

अनुगङ्गं प्रयागं च साकेतं मागधांस्तथा ।
एताञ्जनपदान् सर्वान् भोक्ष्यन्ते गुप्तवंशजाः ॥

यांत वर्णिलेली परिस्थिति गुप्तकालारंभींची म्हणजे प्रथम चन्द्रगुप्ताच्या काळची आहे. समुद्रगुप्ताच्या व त्याच्या नंतरच्या गुप्तराजांच्या काळीं

गुप्त साम्राज्य उत्तर हिंदुस्थानभर पसरलें होतें, त्याचा उल्लेख यांत नाही. तेव्हा हा श्लोक गुप्तकाळाच्या आरंभीं पुराणांत घातला गेला यांत संशय नाही. अर्थातच यांत गुप्तकालीन संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनाचा उल्लेख नाही व तसा उल्लेख याच काय पण इतर मौर्य, शुंग, सातवाहन इत्यादि कोणत्याहि पूर्वकालीन सुविख्यात राजवंशाविषयी पुराणांत येत नाही. प्रा. शेंबवणेकरांनी आपल्या परमारवंशी विक्रमादित्याविषयी तरी तसा एखादा उल्लेख पुराणांतून काढून दाखवावा. त्याचें नांवहि पुराणाच्या वंशावळींत येत नाही.

(३) अल्बेरूनीने त्याला मिळालेल्या माहितीवरून गुप्त राजे फार दुष्ट होते असें म्हटलें आहे खरें, पण त्याच्या इतर अनेक विधानांप्रमाणें तें निखालस खोटें आहे. गुप्तांचा संवत् त्यांच्या विनाशानंतर प्रचलित झाला असें अल्बेरूनी म्हणतो. असें होणें सर्वस्वी असंभवनीय आहे, इतकेंच नाही तर गेल्या शंभर वर्षांत जे अनेक गुप्तसंवताचे लेख सापडले आहेत, त्यांवरून तो संवत् गुप्तनृपति प्रथम चन्द्रगुप्त यानेच सुरू केला होता व गुप्तांच्या सर्व लेखांच्या मित्या त्याला अनुसरूनच दिल्या आहेत हें सिद्ध झालें आहे. अल्बेरूनीच्या या विधानामुळे संशोधकांची पुष्कळ वर्षें दिशाभूल झाली होती.

अल्बेरूनी गुप्तानंतर सुमारें पांच शतकांनी झालेला. इतक्या दीर्घ कालावधींत गुप्तांविषयी खरी माहिती लोकांमध्ये प्रचलित राहिली असेल, हें संभवनीय नाही. मध्यंतरींच्या काळांत उत्तर भारतांत राज्यक्रांति झाली नाही, असें शेंबवणेकर म्हणतात. त्यांना हूणांच्या स्वाऱ्यांची आठवण करून देतों. या रानटी लोकांनी आशिया व युरोप या दोन्ही खंडांत किती धुमाकूळ मांडला होता, हें इतिहासज्ञांस माहित आहे. त्यांच्या भारतावरील पहिल्या स्वाऱ्यांचा गुप्तांनी यशस्वीपणें प्रतिकार केला, तरी शेवटीं ते विजयी झाले व त्यांनी उत्तर भारताचा एरण (सागर जिल्हा, मध्य प्रदेश) गावापर्यंतचा भाग काबीज केला. तेव्हा गुप्तांनंतर महमुदाच्या काळापर्यंत उत्तर हिंदुस्थानांत राज्यक्रांति झाली नव्हती, हे विधान चूक आहे.

अल्बेरूनीने गुप्त दुष्ट लोक होते, असें म्हटलें त्यांत त्याची चूक नाही. त्याला लोकांनी माहिती दिली तसें त्याने लिहिलें. आपल्या काळच्या

हिंदु लोकांच्या इतिहासज्ञानाविषयी तो इतरत्र लिहितो—"दुर्दैवाची गोष्ट ही की, हिंदु लोक ऐतिहासिक कालक्रमाकडे फारसें लक्ष देत नाहीत. राजेलोकांचा अनुक्रम सांगण्यांत ते अत्यंत निष्काळजी आहेत. त्यांना माहिती देण्याविषयी छेडलें की ते हतबुद्ध होतात आणि मग पाहिजे त्या गप्पा मारतात." (अलबेरूनीचा 'इंडिया', प्रकरण ४९ पाहा) अशा लोकांनी दिलेल्या माहितीवरून आम्ही गुप्तनृपतींच्या चारित्र्याची परीक्षा करणार ! खासा न्याय !

गुप्तनृपति कसे होते हें समजून घेण्यास तत्कालीन कोरीव लेखांकडे व चिनी यात्रेकरू फाहियान याच्या प्रवासवर्णनाकडे आपणांस वळलें पाहिजे. स्कन्दगुप्ताच्या जुनागड येथील प्रस्तरलेखांत म्हटलें आहे—

तस्मिन्नृपे शासति नैव कश्चिद्
धर्मादपेतो मनुजः प्रजासु ।
आर्तो दरिद्रो व्यसनी कदर्यो
दण्ड्यो न वा यो भृशपीडितः स्यात् ॥

(स्कन्दगुप्त राज्य करीत असतां प्रजेपैकी कोणीहि धर्मापासून विचलित होत नाही; कोणीहि दुःखी, दरिद्री, व्यसनासक्त किंवा लोभी नाही. किंवा कोणत्याहि शिक्षेस पात्र असलेल्याचा फार छळ होत नाही.)

या वर्णनांत अतिशयोक्ति असेल, पण त्यावरून गुप्तनृपतींनी लोकांचा अनन्वित छळ केला, असें तरी म्हणतां येणार नाही. भिलशाजवळच्या उदयगिरि येथील लेण्यांत इ० स. ४२५ मध्ये (कुमारगुप्ताच्या कारकीर्दींत) कोरलेल्या लेखांत 'श्रीसंयुतानां गुणतोयधीनां गुप्तान्वयानां नृपसत्तमानां राज्ये' (वैभवशाली व गुणांचे सागर असे जे नृपश्रेष्ठ गुप्तवंशी राजे त्यांच्या राज्यांत) असा गुप्तराजांचा उल्लेख आला आहे. हा लेख एका जैन मुनीचा आहे. द्वितीय चन्द्रगुप्ताच्या काळीं भारतांत आलेला चिनी यात्रेकरू फाहियान याने तत्कालीन राज्यव्यवस्थेबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. देशांत सर्वत्र शांतता व सुबत्ता होती व लोक अत्यंत सुखी होते असें त्याच्या वर्णनावरून स्पष्ट दिसतें. या वर्णनाच्या व इतर प्रमाणांच्या आधारावरून चन्द्रगुप्त-विक्रमादित्याविषयी सुप्रसिद्ध इतिहासकार विन्सेन्ट स्मिथ म्हणतो—"Probably India has never

been governed better than it was during the reign of Vikramaditya" (या विक्रमादित्याच्या काळांतल्या इतकें सुराज्य हिंदुस्थानांत बहुधा कधीहि झालें नाही.) अशा तत्कालीन प्रमाणांकडे डोळेझाक करून, पांचशें वर्षांनंतर झालेल्या अलबेरूनीच्या ऐकीव माहितीवरून शेंबवणेकर गुप्तांना दुष्ट ठरवीत आहेत !

(४) गुप्तांनी ब्राह्मणी संस्कृतीला उत्तेजन न देतां बौद्ध धर्माला व बौद्ध ग्रंथकारांना आश्रय दिला, हा आरोपहि असाच निर्मूल आहे. गुप्तांच्या काळीं बौद्ध धर्म भरभराटींत होता, यांत संशय नाही. गुप्तनृपति स्वतः परमभागवत किंवा विष्णूचे निस्सीम उपासक असले तरी त्यांनी भारतीयांच्या उज्ज्वल परंपरेस अनुसरून सर्व धर्मांस समान लेखलें व कोणाचाहि धर्मछळ केला नाही. खुद्द गुप्त राजांनी बौद्ध विहारांना देणग्या दिल्याबद्दल कोरीव लेख सापडले नाहीत. (सांचीचा लेख शेंबवणेकर म्हणतात तसा द्वितीय चन्द्रगुप्ताचा नसून त्याच्या अधिकाऱ्याचा आहे.) तरी बौद्ध धर्मालाहि त्यांचा आश्रय असावा. वसुबंधु नामक बौद्ध तत्त्वज्ञास राजाश्रय होता हें प्रसिद्धच आहे. तेव्हा गुप्तांनी आपल्या वैदिक, किंवा शेंबवणेकर म्हणतात त्याप्रमाणे ब्राह्मणी, धर्माला किंवा संस्कृतीला आश्रय दिला नसेल हें संभवत नाही. किंबहुना या बाबतींत अनुमान करण्याचीहि जरूरी नाही. समुद्रगुप्ताने पुष्कळ काळ प्रचारांत नसलेला (चिरोत्सन्न) अश्वमेध यज्ञ केला व तन्निदर्शक सोन्याचीं नाणीं पाडलीं. द्वितीय चन्द्रगुप्ताचा मांडलिक महाराज सनकानिक याने भिलशाजवळच्या उदयगिरि (प्राचीन नीचैर्गिरि) टेकडींत सहा नंबरचें लेणें कोरविलें. त्यांत विष्णु व महिषासुरमर्दिनी यांच्या मूर्ति कोरल्या आहेत, त्यांत त्याचा लेखहि आहे. तेथील दुसऱ्या एका, पांच नंबरच्या, लेण्यांत विष्णूच्या वराह अवताराची सुप्रसिद्ध मूर्ति आहे. जवळच स्वर्गांतून गंगा व यमुना यांच्या पृथ्वीवरील अवतरणाचें दृश्य दाखविलें आहे. इतर लेण्यांत कार्त्तिकेय, एकमुख लिंग व अष्टमातृका कोरल्या आहेत. उदयगिरीचीं हीं लेणीं गुप्तकालीन होत, यांत संशय नाही. याशिवाय जबलपूरजवळ तिगोवा व मध्यभारतांतील देवगड येथील गुप्तकालीन देवालयें व त्यांतील शिल्पें जगप्रसिद्ध आहेत. तसेंच अजंटा व बाघ येथील लेणीं, व त्यांतील

शिल्पें व चित्रें तर जगप्रसिद्ध आहेत. गुप्तकालीन सोन्याचीं नाणीं विविध प्रकारचीं व सुन्दर आहेत. त्यांवर लक्ष्मी, कार्त्तिकेय यांसारख्या देवतांच्या आकृति उमटविल्या आहेत. यासारखीं नाणीं पूर्वी कधीहि भारतांत प्रचलित नव्हतीं व नंतरहि कधी पाडलीं गेलीं नाहीत.

वरील विवेचनावरून गुप्तांच्या काळीं संस्कृत भाषेला, संस्कृत विद्वानांना व कविनाटककारांना, तसेंच स्थपतिशिल्पकारादि कलाकोविदांना भरपूर राजाश्रय मिळत होता असें दिसून येईल. तत्कालीन शांतता, सुबत्ता व सुरक्षिता यांची प्रशंसा चिनी यात्रेकरूनेहि केली आहे व कोरीव लेखांतहि त्यांचें प्रतिबिंब उमटलें आहे. अशा काळाला 'सुवर्णयुग' म्हटलें तर त्याचें शेंबवणेकरांना एवढें वैषम्य कां वाटावें समजत नाही.

सिद्धान्त दुसरा

विक्रमसंवत् हा परमारवंशी विक्रमादित्याने खिस्तपूर्व पहिल्या शतकांत स्थापला; कारण—

(१) 'कथासरित्सागरा'च्या शेवटच्या लंबकांत परमारवंशी महेन्द्रपुत्र विक्रमादित्याची कथा दिली आहे. तींत तो शंकराचा माल्यवान् नामक गण असून त्याच्या आज्ञेने म्लेच्छांच्या विनाशाकरिता, बौद्ध धर्माच्या पाडावाकरिता व वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाकरिता पृथ्वीवर अवतरला होता, असें म्हटलें आहे. 'कथासरित्सागर' ही पैशाची भाषेंतल्या 'बृहत्कथे'ची संस्कृत आवृत्ति आहे. 'बृहत्कथा' खिस्तोत्तर पहिल्या शतकांत रचली होती. तेव्हा हाच विक्रमादित्य संवताचा स्थापक असला पाहिजे.

(२) हा विक्रमादित्य शैव असावा व यानेच उज्जैनींतील महाकालाचें मंदिर बांधलें असावें. फेरिश्ता नामक इतिहासकाराने संवत्स्थापक विक्रमादित्याने हें मंदिर बांधलें व तेथे त्याची मूर्ति होती असें म्हटलें आहे. वैष्णव द्वितीय चन्द्रगुप्ताने असें भव्य शिवालय बांधलें असणें शक्य नाही.

(३) 'गाथासप्तशतीं'त विक्रमादित्याच्या दातृत्वाविषयी एक गाथा आली आहे. 'गाथासप्तशती' हाल राजाने खिस्तोत्तर पहिल्या शतकांत रचलेली; तेव्हा हा विक्रमादित्य संवत्स्थापक विक्रमादित्यच असला पाहिजे. तो द्वितीय चन्द्रगुप्त असणें शक्य नाही.

(४) परमारवंशी विक्रमादित्य माळव्यांत उज्जयिनी येथे राज्य करीत होता म्हणून त्याच्या संवताला 'मालव संवत्' असें नांव पडलें. कोरीव लेखांत 'मालवानां गणस्थित्या' 'मालवगणस्थितिवशात्' 'श्रीमालव-गणाम्नाते' असे शब्दप्रयोग या संवताचा निर्देश करतांना योजलेले आढळतात. त्यांचा खरा अर्थ संशोधकांना कळला नाही म्हणून ते या शब्द-प्रयोगांवरून हा संवत् मालवगणामध्ये प्रचलित होता असें म्हणतात; पण तें चूक आहे. गण याचा अर्थ गणना असा आहे. 'गणस्तु गणनायां स्याद् गणेशे प्रमथे चये' असें त्याच शब्दाचे अर्थ 'शब्दार्णव' नामक कोशामध्ये दिले आहेत. तेव्हा वरील शब्दप्रयोगांचा अर्थ 'मालवदेशामध्ये प्रचलित असलेल्या गणनेच्या पद्धतीप्रमाणे' असा होतो.

वरील प्रमाणांवरून खिस्तपूर्व पहिल्या शतकांत परमारवंशी विक्रमा-दित्य होऊन गेला व त्यानेच 'विक्रमसंवत्' सुरू केला असें प्रा. शेंबवणे-करांचें मत आहे.

वरील प्रमाणांचें परीक्षण

हीं प्रमाणें अगदी निर्बल आहेत. त्यांतील मुख्य प्रमाणांचें खंडन डॉ. अळतेकर यांनी डिसेंबर १९४३ च्या 'सह्याद्रि' मधील लेखांत उत्कृष्ट रीतीनें केलें असल्यामुळे त्यांवर विशेष लिहिण्याची आवश्यकता नाही. त्यांचें संक्षिप्त परीक्षण खाली केलें आहे—

(१) 'कथासरित्सागर' हा इ. स. च्या अकराव्या शतकांत काश्मीरमध्ये रचलेला संस्कृत ग्रंथ. त्याचें मूळ गुणाढ्याची पैशाची भाषेंत रचलेली 'बृहत्कथा' ही होती, ती आता उपलब्ध नाही. 'कथासरित्सागरा'-शिवाय तिचीं आणखी दोन संस्कृत रूपान्तरें—'बृहत्कथामंजरी' व 'बृहत्कथा-श्लोकसंग्रह'–विद्यमान आहेत. याशिवाय गुणाढ्याची कथा 'नेपाळ-माहात्म्यां'तहि येते. या चार ग्रंथांतील कथांत अनेक भेद आहेत. मूळ बृहत्कथेंत परमारवंशी विक्रमादित्याची कथा होती किंवा तिच्या व संस्कृत रूपांतरांच्या मध्ये जो हजार वर्षांचा दीर्घ कालावधि लोटला त्यामध्ये ती कल्पित कथा घुसडण्यांत आली हें निश्चित करणें जरूर आहे; पण तें अत्यंत दुष्कर आहे. कथेच्या स्वरूपावरून अनुमान केलें तर ती ऐति-

हासिक असेल असें वाटत नाही. शिवाय परमारवंशी विक्रमादित्याचा अन्यत्र कोठेंहि, पुराणांत किंवा कोरीव लेखांत, उल्लेख येत नाही. इतकेंच नाही तर कोरीव लेखांसारख्या अस्सल प्रकारच्या ऐतिहासिक साधनांवरून माळव्याचा खिस्तपूर्व पहिल्या शतकाचा जो इतिहास ज्ञात झाला आहे त्याशीं या कथेचा विरोध आहे. त्या शतकांत उज्जैनीस शकांचें राज्य होतें हें कोरीव लेखांवरून सिद्ध झालें आहे.

शिवाय, या कथेंत कालविपर्यय (anachronism) हा मोठा दोष आहे. हा विषमशील विक्रमादित्य इ. स. पूर्वी ५८ व्या वर्षी स्थापिलेल्या विक्रमसंवताचा उत्पादक असें शेंबवणेकरांचें म्हणणें आहे. अर्थात् तो खिस्तपूर्व पहिल्या शतकांत झालेला. मग त्याची कथा खिस्तपूर्व पांचव्या शतकांत होऊन गेलेल्या नरवाहनदत्ताला काश्यप किंवा कण्व-मुनीने एका अरण्यांत सांगितली, असें जें 'कथासरित्सागर' (१८, १, ३–८) व 'बृहत्कथामंजरी' (१०, १, २–१२) या 'बृहत्कथे'च्या दोन्ही रूपान्तरांत वर्णिलें आहे, त्याची संगति कशी लावावयाची? नरवाहनदत्त हा वत्सराज उदयनाला वासवदत्तेच्या पोटीं झालेला मुलगा. उदयन हा गौतम बुद्धाचा समकालीन होता. तेव्हा तो खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्या अखेरीस व त्याचा मुलगा नरवाहनदत्त खिस्तपूर्व पांचव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला यांत संशय नाही. तेव्हा नरवाहनदत्ताला ज्याची कथा सांगितली तो विषमशील–विक्रमादित्य विक्रमसंवताचा संस्थापक होऊंच शकत नाही. बरें, हा विषमशील–विक्रमादित्य विक्रमसंवताचा संस्थापक मानला तरी तो परमारवंशी कशावरून? 'कथासरित्सागरा'दि ग्रंथांत तसा निर्देश नाही. पुराणांत तर त्याचें नांवहि येत नाही. तो परमारवंशी होता, असें मानण्यास शेंबवणेकरांस आधार मिळाला तो त्यानंतर हजार–पंधराशें वर्षांनी रचलेल्या राजपुतांच्या वंशावळींत व अबुल फाजलच्या 'ऐनी अकबरीं'त! या वंशावळी ऐतिहासिक कालाकरिता कशा अविश्वसनीय आहेत हें म. म. गौरीशंकर ओझांनी आपल्या राजपुन्याच्या इतिहासांत अनेक ठिकाणीं दाखवून दिलें आहे. अशा रीतीने वडाची साल पिंपळाला लावून शेंबवणेकरांनी ही परमारवंशी विक्रमादित्याची कल्पित कथा रचली आहे!

(२) फेरिश्ता हा संवत्स्थापक विक्रमादित्यानंतर हजारों वर्षांनी झालेला. त्याची साक्ष या बाबतींत अत्यंत निर्बल आहे. गुप्त राजांचा शैवपंथालाहि आश्रय होता तेव्हा हें प्रमाण गुप्तवंशी विक्रमादित्याच्या विरुद्ध नाही.

(३) गाथासप्तशतींत इ. स. च्या आठव्या शतकापर्यंत वेळोवेळीं अनेक फेरफार करण्यांत आले. कांही गाथा गाळून त्यांच्या जागीं नंतरच्या कवींच्या गाथा घालण्यांत आल्या हें मी इतरत्र सप्रमाण सिद्ध केलें आहे. (संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. १०४–१२० पाहा.) गुप्त नृपति द्वितीय चन्द्रगुप्त विक्रमादित्य याच्या विषयी लक्षदानाच्या अशा कथा प्राचीन काळीं प्रचलित होत्या असें कोरीव लेखांच्या पुराव्यावरून त्याच लेखांत दाखविलें आहे. तेव्हा हें प्रमाण परमारवंशी विक्रमादित्या-विरुद्ध जातें.

(४) सध्याच्या माळव्याला खिस्तपूर्व पहिल्या शतकांत मालव असें नांव नव्हतें. तें खिस्तोत्तर चौथ्या–पांचव्या शतकांत मालवगणाची तेथे वसती झाली तेव्हा तें त्याला मिळालें. त्याचें पूर्वीचें नांव अवन्ति किंवा आकरावन्ति. तेव्हा मालव देशांत हा संवत् स्थापल्यामुळे त्याला मालव संवत् म्हणूं लागले व मागे उद्‌धृत केलेल्या शब्दप्रयोगांचा अर्थ ‘मालव देशांतील गणनेप्रमाणे’ असा आहे हें म्हणणें लटकें पडतें. शिवाय मालवसंवताचे आरंभींचे लेख माळव्यांत सापडले नसून राजस्थानमध्ये पूर्वीच्या उदेपूर, कोटा, जयपूर आणि भरतपूर संस्थानांत सापडले आहेत. मालवांचा गण किंवा प्रजासत्ताक राज्य होतें. त्यांचीं शेकडों नाणीं, ‘मालवांना जयः’ असा लेख असलेलीं, राजपुतान्यांत सापडलीं आहेत. अलेक्झांडरला मालव व क्षुद्रक गणांनी पंजाबांत प्रतिकार केला होता. त्यांचें वर्णन ‘प्रजासत्ताक राज्यें’ म्हणूनच तत्कालीन ग्रीक लेखकांनी केलें आहे. तेव्हा ‘मालवानां गणस्थित्या’ याचा अर्थ ‘मालवगणस्य स्थित्या’ (मालवगणाच्या पद्धतीप्रमाणे) असा केला पाहिजे. असे सापेक्ष-समास कोरीव लेखांत अनेक ठिकाणीं येतात हें अभ्यासकांस माहीत आहे. मालवगणामध्ये प्रचलित असलेला संवत् आरंभीं ‘कृत’ नांवाने प्रसिद्ध होता. ‘श्रीमालवगणाम्नाते प्रशस्ते कृतसंज्ञिते’ हा मंदसोर येथील वि. सं.

४६१ चा लेख पाहा. पुढे कित्येक शतकांनी विक्रमादित्याचें नांव त्याशीं हळूहळू संलग्न झालें. सध्याच्या शालिवाहनशकाच्या बाबतींतहि असाच प्रकार घडला असल्याचें मी इतरत्र 'शालिवाहनशकाची पूर्वपीठिका' या लेखांत सप्रमाण दाखविलें आहे. (संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. १५१-१५८ पाहा.)

'श्रीमालवगणाम्नातें', 'मालवगणस्थितिवशात्' इत्यादि कोरीव लेखांतील उल्लेखांत 'गण' याचा अर्थ 'गणना' असा करणें शक्य नाही. नाहीतर मालवगणाच्या व यौधेयगणाच्या नाण्यांवरील 'मालवगणस्य जयः' 'यौधेयगणस्य जयः' या लेखांचा अर्थ 'मालवांच्या व यौधेयांच्या गणनेचा जयजयकार' असा होईल व तो हास्यास्पद ठरेल हें उघड आहे.

तेव्हा विक्रमसंवत् हा परमारवंशी विक्रमादित्याने स्थापला असणें शक्य नाही हें दिसून येईल. या नांवाचा राजाहि खिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला, याला पुरावा नाही.

सिद्धांत तिसरा

कालिदास हा खिस्तपूर्व पहिल्या शतकांत परमारवंशी महेन्द्रपुत्र विक्रमादित्याच्या दरबारीं होऊन गेला. तो इ. स. च्या चौथ्या शतकांत द्वितीय-चन्द्रगुप्त-विक्रमादित्याचा राजकवि असणें शक्य नाही. कारण-

(१) 'मेघदूत', श्लोक ३० मध्ये उज्जैनींतले लोक परदेशीयांना उज्जैनींतील उदयनाशीं संबंध असलेलीं स्थळें दाखवीत असें वर्णन आलें आहे. अशा आख्यायिका फार तर पांचशें वर्षें लोकांत प्रचलित राहिल्या असाव्या. उदयन व परमारवंशी विक्रमादित्याच्या काळामधील अंतर यापेक्षा फार नाही. कालिदास गुप्तकालांत होऊन गेला असल्यास मात्र तें आठशें वर्षें होईल व त्या काळीं अशा कथा प्रचलित असणें असंभवनीय आहे.

(२) कालिदासाने 'विक्रमोर्वशीयां'त 'महेन्द्र' व 'विक्रम' शब्दांचा उपयोग बुद्धिपुरस्सर वारंवार केला आहे. यांत त्याचा उद्देश परमारवंशी महेन्द्रादित्य व त्याचा मुलगा विषमशील-विक्रमादित्य यांचा नामोल्लेख करण्याचा असावा.

(३) परमारवंशी विक्रमादित्य शिवोपासक होता, तेव्हा त्याने शैव कालिदासाला आश्रय दिला तर तें स्वाभाविकच आहे. गुप्त राजे वैष्णव होते. त्यांचा शिवोपासक कालिदासाला आश्रय असणें असंभवनीय आहे.

(४) कालिदास व अश्वघोष यांच्या ग्रंथांत साम्यस्थळें आहेत पण त्यांवरून अश्वघोषानेच कालिदासाचें अनुकरण केलें असावें, हें स्पष्ट दिसतें. कारण लघुकविच महाकवींचें अनुकरण करतात व अश्वघोष हा कालिदासाच्या तुलनेने लघुकवि होय. शिवाय अश्वघोषाचे ग्रंथ ब्राह्मण ग्रंथकारांमध्ये प्रचलित होते असें दिसत नाही; कारण कोणत्याहि सुभाषित-संग्रहांत किंवा अलंकारग्रंथांत त्यांचा किंवा त्यांचा कर्ता अश्वघोष याचा उल्लेख नाही.

(५) कालिदासाच्या ग्रंथांत अपाणिनीय प्रयोग आढळतात, तेव्हा तो पाणिनीय व्याकरणास सर्वमान्यता मिळण्यापूर्वी होऊन गेला असावा. तें व्याकरण खिस्तोत्तर चौथ्या शतकांत मान्यता पावलें होतें. तेव्हा त्या काळीं कालिदास झाला असणें शक्य नाही. वरील प्रमाणांवरून कालिदास खिस्तपूर्व पहिल्या शतकांत परमारवंशी विक्रमादित्याच्या दरबारीं होऊन गेला असावा असा निष्कर्ष प्रा. शेंबवणेकरांनी काढला आहे.

वरील प्रमाणांचें परीक्षण

आता वरील प्रमाणांचें थोडक्यांत परीक्षण करूं.

(१) आख्यायिका पांचशे वर्षांपेक्षा जास्त प्रचलित राहूं शकत नाहीत असा नियम नाही. बाणाच्या 'हर्षचरितां'त सेनापति पुष्यमित्राने मौर्य नृपति बृहद्रथाला कसें ठार मारलें याची इतरत्र कोठेहि न आढळणारी माहिती दिली आहे. बाण पुष्यमित्रानंतर सुमारें आठशें वर्षांनी होऊन गेला. उदयनवासवदत्तेची प्रणयकथा अत्यंत लोकप्रिय झाल्याने तिजवर अनेक कवींनी नाटकें लिहिलीं आहेत. उदाहरणार्थ, मायुराज कवीने इ. स. च्या आठव्या शतकांत 'तापसवत्सराज' हें नाटक लिहिलें होतें तें आता प्रसिद्ध झालें आहे. तेव्हा गुप्तकालीं ही आख्यायिका उज्जैनींत प्रचलित नसेल असें म्हणतां येत नाही.

(२) महेन्द्र व विक्रम हे शब्द कालिदासाने सहेतुक योजिले असल्यास ते कुमारगुप्त व द्वितीयचन्द्रगुप्त यांस उद्देशून असण्याचा संभव आहे. कारण त्यांच्या नाण्यांवर अनुक्रमें महेन्द्रादित्य व विक्रमादित्य अशा पदव्या आढळतात.

(३) विष्णूपासक चन्द्रगुप्ताने शिवोपासक कालिदासाला आश्रय दिला यांत असंभवनीय असें कांही नाही. प्राचीन काळीं भारतीय राजे अत्यंत धर्मसहिष्णु असत. वैष्णव राजांनी शिवालयें बांधल्याचीं व शैव राजांनी विष्णूच्या देवालयांना देणग्या दिल्याचीं अनेक उदाहरणें कोरीव लेखांत आढळतात. इतकेंच नव्हे तर हिंदु राजांनी बौद्ध विहारांनाही गावें दान दिल्याचीं उदाहरणें थोडींथोडकीं नाहीत. शैव कालिदासाने विष्णूचा अवतार रामचंद्र याचें चरित्र गाइलें आहे, तें आपल्या विष्णूपासक आश्रयदात्याच्या इच्छेवरून गाइलें असावें, असेंहि अनुमान करतां येईल.

(४) कालिदास व अश्वघोष यांच्या ग्रंथांतील समान स्थलांची चर्चा मी आपल्या 'कालिदास' ग्रंथांत (पृ. १२–१६) केली आहे. त्यांत या प्रमाणाला उत्तर सापडेल. अश्वघोषाचे ग्रंथ हिंदु सुभाषितकारांना व आलंकारिकांना अज्ञात नसून इ० स० च्या बाराव्या शतकापर्यंत त्यांचा सर्वत्र प्रचार होता हें मी इतरत्र सिद्ध केलें आहे. (संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. ४७–५२ पहा.)

(५) कालिदासाच्या ग्रंथांपेक्षा अश्वघोषाच्या ग्रंथांत अपाणिनीय प्रयोग जास्त आढळतात ('कालिदास', पृ. ९८ पाहा). तेव्हा हें प्रमाण स्वीकारल्यास अश्वघोष कालिदासापेक्षा अगोदरचा ठरावा. कालिदासाने योजिलेले कांही प्रयोग, उदाहरणार्थ, तं पातयां प्रथममास पपात पश्चात् । (रघु. ९, ६१), प्रभ्रंशयां यो नहुषं चकार । (रघु. १३, ३६) गुप्तकालीन कोरीव लेखांतहि आढळतात. उदाहरणार्थ, 'संरञ्जयां च प्रकृतीर्बभूव पूर्वस्मिताभाषणमानदानैः' हा स्कन्दगुप्ताच्या गिरनार प्रस्तरलेखांतील श्लोकार्ध पाहा. तेव्हा हें प्रमाणहि गुप्तकालपक्षाविरुद्ध जात नाही.

येथपर्यंत प्रा. शेंबवणेकरांच्या पुस्तकांतील सर्व महत्त्वाच्या प्रमाणांचा विचार करून, कालिदास परमारवंशी विक्रमादित्याच्या दरबारीं खिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला हें सिद्ध करण्यास तीं कशीं असमर्थ आहेत हें दाखविलें; तसेंच गुप्तकाळांत संस्कृत विद्या, शास्त्रें व कला यांची अभूतपूर्व अशी भरभराट झाली होती आणि त्या काळीं देशांत शांतता व सुबत्ता नांदत असल्यामुळे व लोक सुखी होते म्हणून त्या काळाला सुवर्णयुग

म्हणण्यांत मुळीच अतिशयोक्ति होत नाही हेंहि सप्रमाण प्रतिपादिलें. या विषयाची रजा घेण्यापूर्वी प्रा. शेंबवणेकरांना एकदोन स्नेहभावाच्या सूचना करावयाच्या आहेत. त्यांनी अनेक ठिकाणीं गुप्तनृपतींचा सर्व इतिहास कोरीव लेख व नाणीं यांवर आधारलेला आहे, त्याला परंपरागत कथांचें (traditions) पाठबळ नाही असें म्हटलें आहे; पण तें खरें नाही. गुप्तकालपक्षाला उपोद्बलक अशा कांही परंपरागत कथा (उदाहरणार्थ, कालिदासाचें कुन्तलेश्वराकडे चन्द्रगुप्ताचा दूत म्हणून जाणें, विक्रमादित्याच्या आज्ञेवरून प्रवरसेनाकरिता 'सेतुबंध' काव्य रचणें इत्यादि) राजशेखर, क्षेमेन्द्र यांसारख्या संस्कृत ग्रंथकारांनी व टीकाकारांनी दिल्या आहेत. परंपरागत कथांचा तत्कालीन कोरीव लेखादि अस्सल पुराव्याशीं विरोध येतो तेव्हा संशोधक परंपरागत कथांना प्रमाण मानीत नाहीत. प्रा. शेंबवणेकरांनीहि 'भोजप्रबंधा'दि ग्रंथांतील कालिदासविषयक कथा प्रमाण मानल्या नाहीत. त्यांना त्यांची उपपत्ति अन्य तऱ्हेने लावून दाखवावी लागली आहे (पृ. ५९). परंपरागत कथांत अनेकदा परस्परविरोध दृष्टीस पडतो तसा तो कांही संस्कृत ग्रंथांतहि दिसतो. तेव्हा केवळ याच तऱ्हेच्या प्रमाणांवर भिस्त न ठेवतां उपलब्ध सर्व ऐतिहासिक साधनांचा यथायोग्य उपयोग करून केवळ सत्यान्वेषण दृष्टीने विवाद्य प्रश्नांचा त्यांनी विचार केल्यास त्यांचें संशोधन सर्वसंमत होईल.

परिशिष्ट

प्रा. वा. वि. मिराशी यांचे संशोधनपर ग्रंथ व लेख

इंग्रजी

WORK

Inscriptions of the Vākāṭakas (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. V) (in the Press).

ARTICLES*

1 Identification of King Sātavāhana of the Coins (1954), *J. N. S. I.*, XVI, 20 f.

2 The Home of Guṇāḍhya (1954), *Oriental Thought*, (1954), I, 42 f.

3 The Date of the Andhāvaram Plates of Gaṅga Indravarman (1954), *I. H. Q.*, XXX, 271 f.

4 Indragadh Stone Inscription of Rāshṭrakūṭa Nanna (1955), *I. H. Q.*, XXXI, 99. f.

5 Muria Stone Inscription of Śaṅkaragaṇa I (1955), *A. B. O. R. I.*, XXXV, 20 f.

6 Jabalpur Stone Inscription of Śaṅkaragaṇa III (1955), *Ibid.*, XXXV, 23 f.

---

* For a list of the earlier 151 research articles, see Saṃśodhana-muktāvali, Part I, pp. 197–206. For the abbreviations used here, see *ibid.*, p. 196.

7 A Gold Coin of Chandella Vīravarman, (1955) *J. N. S. I.*, XVII, 237 f.

8 A Copper Coin of Krishṇarāya, (1955), *Ibid.*, XVII, 99 f.

9 A Further Note on the Dhulev Plates of Mahārāja Bhetti (1955) (to be published in *E. I.*).

10 A Note on the Maser Inscription of a Śulkī Chief (1955), *I. H. Q.*, XXXI, 105 f.

11 Jabalpur Stone Inscription of the Goṇḍ King Dalpatshāh, (1956), *A. B. N. U. H. S.*, Nos. 8–10, pp. 1 f.

12 Numismatic Notes (1956), *J. N. S. I.*, XVIII, 116 f.

13 A Note on the Bhilsa Inscription of Vāchaspati (1956) (to be published in the Sārdhaśatābdī Volume of the Asiatic Society of Bombay)

14 Vākāṭaka Pṛthivīsheṇa, Suzerain of Vyāghra (1956) (to be published in the *Belvalkar Felicitation Volume*).

15 Identification of Vāmadeva of Kalachuri Inscriptions (1956) (to published in *I. H. Q.*).

मराठी

ग्रंथ

१. कालिदास (मराठी) (द्वितीयावृत्ति, १९५७) (व्हीनस प्रकाशन, पुणें).

२. कालिदास (हिंदी) (द्वितीयावृत्ति, १९५६) (हिंदी–ग्रंथ–रत्नाकर, मुंबई).

३. कलचुरि नृपति आणि त्यांचा काल (१९५६) (मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद्, नागपूर).

४. वाकाटक नृपति आणि त्यांचा काल (१९५६) (वाठोडकर व्याख्यानमाला, नागपूर विश्वविद्यालय) (छापत आहे).

लेख*

§१. प्राध्यापक शेंबवणेकर आणि गुप्त सम्राट् (युगवाणी, दिवाळी अंक १९५४).

२. मत्तमयूर व गोलकी मठ (नवभारत, जानेवारी, १९५५).

३. प्रा. शेंबवणेकर आणि गुप्तकाल प्रा. शेंबवणेकरांस उत्तर) (युगवाणी, फेब्रुवारी १९५५).

§४. संस्कृत 'मृच्छकटिक' नाटकाबद्दल कांही विचार (नवभारत, डिसेंबर, १९५५).

§५. संस्कृत आणि मराठी 'मृच्छकटिक' (१९५५) (महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष २९, अंक ११४).

६. पंढरपूरचा शिलालेख (१९५६) (महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष ३०, अंक ११८).

§७. महाराष्ट्र आणि बौद्ध धर्म (नवभारत, सप्टेंबर १९५६).

८. प्राचीन विदर्भ (मातृभूमि, दिवाळी विशेषांक, १९५६).

९. जबलपूर येथील गोंडनृपति दलपतशहाचा शिलालेख, [विक्रम] संवत् १६०६ (१९५६), (ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६, पृ. ५१–५५) (भा. इ. सं. मं.)

१०. पैठणचा नवीन शिलालेख (नवभारत, डिसेंबर १९५६).

---

* यापूर्वीच्या ७० लेखांची यादी संशोधन मुक्तावलि, सर पहिला, पृ. २०७–२११ वर दिली आहे.

§ या चिह्नाने अंकित लेख प्रस्तुत पुस्तकांत घेतले आहेत.

सूची

संशोधनमुक्तावलि, सर पहिला, यावरील कांही अभिप्राय

१

रावबहादूर डॉ. **गोविंद सखाराम सरदेसाई**, रियासतकार, लिहितात—

"प्रा. मिराशी यांचे लेख मी थोडेबहुत पूर्वी वाचले होते, पण आजच्या या लेखांनी त्यांच्या अगाध ज्ञानाचा व खोचदार संशोधनाचा मला फार फार आदर वाटतो. खरें संशोधन कसें असावें, अभ्यासूंनी या कामांत प्रवेश व श्रम कसे करावे, आणि आपले निर्णय कोणत्या पद्धतीने वाचकांपुढे मांडावे यांचे उत्कृष्ट मासले त्यांनी हिंदी जनतेला या लेखांच्या द्वारें कायमचे पुरविले आहेत. वाङ्मयांतून संशोधन कसें वेचून काढावें याचा एक मोठा प्रबंधच त्यांनी वाचकांपुढे मांडला आहे. नवीन शास्त्रच निर्माण केलें आहे. काव्यें, नाटकें, शिलालेख, मूर्ति, स्थापत्य, नाणीं या विविध विषयांचें मंथन इतक्या मार्मिकतेने दाखविलेलें मला फारसें माहीत नाही. सर्वच लेख मी मोठ्या उत्कंठतेने वाचले.

✠ ✠ ✠

"या सर्व सिद्धांताच्या मागे प्रत्यक्ष अवलोकन, अगाध वाचन, अहोरात्र विचार यांची जुळणी प्रा. मिराशी यांचे ठिकाणीं जमलेली पाहून धन्यता वाटली. सर्व पुस्तक अभ्यासकांना चिरंतन मार्गदर्शन करील यांत संशय नाही"

—**युगवाणी**, नागपूर, सप्टेंबर १९५४.

२

डॉ. **के. ना. वाटवे**, संस्कृत व मराठीचे प्राध्यापक, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें—

"संस्कृतचे प्राध्यापक व महाविद्यालयाचे प्राचार्य या नात्यांनी आपला मुख्य व्यवसाय उत्तम तऱ्हेने संभाळून महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांनी गेल्या दोन सव्वा दोन तपांत बजावलेली संशोधनविषयक भरीव कामगिरी आदर्शभूत व आदरणीय आहे. त्यांची बुद्धि कुशाग्र आणि चतुरस्र, व्यासंग विस्तृत आणि सखोल व वृत्ति समतोल व संयमित आहे."

✠ ✠ ✠

"प्राचीन भारताच्या इतिहासाची जुळवाजुळव ही अत्यंत अल्प, संदिग्ध व अपुऱ्या पुराव्यावर आधारलेली एक अनुमानाची साखळीच बहुतांशीं असते. काल जितका जितका अधिक प्राचीन तितका तितका पुराव्याचा अपुरेपणा व अनुमानावरचा भर अधिक वाढत जातो. अशा स्थितींत खरा इतिहास उपलब्ध करून द्यावयाचा असल्यास इतिहास-संशोधकाने आत्मनिष्ठा कमी करून वस्तुनिष्ठेवरच अधिक विसंबिलें पाहिजे. म्हणजे आपलें मनोगत, आपलें गृहीत कृत्य वा आपलें इष्ट पुराव्याला मारून मुटकून बोलावयास न लावतां त्याला आपल्या तोंडानें आपलें (म्हणजे त्याचेंच) मनोगत मोकळेपणाने बोलूं दिलें पाहिजे. यालाच वस्तुनिष्ठ, निःपक्षपाती व म्हणूनच विश्वसनीय संशोधन म्हणतां येईल. प्रा. मिराशी यांचें संशोधन ह्या प्रकारांतील आहे.

✠ ✠ ✠

"अनेक गत व विद्यमान संशोधकांच्या प्रयत्नांनीच प्राचीन भारताचा व महाराष्ट्राचा विश्वसनीय इतिहास लिहिला जाणार आहे. त्यांत प्रा. मिराशी यांच्या संशोधनमुक्तावलीला मानाचें स्थान आहे. तिचे आणखी अधिक सर यापुढे मराठींतच प्रसिद्ध व्हावे व त्यांनी मराठी संशोधनाला मार्गदर्शन लाभावें अशी कोणाहि संशोधनप्रेमी वाचकाची उत्कट इच्छा साहजिकच असणार." —**महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, वर्ष २७, अंक १०९ (एप्रिल-जून १९५४).

३

साहित्याचार्य **बाळशास्त्री हरदास**, नागपूर—

वस्तुनिष्ठ संशोधन हें म. म. मिराशी यांच्या संशोधनपद्धतीचें डोळ्यांत भरणारें पहिलें वैशिष्ट्य होय. कोणत्याहि भावनेच्या सहसा आहारीं न जातां व कोणत्याहि गोष्टीविषयी पूर्वग्रह अंतःकरणांत न बाळगतां शक्य असेल तेवढें करावें आणि प्राचीन इतिहासाचीं साधनें एकत्रित करून त्यावरून आपल्या प्रतिभेच्या दर्पणांत जें प्रतिबिंबित होईल तेंच ग्राह्य म्हणून उपलब्ध सर्व पुराव्यानिशीं पुढे मांडावें ही त्यांची वृत्ति आहे. त्यामुळे पंडितंमन्य अशा पूर्वग्रहदूषित संशोधकांना प्रा. मिराशी यांचें म्हणणें खोडून काढणें कठीण जातें.

✠ ✠ ✠

वस्तुनिष्ठ संशोधनपद्धतीबरोबरच म. म. मिराशी यांच्या लेखन-पद्धतीचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या मनाचा समतोलपणा हें होय. आग्रहीपणाच्या आहारीं जाऊन प्रतिपक्षाने कितीहि मर्यादाभंग केला, तरी नानासाहेब मिराशी यांची लेखणी आपली शालीनता कधीहि सोडावयाची नाही. भरपूर पुराव्याचें माप पदरांत घालणें हेंच प्रतिपक्षाच्या खंडनाचें ते खरें साधन समजतात व अत्यंत सभ्य आणि शालीन भाषेंत तें माप पदरांत घातल्यावर चुकूनहि अधिक उगा शब्द न वापरतां ते त्याचा निरोप घेतात.

✠ ✠ ✠

श्री. नानासाहेब मिराशी यांचा तिसरा विशेष म्हणजे त्यांची आकर्षक व सहजरम्य लेखनपद्धति होय. संशोधनासारख्या प्रमाणबद्ध, किचकट, रूक्ष अशा विषयाच्या लेखनांत आलंकारिक भाषेची व साहित्य-गुणांची फारशी कोणी अपेक्षा करीत नाही. पण नानासाहेबांची सहजरम्य लेखनपद्धति त्यांच्या रूक्ष विषयांकडे सुद्धा वाचकांचें चित्त आकृष्ट केल्या-विना राहत नाही." —'महाराष्ट्र', नागपूर, ११ जुलै १९५४.

४

"संशोधन-मुक्तावलि (सर पहिला) या दोनशें पानांच्या पुस्तकांत प्रो. मिराशी यांनी चहुकडे विखुरलेले कित्येक वर्षांतील फुटकळ लेख पुनः एकत्र छापल्याने अभ्यासकांची मोठी सोय झाली आहे. संशोधनाच्या दृष्टीने संस्कृत, प्राकृत वगैरे वाङ्मय सूक्ष्मतेने तपासण्याची केवढी निकड आहे आणि त्यांत केवढें नवीन उद्योगक्षेत्र आहे हें हे लेख वाचल्याने स्पष्ट निदर्शनास येतें.

✠ ✠

" दुसरा एक विशिष्ट गुण प्रो. मिराशी यांचा सहज लक्षांत येतो. संशोधकाची मनोवृत्ति किती निर्विकार पाहिजे, प्रतिपक्षाचें खंडन करतांना शब्द व मतलब किती जपून मांडला पाहिजे, याचा कित्ता त्यांच्या लेखांत विशेष निदर्शनास येतो. सर्व प्रकारच्या संशोधकांना प्रो. मिराशी यांचें पुस्तक मार्गदर्शी होईल इतकें तें निःपक्षपाती वृत्तीचें द्योतक आहे. "

—'सकाळ', पुणें, २९ आगष्ट १९५४.

मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर

स्वीय व पुरस्कृत ग्रंथ

१ नागपूरकर भोसल्यांची बखर

विदर्भांतील नामवंत इतिहासकार **कै. यादव माधव काळे** यांनी संपादिलेली द्वितीयावृत्ति, **किंमत अडीच रुपये**

२ दृष्टान्तपाठ—(यादवकालीन मराठी गद्य प्रबंध)

लेखक–**कै. नी. ब. भवाळकर** आणि **कै. ह. ना. नेने** (शिल्लक नाही)

३ निवडक निबंध, खंड १

कै म. म. कृष्णशास्त्री घुले, कै. नी. ब. भवाळकर, कै. डॉ. दफ्तरी, म. म. प्रा मिराशी, प्रा. नेने, डॉ. य. खु देशपांडे, श्री. दे. गो. लांडगे

यांच्या विविध विषयांवरील संशोधनपर लेखांचा संग्रह, किंमत दोन रुपये.

४ नागपूरचा सांस्कृतिक इतिहास

भोसल्यांच्या राज्यस्थापनेपासून सुमारें दीडशें वर्षांचा नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासाचा सर्वांगीण परामर्श.

लेखक—**श्री. दे. गो. लांडगे** **किंमत दोन रुपये**

५. संशोधनमुक्तावलि : सर पहिला

यांत कालिदास, भवभूति सर्वसेन, प्रवरसेन इत्यादि संस्कृत व प्राकृत कवींविषयी व सातवाहन, गुप्त, वाकाटक, कलचुरि इत्यादि प्राचीन राजवंशांविषयी नवीन माहिती आहे.

लेखक—महामहोपाध्याय **वा. वि. मिराशी** **किंमत चार रुपये**

प्राप्तिस्थान––१ चिटणीस, **विदर्भ संशोधन मंडळ,**
विदर्भ साहित्य मंदिर, सीताबर्डी, नागपूर १.
२ **डेनेट आणि कंपनी**, सीताबर्डी, नागपूर १.